एकुण आरक्षणे	विकसित	भागश विकसित	प्रगती पथावर	टीडी आर माध्यामातून हस्तांतरीत झालेली	अविकसित आरक्षणे

वरील तक्त्यामधील महिती बांधकाम विभागाशी संबंधीत असल्याने नगररचना विभागने त्यांचेकडील पत्र क्र.1021 दि.09/03/2016 अन्वये बांधकाम विभागास पुरविणेबाबत कळविले होते. परंतु अशी माहिती बांधकाम विभागने सादर केली नाही. त्यामुळे एकूण आरक्षणे किती होती यापैकी विकसित

किती व भागश: विकसित प्रगतीपथावर किती तसेच टी.डी.आर माध्यमातून हस्तांतरीत झालेली प्रकरणे याबाबतची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध् न झाल्यामुळे त्यावरील अभिप्राय नोंदविता आले नाहीत.

DATNDMM5801 (Ref No : 95, Hmm No : 17)

5 केंद्र शासनाचे सॅट लाईट सिटींना पायभुत सुविधा निर्माण करणे अंतर्गत घनकचरा, व्यवस्थापन कामी वाहन खरेदी करण्याबाबत

घनकचरा, व्यवस्थापन कामी वाहन खरेदी

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 08

लेखा शीर्ष : घनकचरा व्यवस्थापन केंद्र, राज्य, मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 66588058.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 66588058.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 7049946.00/-

महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियमाचे कलम 73 नुसार खरेदीबाबत केलेल्या संविदा लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिल्या नाहीत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता, 1971 मधील नियम 44 नुसार जंगम मालमत्ता नोंदवही नमुना क्रमांक 114 मध्ये खरेदी केलेले कॉम्पेक्टर, चेसीज, टेंपो, कचरा कुंडया, सक्शन मशीन, प्रेशरजेट, इ. ची नोंद घेवून विनीयोग दाखविला नाही. खरेदी साहित्याची आवश्यकता असल्याबाबतची मागणीपत्र उपलब्ध झाले नाही. प्राप्त अनुदानातुन खर्च रक्कम रु.6,65,88,058/- चे विनीयोग प्रमाणपत्र केंद्र, राज्य शासनास पाठविले नाही. कॉम्पेक्टर, टीपर भाडयाची रक्कम रु.70,49,946/- वसुल केली नाही. 2013-14 मधील खर्च रु.6,65,88,058/- बाबतचे अभिलेखे मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिले नाहीत. योजनेतुन काय साध्य झाले याचा फलश्रुती अहवाल केंद्र, राज्य शासनास पाठविला नाही. तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेतले नाही.

केंद्र शासनाने सॅटेलाईट सिटींना पायाभुत सुविधा पुरविणे अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेची निवड केली असुन महापालिकेने नोडल एजन्सी मार्फत विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन राज्य शासना मार्फत केंद्र शासनाकडे पाठविला होता. केंद्र शासनाने घनकचरा व्यवस्थापन व भुयारी गटार मलनिसा:रण योजनेच्या कामास मंजुरी दिली आहे. या योजने अंतर्गत मिळणारे अनुदान- केंद्र हिस्सा 80%, राज्य हिस्सा 10%, मनपा हिस्सा 10% या प्रमाणे आहे. घनकचरा कामाच्या व्यवस्थापनासाठी पुढील दर्शविल्याप्रमाणे अनुदान मिळाले असुन महापालिकेने खर्च केला आहे.

घनकचरा व्यवस्थापन **रक्कम रु. (हजारात)**

अनुदान	31/3/2013 पर्यंत प्राप्त झालेले	2013-14	2014-15	31/03/15 पर्यंत एकूण	खर्च	31/03/13 पर्यंत खर्च झालेले	2013-14	2014-15	एकूण 31/3/2015 पर्यंत
घनकचरा व्यवस्थापन					घनकचरा व्यवस्थापन				
केंद्र हिस्सा	63453	-	63453	126906					
राज्य हिस्सा	7932	-	7932	15864					
मनपा हिस्सा	7932	-	-	7932		79734	66588	6055	152377
एकूण	79317	-	71385	150702		79734	66588	6055	152377

घनकचरा व्यवस्थापन कामी महापालिकेने 2013-14 मध्ये पुढील प्रमाणकाव्दारे खर्च केला आहे.

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	तपशिल
5	10/05/13	3,16,836	12 कॉम्पॅक्टर विमा नुतनिकरण - दि.न्यु इंडिया इ.
7	28/05/13	95,20,000	मे.ॲन्थोनी मोटर्स प्रा.लि. 12 टन क्षमतेचे कॉम्पॅक्टर बांधणेसाठी 8 नग चेसिज (मशीन, केबिन व सांगाडा)
13	12/08/13	19,65,000	मे.मरिन इंजिनिअरिंग 240 ली.क्षमतेच्या HDPC कचराकुंडी 500 नग
14	17/08/13	13,15,700	टाटा कंपनीचे मिनी हायड्रोलिक टिपर वाहन विमा - दि.न्यु इंडिया इ.
15	29/08/13	19,65,000	मे.मरिन इंजिनिअरिंग 240 ली क्षमतेच्या 500 नग कचराकुंडया
21	12/09/13	1,19,25,000	मे.ॲन्थोनी मोटर्स प्रा.लि. 8 नग कॉम्पेक्टर
22	10/10/13	35,000	श्री.गिल्सन घोन्सालविस यांस वाहन नोंदणी आगाऊ रक्कम
26	21/10/13	2,67,48,000	मे.बाफना मोटर्स - टाटा कंपनीचे ASE HT टम्पो 50 नग
27	25/10/13	29,47,500	मे.मरिन इंजिनिअरिंग 240 ली क्षमतेच्या 750 नग कचराकुंडया
34	04/12/13	9,82,500	मे.मरिन इंजिनिअरिंग 240 ली क्षमतेच्या 250 नग कचराकुंडया
35	07/12/13	5,25,026	कॉम्पेक्टर व टिपर विमा - दि.न्यु इंडिया इ

44	01/01/14	12,52,800	मे.आय.पी.डब्लू.टी-6000 ली क्षमतेचे माऊंटेड सक्सन युनिट-03 नग
45	01/01/14	6,55,200	मे.आय.पी.डब्लू.टी-3000 ली क्षमतेचे वॉटर टँकर प्रेशर जेट -02 नग
50	20/02/14	43,74,384	मे.बाफना मोटर्स - 6000 ली क्षमतेचे माऊंटेड सक्सन युनिट(टाटा)-03 नग
51	20/02/14	20,59,112	मे.बाफना मोटर्स - 3000 ली क्षमतेचे वॉटर टँकर प्रेशर जेट (टाटा)-02 नग
एकूण		6,65,88,058	

याबाबत लेखा परीक्षणाने अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.23, दिनांक 05/03/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) केंद्र, राज्य व महापालिका अनुदानातुन ही योजना राबविण्यात येत आहे. त्यासाठी उपरोक्त दर्शविल्यानुसार अनुदान प्राप्त झाले आहे. या योजनेतुन केलेल्या खर्चाची प्रमाणके व रोखवही उपलब्ध करुन देण्यात आली. मे. मरिन इंजिनअरींग यांच्या कडून 240 लि. क्षमतेच्या कचरा कुंडी खरेदीबाबतची संविदा लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिली. उर्वरीत रु.6,06,93,058/- खरेदीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 नुसार केलेल्या संविदा लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिल्या नाहीत. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, 1930 चे कलम 06 व सुधारीत अध्यादेश, 2011 अन्वये - लेखापरीक्षणासाठी दप्तरी लेखे उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

2) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 144 नुसार जंगम मालमत्ता नोंदवही नमुना नं.114 मध्ये ठेवायची आहे. त्यात मनपा मालकीच्या कचरा सफाई गाडया, इंजने, यंत्रे, फर्निचर इ. नोंदी घेऊन त्यांचा विनियोग दाखविणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेने खरेदी केलेले कॉम्पेक्टर, चेसिज, टेम्पो, कचराकुंडया, सक्सन मशिन, प्रेशर जेट इत्यादीच्या नोंदी नमुना नं.114 (जंगम मालमत्ता) नोंदवहीत घेवून विनियोग दाखविला नाही.

3) खरेदी केलेल्या वस्तुंची आवश्यकता असल्याबाबत विभाग प्रमुखाचा अहवाल/मंजुर टिपणी मनपाची प्रशासकिय व आर्थिक मंजूरी, निविदा मंजूरी, इ. अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत.

4) प्राप्त अनुदानातुन केलेला खर्च रु.6,65,88,058/- बाबतचे विनियोग प्रमाणपत्र केंद्र व राज्य शासनाला पाठविले नाही.

5) घनकचरा व्यवस्थापन कामी मे. ॲन्थोनी कर्मशिअल मोटर यांचे कडुन 08 चेसीज खरेदी केल्या आहेत. (प्र.क्र.07दि28.05/2013रु.95,200/-) तसेच 08 कॉम्पेक्टर खरेदी केले आहेत. (प्र.क्र.21दि12.09/2013 रु.1,19,25,000/-)

तसेच मे. मरिन इंजिनियअरिंग यांचे कडुन एकूण 2000 कचरा कुंडया खरेदी केल्या आहेत.

या बाबत मागील लेखा परीक्षण अहवाल 2012-13 मधील परिच्छेद क्र.23 नुसार आक्षेप घेण्यात

आला आहे. स्थायी समिती ठराव क्र.713 दि.07.12.2012 अन्वये कॉम्पेक्टरचे भाडे रु.65,000/- प्रतिमहा व टिपरचे भाडे रु.15,000 प्रतिमहा ठरविले असुन सदरच्या भाडयाची रक्कम घनकचरा व्यावस्थापनासाठी नेमलेल्या ठेकेदारांचे देयकातुन वसुल करावयाची आहे. त्यानुसार -

दि.31.03.2013 अखेर 27 कॉम्पेक्टर व 20 टिपर भाड्याची थकबाकी	रु.45,00,000/-
2013-14 मधील 27 कॉम्पेक्टर व 20 टिपरची होणारी भाडे -	
कॉम्पेक्टर रु.	2,10,60,000
टिपर भाडे रु.	36,00,000
2013-14 मधील खरेदी केलेल्या 08 कॉम्पेक्टर भाडे (खरेदी सप्टे.13 मध्ये खरेदी म्हणून भाडे ऑक्टो.13 ते मार्च 14 एकूण 06 महिने)	31,20,000
एकुण ..	3,22,80,000/-

दिनांक 10-05-2016 रोजी विभागाने दाखविलेले अभिलेखे व लेखा विभागाकडे प्राप्त झालेली कॉम्पॅक्टर व टीपर भाडे वसुलीची रक्कम	25230054/-
	7049946/-

उपरोक्त भाडयाची रक्कम रु.7049946/- वसुलपात्र आहे.

6) 2013-14 या वर्षात एकूण खर्च रु.6,65,88,058/- केला असुन त्या बाबतचे अभिलेखे लेखा परीक्षणास न दाखविल्याने खर्चाच्या सत्यतेची पडताळणी करता येत नाही. सबब सदरच्या खर्चाची रक्कम लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

7) योजनेचे प्राप्त अनुदाना बाबत-शासन निर्णय क्र. यु.आय.डी.-2013,प्र.क्र.244(1)/नवि-33दि.21/02/2014 व शासन निर्णय क्र. यु.आय.डी.-2013,प्र.क्र.244(2)/नवि-33दि.21/02/2014 नुसार प्रस्तुत योजने अंर्तगत प्रकल्पांची अंमलबजावणी पूर्ण झाल्या नंतर या योजनेतुन काय साध्य झाले या बाबतचा अहवाल नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी राज्य शासन व केंद्र शासनास सादर करावयाचा आहे. घनकचरा व्यवस्थापन कामी खरेदी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. परंतु शासनास कामाची फलनिष्पत्ती कळविलेली नाही.

8)शासन निर्णय नगर विकास क्र.संकिर्ण 2008/1338/प्र.क्र.171/08/नवी20 दि.02/03/2009 अन्वये विकास कामासाठी त्रयस्थ संस्थेकडुन (Third Party Technical Audit) तांत्रिक लेखा परिक्षण करुन घेणे अनिवार्य आहे. ड वर्ग महापालिकेचे बाबत 50 लाखा पेक्षा अधिक रक्कमेची कामे असल्यास त्यांचे त्रयस्थ लेखा परिक्षण करुन घेणे आवश्यक आहे. खरेदीबाबत निविदा नस्ती, करार, इ. उपलब्ध

न झाल्याने अटी व शर्ती नमुद करता येत नाहीत.

वसुलपात्र कॉम्पॅक्टर व टीपर भाडयाची रक्कम रु. 7049946/-

अभिलेखे न दाखविल्याने आक्षेपाधीन रक्कम रु. 6,65,88,058/-

DATPMVM6001 (Ref No : 3, Hmm No : 23)

6 केंद्र शासनाचे सॅट लाईट सिटींना पायभुत सुविधा निर्माण करणे अंतर्गत घनकचरा, व्यवस्थापन कामी वाहन खरेदी करण्याबाबत

घनकचरा, व्यवस्थापन कामी वाहन खरेदी

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 07

लेखा शीर्ष : घनकचरा व्यवस्थापन केंद्र, राज्य, मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 6054650.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6054650.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 30900000.00/-

महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियमाचे कलम 73 नुसार वाहन खरेदीबाबत केलेल्या संविदा लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिल्या नाहीत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता, 1971 मधील नियम 44 नुसार जंगम मालमत्ता नोंदवही नमुना क्रमांक 114 मध्ये खरेदी केलेले कॉम्पेक्टर, चेसीज, टेंपो, कचरा कुंडया, सक्शन मशीन, प्रेशरजेट, इ. ची नोंद घेवून विनीयोग दाखविला नाही. खरेदी साहित्याची आवश्यकता असल्याबाबतची टिप्पणी उपलब्ध झाली नाही. प्राप्त अनुदानातुन खर्च केल्याबाबतचे विनीयोग प्रमाणपत्र केंद्र, राज्य शासनास पाठविले नाही. कॉम्पेक्टर, टीपर भाडयाची रक्कम रु.30900000/- वसुल केली नाही. 2014-15 मधील खर्च रु.6054650/- बाबतचे अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत. योजनेतुन काय साध्य झाले याचा अहवाल केंद्र, राज्य शासनास पाठविला नाही. तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेतले नाही.

केंद्र शासनाने सॅटेलाईट सिटींना पायाभुत सुविधा पुरविणे अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेची निवड झाली असुन महापालिकेने नोडल एजन्सी मार्फत विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन राज्य शासना मार्फत केंद्र शासनाकडे पाठविला होता. केंद्र शासनाने घनकचरा व्यावस्थापन व भुयारी गटार मलनिसा:रण योजनेच्या कामास मंजुरी दिली आहे. या योजने अंतर्गत मिळणारे अनुदान- केंद्र हिस्सा 80%, राज्य हिस्सा 10%, मनपा हिस्सा 10% या प्रमाणे आहे. घनकचरा कामाच्या व्यवस्थापनासाठी पुढील दर्शविल्याप्रमाणे अनुदान मिळाले असुन महापालिकेने खर्च केला आहे.

घनकचरा व्यवस्थापन **रक्कम रु. (हजारात)**

अनुदान	31/3/2013 पर्यंत प्राप्त झालेले	2013-14	2014-15	31/03/15 पर्यंत एकूण	खर्च	31/03/13 पर्यंत खर्च झालेले	2013-14	2014-15	एकूण 31/3/15 पर्यंत
घनकचरा व्यवस्थापन					घनकचरा व्यवस्थापन				
केंद्र हिस्सा	63453	-	63453	126906					
राज्य हिस्सा	7932	-	7932	15864					
मनपा हिस्सा	7932	-	-	7932		79734	66588	6055	152377
एकूण	79317	-	71385	150702		79734	66588	6055	152377

घनकचरा व्यवस्थापन कामी 2014-15 मध्ये लेखा परीक्षण कालावधीत पुढील प्रमाणकाव्दारे खर्च केला आहे.

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम	तपशिल
16	22/07/2014	16,38,000	मे. आयपीडब्ल्यूटी 3000 लि. क्षमतेचे वॉटर टँकर प्रेशर जेट - 02 नग
17	22/07/2014	31,32,000/-	मे. आयपीडब्ल्यूटी 6000 लि. क्षमतेचे माऊंटेड सक्शन युनिट - 03 नग
26	19/08/2014	12,53,450/-	टाटा टीपर विमा - दी न्यु इंडिया इंशुरन्स
62	30/12/2014	31,200/-	श्री. गिल्सन घोन्साल्वीस आगावू रकमेचे समायोजन.
	एकुण	**60,54,650/-**	

याबाबत लेखा परीक्षणाने अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.23, दिनांक 05/03/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 144 नुसार जंगम मालमत्ता नोंदवही नमुना नं.114 मध्ये ठेवायची आहे. त्यात मनपा मालकीच्या कचरा सफाई गाडया, इंजने, यंत्रे, फर्निचर इ.ची नोंद घेऊन त्यांचा विनियोग दाखविणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेने उपरोक्त प्रमाणकांव्दारे खरेदी केलेले कॉम्पेक्टर, चेसिज, टेम्पो, कचराकुंडया, सक्सन मशिन, प्रेशर जेट इत्यादीच्या नोंदी नमुना नं.114 (जंगम मालमत्ता) नोंदवहीत घेवून विनियोग दाखविला नाही.

2) खरेदी केलेल्या वस्तुंची आवश्यकता असल्याबाबत विभाग प्रमुखाचे मागणीपत्र, मनपाची प्रशासकिय व आर्थिक मंजूरी, निविदा मंजूरी इ. अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत.

3) प्राप्त अनुदानातुन केलेला खर्च रु.6054650/- बाबत केंद्र व राज्य शासनाला विनियोग प्रमाणपत्र पाठविले नाही.

4) घनकचरा व्यवस्थापन कामी मे. ॲन्थोनी कर्मशिअल मोटर यांचे कडुन 08 चेसीज खरेदी केल्या

आहेत. (प्र.क्र.07दि28.05/2013 रु.95,200/-) तसेच 08 कॉम्पेक्टर खरेदी केले आहेत. (प्र.क्र.21दि12.09/2013 रु.1,19,25,000/-)

तसेच मे. मरिन इंजिनियअरिंग यांचे कडुन एकूण 2000 कचरा कुंडया खरेदी केल्या आहेत.

या बाबत मागील लेखा परीक्षण अहवाल 2012-13 मधील परिच्छेद क्र.23 नुसार आक्षेप घेण्यात आला आहे. स्थायी समिती ठराव क्र.713 दि.07.12.2012 अन्वये कॉम्पेक्टरचे भाडे रु.65,000/- प्रतिमहा व टिपरचे भाडे रु.15,000 प्रतिमहा ठरविले असुन सदरच्या भाडयाची रक्कम घनकचरा व्यवस्थापनासाठी नेमलेल्या ठेकेदारांचे देयकातुन वसुल करावयाची आहे. त्यानुसार -

2014-15 मधील 27 कॉम्पेक्टर व 20 टिपरची होणारी भाडे -

कॉम्पेक्टर रु.	2,10,60,000
टिपर भाडे रु.	36,00,000
2013-14-15 मधील खरेदी केलेल्या 08 कॉम्पेक्टर भाडे (खरेदी सप्टे.13 मध्ये खरेदी म्हणून भाडे एप्रिल, 14 ते मार्च 15 एकूण 06 महिने)	62,40,000
एकुण ..	30900000/-

उपरोक्त भाडयाची रक्कम रु.30900000/- वसुलपात्र आहे.

5) 2014-15 या वर्षात एकूण खर्च रु.60,54,650/- केला असुन त्या बाबतचे अभिलेखे लेखा परीक्षणास न दाखविल्याने खर्चाच्या सत्यतेची पडताळणी करता येत नाही. सबब सदरच्या खर्चाची रक्कम लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

6) योजनेचे प्राप्त अनुदाना बाबत-शासन निर्णय क्र. यु.आय.डी.-2013,प्र.क्र.244(1)/नवि33 दि.21/02/2014 व शासन निर्णय क्र. यु.आय.डी.-2013,प्र.क्र.244(2)/नवि-33दि.21/02/2014 नुसार प्रस्तुत योजने अंर्तगत प्रकल्पांची अंमलबजावणी पूर्ण झाल्या नंतर या योजनेतुन काय साध्य झाले या बाबतचा अहवाल नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी राज्य शासन व केंद्र शासनास सादर करावयाचा आहे. घनकचरा व्यवस्थापन कामी खरेदी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. परंतु शासनास कामाची फलनिष्पत्ती कळविलेली नाही

7)शासन निर्णय नगर विकास क्र.संकिर्ण 2008/1338/प्र.क्र.171/08/नवी20 दि.02/03/2009 अन्वये विकास कामासाठी त्रयस्थ संस्थेकडुन (Third Party Technical Audit) तांत्रिक लेखा परिक्षण करुन घेणे अनिवार्य आहे. ड वर्ग महापालिकेचे बाबत 50 लाखा पेक्षा अधिक रक्कमेची कामे असल्यास त्यांचे त्रयस्थ लेखा परिक्षण करुन घेणे आवश्यक आहे. परंतु त्यानुसार कार्यवाही केली नाही.

वसुलपात्र कॉम्पॅक्टर व टीपर भाडयाची रक्कम रु. 30900000/-

अभिलेखे न दाखविल्याने आक्षेपाधीन रक्कम रु.6054650/-

DATPMVM6001 (Ref No : 4, Hmm No : 23)

7 परिवहन सेवा कामी प्रकल्प सल्लागाराची नेमणूक विना निविदा करणे बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष : परिवहन सेवा मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 75550641.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 75550641.00/-

निविदा न मागवता प्रकल्प सल्लागाराची नेमणुक केली. या कामावर खर्च केलेल्या रक्कम रु.75550641/- बाबतच्या नोंदवहया, सविस्तर प्रकल्प अहवाल, नस्त्या उपलब्ध करुन दिल्या नाहीत. प्रकल्प सल्लागारास प्रकल्प रकमेच्या 5% पेक्षा जादा दराने प्रदान केले आहे. ठेकेदारासोबत महसुल मुद्रांकावर करार केला नाही, त्यामुळे कामाची विधीग्राहयता तपासता आली नाही.

शासनाचे सॅटे लाईट सिटींना पायभुत सुविधा निर्माण करणे योजनेतून प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रशिक्षण क्षमतावृध्दी इत्यादी कामाकरिता प्रकल्प सल्लागार म्हणून मे.टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि यांची नेमणूक केली होती. ही नेमणूक भुयारी गटार योजनेच्या STP 1 व 2 झोन करीता केली होती. सदर प्रकल्प सल्लागार मे.टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि. यांना 5.40% अधिक सेवा कर या दराने परिवहन सेवेचे काम विना निविदा दिले आहे.

परिवहन सेवा योजना रक्कम रु. (हजारात)

अनुदान	31/3/2013 पर्यंत प्राप्त झालेले	2013-14	2014-15	31/03/15 पर्यंत एकूण	खर्च	2012-13 पर्यंत खर्च झालेले	2013-14	2014-15	एकूण 31/3/2015 पर्यंत
परिवहन सेवा					परिवहन सेवा				
केंद्र हिस्सा राज्य हिस्सा मनपा हिस्सा	- - -	- - -	- - -	- - -	नविन बस खरेदी करणेसाठी DPR तयार करणे- JNNURM योजनेतुन मिळणाऱ्या	-	75751	11998	87549

					अर्थसहाय्यतुन तांत्रिक सल्लागार नेमणे. मे.टंडन अर्बन प्रकल्प सल्लागार				

महापालिकेने सॅटे लाईट सिटींना पायभुत सुविधा निर्माण करणे योजनेतून परिवहन सेवा विस्तारीकरण करणेसाठी प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सल्लागाराच्या पॅनलवर असलेले प्रकल्प सल्लागार म्हणून मे.टंडन अर्बन सोल्यूशन प्रा. लि. यांना दिले आहे. याकामी पुढीलप्रमाणे खर्च केला आहे.

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	तपशिल
38	13/12/13	35397393/-	मे.टंडन अर्बन सोल्यूशन प्रा.लि. परिवहन सेवा नवीन बस खरेदीकामी डीपीआर तयार करणेकामी
46	20/01/14	28202360/-	-//-
47	20/01/14	11950888/-	-//-
एकूण		75550641/-	

या कामा बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.26 दि.05/03/2016 अन्वये खुलासा विचारला होता. परंतु विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) या कामासाठी महापालिकेने प्रशासकीय मंजुरी व आर्थिक मंजुरी घेतली नाही. टेंडर नोटीस प्रसिध्द केली नाही. निविदा न मागवता तांत्रिकदृष्ट्या पात्र सल्लागार संस्थांमधील सल्लागार म्हणून मे.टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि, यांची नियुक्ती करण्यांत आली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची "ड" प्रकरण 5 चे कलम 2(2) अन्वये मंजुरी दिली आहे. याबाबत महासभा ठराव क्र.3 दि.17/02/2014, स्थायी समिती ठराव क्र.09 दि.09/03/2011, स्थायी समिती ठराव क्र.12 दि.12/08/2013 अन्वये मंजुरी दिल्याचे प्रमाणकासोबत जोडलेल्या अहवालावरुन दिसून येते. परंतु 5(2)(2) या कलमाचा वापर आणीबाणीच्या परिस्थितीत म्हणजेच आपातकालीन परिस्थितीत कारण नमुद करुन करता येतो. परंतु तातडीची बाब नसतांना आणि कोणतेही कारण नमुद न करता, जाहीर निविदा न मागवता सदर काम दिले आहे.

शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग क्र.भाखसं/1088/(2512)/उद्योग-6, दि.02/01/1992 मधील परिच्छेद क्र.10.8 नुसार निविदा मागविताना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. प्रसिध्दी स्थानिक, राज्य, राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयस्कर ठरते. त्यामुळे दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु या प्रकरणी महानगरपालिकेने निविदा न मागविता प्रकल्प सल्लागाराला काम दिल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

2) भविष्यात JNNURM योजनेतून केंद्र राज्य अनुदान प्राप्त होणार आहे, परिवहन योजनेसाठी बसची सुविधा या योजनेतुन प्राप्त होणार आहे, म्हणून खर्च परिवहन सेवा योजनेच्या कामासाठी

केला. 2013-14 या वित्तीय वर्षात सल्लागार कामी एकूण खर्च रक्कम रु.7,55,50,641/- केला आहे. हा खर्च सॅटेलाईट सिटी योजनेच्या रोखवहीतून केला असुन सदर खर्च महापालिका फंडाच्या हिश्यातून केला आहे. याबाबतचे सविस्तर प्रकल्प अहवाल, नस्त्या, संबंधित नोंदवहया लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिल्या नाहीत.

3) केंद्र शासनाचे अनुदान प्राप्त झाल्यानंतर त्या योजनेचा/कामाचा तपशिलवार प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रशिक्षण, क्षमतावृध्दी इत्यादी करीता एकूण प्राकलनाच्या जास्तीत जास्त 5% पर्यंत खर्च करता येतो. आर्किटेक्ट व्यावसायिक अधीनियम, 1989 अन्वये घराव्यतिरीक्त उपक्रमासाठी 5% फी देण्याबाबत तरतूद आहे. तसेच वास्तुशास्त्रज्ञ अधीनियम, 1972 अन्वये कामाची व्याप्ती या प्रकरणातील वरील परिच्छेद क्रमांक 03 मधील अ.क्र.02 मध्ये नमुद केलेल्या सेवेच्या कामासाठी 5% शुल्क देय आहे. असे असताना परिवहन सेवा योजनेच्या कामासाठी तांत्रिक सल्लागारास 5.40% + सेवा कर या दराने प्रदान केले आहे. म्हणजेच 0.40% जादा दराने होणारी रक्कम रु. 5596344/- आहे. प्रकल्प सल्लागार नेमणूकी बाबत कोणतीही जाहिर निविदा मागविली नाही. याबाबत विभागाने खुलासा केला नाही.

4) प्रकल्प सल्लागाराची नेमणूक केली असुन त्याचे सोबत महसुल मुद्रांकावर करार केला नाही. मुंबई मुद्रांक शुल्क अधीनियम 1958 कलम 03 मधील तरतुदीनुसार कामाच्या ठेक्या संबंधीत या अधीनियमाच्या शेडुल 1 मधील 63 नुसार दि.01/05/2006 मुद्रांक शुल्काची वसुली करायची आहे. परंतु विभागाने प्रकल्प सल्लागारासोबत करार केला नाही. त्यामुळे शासनाच्या महसुल मुद्रांकाचे रु.74700/- चे नुकसान झाले आहे. तसेच करार नसल्याने कामाची विधीग्राहयता दिसून येत नाही.

आक्षेपाधिन खर्च रु.7,55,50,641.

DATPMVM6001 (Ref No : 9, Hmm No : 26)

8 परिवहन सेवा कामी प्रकल्प सल्लागाराची नेमणूक विनानिविदा करणे बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष : परिवहन सेवा मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 11998212.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 11998212.00/-

निविदा न मागवता प्रकल्प सल्लागाराची नेमणुक केली. या कामावर खर्च केलेल्या रक्कम रु. 11998212/- बाबतच्या नोंदवहया, सविस्तर प्रकल्प अहवाल, नस्त्या मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिल्या नाहीत. प्रकल्प सल्लागारास 5% पेक्षा जादा दराने प्रदान केले आहे. ठेकेदारासोबत महसुल मुद्रांकावर करार केला नाही, त्यामुळे कामाची विधीग्राहयता तपासता आली नाही.

शासनाचे सॅटे लाईट सिटींना पायभुत सुविधा निर्माण करणे योजनेतून प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रशिक्षण क्षमतावृध्दी इत्यादी कामाकरिता प्रकल्प सल्लागार मे.टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि. म्हणून नेमणूक केली होती. ही नेमणूक भुयारी गटार योजनेच्या STP 1 व 2 झोन करीता केली होती. सदर प्रकल्प सल्लागार मे.टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि. यांना 5.40% अधिक सेवा कर या दराने परिवहन सेवेचे काम विना निविदा दिले आहे.

परिवहन सेवा योजना रक्कम रु. (हजारात)

अनुदान	31/3/2013 पर्यंत प्राप्त झालेले	2013-14	2014-15	31/03/15 पर्यंत एकूण	खर्च	2012-13 पर्यंत खर्च झालेले	2013-14	2014-15	एकूण 31/3/2015 पर्यंत
परिवहन सेवा					परिवहन सेवा				
केंद्र हिस्सा राज्य हिस्सा मनपा हिस्सा	- - -	- - -	- - -	- - -	नविन बस खरेदी करणेसाठी DPR तयार करणे- JNNURM योजनेतुन मिळणाऱ्या अर्थसहाय्यतुन तांत्रिक सल्लागार नेमणे. मे.टंडन अर्बन प्रकल्प सल्लागार	-	75751	11998	87549

महापालिकेने सॅटे लाईट सिटींना पायभुत सुविधा निर्माण करणे योजनेतून परिवहन सेवा विस्तारीकरण करणेसाठी प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम पॅनलवर असलेले प्रकल्प सल्लागार म्हणून मे.टंडन अर्बन सोल्यूशन प्रा.लि. यांना दिले आहे. याकामी पुढीलप्रमाणे खर्च केला आहे.

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम	तपशिल
19	04/08/14	1593451/-	मे.टंडन अर्बन सोल्यूशन प्रा.लि. परिवहन सेवा नवीन बस खरेदीकामी डीपीआर तयार करणेकामी
20	04/08/14	73034/-	-//-
13	26/06/14	10331727/-	-//-
एकूण		11998212/-	

या कामा बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.26 दि.05/03/2016 अन्वये खुलासा विचारला होता. परंतु विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) या कामासाठी महापालिकेनी प्रशासकीय मंजुरी व आर्थिक मंजुरी घेतली नाही. टेंडर नोटीस प्रसिध्द केली नाही. निविदा न मागवता तांत्रिकदृष्ट्या पात्र सल्लागार संस्थांमधील मे.टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि. यांची सल्लागार म्हणून नेमणूक केली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ‘‘ड”

प्रकरण 5 चे कलम 2(2) अन्वये मंजुरी दिली आहे. याबाबत महासभा ठराव क्र.3 दि.17/02/2014, स्थायी समिती ठराव क्र.09 दि.09/03/2011, स्थायी समिती ठराव क्र.12 दि.12/08/2013 अन्वये मंजुरी दिल्याचे प्रमाणकासोबत जोडलेल्या अहवालावरुन दिसून येते. परंतु 5(2)(2) या कलमाचा वापर आणीबाणीच्या परिस्थितीत म्हणजेच आपातकालीन परिस्थितीत कारण नमुद करुन करता येतो. परंतु तशी तातडीची बाब नसतांना जाहीर निविदा न मागवता सदर काम केले आहे.

शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग क्र.भाखसं/1088/(2512)/उद्योग-6, दि.02/01/1992 मधील परिच्छेद क्र.10.8 नुसार निविदा मागविताना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. प्रसिध्दी स्थानिक, राज्य, राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयस्कर ठरते. त्यामुळे दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु या प्रकरणी महानगरपालिकेने निविदा न मागविता प्रकल्प सल्लागाराला काम दिल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

2) JNNURM या योजनेतून केंद्र राज्य अनुदान प्राप्त होणार आहे, म्हणून खर्च परिवहन सेवा योजनेसाठी केला. 2014-15 या वित्तीय वर्षात सल्लागार कामी एकूण खर्च रक्कम रु.1,19,98,212/- केला आहे. हा खर्च सॅटेलाईट सिटी योजनेच्या रोखवहीतून केला आहे. हा खर्च सॅटेलाईट सिटी योजनेच्या रोखवहीतून केला असुन सदर खर्च महापालिका फंडाच्या हिश्यातून केला आहे. याबाबतचे सविस्तर प्रकल्प अहवाल, नस्त्या, संबंधित नोंदवहया लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिल्या नाहीत.

3) केंद्र शासनाचे अनुदान प्राप्त झाल्यानंतर त्या योजनेचा/कामाचा तपशिलवार प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रशिक्षण, क्षमतावृध्दी इत्यादी करीता एकूण प्राकलनाच्या जास्तीत जास्त 5% पर्यंत खर्च करता येतो. आर्किटेक्ट व्यावसायिक अधीनियम, 1989 अन्वये घराव्यतिरीक्त उपक्रमासाठी 5% फी देण्याबाबत तरतूद आहे. तसेच वास्तुशास्त्रज्ञ अधीनियम, 1972 अन्वये कामाची व्याप्ती या प्रकरणातील वरील परिच्छेद क्रमांक 03 मधील अ.क्र.02 मध्ये नमुद केलेल्या सेवेच्या कामासाठी 5% शुल्क देय आहे. असे असताना परिवहन सेवा योजनेच्या कामासाठी तांत्रिक सल्लागारास 5.40% + सेवा कर या दराने प्रदान केले आहे. म्हणजेच 0.40% जादा दराने होणारी रक्कम रु.888624/- आहे. प्रकल्प सल्लागार नेमणूकी बाबत कोणतीही जाहिर निविदा मागविली नाही. याबाबत विभागाने खुलासा केला नाही.

4) प्रकल्प सल्लागाराची नेमणूक केली असुन त्याचे सोबत महसुल मुद्रांकावर करार केला नाही. मुंबई मुद्रांक शुल्क अधीनियम 1958 कलम 03 मधील तरतुदीनुसार कामाच्या ठेक्या संबंधीत या अधीनियमाच्या शेडुल 1 मधील 63 नुसार दि.01/05/2006 मुद्रांक शुल्काची वसुली करायची आहे. परंतु विभागाने प्रकल्प सल्लागारासोबत करार केला नाही. त्यामुळे शासनाच्या महसुल मुद्रांकाचे रु.11100/- चे नुकसान झाले आहे. तसेच करार नसल्याने कामाची विधीग्राहयता दिसून येत नाही.

आक्षेपाधिन खर्च रु.1,19,98,212.

9 पाणी पुरवठा विस्तारीकरण करणे कामी प्रकल्प सल्लागाराची नेमणूक विना निविदा करणे बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मल निस मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 67031820.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 67031820.00/-

निविदा न मागवता सल्लागाराची नेमणुक केली. या कामावर खर्च केलेली रक्कम रु. 67031820/- बाबतच्या नोंदवहया, सविस्तर प्रकल्प अहवाल, नस्त्या लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिल्या नाहीत. प्रकल्प सल्लागारास 5% पेक्षा जादा दराने प्रदान केले आहे. ठेकेदारासोबत महसुल मुद्रांकावर करार केला नाही, त्यामुळे कामाची विधीग्राहयता तपासता आली नाही.

शासनाचे सॅटे लाईट सिटींना पायभुत सुविधा निर्माण करणे योजनेतून प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रशिक्षण क्षमतावृध्दी इत्यादी कामाकरिता प्रकल्प सल्लागार म्हणून मे.टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि यांची नेमणूक केली होती. ही नेमणूक भुयारी गटार योजनेच्या STP 1 व 2 झोन करीता केली होती. प्रकल्प सल्लागार मे.टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि. यांना 5.40% अधिक सेवा कर या दराने पाणीपुरवठा विस्तारीकरण योजनेच्या प्रकल्प सल्लागाराचे काम दिले आहे.

पाणी पुरवठा विस्तारीकरण योजना रक्कम रु. (हजारात)

अनुदान	31/3/2013 पर्यंत प्राप्त झालेले	2013-14	2014-15	31/03/15 पर्यंत एकूण	खर्च	2012-13 पर्यंत खर्च झालेले	2013-14	2014-15	एकूण 31/3/2015 पर्यंत
पाणी पुरवठा विस्तसरीकरण					पाणी पुरवठा विस्तारीकरण				
केंद्र हिस्सा राज्य हिस्सा मनपा हिस्सा	- - -	- - -	- - -	- - -	पाणी पुरवठा योजना विस्तारीकरण. महासभा ठराव क्र.03, दि.17/02/14 स्थायी समिती ठराव क्र.09, दि.09/03/11	-	-	67032	67032

महापालिकेने सॅटे लाईट सिटींना पायभुत सुविधा निर्माण करणे योजनेतून पाणी पुरवठा विस्तारीकरण करणेसाठी प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम पॅनलवर असलेले प्रकल्प सल्लागार म्हणून मे .टंडन अर्बन सोल्यूशन प्रा.लि. यांना दिले आहे. याकामी पुढीलप्रमाणे खर्च केला आहे.

प्रमाणक क्र .55 दि.20/12/2014 रु.6,70,31,820 मे.टंडन यांना पाणी पुरवठा विस्तारीकरण कामी DPR तयार करणे . या कामा बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.26 दि.05/03/2016 अन्वये खुलासा विचारला होता. परंतु विभागाने त्याचे पत्र क्र.निरंक दि.15/03/2016 अन्वये खुलासा केला आहे. तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) या कामासाठी महापालिकेनी प्रशासकीय मंजुरी व आर्थिक मंजुरी घेतली नाही. टेंडर नोटीस प्रसिध्द केली नाही. निविदा न मागवता तांत्रिकदृष्ट्या पात्र सल्लागार संस्थांमधील सल्लागार मे.टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि, यांची नेमणूक केली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची "ड" प्रकरण 5 चे कलम 2(2) अन्वये मंजुरी दिली आहे. याबाबत महासभा ठराव क्र.3 दि.17/02/2014, स्थायी समिती ठराव क्र.09 दि.09/03/2011, स्थायी समिती ठराव क्र.12 दि.12/08/2013 अन्वये मंजुरी दिल्याचे प्रमाणकासोबत जोडलेल्या अहवालावरुन दिसून येते. परंतु 5(2)(2) या कलमाचा वापर आणीबाणीच्या परिस्थितीत म्हणजेच आपातकालीन परिस्थितीत कारण नमुद करुन करता येतो. परंतु तशी तातडीची बाब नसतांना जाहीर निविदा न मागविता प्रकल्प सल्लागाराची नेमणूक केली आहे.

शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग क्र.भाखसं/1088/(2512)/उद्योग-6, दि.02/01/1992 मधील परिच्छेद क्र.10.8 नुसार निविदा मागविताना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. प्रसिध्दी स्थानिक, राज्य, राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयस्कर ठरते. त्यामुळे दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु या प्रकरणी महानगरपालिकेने निविदा न मागविता प्रकल्प सल्लागाराला काम दिल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

विभागाने केलेल्या खुलाशा नुसार महापालिकेने 2011-12 दि.17/06/2011 रोजी भुयारी गटार योजनेच्या कामासाठी मे.टंडन अर्बन सोल्युशन यांचेसोबत करार केला होता. त्यानुसार प्रदान केल्याचे नमुद केले आहे. परंतु दि.17/06/2011 रोजी केलेला करार हा एका ठराविक कामासाठी (भुयारी गटार योजना) केला होता. त्याकामाच्या करारानुसार नविन कामासाठी प्रदान करता येणार नाही.

2) JNNURM या योजनेतून केंद्र राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त होणार आहे, म्हणून खर्च पाणी पुरवठा विस्तारीकरण योजनेसाठी केला. 2014-15 या वित्तीय वर्षात सल्लागार कामी एकूण खर्च रक्कम रु.6,70,31,820/- केला आहे. हा खर्च सॅटेलाईट सिटी योजनेच्या रोखवहीतून केला असुन सदर खर्च महापालिका फंडाच्या हिश्यातून केला आहे. परंतु याबाबतचे सविस्तर प्रकल्प अहवाल, नस्त्या, संबंधित नोंदवह्या मागणी करुनही लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिल्या नाहीत.

3) केंद्र शासनाचे अनुदान प्राप्त झाल्यानंतर त्या योजनेचा/कामाचा तपशिलवार प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रशिक्षण, क्षमतावृध्दी इत्यादी करीता एकूण प्राकलनाच्या जास्तीत जास्त 5% पर्यंत खर्च करता येतो. आर्किटेक्ट व्यावसायिक अधीनियम, 1989 अन्वये घराव्यतिरीक्त उपक्रमासाठी 5% फी देण्याबाबत तरतूद आहे. तसेच वास्तुशास्त्रज्ञ अधीनियम, 1972 अन्वये कामाची व्याप्ती या प्रकरणातील वरील परिच्छेद क्रमांक 03 मधील अ.क्र.02 मध्ये नमुद केलेल्या सेवेच्या कामासाठी 5% शुल्क देय आहे. असे असताना पाणी पुरवठा विस्तारीकरण योजनेच्या कामासाठी तांत्रिक सल्लागारासाठी 5.40 + सेवा कर या दराने प्रदान केले आहे. म्हणजेच 0.40% जादा दराने होणारी रक्कम रु.4965320/- आहे.

4) प्रकल्प सल्लागाराची नेमणूक केली असुन त्याचे सोबत महसुल मुद्रांकावर करार केला नाही. मुंबई मुद्रांक शुल्क अधीनियम 1958 कलम 03 मधील तरतुदीनुसार कामाच्या ठेक्या संबंधीत या

अधीनियमाच्या शेडुल 1 मधील 63 नुसार दि.01/05/2006 मुद्रांक शुल्काची वसुली करायची आहे. परंतु विभागाने प्रकल्प सल्लागार सोबत करार केला नाही. त्यामुळे शासनाच्या महसुल मुद्रांकाचे रु.66200/- चे नुकसान झाले आहे. तसेच करार नसल्याने कामाची विधीग्राह्यता दिसून येत नाही.

आक्षेपाधिन खर्च रु.6,70,31,820.

10 नगरोत्थान अभियान कार्यक्रमांतर्गत वाढीव 100 द.ल.लि. वसई-विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना (सूर्या) टप्पा -03 कामातील अनियमितते बाबत.

वाढीव 100 द.ल.लि. पाणीपुरवठा योजना

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 09

लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनि:स मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 1530290435.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1378695679.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 151594756.00/-

महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्र.167(2) नुसार मुळ अंदाजामध्ये 10% पेक्षा अधिक वाढ झाली असतानाही सुधारीत मंजुरी घेतली नाही. प्राकलनाच्या 18% जादा दराची निविदा मंजुर केली आहे. नगरोत्थान योजनेतुन काम घेतल्याने 50% अनुदान शासनाकडून मिळणार आहे. शासनाने प्रशासकिय मंजुरी दिलेली रक्कम रु.269.7906 कोटी, मजीप्रा यांची तांत्रिक मंजुरी रु.281.63 कोटी, आणि निविदा नोटीस मधील रक्कम रु.240.73 कोटी, या भिन्न आसुन त्यात तफावत आहे. पाणी पुरवठयाचे काम लवकर करण्याचे असल्याने प्राकलन दरापेक्षा 18% जादा दराची निविदा स्विकारली आहे. शासन निर्णय दि.20/02/2010 नुसार या योजने अंतर्गत कामाचे बाबत नागरी स्वराज्य संस्था व शासन यांच्यात सामंजस्य करार झाला असून त्यानुसार कामात सुधारणा केल्या नाहीत. मोबीलायझेशन अग्रिमाची रक्कम रु.15,15,94,756/- समायोजीत केली नाही. प्रकल्प सल्लागाराने दाखवलेल्या ऊणिवांची नोंदवही लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिली नाही. नगरोत्थान अभियान योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार स्वतंत्र रोखवही, स्वतंत्र व्यवहार ठेवले नाहीत. मोबीलायझेशन अग्रिमाचे विधीग्राह्यतेचे अभिलेखे लेखा विभागाने उपलब्ध करुन दिले नाहीत. मुदतवाढीच्या आदेशात महागाईच्या फरकासह किंवा फरका शिवाय मुदतवाढ दिली, असा उल्लेख नाही. मुदतवाढ दिल्याने भाववाढ फरकापोटी (टेंडर शर्त क्र.59 नुसार) प्रमाणक क्र.1156 दि.04/02/2015 रक्कम रु.3,12,76,887/- चे प्रदान केले आहे. या भाववाढ फरक म्हणुन खर्च केलेल्या रकमेस सभागृहाची मंजुरी घेतली नाही.

कामाचे नाव :- नगरोत्थान अभियान कार्यक्रमांतर्गत वाढीव 100 द.ल.लि. वसई-विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना (सूर्या) टप्पा -03.

प्राकलन :- रु.226.29 कोटी.

प्रशासकिय मंजुरी :- शासन निर्णय क्र.नगरो/2013/प्र.क्र.307/33,दि.27/01/2014
महासभा ठराव क्र.17, दि.13/08/2012
--//-- 18, दि.15/09/2012
--//-- 11, दि.16/05/2013

तांत्रिक मंजुरी :- मु.अ.महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे दि.08/07/2013
ढोबळ रक्कम रु.281.63 कोटी / प्रत्यक्षात रु.259.55 कोटी

निविदा तारिख :- नोटीस क्र.02/2013-14 दि.21/01/2014,लोकमत, सकाळ, टाईम्स ऑफ इंडिया व मनपा वेबसाईट

एल-1 निविदा :- मे.घारपुरे इंजिनिअरिंग ॲण्ड कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. पुणे,
39.60% जादा दराने, वाटाघाटीने 30.96% जादा दराने.

निविदा मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र.74 दि.25/02/2014

करार :- दि.26/02/2014.

कार्यादेश :- क्र.711/13-14 दि.26/02/2014

मुदत :- 15 महिने पावसाळ्यासह.

कामाची स्थिती :- काम अपुर्ण.

प्राप्त अनुदान :- 2014-15 रु.67.4476 कोटी.

खर्च :- मोबिलायझेशन ॲडवान्स

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	तपशिल
1301	28/03/14	25,00,00,000	मोबि. अग्रिम.
01	07/04/14	4,63,53,866	--//--
एकूण		29,63,53,866	

कामावरील खर्च -

अ.क्र.	प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	तपशिल, मोजमाप पुस्तक क्र.
01	572	06/09/14	7,19,31,958	मे.घारपुरे इंजिनिअरिंग ॲण्ड कन्स्ट्रक्शन प्रा. लि. धावते 01 MB No.28 p 01 ते 07 29 p 01 ते 06 30 p 01 ते 05 31 p 01 ते 05

02	779	21/10/14	21,19,80,752	--//-- धावते 02 MB No.28 p 01 ते 07 29 p 01 ते 06 30 p 01 ते 05 31 p 01 ते 05
03	893	29/11/14	26,34,36,532	--//-- धावते 04 MB No.28 p 24 ते 28 30 p 19 ते 26 33 p 01 ते 09 32 p 13 ते 22
04	894	29/11/14	29,62,56,183	--//-- धावते 03 MB No.28 p 18 ते 24 29 p 08 ते 11 30 p 13 ते 18 32 p 07 ते 12 153 p 01 ते 08
05	1047	19/01/15	10,93,67,895	--//-- धावते 05 MB No.28 p 29 ते 36 29 p 11 ते 14 30 p 27 ते 40 32 p 23 37 p 09 ते 21 153 p 09 ते 14 154 p 01 ते 06 155 p 01 ते 07
06	1156	04/02/15	3,12,76,887	--//-- भाववाढ फरक टेंडर शर्त क्र.59 धावते 06 MB No.32 p 24 ते 27 30 p 41 ते 42
07	1245	05/03/15	7,57,38,550	--//-- धावते 07 MB No.28 p 36 ते 45

				29 p 15 30 p 43 ते 56 31 p 17 ते 21 32 p 28 ते 29 33 p 22 ते 30 153 p 15 ते 19 155 p 08 ते 13 201 p 01 202 p 01 ते 02 204 p 01 ते 02 205 p 01 ते 04 210 p 01 ते 08
08	1326	30/03/15	17,28,40,058	--//-- धावते 08 MB No.28 p 45 ते 47 29 p 16 ते 21 30 p 57 ते 72 31 p 22 32 p 29 ते 31 33 p 30 ते 38 153 p 20 ते 21 155 p 14 ते 18 201 p 02 ते 04 202 p 02 ते 06 204 p 03 ते 04 205 p 05 ते 08 206 p 01 ते 09
एकूण मे.घारपुरे			123,28,28,815	
09	1051	19/01/16	6,12,754	मे. सिनियर डिव्हीजनल फायनान्स मॅनेजर, वे.रेल्वे, नालासोपारा येथील लाईनचे बाबत प्राकलन तयार करणे

				कामी अग्रिम.
10	1330	30/03/15	4,95,000	मे. मंदार गडकरी असोसिएट - वन संवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत जमीन भुसंपादन प्रस्ताव तयार करण्यासाठी सल्लागार फी 50%.

या बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.82 दि.28/04/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्याचे पत्र क्र.निरंक दि. 04/05/2016 नुसार खुलासा केला आहे. विभागाचा खुलासा विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) या कामासाठी पुढीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्या.

अ) मे.घारपुरे इंजिनिअरिंग पुणे 39.60% जादा दराने

ब) मे.एस.एम.सी. इन्फ्रा प्रा.लि. ठाणे 44.10% जादा दराने

क) मे.लार्सन ॲण्ड टुब्रो चेन्नई 45.72% अधिक दराने

यापैकी मे.घारपुरे एल-1 असल्याने यांना वाटाघाटीला बोलवले असता त्यांनी 30.96% जादा दराने काम करण्यास मान्यता दिली. याबाबतची टिपणी पाहता - 2012-13 च्या मजिप्रच्या जिल्हा दरसुचीनुसार मुळ प्राकलन रु.269.79 कोटीचे केले होते. या निविदेचे चालू दरसूचीनुसार (2013-14) दरपृथ:करण केले असता 18% जादा दराची निविदा म्हणून मंजुरीची शिफारस प्रशासनाने केली आहे. हा देकार 10% पेक्षा जादा आहे.

महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्र.167(2) नुसार जेव्हा मुळ अंदाजामध्ये 10% पेक्षा अधिक वाढ होण्याचा संभव असेल, अथवा संकल्प चित्रात वा योजनेत फेरफार प्रस्तावित केला असेल, तर सुधारित अंदाजपत्रक तयार केले पाहिजे आणि त्यास नव्याने मंजुरी घेतली पाहिजे. या प्रकरणी प्राप्त निविदा दरपृथ:करण करुनही 18% जादा दराने असल्याने या कामासाठी सुधारित अंदाजपत्रक तयार करुन त्यास मंजुरी घेतली नाही. योजना ही नगरोत्थान अभियानातुन घेतली असल्याने या कामासाठी शासन निर्णय दि.27/01/2014 नुसार एकूण खर्चाच्या 50% अनुदान मंजुर झाले. सुधारित अंदाज तयार केला असता तर सुधारित खर्चानुसार अनुदानाची 50% रक्कम महापालिकेला प्राप्त झाली असती. याबाबत विभागाने केलेल्या खुलाशानुसार प्रशासकिय मंजुरीपेक्षा जादा होणारा वाढीव खर्च महानगरपालिका करणार आहे. परंतु या प्रकरणी विभागाने सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन मंजुरी घेतली नाही.

2) या कामासाठी शासन निर्णय क्र.नगरो/2013/प्र.क्र.307/नवि-33/ दि.27/01/2014 अन्वये प्रशासकीय मंजुरी रक्कम रु.269.7906 कोटी दिली आहे. त्यामुळे नगरोत्थान योजनेअंतर्गत 50% अनुदानाच्या हिस्याची रक्कम रु.134.8953 कोटी मंजुरी मिळाली आहे. शासन निर्णय दि.17/05/2014 अन्वये पहिल्या हप्त्याची रक्कम रु.67.4476 कोटी अनुदान म्हणुन प्राप्त झाली आहे. उर्वरीत 50% रक्कम रु.134.8953 कोटी महापालिकेने खर्च करावयाची आहे. असे असताना निविदेसंबंधी नोटीस व

वर्तमानपत्रातील जाहिरात पाहता कामाची रक्कम रु.240.73 कोटी दाखविली आहे.

शासनाने प्रशासकिय मंजुरी दिलेली रक्कम रु.269.7906 कोटी, मजीप्रा यांची तांत्रिक मंजुरी रु.281.63 कोटी, आणि निविदा नोटीस मधील रक्कम रु.240.73 कोटी, या भिन्न आसुन त्यात तफावत आहे. याबाबत विभागाने खुलाशानुसार सदर योजनेची उपांग निहाय एकत्रीत ई निविदा मागविण्यात आली. त्यात टप्पा क्र.1 मधील आवश्यक कामाची किंम्मत रु.226.29 कोटी असुन उर्वरित कामासाठी टप्पा क्र.2 निविदा प्रक्रिया सुरु आहे. हा खुलासा संयुक्तिक नाही.

3) निविदा मंजुरीसाठी प्रशासनाने जी स्थायी समितीस टिपणी सादर केली आहे तिचे अवलोकन करता योजनेचे काम पावसाळ्यासह 15 महिन्याच्या कालावधीत पूर्ण होण्यासाठी ठेकेदारास अधिकची मशिनरी व मनुष्यबळ वापरुन कामे युध्द पातळीवर करावी लागणार आहेत. या सर्व बाबी लक्षात घेऊन मे.घारपुरे यांची 30.96% जादा दराची निविदा (प्रचलित दरानुसार 18% जादा दराची निविदा) मंजुरीची शिफारस करण्यात आली आहे. म्हणजेच काम त्वरित करावयाचे असल्याने 18% जादा दराची निविदा स्विकारल्याचे दिसुन येते. परंतु महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्र.167(2) नुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

4) शासन निर्णय दि.27.01.2014 नुसार या कामासाठी प्रशासकीय मान्यता दिली. त्या निर्णयात नमूद केल्यानुसार शासन निर्णय दि.20/02/2010 नुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानाअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामाचे बाबत नागरी स्वराज्य संस्था व शासन यांच्यात सामंजस्य करार झाला असून त्यानुसार कामात पुढील सुधारणा करणे आवश्यक आहे.

i. व्दिनोंदी लेखा पध्दती
ii. कामात संगणकीय वापर
iii. मालमत्ता कर विषयक सुधारणा
iv. उचित उपभोक्ता आकार वसुली
v. पर्जन्य जलसंचय
vi. सांडपाणी पुनर्वापर
vii. पाणी बचत
viii. ऊर्जा बचत
ix. पी.पी.पी. योजना
x. प्रशासकीय सुधारणा

परंतु अशा प्रकारच्या सुधारणा महापालिकेने पुर्णपणे केल्या नाहीत. म्हणजेच शासन निर्णयानुसार कामात सुधारणा केल्या नाहीत.

5) निविदेतील भाग 01 पुष्ट क्र.110 वरील शर्त क्र.64 नुसार प्राकलनाच्या 10% मोबीलायझेशन अग्रिम देण्याची तरतूद आहे. त्यानुसार ठेकेदार मे. घारपुरे यांना (दोन देयकाव्दारे) रक्कम रु.29,63,53,866/- मोबीलायझेशन अग्रिम देण्यात आले आहे.

अ) निविदा नस्तीमधील अटी/शर्ती नुसार प्राकलनाच्या 10% मोबिलायझेशन अग्रीम देय असताना मंजुर निविदा रक्कमेच्या 10% मोबिलायझेशन अग्रीम देण्यात आले आहे. निविदा रु.226.29 कोटीची असून प्राप्त एल- 1 निविदा जादा दराने आल्याने त्याची होणारी रक्कम रु.293.36 कोटी आहे. म्हणजेच प्राकलनाच्या रक्कमेपेक्षा 30.96% जादा दराने देकार आल्याने मोबिलायझेशन अग्रीमाचे रु.6.71 कोटी जादा प्रदान करण्यात आले आहे.

ब) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता प्रकरण 10 बांधकाम लेखे "घ" कंत्राटदारांना आगाऊ रक्कमा देणे, परिच्छेद 10.2.21, 10.2.22 अन्वये - नियमानुसार कंत्राटदारांना आगाऊ रक्कमा देण्यास मनाई आहे. जागेवर आणलेल्या सामानाच्या मुल्याच्या 75% पेक्षा अधिक नसेल, इतक्या आगाऊ रक्कमा मंजूर करता येतील, त्यासाठी ठेकेदाराने जागेवर आणलेल्या सामानाची नोंद मोजमाप पुस्तकात घेऊन, त्याचे प्रमाणात अग्रीम दिल्याची नोंद घेणे जरुरीचे आहे. परंतु या कामाचे संदर्भात जागेवर आणलेल्या साहित्याच्या नोंदी मोजमाप पुस्तकात न घेता अग्रीम देण्यात आले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम 189 नुसार दिलेल्या अग्रीमाचे वसुलीबाबतच्या नोंदी नमुना नं.147 मध्ये घेण्यात आल्या नाहीत. मात्र विभागाने एक नोंदवही ठेऊन त्यात अग्रीमाच्या वसुलीची व व्याज वसुलीची नोंद घेतली आहे. व्याजाची गणना निविदेतील अटी शर्तीनुसार दरसाल दर शेकडा 12% दराने करावयाची आहे. दि.31.03.2015 पर्यंत व्याजाची रक्कम रु.2,85,76,017/- समायोजन केली आहे.

एकूण मोबिलायझेशन अग्रीमापोटी ठेकेदाराला रक्कम रु.29,63,53,866/ प्रदान केले आहे. त्यापैकी दि.31.03.2015 पर्यंत एकूण 8 धावत्या देयकाद्वारे रक्कम रु.14,47,59,110/- चे समायोजन केले आहे. अग्रीमाची थकीत रक्कम रु.15,15,94,756/- इतकी आहे. निविदेतील भाग 01 पुष्ट क्र.110 वरील शर्त क्र.64 नुसार थकीत रक्कम रु.15,15,94,756/- संबंधिताकडून वसुलपात्र आहे.

6) लेखापरीक्षण काळात काम अपुर्ण आहे. दि.31.03.2015 पर्यंत ठेकेदारास एकूण रक्कम रु.123,28,28,815/- इतके प्रदान केले आहे. या कामाचे प्रकल्प सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग असुन ठेकेदाराची देयके तपासुन महापालिकेकडे प्रदानासाठी सादर केली जातात. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा सहिंता 1971 नियम 172 नुसार बांधकाम चालू असताना त्याची तपासणी करुन, त्याचा निरिक्षण अहवाल/ नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध् करुन दिली पाहीजे. परंतु प्रकल्प सल्लागाराने कामाचे बाबत दिलेले अभिप्राय, उणिवा, दुरुस्त्या, इत्यादी बाबतची नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

7) नगरोत्थान अभियान योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार - या योजनेसाठी स्वतंत्र रोखवही, स्वतंत्र खाते, स्वतंत्र व्यवहार ठेऊन ते लेखा परीक्षणास सादर करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. परंतु महापालिकेने या कामासाठी स्वतंत्र रोखवही ठेवली नाही. पाणीपुरवठा देखभाल दुरुस्ती योजनेच्या रोखवहीतून या कामाचे प्रदान केले आहे. त्यामुळे शासनाच्या निकषानुसार शासन अनुदान + महापालिका हिस्सा, या प्रमाणात काम चालू असल्याची लेखा परीक्षणास खातरजमा करता आली नाही.

8) मोबिलायझेशन ॲडव्हान्स देताना ठेकेदाराकडून घेतलेली बँक गॅरंटी, त्याची विधीग्राह्यता विभागाने एका नस्तीमध्ये ठेवली आहे. प्रत्यक्षात बँक गॅरंटी व तिची विधीग्राह्यता, मुदत वाढवुन घेतलेली विधीग्राह्यता या महत्वाच्या बाबी लेखा शाखेकडे सुपूर्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

9) कामाची मुदत दिनांक 26.02.2014 पासून 15 महिन्याची पावसाळा धरुन होती. या कामास मा. आयुक्तांनी आदेश क्र.119/2015 दि.14/05/2015 अन्वये 09 महीन्याची म्हणजेच दि.15/02/2016 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. मुदतवाढीच्या आदेशात महागाईच्या फरकासह किंवा फरका शिवाय मुदतवाढ दिली, असा उल्लेख नाही. मुदतवाढ दिल्याने भाववाढ फरकापोटी (टेंडर शर्त क्र.59 नुसार) प्रमाणक क्र.1156 दि.04/02/2015 रक्कम रु.3,12,76,887/- चे प्रदान केले आहे. या भाववाढ फरक म्हणुन खर्च केलेल्या रकमेस सभागृहाची मंजुरी घेतली नाही.

वसुलपात्र रक्कम रु.15,15,94,756/-
आक्षेपाधिन रक्कम रु. 137,86,95,679/-

DATPMVM6001 (Ref No : 47, Hmm No : 82)

11 नगरोत्थान अभियान कार्यक्रमांतर्गत वाढीव 100 द.ल.लि. वसई - विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना (सूर्या) टप्पा -03 साठी - प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करणेबाबत.

वाढीव 100 द.ल.लि. पाणीपुरवठा योजना, प्रकल्प सल्लागार नेमणुक
लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 05

लेखा शीर्ष : पाणी पुरवठा व मलनि:स मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 39499963.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 38204963.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 1295000.00/-

प्रकल्प सल्लागारास दिलेला कार्यादेश लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिला नाही. प्रकल्प सल्लागाराची नेमणुक निविदा न मागवता केली आहे. प्रकल्प सल्लागाराबरोबर रु.100 च्या मुद्रांकावर करारनामा केला आहे. त्यामुळे मुद्रांक शुल्काची रक्कम रु.84000 कमी वसुली झाली आहे. सेवा शुल्क व सल्लागार फी यांचे प्रदान करताना प्रकल्प खर्चाच्या प्रमाणात करावयाचे आहे. परंतु महापालिकेने मंजुर निविदा खर्चाच्या प्रमाणात सल्लागार फी चे प्रदान केले आहे. त्यामुळे जादा खर्च रु.12.95 लक्ष झाला. वाढीव 100 द.ल.लि. योजनेच्या

कामासाठी ठेकेदाराला मुदतवाढ देण्यापुर्वी प्रकल्प सल्लागाराचा अभिप्राय घेण्यात आला नाही.

कामाचे नाव :- नगरोत्थान अभियान कार्यक्रमांतर्गत वाढीव 100 द.ल.लि. वसई-विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना (सूर्या) टप्पा -03 साठी
प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करणे.

प्राकलन :- योजना रु.226.29 कोटी.
प्रकल्प सल्लागाराची फी- पुढीलप्रमाणे-
सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे - प्रकल्प खर्चाच्या 0.5% सेवाशुल्क व प्रकल्प खर्चाच्या 2.5% सल्लागार फी

प्रशासकिय मंजुरी :- महासभा ठराव क्र.11, दि.16/05/2013

तांत्रिक मंजुरी :- -

निविदा तारिख :- निविदा काढली नाही.

प्रकल्प सल्लागाराचे नाव :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

करार :- दि.18/02/2014. रु.100 च्या महसुल मुद्रांकावर

कार्यादेश :- उपलब्ध झाला नाही.

कामाची स्थिती :- काम अपुर्ण.

खर्च :-

<u>प्रमाणक क्र.</u>	<u>दिनांक</u>	<u>रक्कम रु.</u>	<u>तपशिल</u>
1) 1001	24/01/14	1,35,69,000	मोजमाप पुस्तकात नोंद नाही. कार्यकारी अभियंता म.जी.प्रा. यांना प्रकल्प अहवाल तयार करण्याचे सेवाशुल्क.
2) 1289	28/03/14	1,00,00,000	--//-- सल्लागार फी 2.5%.
3) <u>1296</u>	<u>29/03/14</u>	<u>1,59,30,963</u>	--//--
<u>एकूण</u>		<u>3,94,99,963</u>	

या बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.83 दि.28/04/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्याचे पत्र क्र.निरंक दि. 04/05/2016 नुसार खुलासा केला आहे. विभागाचा खुलासा विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) प्रकल्प सल्लागारास महानगरपालिकेने कामासाठी कार्यादेश दिल्याचे दिसुन येत नाही. सल्लागारास कामाचे एकूण रु.3,94,99,963/- प्रदान केले आहे. तथापि कार्यादेश लेखापरीक्षणास दाखविला नाही.

2) प्रकल्प सल्लागाराच्या नेमणुकीसाठी दि.20/04/2013 रोजी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन प्रतिसाद

मिळाला नाही असे विभागाच्या टिपणीत नमूद केले आहे. प्रत्यक्षात जाहिरातीचे कात्रण लेखापरीणास उपलब्ध करुन दिले नाही.

महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.270, दि.02/01/2013 नुसार सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई यांना पत्र पाठवुन- प्रकल्प सल्लागाराचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी करावे, असे कळविले आहे. मुख्य अभियंता जीवन प्राधिकरण म.जी.प्रा. यांचे पत्र क्र.1034, दि.30/04/2013 नुसार प्रकल्प व्यवस्थापनाचे काम तयार करण्यास तयार असल्याचे कळविले आहे. म.जी.प्रा. ने कामासाठी शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.सुनिअ2010/प्र.क्र.510/पापु-22/दि.22/02/2011 नुसार मंजुर केलेल्या दराने काम करण्यास तयार असल्याचे कळविले आहे. म्हणजेच आयुक्तांनी म.जी.प्रा. ला काम करण्यास कळविल्याचे दिनांका नंतर वर्तमानपत्रात जाहिरात दिली आहे. या विसंगती बाबत खुलासा केला नाही. या कामासाठी वर्तमानपत्रात निविदा न मागवता, प्रसिध्दी न देता प्रकल्प सल्लागाराची नेमणूक केली आहे. शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग क्र.भाखसं/1088/(2512)/उद्योग-6, दि.02/01/1992 मधील परिच्छेद क्र.10.8 नुसार निविदा मागविताना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. प्रसिध्दी स्थानिक, राज्य, राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयस्कर ठरते. त्यामुळे दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु या प्रकरणी महानगरपालिकेने निविदा न मागविता प्रकल्प सल्लागाराला काम दिल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

3) प्रकल्प सल्लागाराची नेमणूक केली असुन त्याचे सोबत रु.100 च्या महसुल मुद्रांकावर करारनामा केला आहे. मुंबई मुद्रांक शुल्क अधीनियम 1958 चे कलम 03 मधील तरतुदीनुसार कामाच्या ठेक्यासंबंधीत या अधीनियमाच्या शेडुल 1 मधील क्र.63 नुसार दि.01/05/2006 पासुन मुद्रांक शुल्क वसुल करावयाचे आहे. त्यानुसार या कामाचे बाबत सुमारे रु.8.45 कोटी पर्यंतचे प्रदान सल्लागाराला करावे लागणार आहे. सबब या करारासाठी एकूण रक्कम रु.84,100 चे महसुल मुद्रांक वापरणे आवश्यक असताना रु.100 च्या मुद्रांकावर करार केला आहे. त्यामुळे शासनाचे मुद्रांक शुल्काचे रु.84,000 चे नुकसान झाले आहे. तसेच कराराची विधीग्राह्यता दिसून येत नाही.

4) उपरोक्त प्रदानाचे बाबत अनुक्रमांक 1 नुसार सेवाशुल्काचे प्रदान केले आहे. अनुक्रमांक 2 व 3 प्रमाणे सल्लागार फी म्हणुन प्रदान केले आहे. सल्लागार फी च्या प्रमाणकासोबत जोडलेल्या टिपणीचे अवलोकन करता निविदा स्विकृतीच्या रकमेवर 2.5% सल्लागार फी ची आकारणी केली आहे.

शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.सुनिअ 2010/प्रक्र.510/पा.पु.22 दि.22/02/2011 नुसार - पाणी पुरवठा व मलनि:स्सारण कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रकल्प सल्लागाराचे काम घेतले असल्यास सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सेवाशुल्क व भांडवली कामाचे व्यवस्थापन करण्यासाठी सल्लागार फी चे दर मंजुर केले आहेत. प्रकल्प खर्च ठरवताना त्याकामाचे प्राकलन (प्रशासकिय व आर्थिक मंजुरी मिळालेले, तांत्रिक मंजुरी मिळालेले) किती रकमेचे आहे. हे विचारात घेणे अभिप्रेत आहे. या कामाचे बाबत मजीप्राने तांत्रिक मंजुरी रु.281.63

कोटीचे कामास दिली आहे. शासनाने या प्रकल्पासाठी प्रशासकिय मंजुरी रु.269.89 कोटीचे कामास दिली आहे. निविदा 30.96% जादा दराने मंजुर केल्याने स्विकृत निविदेची रक्कम रु.296.36 कोटी झाली आहे. तांत्रिक मंजुरी मिळालेल्या प्रकल्प खर्चाची रक्कम रु.281.63 कोटी असल्याने याच रकमेवर सल्लागार फी ची गणना करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने महापालिकेसोबत केलेल्या करारातील अट क्र.7.1 नुसार - शासन निर्णय दि.22/02/2011 च्या दरानुसार काम करण्याची तयारी दाखवली आहे, त्यात प्रकल्प किंमती मध्ये स्विकारलेल्या जादा दराचा खर्च धरुन, जादा बाबी, भाववाढी, इ. धरुन प्रकल्प किंमत धरण्यात येईल. असे नमुद केले आहे. म्हणजेच निविदा 30.96% जादा दराने आल्याने सदरचा जादा खर्च सल्लागार फी साठी दयावा लागणार आहे.

प्राप्त निविदेनुसार रु.296.36 कोटी

मुळ प्रकल्प रु.281.63 कोटी

फरक रु.14.73 कोटी.

दुस-या व तिस-या देयकाची टिपणी पाहता -

रु.296.36 कोटीच्या 2.5% = 7.41 कोटी पैंकी 35% रु.2.5935 कोटी

रु.281.63 कोटीच्या 2.5% = 7.04 कोटी पैंकी 35% रु.2.4640 कोटी

तफावत रु.0.1295 कोटी

म्हणजेच या प्रकरणी मंजुर निविदेनुसार सल्लागार फी कामी रक्कम रु.12.95 लक्षाचे जादा प्रदान झाले आहे. (प्रमाणक क्र.1289 दि.28/03/2014 रु.1,00,00,000/- व प्रमाणक क्र.1296 दि.29/03/2014 रु.1,59,30,963/-.)

5) वाढीव पाणीपुरवठा योजनेचे काम ठेकेदार मे.घारपुरे यांनी विहीत वेळेत पूर्ण करण्यासाठी त्यांना जादा मशिनरी, साहित्य, मनुष्यबळ इत्यादी लागणार असल्याने त्यांची मुळ प्राकलनाच्या 30.96% जादा दराची निविदा स्विकारण्याची शिफारस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने (प्रकल्प सल्लागार) केली. या कामासाठी मुदतवाढ दिली आहे. विहीत मुदतीत (15 महिन्यांत) ठेकेदाराने काम पूर्ण केले नाही. मुदतवाढीच्या प्रस्तावास महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 172 नुसार - सल्लागाराने सहमती दिल्याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास दाखविले नाहीत.

वसुलपात्र रक्कम रु.12,95,000/-

आक्षेपाधीन रक्कम रु.3,82,04,963/-

12 पाणीपट्टी कराचा भरणा केलेले धनादेश न वटल्यामुळे थकीत कराच्या व दंडात्मक शुल्काच्या वसुलीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 03

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 96000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 96000.00/-

नळजोडणी धारकांकडून पाणीपट्टी कर भरणा केलेले धनादेश न वटल्यामुळे सदर धनादेश संबंधीत बँकेकडून महापालिकेस परत पाठविण्यात आले असल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले आहे. अशा न वटलेल्या धनोदशांची रक्कम संबंधीत नळजोडणी धारकांकडून तात्काळ वसुल न करता थकबाकी म्हणून पुढील देयकांत समाविष्ट करण्यात आल्यामुळे मनपास येणे असलेली कराची रक्कम गुंतून राहिली आहे. धनादेश न वटल्यामुळे संबंधीत नळजोडणी धारकांविरुध्द Negotiable Instrument act चे कलम 138 नुसार विभागाकडून कारवाई करण्यात आलेली नाही.

वसई विरार महानगरपालिकेच्या विरार "अ" प्रभागाच्या पाणीपट्टी कर वसुली विभागाचे वर्ष 2013-14 व 2014-15 या वर्षातील पाणीपट्टी कर जमा रक्कमांची पडताळणी करतांना नळजोडणी धारकांकडून पाणीपट्टी कर भरणा केलेले धनादेश न वटल्यामुळे सदर धनादेश संबंधीत बँकेकडून महापालिकेस परत पाठविण्यात आले असल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले आहे. अशा पाणीपट्टी कराच्या न वटलेल्या धनादेशाचा वर्ष 2013-14 व 2014-15 चा तपशिल सोबतच्या विवरणपत्रात दर्शविण्यात आला आहे. याबाबत लेखापरिक्षणास खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.84 दि.28/04/2016 अन्वये विभागास कळविण्यात आला असता विभागाने अर्धसमास पत्रावर सादर केलेला खुलासा पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) वर्ष 2013-14 मध्ये पाणीपट्टी कर भरणा केलेले धनादेशांपैकी न वटलेल्या धनादेशांची रक्कम रु.2,85,480/- एवढी असून सदर रकमेपैकी रु.42,240/- एवढी रक्कम संबंधीत नळजोडणी धारकांकडून वसुल झाली नसल्याचे सोबतच्या विवरणपत्रावरुन दिसून येते. तसेच वर्ष 2014-15 मध्ये पाणीपट्टी कर भरणा केलेले धनादेशांपैकी न वटलेल्या धनादेशांची रक्कम रु.1,51,060/- एवढी असून सदर रकमेपैकी अद्याप रु.53,760/- एवढी रक्कम संबंधीत नळजोडणी धारकांकडून वसुल करण्यात आली नसल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले. याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये सदर न वटलेल्या धनादेशांच्या रकमा पुढील वर्षाच्या देयकांमध्ये थकबाकी म्हणून मागणी केल्याचे नमूद केले आहे. परंतू याबाबतची आवश्यक तपशील लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आलेला नाही. न वटलेल्या धनोदशांसदर्भात संबधीत नळजोडणी धारकास नोटीस देवून देयकाची रक्कम दंडात्मक शुल्कासह वसुल करणे आवश्यक असतांना थकबाकी म्हणून सदर रकमा पुढील वर्षाच्या मागणीत समाविष्ट करण्यात आल्यामुळे

मनपास पाणीपट्टी करापोटी प्राप्त होणाऱ्या रकमा अनावश्यक गुंतून राहिल्या आहे. विभागाने केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने मान्य करता येत नाही.

2) पाणीपट्टी कराच्या भरणापोटी मनापास दिलेला धनादेश न वटल्यामुळे संबंधीत नळजोडणी धारकांविरुध्द Negotiable Instrument act चे कलम 138 नुसार विभागाकडून कारवाई करण्यात आली नाही. तसेच रु.100/- एवढी नगण्य रक्कम धनादेश वटणावळ फी म्हणून वसुल करण्यात येत असल्यामुळे न वटलेल्या धनादेशांची रक्कम संबधीत नळजोडणी धारकाकडून त्वरीत मनपाकडे भरणा करण्यात आलेली नाही.

3) नळजोडणी धारकांचे पाणीपट्टी कराच्या वसुलीचे धनादेश न वटल्यामुळे बँकेकडून मनपास परत पाठविण्यात आल्यानंतर विभागाकडून संबधितास नोटीस बजावून सदर रकमा बँकेकडील दंडात्मक शुल्कासह रोखीने वसुल करणे आवश्यक आहे. याबाबत विभागाकडून संबंधीतास नोटीस पाठविण्यात आल्याचे लेखापरिक्षणास आढळुन आले नाही. त्यामुळे न वटलेल्या धनादेशांच्या रकमांचा संबंधीत नळजोडणी धारकांकडून महापालिकेस वेळेत भरणा करण्यात येत नसल्याचे दिसून येते.

वसुलपात्र रक्कम रु.96,000/-

FDSANMM7201 (Ref No : 99, Hmm No : 84)

13 नालासोपारा (पू) येथील वॉर्ड क्र. 25 येथील रश्मी गार्डन विवा जाहांगीर कॉम्प्लेक्स ते नालासोपारा विरार 30 मी. रस्त्यापर्यंतचा कल्वर्ट बांधणे

इतर विकास कामे.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : सार्व. बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 11886746.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2621914.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 129785.00/-

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका परिच्छेद क्र.227 (अ), (1), (2), (अ) नुसार अतिरिक्त बाबीचा दर हा अनुसूचीत(जिल्हा दरसुचे) दरापेक्षा अधिक असता कामा नये. परंतु या कामाचे बाबत अतिरिक्त कामावर जिल्हा दरसुची पेक्षा 4.95% जादा दराने प्रदान केले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका परिच्छेद क्र.227 टिप क्र.3 नुसार अतिरीक्त कामास सुधारीत तांत्रिक मंजूरी घेतली नाही. तात्रिक सल्लागार नियुक्तीची नस्ती लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिली नाही.

कामाचे नाव :- नालासोपारा (पू) येथील वॉर्ड क्र. 25 येथील रश्मी गार्डन विवा जाहांगीर कॉम्प्लेक्स ते

नालासोपारा विरार 30 मी. पर्यंत रस्त्यापर्यंतचा कल्वर्ट बांधणे.

प्राकलन :- रु.99,73,669.
सुधारीत रु.118,86,557.
प्रशासकिय मंजुरी :- महासभा ठराव क्र.04 दि.12/08/2013
सुधारीत ---//--- 04 दि.19/08/2014
तांत्रिक मंजुरी :- शहर अभियंता दि.23/03/2013
निविदा तारिख :- दि.18/09/2013 ई निविदा, प्रहार.
एल-1 निविदा :- मे.संजय कंन्स्ट्रक्शन, 4.95% जादा दराने.
निविदा मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र.1002 दि.06/11/2013.
करार :- दि.06/02/2014.
कार्यादेश :- क्र.1963 दि.06/02/2014
मुदत :- 120 दिवस.
कामाची स्थिती :- काम पुर्ण दि.30/06/2014
खर्च :- प्रथम धावते प्र.क्र.801 दि.19/06/2014 रु.72,37,437
M.B.no.59 p 18 ते 24.
दूसरे धावते प्र.क्र.3160 दि.18/10/2014 रु.46,49,309

M.B.no.59 p 25 ते 32.

एकूण रु.118,86,746

या कामा बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.54 दि.29/03/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्याचे पत्र क्र.निरंक दि.06/04/2016 रोजी खुलासा केला आहे. तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचा अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) या कामाचे मुळ प्राकलन रु.99.74 लक्ष असून कामात वाढ होणार असल्याने सुधारीत प्राकलन रु.118.87 लक्षाचे तयार केले. म्हणजेच वाढ सुमारे 18% आहे. सुधारीत प्रशासकिय मंजुरी महासभा ठराव क्र.04 दि.19/08/2014 घेतली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका परिच्छेद क्र.227 (अ), (1), (2), (अ) नुसार अतिरिक्त बाबीचा दर हा अनुसूचीत (जिल्हा दरसुचे) दरापेक्षा अधिक असता कामा नये. परंतू या कामाचे बाबत ठेकेदारास निविदा रकमेच्या 4.95% जादा दराने काम दिले असून सुधारीत प्राकलनाचे बाबतही 4.95% जादा दराने प्रदानास मंजुरी दिली आहे. सबब जादा प्रदान रु.129785 झाले आहे. या अनियमितते बाबत खुलासा केला नाही.

दुसऱ्या देयकात वाढीव कामाचे प्रदान रु.26,21,914 केल्याचे दिसून येते. त्यावर 4.95% जादा दराने रक्कम रु.1,29,785 चे प्रदान केले आहे. वाढीव कामावर 4.95% जादा दराने प्रदान केलेली

रक्कम वसुलपात्र आहे. विभागाने केलेल्या खुलाशानुसार 2012-13 चे दर सुचीनुसार अंदाजपत्रक तयार केले होते. सुधारीत कामाचा कार्यादेश दि.06/02/2014 रोजी दिला. त्यामुळे 2013-14 ची दरसुची वापरणे आवश्यक होते. परंतु तसे न करता जुन्या 2012-13 च्या दरसुची नुसार प्राकलनाच्या 4.95% जादा दराने प्रदान केले आहे. वाढीव कामासाठी दिलेला दर (प्राकलन दराच्या 4.95% जादा दर), लेखा परीक्षणात मान्य करता येणार नाही.

2) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका परिच्छेद क्र.227 टिप क्र.3 नुसार अतिरिक्त कामास संभाव्य खर्चासह सुधारीत प्रशासकिय मंजुरी व सुधारीत तांत्रिक मंजुरी घेतल्याशिवाय जादा काम हाती घेता येणार नाही. परंतू या कामाचे बाबत सुधारीत तांत्रिक मंजुरी घेण्यापुर्वीच कामास सुरुवात केल्याचे दिसून येते.

3) या कामाचे तांत्रिक सल्लागार मे.राजेश पितळे हे असून त्यांना कामाचे प्लान व अंदाजपत्रक तयार करण्यासाठी कार्यकारी अभियंता यांनी दि.02/07/2013 अन्वये कळविल्याचे दिसून येते. परंतु सदर तांत्रिक सल्लागाराचे नियुक्ती बाबत नस्ती लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिली नाही.

वसुलपात्र रक्कम रु.1,29,785

आक्षेपाधीन रक्कम रु.26,21,914

DATPMVM6001 (Ref No : 24, Hmm No : 54)

14 नालासोपारा (प) वॉर्ड क्र. 36 मध्ये भट्टीला तलावाचे सुशोभिकरण करणे.

राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : सार्व. बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 38199616.00 /-

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका परिच्छेद क्र.227 (अ), (1), (2), (अ) नुसार अतिरिक्त बाबीचा दर हा अनुसूचीत दरापेक्षा (जिल्हा दरसुची) अधिक असता कामा नये. परंतु या कामाचे बाबत अतिरिक्त कामासाठी प्राकलन दरापेक्षा 8.90% जादा दर मंजूर केला आहे. सुधारीत कामाचा कार्यादेश दि.15/05/2015 रोजी दिला आहे. नेमणुक केलेल्या तांत्रिक सल्लागाराची नस्ती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिली नाही.

कामाची नोंद नमुना नं.139 मध्ये घेतली नाही.

कामाचे नाव :- नालासोपारा (प) वॉर्ड क्र. 36 मध्ये भट्टीला तलावाचे सुशोभिकरण करणे.

प्राकलन :- रु.4,72,26,306.
सुधारीत रु.6,38,22,217.

प्रशासकिय मंजुरी :- महासभा ठराव क्र.10 दि.20/11/2013
सुधारीत ---//--- 31 दि.08/05/2015

तांत्रिक मंजुरी :- शहर अभियंता दि.22/11/2013
सुधारीत दि.15/05/2015.

निविदा तारिख :- दि.18/11/2013 ई निविदा, सकाळ.

एल-1 निविदा :- मे.लॅण्डमार्क कार्पो. प्रा.लि., 8.90% जादा दराने.

निविदा मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र.1654 दि.19/02/2014.

करार :- दि.28/02/2014.

कार्यादेश :- क्र.2358 दि.28/02/2014
सुधारीत क्र.936 दि.15/05/2015

मुदत :- 18 महिने.

कामाची स्थिती :- काम अपुर्ण

खर्च :- प्रथम धावते प्र.क्र.1137 दि.11/07/2014 रु.2,68,33,724
M.B.no.347 p 01 ते 07.
दूसरे धावते प्र.क्र.6585 दि.31/03/2015 रु.1,13,65,892

M.B.no.347 p 60 ते 84.

एकूण <u>रु.3,81,99,616</u>

या कामा बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.55 दि.29/03/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्याचे पत्र क्र.निरंक दि.06/04/2016 रोजी खुलासा केला आहे. तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचा अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) या कामाचे मुळ प्राकलन रु.472 लक्ष असून कामास सुरुवात केल्या नंतर तलावातील गाळ काढताना काम वाढल्याचे लक्षात आले. त्यामुळे सुधारीत प्राकलन रु.638 लक्षाचे तयार केले. म्हणजेच वाढ सुमारे 35% आहे. सुधारीत प्रशासकिय मंजुरी महासभा ठराव क्र.31 दि.08/05/2015 घेतली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका परिच्छेद क्र.227 (अ), (1), (2), (अ) नुसार अतिरिक्त

बाबीचा दर हा अनुसूचीत दरापेक्षा (जिल्हा दरसुची) अधिक असता कामा नये. परंतू या कामाचे बाबत ठेकेदारास निविदा रकमेच्या 8.90% जादा दराने काम दिले असल्याने सुधारीत प्राकलनाचे बाबतही 8.90% जादा दराने प्रदानास मंजुरी दिली आहे. सुधारीत कामाचा कार्यादेश दि.15/05/2015 रोजी दिल्याने पुढील काळात जादा प्रदान होणार आहे. या अनियमिततेबाबत खुलासा केला नाही.

विभागाने केलेल्या खुलाशानुसार 2012-13 चे दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार केले होते. सुधारीत कामाचा कार्यादेश दि.15/05/2015 रोजी दिला. त्यामुळे 2014-15 ची दरसुची वापरणे आवश्यक होते. परंतु तसे न करता जुन्या 2012-13 च्या दरसुची नुसार प्राकलनाच्या 8.90% जादा दराने प्रदान केले आहे. वाढीव कामासाठी (प्राकलन दराच्या 8.90% जादा दराने) प्रदान केल्याने लेखा परीक्षणात मान्य करता येणार नाही.

2) या कामाचे तांत्रिक सल्लागार मे.अजिंक्यतारा हे असून त्यांनी कामाचे अंदाजपत्रक तयार केले होते. परंतु सदर तांत्रिक सल्लागारचे नियुक्ती बाबत लेखा परीक्षणास नस्ती उपलब्ध करुन दिली नाही.

3) सदरचे काम दि.31/03/2015 रोजी अपुर्ण आहे. कामाची नोंद नमुना नं.139 मध्ये घेतली नाही.

DATPMVM6001 (Ref No : 25, Hmm No : 55)

15 बांधकाम विभागाने, पाणी पुरवठा विभागाने निरनिराळ्या कामासाठी नेमलेल्या तांत्रिक सल्लागाराच्या नियुक्ती बाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 07

लेखा शीर्ष : सार्व. बांधकाम विभाग मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 25527808.00 /-

तात्रिक सल्लागार नियुक्ती बाबत - मंजुरी ठराव, जाहिर निविदा मंजूरी, करार, कार्यादेश, कामाचा तपशिल, मुदतवाढी आणि प्रदाना बाबतचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिले नाहीत.

महानगरपालिकेच्या बांधकाम, पाणी पुरवठा विभागाचे कामासाठी निरनिराळ्या सल्लागार कंपन्यांची नेमणुक केल्याचे दिसून येते . उदा :- मे.राजेश पितळे, मे.अजिंक्यतारा, मे.टंडन अर्बन सोल्युशन , मे.एनमार्ज इ. तांत्रिक सल्लागारामार्फत बांधकामाचे नियोजन या लेखा शिर्षातून पु ढील प्रमाणे खर्च

केला आहे.

2013-14 रु.1,41,25,961/-

2014-15 रु.1,14,01,847/-

सल्लागार निहाय प्रशासकीय वित्तीय मंजुरी, निविदा मंजुरी, कार्यादेश, प्रदान, इ. तपशिल उपलब्ध् करुन देण्याबाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.57 दि.29/03/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखा परीक्षणाचा अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) तांत्रिक सल्लागाराची सेवा घेण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रशासकीय व वित्तीय मंजुरीचा ठराव उपलब्ध करुन दिला नाही.

2) तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करताना जाहिर निविदा मागविल्याची नस्ती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिली नाही.

3) निविदा मंजुरीचा ठराव उपलब्ध करुन दिला नाही.

4) किफायतशीर निविदा धारकाचे बाबत मंजुरी, करार, कार्यादेश, इ. बाबी उपलब्ध करुन दिल्या नाहीत.

5) निरनिराळ्या तांत्रिक सल्लागारांनी केलेल्या कामाचा तपशिल, 2013-14 व 2014-15 मध्ये त्यांना केलेल्या प्रदानाची प्रमाणके उपलब्ध करुन दिली नाहीत.

6) तांत्रिक सल्लागाराला मुदतवाढ दिली असल्याबाबतच्या ठरावाची प्रत उपलब्ध करुन दिली नाही.

7) या कामासाठी 2013-14 व 2014-15 मध्ये एकूण केलेले प्रदानाचा तपशिल लेखा परीक्षणास उपलब्ध् करुन दिला नाही.

विभागाने उपरोक्त अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत. त्यामुळे तांत्रिक सल्लागाराच्या नियुक्ती बाबतचे लेखा परीक्षण करता आले नाही.

16 वॉर्ड क्र.70/71 मधील माणिकपूर नाका ते चुळणा खलाटीपाडा पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.

रस्ता डांबरीकरण

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष : सार्व. बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 4212842.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4212842.00/-

निविदा मंजूरीनंतर सुधारीत प्राकलनात सुमारे 80% वाढ झाली. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका परिच्छेद क्र.227 (अ), (1), (2), (अ) नुसार मुळ प्राकलनातील अतिरिक्त बाबीचा दर- हा अनुसूचीत दरापेक्षा (जिल्हा दरसुचीचे) अधिक असता कामा नये. असे असताना प्राकलनात वाढलेल्या अतिरिक्त कामासाठी 5% जादा दर दिला आहे. काम दि.15/05/2015 रोजी पुर्ण झाल्याने, जादा प्रदानाची रक्कम नमुद करता येत नाही. कामची नोंद नमुना नं.139 घेतली नाही.

कामाचे नाव :- वॉर्ड क्र.70/71 मधील माणिकपूर नाका ते चुळणा खलाटीपाडा पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.

प्राकलन :- रु.70,02,085.
सुधारीत रु.1,23,97,123

प्रशासकिय मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र.1239 दि.31/12/2013
सुधारीत महासभा ठराव क्र.09 दि.16/04/2015

तांत्रिक मंजुरी :- शहर अभियंता दि.02/01/2014
सुधारीत दि.18/04/2015.

निविदा तारिख :- दि.15/02/2014 ई निविदा, लोकमत, महाराष्ट्र जनमुद्रा.

एल-1 निविदा :- मे.सुवर्णा एंटरप्रायझेस, 5% जादा दराने.

निविदा मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र.56, दि.16/06/2014.

करार :- दि.06/09/2014.

कार्यादेश :- क्र.3063 दि.11/09/2014
सुधारीत 373 दि.21/04/2015

मुदत :- 120 दिवस.
सुधारीत 90 दिवस.

कामाची स्थिती :- लेखा परीक्षण काळात काम अपुर्ण (दि.15/05/2015 पूर्ण)

खर्च :- प्रथम धावते प्र.क्र.6066 दि.25/03/2015 रु.42,12,842
MB No.66 P. 75 ते 79

या कामा बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.60 दि.01/04/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने पत्र क्र.14 दि.04/04/2016 नुसार खुलासा केला आहे. विभागाने केलेला खुलासा विचारात घेता लेखा परीक्षणाचा अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) या कामाचे मुळ प्राकलन रु.70.02 लक्ष असून कामास सुरुवात केल्या नंतर खडीकरण व डांबरीकरण करण्याचे कामात वाढ होणार असल्याचे लक्षात आले. त्यामुळे सुधारीत प्राकलन रु.123.97 लक्षाचे तयार केले. म्हणजेच मुळ प्राकलनात सुमारे 80% वाढ आहे. सुधारीत प्रशासकिय मंजुरी महासभा ठराव क्र.09 दि.16/04/2015 नुसार घेतली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका परिच्छेद क्र.227 (अ), (1), (2), (अ) नुसार अतिरिक्त बाबीचा दर हा अनुसूचीत दरापेक्षा (जिल्हा दरसुची) अधिक असता कामा नये. परंतू या कामाचे बाबत ठेकेदारास निविदा रकमेच्या 5% जादा दराने काम दिले असून त्यानुसार प्रदान केले आहे. सुधारीत प्राकलनाचे कामासही 5% जादा दराने प्रदानास मंजुरी दिली आहे. या कामाचे दुसरे व अंतिम देयक पुढील वर्षात खर्ची पडले आहे. त्यात सुधारीत कामाचे प्रदान करताना मुळ प्राकलनाच्या 5% जादा प्रदान केलेली रक्कम वसुलपात्र आहे.

2) सदरचे काम दि.31/03/2015 रोजी अपुर्ण आहे. कामास सुधारीत मुदतवाढ दिली आहे. कामाची नोंद नमुना नं.139 मध्ये घेतली नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु.42,12,842

DATPMVM6001 (Ref No : 27, Hmm No : 60)

17 मौजे - मालोंडे मधील सर्व्हे नं.77 अ येथील ख्रिस्ती समाज दफनभुमी कंपाऊंड वॉल बांधणे.

कंपाऊंड वॉल

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष : सार्व. बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 1901228.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 19012.00/-

कामास मुदतवाढ दिल्यानंतर सुधारीत कालावधीसाठी कामाचा विमा काढला नसताना प्रदान करताना विम्याची 1% रक्कम रु.19,012 वसुल केली नाही.

कामाचे नाव :- मौज - मालोंडे मधील सर्व्हे नं.77 अ येथील ख्रिस्ती समाज दफनभुमी कंपाऊंड वॉल बांधणे.

प्राकलन :- रु.19,01,713.
प्रशासकिय मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र.476. दि.29/08/2012
तांत्रिक मंजुरी :- शहर अभियंता दि.17/09/2012
निविदा तारिख :- दि.10/10/2012, पुढारी, खबरे आजतक.
एल-1 निविदा :- मे.मॅनदिप एंटरप्रायझेस, 4.99% जादा दराने.
निविदा मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र.695 दि.23/11/2012
करार :- दि.13/02/2013.
कार्यादेश :- क्र.1401 दि.13/02/2013
मुदत :- 60 दिवस.
मुदत वाढ दि.31/10/2013 पर्यंत
कामाची स्थिती :- काम पुर्ण दि.28/10/2013
खर्च :- प्रथम धावते प्र.क्र.3569 दि.29/10/2013 रु.8,28,193
MB No.59 P.38 ते 42
दूसरे धावते प्र.क्र.5058 दि.04/02/2014 रु.8,48,545
MB No.59 P.48 ते 53
तिसरे धावते प्र.क्र.2481 दि.03/09/2014 रु.2,24,490
MB No.59 P.54 ते 60
रु.19,01,228

या कामा बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.62 दि.01/04/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने पत्र क्र.15 दि.04/04/2016 नुसार खुलासा केला आहे. विभागाने केलेला खुलासा विचारात घेता लेखा परीक्षणाचा अभिप्राय पुढील प्रमाणे आहे.
या कामाचा कार्यादेश दि.13/02/2013 रोजी दिला असुन मुदत 60 दिवसांची होती. विभागाने मुदतवाढ दि.31/10/2013 पर्यंत दिली आहे. विमा संचालक, शासकीय विमा निधी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक प्रविनी-2300/सहविमा/जीप-2, दिनांक 7 जानेवारी, 2004 नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या एक टक्का विमा कामासाठी व कामगारांच्या सुरक्षेसाठी विमा निधीत भरणे आवश्यक आहे. या कामाचे बाबत मुदतवाढीच्या कालावधीसाठी विमा उतरविलेला नाही. तसेच विमा काढला नसताना एकूण प्रदानाच्या 1% रक्कम रु.19,012 वसूल केली नाही.
वसुलपात्र रक्कम रु.19,012/-

DATPMVM6001 (Ref No : 28, Hmm No : 62)

18 किरवली येथील चांदकाई मंदिर ते स्मशानभुमी गटार बांधणे.

गटार बांधकाम.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष : सार्व. बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 2985452.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2979481.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 5971.00/-

आर.सी.सी. पाईप पुरवठा करण्यासाठी महापालिकेने स्वतंत्र ठेकेदार नेमला आहे. कामासाठी वापरलेल्या रु.723639/- किंमतीच्या पाईपची चलने देयकासोबत जोडली नाहीत. प्रकलनात दाखवलेला आर.सी.सी. पाईपचा दर रु.1216.20 प्रति रनिंग मिटर आहे. मनपाने नेमणुक केलेल्या ठेकेदाराच्या पाईपचा दर रु.1374 प्रति रनिंग मिटर आहे. या प्रति रनिंग मिटर दरात रु.157.80 तफावत आहे. कामासाठी मुदतवाढ दिल्यानंतर ठेकेदाराने वाढीव कालावधीचा विमा काढला नसल्याने प्रदान करताना रक्कम रु.5971/- वसुल केली नाही.

कामाचे नाव :- किरवली येथील चादकाई मंदिर ते स्मशानभुमी गटार बांधणे.

प्राकलन :- रु.36,85,965.

प्रशासकिय मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र.04. दि.14/11/2011

तांत्रिक मंजुरी :- शहर अभियंता दि.28/12/2011

निविदा तारिख :- दि.07/02/2012, लोकनायक,महारष्ट्र बुलंद टाईम्स.

एल-1 निविदा :- मे.अविनाश देशमुख, 4.98% जादा दराने.

निविदा मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र.16 दि.19/03/2012

करार :- दि.13/04/2012.

कार्यादेश :- क्र.121 दि.21/04/2012

मुदत :- 120 दिवस.

मुदत वाढ दि.31/05/2013

कामाची स्थिती :- काम पुर्ण दि.29/05/2013

खर्च :- प्र.क्र.698 दि.18/10/2013 रु.29,85,452

MB No.63 P.12 ते 17

या कामा बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.63 दि.01/04/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने पत्र क्र.13 दि.04/04/2016 नुसार खुलासा केला आहे. विभागाने केलेला खुलासा विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) महापालिकेने आ.सी.सी. पाईप पुरवठा करणेसाठी कामासाठी स्वतंत्र ठेकेदार नेमला आहे. त्याने या कामासाठी पाईपचा पुरवठा केल्याचे दाखविले आहे. परंतु पाईप पुरवठ्याची चलने देयकासोबत जोडलेली नाहीत.

प्राकलनात या कामासाठी NP 2, 600mm चे 595 रनिंग मीटर x दर 1216.20 = खर्च रु.723639

दाखविला आहे. परंतू मनपाने नेमणूक केलेल्या ठेकेदाराच्या पाईपचा दर रु.1374 प्रति रनिंग मीटर आहे. या दरातील तफावती बाबत विभागाने खुलासा केला नाही. मनपाने नेमणूक केलेल्या ठेकेदाराला पाईपचे प्रदान स्वतंत्रपणे केले जाते. पाईपचा खर्च कामावर दाखविला नाही. त्यामुळे पाईपच्या खर्चाची रक्कम कामावरील खर्चात न दाखविल्याने प्राकलनापेक्षा कमी खर्च झाल्याचे दिसून येते.

2) या कामासाठी ठेकेदारास मुदतवाढ दि.31/05/2013 पर्यंत दिली आहे. विमा संचालक, शासकीय विमा निधी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक प्रविनी-2300/सहविमा/जीप-2, दिनांक 7 जानेवारी, 2004 नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या एक टक्का विमा कामासाठी व कामगारांच्या सुरक्षेसाठी विमा निधीत भरणे आवश्यक आहे. या कामाचे बाबत मुदतवाढीच्या कालावधीसाठी विमा उतरविलेला नाही. विभागाने केलेल्या खुलाशानुसार कामासाठी ठेकेदारास दिलेल्या मुदतीत एकूण 80% काम पुर्ण केले असून त्याची नोंद साईड इंजिनियरच्या डायरीत घेतल्याचे प्रमाणीत केले आहे. त्यानंतर मुदत वाढ दि.31/05/2013 पर्यंत दिली गेली. मुदतवाढीच्या काळात 20% काम रक्कम रु.5,97,091 चे पुर्ण झाले आहे. ठेकेदाराने विमा संचालनालयाकडे काढलेला विमा दि.21/12/2012 ते 20/04/2013 पर्यंत आहे. परंतू वाढीव कामासाठी विमा काढला नाही. मुळ मुदती नंतर पुर्ण केलेल्या कामाच्या प्रदानाच्या 1% रक्क्म रु.5,971 प्रदान करताना वसूल केली नाही.

वसुलपात्र रक्कम रु.5,971/-

आक्षेपाधीन रक्कम रु.29,79,481/-

DATPMVM6001 (Ref No : 29, Hmm No : 63)

19 महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 नुसार संविदा करण्याबाबत आयुक्तांना दिलेल्या अधिकाराबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष : सार्व. बांधकाम विभाग मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9अ

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 (ड) नुसार रक्कम रु.5 लाख ते 25 लाखा पर्यंत आयुक्तांनी केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती, त्याने संविदा केल्याच्या तारखेपासुन 15 दिवसाचे आत स्थायी समितीस कळविली पाहिजे. कलम 73 (ई) नुसार रु. पाच लाख पर्यंत संविदा करण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत. प्रभाग समितीने रक्कम रु. पाच लाखापर्यंत दुरुस्ती/ विकास कामास आर्थिक प्रशासकीय मजुरी दिली आहे आणि

उपायुक्तांनी निविदा मंजूर केल्या आहेत. आयुक्तांनी आपले संविदा करण्याचे अधिकार प्रभागास व उपायुक्तांना प्रत्यार्पित केल्याचे आदेश, विभागाने लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिले नाहीत.

<u>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 नुसार संविदा करण्याबाबत आयुक्तांना दिलेल्या अधिकाराबाबत.</u>

या बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.67 दि.04/04/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने खुलासा केला नाही. लेखा परीक्षणाचा अभिप्राय पुढील प्रमाणे आहे.

आयुक्त वसई-विरार शहर महानगरपालिका यांचेकडील आदेश क्र.आस्था/738/2012, दि.17/01/2012 अन्वये महापालिकेच्या पाच प्रभाग समित्यांना लेखा विषयक अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार प्रभाग समिती निहाय लेखाविषयक कामकाज पार पाडण्याकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 84(1) नुसार लेखापाल/वरीष्ठ लेखा लिपिक यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील तरतुदीनुसार प्रभाग समितीचे संपूर्ण कामकाज प्रभाग समिती मार्फत पार पाडले जाईल. यासाठी मुख्य निधीतून प्रत्येक प्रभागास ठराविक रक्कम वर्ग करण्यात आली आहे. प्रभाग समितीच्या अधिकाऱ्यांनी निधीनिहाय स्वतंत्र लेखे ठेवायचे आहेत. बँक खात्याचे व्यवहार प्रभाग कार्यालयापुरते मर्यादित ठेवले आहेत. बँकेचे व्यवहार करण्याचे अधिकार संबंधित उपायुक्त व प्रभागाचा लेखापाल/वरीष्ठ लेखा लिपिकास दिले आहेत. यासाठी खर्चाची रक्कम रु.5.25 लाख पर्यंतची मर्यादा घालून दिली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 (ड) नुसार रक्कम रु.5 लाख ते 25 लाखा पर्यंत आयुक्तांनी केलेल्या प्रत्येक संविदेची माहिती, त्याने संविदा केल्याच्या तारखेपासुन 15 दिवसाचे आत स्थायी समितीस कळविली पाहिजे. कलम 73 (ई) नुसार रु.पाच लाख पर्यंत संविदा करण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत. प्रभाग समितीने रक्कम रु.पाच लाख रक्कमेपर्यंतच्या दुरुस्ती/विकास कामास आर्थिक प्रशासकीय मंजुरी दिली आहे आणि अशा कामाच्या निविदेस संबंधित उपायुक्त यांनी मंजुरी दिली आहे. आयुक्तांनी रक्कम रु.पाच लाखा पर्यंतच्या कामास आर्थिक प्रशासकीय मंजुरीचा अधिकार प्रभागास प्रत्यार्पित केल्याचे आदेश विभागाने लेखा परीक्षणास दाखविले नाहीत. तसेच रु.पाच लाखापर्यंत निविदा मंजुरीचे अधिकार उपायुक्तांना प्रत्यार्पित केल्याचे आदेश लेखा परीक्षणास दाखविले नाहीत. याचा उदाहरणा दाखल तपशिल परिशिष्ट क्र. मध्ये दिला आहे. याबाबतचे आदेश विभागाने लेखा परीक्षणास उपलब्ध् करुन दिले नाहीत.

20 मुल्यावर्धित कर (व्हॅट) वसुली बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष : सार्व. बांधकाम विभाग मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 446265.00/-

मुल्यावर्धित कराची वसुली कमी दराने केली आहे. त्यामुळे रक्कम रु.4,46,265/- वसुलपात्र आहे. सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. मध्ये दाखविलेल्या कामाशिवाय अन्य कामातुनही मुल्यावर्धित कराची रक्कम वसुल केल्याची खात्री प्रदान करताना केली नाही.

मुल्यावर्धित कर (व्हॅट) वसुली बाबत.

या बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.68 दि.04/04/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने खुलासा केला नाही. लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी शासन राजपत्र दि.04/04/2012 नुसार अधिसुचना जाहीर केली असून मुल्यावर्धित कर अधिनियम 2002 मध्ये सुधारणा केली आहे. त्यानुसार दि.01/04/2012 पासून- या कराची नोंदणी प्रमाणपत्र सादर न केलेल्या ठेकेदाराकडून मुल्यावर्धित कराची 5% रक्कम वसुली करावयाची आहे. परंतु महापालिकेच्या बांधकाम विभागाने संबंधित ठेकेदाराकडून या कराची रक्कम पाच टक्यापेक्षा कमी वसुली केल्याचे दिसून येते. त्यामुळे रक्कम रु.4,46,265/- वसुलपात्र आहे. त्याचा उदाहरणा दाखल तपशिल परिशिष्ट क्र. नुसार दाखविण्यात आला आहे.

2) उपरोक्त दाखविलेल्या कामा शिवाय अन्य कामातुन (2013-14 व 2014-15) मुल्यावर्धित कराची रक्कम वसुल केल्याची खात्री करुन त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

वसुलपात्र रक्कम रु.4,46,265/-

DATPMVM6001 (Ref No : 35, Hmm No : 68)

21 आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत केलेल्या कामाविषयी अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 06

लेखा शीर्ष : सार्व. बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 30157660.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 30157660.00/-

2013-14 मधील मंजुर कामे व पुर्ण झालेल्या कामाची नोंदवही ठेवली नाही. 2009-10 ते 2013-14 पर्यंतच्या मंजुरी प्राप्त कामापैकी पुर्ण झालेली कामे लेखा परीक्षणास दाखविली. परंतु वर्षवार कामाची स्थिती दाखविली नाही. जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय मंजुरीतील अट क्र.07 नुसार आमदार निधीतील कामे एक ते दोन सिझनमध्ये पूर्ण करणे बंधनकारक आहे. परंतु याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिली नाही. प्रशासकीय मंजुरीतील अट क्र.10 नुसार अनुदान व खर्चाच्या हिशेबासाठी स्वतंत्र रोखवही ठेवली नाही. 2013-14 मध्ये अनुदान रु.2,46,19,000/- प्राप्त झाले असुन अट क्र.18 नुसार पुर्ण झालेल्या कामाची उपयोगिता प्रमाणपत्रे मा. जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेली नाहीत. लेखा शाखेने अनुदानाच्या जमा-खर्चाचे हिशोब मागणी करुनही लेखा परीक्षणास दाखविले नाहीत.

<u>आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत केलेल्या कामाविषयी अनियमितता.</u>

मागील 2012-13 लेखा परिच्छेद क्र.06 नुसार आक्षेप घेण्यात आला होता. मा.जिल्हाधिकारी यांचे कडील आदेश दि.17/08/2009, 31/03/2011, 31/03/2012, 30/04/2012, 19/10/12, 26/03/2013, 28/03/2013, 01/06/2013, 17/08/2013 नुसार मंजुरी दिलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार महानगरपालिकेने 2013-14 मध्ये 24 कामे केली आहेत. असे बांधकाम विभागाने व लेखा विभागाने सादर केलेले अभिलेखे व प्रमाणके यानुसार दिसुन येते. स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत केलेल्या कामाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

2013-14

अ.क्र.	कामाचे नाव	गावांचे व तालुक्याचे	प्रशासकीय मंजुरी .क्र. दिनांक	प्रशासकीय मंजुरीची रक्कम रु.(लाखात)	प्राकलन रु.	ठेकेदाराचे नाव	खर्च रु. (लाखात)	कामाची स्थिती.
अ 1.	मौज बोळींज स.नं. 492 येथे सामाजिक सभागृह बांधणे.	बोळींज/ विरार		21.62	21.00	मे.बाबा कंन्स्ट्रक्शन	21.62	काम पुर्ण
2	नांरिगी गावातील सामाजिक सभागृह बांधणे.	नांरिगी/ विरार	642 दि.31.03.12	12.37	24.74	मे.किरण काशिनाथ पाटील 4.99% जादा दराने	12.93	काम पुर्ण 4308 03.02.2014

3	प्रभाग क्र.10 बोळींज दिवलईपाडा येथे स्मशानभुमीचे बांधकाम करणे.	बोळींज/ विरार		32.19	32.19	मे.संजय कंस्ट्रक्शन	11.01	काम पुर्ण
4	विरार (प.) बोळींज येथे प्रिमियम पार्क येथे उद्यान विकसीत करणे.	बोळींज/ विरार		9.98	9.98	मे.संजय कंस्ट्रक्शन	10.45	काम पुर्ण 93 28.02.2014
5	विरार (प.) बोळींज येथील साई समर्थनगर येथे प्रिमियम पार्क येथे उद्यान विकसीत करणे.	बोळींज/ विरार		10.29	10.29	मे.संजय कंन्स्ट्रक्शन	10.29	काम पुर्ण
6	प्रभाग क्र.10 बोळींज लक्ष्मी रेसिडन्सी समोरील म.न.पा. उद्यान विकसीत करणे.	बोळींज/ विरार	671 दि.26.03.13	8.97	8.97	मे.व्दारका कन्स्ट्रंक्शन 4.50% जादा दराने	9.43	काम पुर्ण 4683 28.02.2014
ब 7	प्रभाग समिती ब मधील विरार (पू.) कमळाकर चौधरी उद्यान विकसीत करणे.	विरार (पू)		10.44	10.44	मे.स्वप्निल सेठ	11.38	काम पुर्ण
8	विरार (पु) दहिसर व्हिलेज येथे स्मशानभुमीचे बांधकाम करणे.	दहिसर विरार (पू)	642 दि.31.03.12	32.19	32.19	मे.बाबा कंन्स्ट्रक्शन 5% जादा दराने	25.96	काम पुर्ण 170 08.05.2013
9	दहिसर हरीत फणसपाडा येथे स्मशानभुमी बांधणे.	दहिसर विरार (पू)		9.65	9.65	मे.व्दारका कंन्स्ट्रक्शन	8.09	काम पुर्ण
10	नालासोपारा (पू.) वालईपाडा येथे स्मशानभुमीचे बांधकाम करणे.	नालासोपारा (पू)	772 दि.31.3.11	10.48	10.48	मे.गणेश असो.	8.39 0.72	काम पुर्ण 56 26.11.2013
11	प्रभाग समिती ब शिरगांव स्मशानभुमीचे बांधकाम करणे.	कोपरी/ विरार (पू)	671 दि.26.03.13	32.19	32.19	मे.सुवर्णा एंटरपा्रयजेस 5% जादा दराने	35.26	काम पूर्ण
12	विरार (पू) मोरयानगर शासकीय जागेत सामाजिक सभागृह बांधणे.	विरार (पू)		24.99	24.99	मे.शोएब अकबर शेख	3.66	काम पुर्ण
13	प्रभाग समिती ब कोपरी स्मशानभुमीचे बांधकाम करणे.	कोपरी / विरार		32.19	32.19	मे.बालाजी कंस्ट्रक्शन	11.99	काम पुर्ण

14	सोपारा येथील गार्डनला बाहेरील बाजूने सुशोभित कुंपण करणे.	नालासोपारा (पू)		11.78	11.78	मे.एम.बी. कंस्ट्रक्शन	6.21	काम पुर्ण
15	प्रभाग समिती ब तूळींज महेश पार्क उद्यान विकसीत करणे.	नालासोपारा (पू)	698 दि.28.03.13	16.76	16.76	मे.शार्प एंटरप्रायजेस	17.18	काम पुर्ण 607 27.03.2014.
क 16	नालासोपारा (प) प्रभाग समिती क्र.39 आचोळे टाकीजवळ नाना - नानी पार्क उद्यान विकसीत करणे.	नालासोपारा (पू)	642 दि.31.03.12	15.22	15.22	मे.व्दारका कंन्स्ट्रक्शन	13.06	काम पूर्ण 30 12.09.2013
17	सोपारा येथील पाटणकर पार्क येथे बहुउद्देशीय इमारत सभागृह बांधणे.	नालसोपारा (प.)	779 दि.31.03.11	26.87	26.87	मे.एम.ई.प्रोजेक्ट	23.38	काम पुर्ण 1612 07.08.2013
18	नालासोपारा झालावाड येथे बहुउद्देशीय इमारत सभागृह बांधणे.	नालासोपारा (प.)	779 दि.31.03.11	25.25	25.25	मे.शोएब अकबर शेख	23.29	काम पुर्ण 61 30.11.2013
19	नालासोपारा सर्वोदय वसाहत येथे सामाजिक सभागृह बांधणे.	नालासोपारा (प.)	779 दि.31.03.11	26.87	26.87	मे.ओम एंटप्रायजेस	18.32	काम पुर्ण 2964 28.10.2013
ड 20	आचोळे तलाव बाहेरील बाजुस कंपाऊंड वॉल बांधणे	आचोळे, नालासोपारा (प.)	698 दि.28.03.13	10.48	10.48	मे.व्दारका कंन्स्ट्रक्शन 9.98% जादा दराने	10.48	काम पूर्ण 50 31.10.2013
21	कोल्ही गावदेवी मंदिर ते ताई बरफ यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.	कोल्ही	975 दि.17.08.09	3.31	3.31	मे. ठाकूर एंटरप्रायजेस 9.99% जादा दराने	3.24	काम पूर्ण 39 07.10.2013
22	जूचंद्र गावाबाहेरील रस्त्याचे डांबरीकरण करणे.	जूचंद्र	दि.17.8.09	5.00	5.00	मे.शितल कंन्स्ट्रक्शन 9.99% जादा दराने	3.52	काम पूर्ण 38 07.10.2013
23	चिंचोटी गाव दर्गा ते दांडेकर पाडा रस्ता डांबरीकरण	चिंचोटी	975 दि.17.08.09	3.31	3.31	मे.संजय कंन्स्ट्रक्शन 9.99% जादा दराने	5.04	काम पूर्ण 37 07.10.2013
24	आचोळे गाव सर्वे नं.58 मध्ये आंबेडकर नगर बुध्द विहार पुतळ्याच्या परिसरातील उद्यान विकसित	आचोळे, नालासोपारा (पूर्व)	642 दि.31.3.12	10.00	10.00	मे.मॅनदिप एंटरप्रायझेस 5% जादा दराने	9.31	काम पूर्ण 314 16.05.2013

	करणे.							

या बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.65 दि.04/04/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्याचे पत्र क्र.निरंक दि. 11/04/2016 नुसार खुलासा केला आहे. विभागाचा खुलासा विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) मा.जिल्हा अधिकारी यांचेकडील प्रशासकीय मान्यतेचा आदेश क्र.378 दि.14/02/2014 नुसार वित्तीय वर्ष 2013-14 करीता एकूण 22 कामे मंजुर केली असून त्यासाठी रक्कम रु.186.54 लक्ष रकमेस प्रशासकीय मंजूरी दिली आहे.

परंतू विभागाने वित्तीय वर्ष 2013-14 मध्ये एकूण 24 कामे पूर्ण झाल्याचे दाखविले आहे. म्हणजेच प्रत्यक्षात मागील वर्षातील 02 कामे पुर्ण झाली आहेत. प्रशासकीय मंजुरी मिळालेली कामे आणि विभागाने केलेली कामे यात तफावत आहे. मा.जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या प्रशासकीय मंजुरीतील अनु क्र.7 नुसार - बांधकाम विभाग व लेखा विभागाने स्वतंत्र नोंदवही ठेवुन त्यात मंजूर कामे, पुर्ण केलेली कामे यांची तपशिलवार नोंद केली नाही.

2) मागील लेखा परीक्षण अहवाल 2012-13 मधील परिच्छेद क्र.6 नुसार स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत केलेल्या कामाबाबत आक्षेप घेण्यात आला होता. 2013-14 मध्ये मा.जिल्हाधिकारी यांचेकडून किती कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाली, त्यापैकी अनुदान प्राप्त किती झाले, अनुदानातून किती खर्च केला, शिल्लक अनुदान किती याबाबतची माहिती लेखा परीक्षणास प्राप्त झाली नाही. उपरोक्त कामे पाहता मंजुरी मिळालेल्या 2009-10 पासून 2013-14 पर्यंतच्या कामापैकी पूर्ण झालेली कामे दाखविली आहेत. प्रत्यक्षात वर्षवार मिळालेली मंजुरी व अनुदान, वर्षवार पूर्ण झालेली कामे व अपुर्ण कामे याबाबतची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिली नाही.

3) मा.जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या प्रशासकीय मंजुरीतील अनु क्र.7 नुसार सदरील कामे एक ते दोन वर्कींग सिझन मध्ये पूर्ण करणे बंधनकारक आहे. परंतु 31/03/2014 पर्यंत किती कामांना मंजुरी मिळाली, त्यापैकी महापालिकेने किती कामे पूर्ण केली याची माहिती उपलब्ध करुन दिली नाही.

4) मा.जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या प्रशासकीय मंजुरीतील अनु क्र.10 नुसार या कार्यक्रमाअंतर्गत येणाऱ्या अनुदान व खर्चाचा हिशेब स्वतंत्र ठेवायचा आहे. असे असताना महानगरपालिकेने या योजनेच्या कामासाठी स्वतंत्र रोखवही ठेऊन त्यात हिशेब दाखविले नाहीत. महापालिकेने सर्वसाधारण रोखवहीत शासकीय अनुदानाच्या जमा खर्चाची नोंद घेतली आहे. त्यामुळे प्रत्येक वर्षातील अनुदानाची किती रक्कम शिल्लक आहे, याचा ताळमेळ घेता आला नाही.

5) मा.जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या प्रशासकीय मंजुरीतील अनु क्र.18 नुसार काम पूर्ण

झाल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र मा.जिल्हाधिकाऱ्यास पाठविणे बंधनकारक आहे. परंतु महापालिकेने 2013-14 मधील रु.2,46,19,000/- अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधितांना पाठविलेली नाहीत.

6) लेखा परीक्षणास शासन अनुदानाच्या जमा खर्चाचे विवरणपत्र, (अखर्चित रक्कमेसह) देण्याबाबत अर्धसमास ज्ञापनपत्र क्र.04 दि.11.02.2014 अन्वये कळविण्यात आले होते. त्यानंतर मुख्य लेखाधिकारी, मुख्यालय यांच्याकडे वारंवार मागणी करुनही लेखा परीक्षणास आवश्यक असलेली शासन अनुदानाच्या जमा-खर्चाची विवरणपत्रे, आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत मिळालेले अनुदान व खर्चाची विवरणपत्रे, अखर्चीत रक्कम, इ. मागणी करुनही उपलब्ध करुन दिली नाहीत. त्यामुळे स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत जमा-खर्चाचे लेखा परीक्षण करता आले नाही. लेखा विभागाकडील आमदार निधी शिलकेचा तपशिलाचे अवलोकन करता पुढील प्रमाणे वित्तीय वर्षाचे अखेर शिल्लक असल्याचे दिसुन आले.

वर्ष	दिनांक	अखेर शिल्लक	तपशिल		
2013-14	31.03.2014	रु.4,07,74,745	स्टेट बँक	रु.5,84,438	
			इंडियन बँक	रु.2,77,212	
			मुदतठेवी कार्पो.	2,26,10,617	गुंतवणूक नोंदवही 13-14 पृ.क्र.17, अ.क्र. 210
			-//-	1,73,02,478	पृ.क्र.16, अ.क्र.209

लेखा शाखेने स्वतंत्र रोखवही ठेवली नाही. फक्त बँकेचे खाते स्वतंत्र ठेवले आहे. त्यामुळे खात्यावर असलेली दि.31/03/2014 अखेरची शिल्लक समजते. परंतु रक्कम मुदतठेवीमध्ये सुध्दा ठेवल्याने व्याजाची आकारणी तपासता आली नाही. आमदार निधीच्या कामासाठी मिळालेल्या अनुदानाची रक्कम अनेक वर्षापासून शिल्लक असून ती महापालिकेने मुदत ठेवीत ठेवल्याचे दिसून येते. परंतु विभागाकडे सुध्दा संबंधित कामाची नोंदवही नसल्याने कोणत्या वर्षापैकी किती रक्कम शिल्लक आहे हे तपासून पाहता येत नाही. वर्गीकरण नोंदवहीत लेखाशिर्षानुसार नोंदी घेतल्या आहेत. त्यामुळे खर्चाची अचूक

नोंद घेतल्याची खात्री करता आली नाही. आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत मिळालेले अनुदान खर्च न करता अनेक वर्षापर्यंत मुदतठेवीमध्ये ठेवण्यात आली आहे. योजनेसाठी स्वतंत्र रोखवही न ठेवल्याने अखर्चित अनुदान मागील कोणत्या वर्षापासुनचे आहे, हे समजु शकत नाही.

2013-14 मध्ये आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमावर एकूण खर्च रु.3,01,57,660 केला आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.3,01,57,660

DATPMVM6001 (Ref No : 36, Hmm No : 65)

22 आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत केलेल्या कामाविषयी अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 06

लेखा शीर्ष : सार्व. बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 7234363.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7234363.00/-

2014-15 मधील मंजुर कामे व पुर्ण झालेल्या कामाची नोंदवही ठेवली नाही. 2009-10 ते 2014-15 पर्यंतच्या मंजुरी प्राप्त कामापैकी पुर्ण झालेली कामे लेखा परीक्षणास दाखविली. परंतु वर्षवार कामाची स्थिती दाखविली नाही. जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय मंजुरीतील अट क्र.07 नुसार आमदार निधीतील कामे एक ते दोन सिझनमध्ये पूर्ण करणे बंधनकारक आहे. परंतु याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिली नाही. प्रशासकीय मंजुरीतील अट क्र.10 नुसार अनुदान व खर्चाच्या हिशेबासाठी स्वतंत्र रोखवही ठेवली नाही. 2014-15 मध्ये अनुदान रु.1,62,27,000/- प्राप्त झाले असुन अट क्र.18 नुसार पुर्ण झालेल्या कामाची उपयोगिता प्रमाणपत्रे मा. जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेली नाहीत. लेखा शाखेने अनुदानाच्या जमा-खर्चाचे हिशोब मागणी करुनही लेखा परीक्षणास दाखविले नाहीत.

आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत केलेल्या कामाविषयी अनियमितता.

मागील लेखा परीक्षण अहवाल 2012-13 मधील परिच्छेद क्र.06 नुसार आक्षेप घेण्यात आला होता. मा.जिल्हाधिकारी यांचे कडील आदेश दि .17/08/2009, 31/03/2011, 31/03/2012, 30/04/2012, 19/10/12, 26/03/2013, 28/03/2013, 01/06/2013, 17/08/2013 नुसार मंजुरी दिलेल्या प्रशासकीय मान्यते नुसार महानगरपालिकेने 2014-15 मध्ये 3 कामे केली आहेत. असे बांधकाम

विभागाने व लेखा विभागाने सादर केलेले अभिलेखे व प्रमाणके यानुसार दिसुन येते . स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत केलेल्या कामाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

2014-15

अ. क्र.	कामाचे नाव	गावांचे व तालुक्याचे	प्रशासकीय मंजुरी .क्र. दिनांक	प्रशासकीय मंजुरीची रक्कम रु.(लाखात)	प्राकलन रु.	ठेकेदाराचे नाव	खर्च रु. (लाखात)	कामाची स्थिती.
ब 1.	विरार (पूर्व) रानळे तलाव येथे उद्यान विकसित करणे.	विरार (पूर्व)		5.11	5.11	मे.साई पोमू कंन्स्ट्रक्शन	5.62	काम पुर्ण
क 2	प्रभाग समिती ब तुळींज स.नं.62 वर्धमान नगर येथे तलावासाठी संरक्षण भिंत व काँक्रीट पाथवे बनविणे.	तुळींज	586 दि.19.10.12	53.33	74.79	मे.बाबा कंन्स्ट्रक्शन 5% जादा दराने	53.08	काम पूर्ण 11 31.05.2015
3	प्रभाग समिती क कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प.) लक्ष्मीबेन छेडा गार्डनला बाहेरील बाजुने कुंपण करणे.	नालासोपारा (प.)	671 दि.26.03.13	22.00	22.00	मे.विशाल चौधरी	21.34	काम पूर्ण 09 09.02.2015

या बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.65 दि.04/04/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्याचे पत्र क्र.निरंक दि. 11/04/2016 नुसार खुलासा केला आहे. विभागाचा खुलासा विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) मा.जिल्हा अधिकारी यांचेकडील प्रशासकीय मान्यतेचा आदेश क्र.1336 दि.14/08/2014 नुसार वित्तीय वर्ष 2014-15 करीता एकूण 12 कामे मंजुर केली असून त्यासाठी रक्कम रु.162.27 लक्ष रकमेस प्रशासकीय मंजूरी दिली आहे.

परंतू विभागाने वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये एकूण 3 कामे पूर्ण झाल्याचे दाखविले आहे. ही कामे 2012-13 मंजुर झालेल्या कामापैकी आहेत. म्हणजेच प्रशासकीय मंजुरी मिळालेली कामे 12 असुन विभागाने केलेली कामे 03 आहेत. मा.जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या प्रशासकीय मंजुरीतील अनु क्र.7 नुसार सदरील कामे एक ते दोन वर्कींग सिझन मध्ये पूर्ण करणे बंधनकारक आहे. बांधकाम विभाग व लेखा विभागाने स्वतंत्र नोंदवही ठेवुन त्यात मंजूर कामे, पुर्ण केलेली कामे यांची तपशिलवार नोंद केली नाही.

2) मागील लेखा परीक्षण अहवाल 2012-13 मधील परिच्छेद क्र.6 नुसार स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत केलेल्या कामाबाबत आक्षेप घेण्यात आला होता. 2014-15 मध्ये मा.जिल्हाधिकारी यांचेकडून किती कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाली, त्यापैकी अनुदान प्राप्त किती झाले, अनुदानातून किती कामे पूर्ण केली. शिल्लक अनुदान किती याबाबतची माहिती लेखा परीक्षणास प्राप्त झाली नाही. उपरोक्त कामे पाहता मंजुरी मिळालेल्या 2009-10 पासून 2013-14 पर्यंतच्या कामापैकी पूर्ण झालेली कामे दाखविली आहेत. प्रत्यक्षात वर्षवार मिळालेली मंजुरी व अनुदान, वर्षवार पूर्ण झालेली कामे व अपुर्ण कामे याबाबतची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिली नाही.

3) मा.जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या प्रशासकीय मंजुरीतील अनु क्र.7 नुसार सदरील कामे एक ते दोन वर्कींग सिझन मध्ये पूर्ण करणे बंधनकारक आहे. परंतु 31/03/2015 पर्यंत किती कामांना मंजुरी मिळाली, त्यापैकी महापालिकेने किती कामे पूर्ण केली याची माहिती उपलब्ध करुन दिली नाही.

4) मा.जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या प्रशासकीय मंजुरीतील अनु क्र.10 नुसार या कार्यक्रमाअंतर्गत येणाऱ्या अनुदान व खर्चाचा हिशेब स्वतंत्र ठेवायचा आहे. असे असताना महानगरपालिकेने या योजनेच्या कामासाठी स्वतंत्र रोखवही ठेऊन त्यात हिशेब दाखविले नाहीत. महापालिकेने सर्वसाधारण रोखवहीत शासकीय अनुदानाच्या जमा खर्चाची नोंद घेतली आहे. त्यामुळे प्रत्येक वर्षातील अनुदानाची किती रक्कम शिल्लक आहे, याचा ताळमेळ घेता आला नाही.

5) मा.जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या प्रशासकीय मंजुरीतील अनु क्र.18 नुसार काम पूर्ण झाल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र मा.जिल्हाधिकाऱ्यास पाठविणे बंधनकारक आहे. परंतु महापालिकेने 2014-15 मधील रु.1,62,27,000/- अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधितांना पाठविलेली नाहीत.

6) लेखा परीक्षणास शासन अनुदानाच्या जमा खर्चाचे विवरणपत्र, (अखर्चित रक्कमेसह) देण्याबाबत अर्धसमास ज्ञापनपत्र क्र.04 दि.11.02.2014 अन्वये कळविण्यात आले होते. त्यानंतर मुख्य लेखाधिकारी, मुख्यालय यांच्याकडे वारंवार मागणी करुनही लेखा परीक्षणास आवश्यक असलेली शासन अनुदानाच्या जमा-खर्चाची विवरणपत्रे, आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत मिळालेले अनुदान व खर्चाची विवरणपत्रे, अखर्चीत रक्कम, इ. मागणी करुनही उपलब्ध करुन दिली नाहीत. त्यामुळे स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत जमा-खर्चाचे लेखा परीक्षण करता आले नाही. लेखा विभागाकडील आमदार निधी शिलकेच्या तपशिलाचे अवलोकन करता पुढील प्रमाणे वित्तीय वर्षाचे अखेर शिल्लक असल्याचे दिसुन आले.

वर्ष	दिनांक	अखेर शिल्लक	तपशिल

2014-15	31.03.2015	रु.80855847	स्टेट बँक	रु.607658
			इंडियन बँक	37351119
			मुदतठेवी कार्पो.	24897070 गुंतवणूक नोंदवही 14-15, पृ.क्र.24, अ.क्र.210
			-//-	90,00,000 पृ.क्र.45, अ.क्र.325
			-//-	90,00,000 पृ.क्र.45, अ.क्र.326

लेखा शाखेने स्वतंत्र रोखवही ठेवली नाही. फक्त बँकेचे खाते स्वतंत्र ठेवले आहे. 2014-15 मध्ये आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमावर एकूण खर्च रु. 72,34,363 केला आहे. या खात्यावर असलेली दि.31/03/2015 अखेरची शिल्लक समजते. आमदार निधीच्या कामासाठी मिळालेल्या अनुदानाची रक्कम अनेक वर्षापासून शिल्लक असून ती महापालिकेने मुदत ठेवीत ठेवल्याचे दिसून आले. विभागाकडे संबंधित कामाची नोंदवही नसल्याने कोणत्या वर्षाची - किती रक्कम शिल्लक आहे, हे तपासून पाहता आले नाही. वर्गीकरण नोंदवहीत लेखाशिर्षानुसार - प्रत्येक वर्षाच्या जमा खर्चाच्या नोंदी घेतल्या आहेत. त्यामुळे मागील किती वर्षापासुन स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत रक्कम शिल्लक आहे याबाबत लेखापरीक्षणास खातरजमा करता आली नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु.7234363

DATPMVM6001 (Ref No : 37, Hmm No : 65)

23 स्थानिक संस्था कर निर्धारणात कराच्या आकारणीतील त्रुटींबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 12

मनपा निधी
अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 56118.00/-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 मधील 30(1) नुसार नोंदणीस पात्र ठरलेल्या व्यापाऱ्यांकडून नियम 10(3) नुसार सुरक्षा ठेव घेण्यात आलेली नाही. नगर विकास विभाग अधिसुचना दि.20 जुन 2013 नुसार नोंदणीकृत व्यापाऱ्याने वार्षिक विवरणपत्र वर्ष संपल्यानंतर 90 दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक आहे. विहीत कालावधीत विवरणपत्र सादर न करणाऱ्या व्यापाऱ्याकडून कलम 48(6) नुसार रु.5000/- एवढी शास्ती आकारणे आश्यक आहे. परंतू विहीत रकमेपेक्षा कमी शास्ती आकारण्यात आली आहे. कर निर्धारण् केलेल्या व्यापाऱ्यांकडून येणे असलेली थकबाकी संबंधीतांनी वेळेत महापालिकेकडे भरणा केली नसल्याने अशी थकबाकी कलम 48(3)(ख) मधील तरतूदीनुसार प्रतिमहा 2 टक्के व्याजासह वसुल करण्यात आलेली नाही. तसेच अशी थकबाकीची रक्कम "Form-L" मधील नोटीस बजावून मालमत्ता कराची थकबाकी असल्याप्रमाणे वसुलीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमाच्या कलम 152 नुसार वसई विरार मनपा क्षेत्रामध्ये दि.1.04.2011 पासुन स्थानिक संस्था कर लागू करण्यात आला आहे. त्यानुसार स्थानिक संस्था कर विभागाच्या वर्ष 2013-14 व 2014-15 या वर्षातील स्थानिक संस्था कर निर्धारण प्रकरणांच्या नस्ती, कर निर्धारण नोंदवही, कर भरणा चलने यांची तपासणी करता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत खुलासा करण्याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.16 दि.26/01/2016 अन्वये कळविण्यात आले असता याबाबत स्थानिक संस्था कर विभागाकडील पत्र जा.क्र.व.वि.श.म.स्था.सं.कर/2672/15-16 दि.03/03/2016 अन्वये खुलासा सादर केला आहे. सदर खुलासा पडताळणी करुन खालील प्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 मधील 30(1) नुसार नोंदणीस पात्र ठरलेल्या व्यापाऱ्यांकडून स्थानिक संस्था कर, व्याज अथवा दंडाची रक्कम समायोजित करण्याच्या दृष्टीने आयुक्तांनी ठरवून दिलेल्या दिनांकापर्यंत नियम 10(3) नुसार सुरक्षा ठेव म्हणून स्विकारणे आवश्यक आहे. परंतू महापालिकेने वरील नियमाप्रमाणे नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडून सुरक्षा ठेव घेतलेली नाही. त्यामुळे सदर नियमाचे पालन करण्यात आलेले नाही.

2) मे.स्वस्तिक पॉलीमर्स, स्थानिक संस्था कर नोंदणी क्र.61/1540/2011 या आस्थापनेचे 2011-12 या आर्थिक वर्षातील करनिर्धारण जा.क्र.वविशम/793/2014-15 दि.16.07.2014 अन्वये केलेले आहे. सदर कर निर्धारणाची पडताळणी करता त्यानुसार मे.स्वस्तिक पॉलीमर्स यांचे कडून नमुना ड-1 व नमुना ड-2 मधील विवरणपत्रे विहीत कालावधीत सादर करण्यात आली नसल्याने कर निर्धारणामध्ये पहिल्या सहामाही विवरणपत्राच्या विलंबासाठी रु.5000/- व वार्षिक विवरणपत्राच्या विलंबासाठी रु.5000/- याप्रमाणे रु.10,000/- एवढी शास्ती आकारणे आवश्यक असतांना रु.2000/- एवढी शास्ती आकारण्यात आली आहे. नगर विकास विभाग अधिसुचना दि.20 जुन 2013 नुसार वार्षिक विवरणपत्र वर्ष संपल्यानंतर 90 दिवसांच्या आत सादर केले नसल्याने कलम 48(6) नुसार रु.5000/- एवढी शास्ती आकारण्यात आलेली नाही. याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये व्यापाऱ्याकडून 48(3) अन्वये 28035/- व्याज व 48(2) अन्वये 47309/- शास्ती लावण्यात आली असल्याने प्रकरणाचा सारासार विचार करुन 48(6) अन्वये 2000/- इतकी शास्ती लावण्यात आली आहे. तसेच नियम 48(6) नुसार रु.5000/- ची शास्ती अनिवार्य नाही. विभागाचा सदर खुलासा आक्षेपाशी नियमाशी सुसंगत नसल्याने मान्य करता येत नाही. तरी मे.स्वस्तिक पॉलीमर्स यांचे कडून वार्षिक विवरणपत्राच्या विलंबासाठी रु.3000/- शास्तीची रक्कम वसुलपात्र आहे.

3) मे.जे.बी.इन्डस्ट्रीज नोंदणी क्र.28/00175/2011-12/I-GN यांचे 2011-12 या कालावधीतील कर निर्धारण जा.क्र.वविशम/स्थासंक/145/14 दि.22.05.2014 अन्वये करण्यात आले असून सदर आस्थापनेस रु.27,112/- एवढा कराचा भरणा करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर करनिर्धारण नस्तीची पडताळणी केली असता मे.जे.बी.इन्डस्ट्रीज यांनी नमुना ड-1 व नमुना ड-2 मधील विवरणपत्रे विहीत कालावधीत सादर करण्यात आली नसल्याने सदर

आस्थापनेच्या कर निर्धारणामध्ये सहामाही व वार्षिक विवरणपत्रासाठी रु.1000/- प्रमाणे एकूण रु.2000/- एवढी शास्ती आकारण्यात आली आहे. तसेच कर निर्धारण आदेशानुसार रु.27,112/- एवढा कराचा भरणा करण्यात आल्याबाबत भरणा चलन नस्तीत आढळून आले नाही. तरी संबधिताकडून मनपास येणे असलेली कराची रक्कम कलम 48(3)(ख) मधील तरतूदीनुसार प्रतिमहा 2 टक्के व्याजासह वसुल करणे आवश्यक आहे. याबाबत विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये संबधित व्यापाऱ्यास आकारण्यात आलेलया 48(2) किंवा 48(3) नुसार शास्ती व व्याज विचारात घेवून रु.2000/- शास्ती आकारण्यात आली आहे. तसेच दि.22/05/2014 रोजी देवू केलेला कर निर्धारण आदेशातील मागणी नुसार रक्कम न भरता दि.29/07/2015 रोजी अभय योजनेंतर्गत अर्ज सादर करुन रु.4219/- निव्वळ कराचा भरणा केल्याचे नमूद केले आहे. करनिर्धारण आदेशानुसार संबंधित व्यापाऱ्याकडून कराची वसुली करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे सदर खुलासा आक्षेपाशी सुसंगत नसल्याने मान्य करता येत नाही. तरी दि.22.05.2014 अन्वये निर्धारीत कराची रक्कम रु.27,112/- तसेच वार्षिक विवरणपत्राच्या विलंबासाठी 48(6) नुसार उर्वरीत शास्तीची रक्कम रु.3000/- अशी एकूण रु.30,112/- वसुलपात्र आहे.

4) मे.श्री अश्विनी ट्रेडर्स नोंदणी क्र.62/00238/2011-12/J-TR या आस्थापनेचे दि.1.04.2011 ते 31.03.2011 या कालावधीचे करनिर्धारण जा.क्र.ववि शम/स्था.सं.क./2334 दि.13.02.2014 अन्वये करण्यात आले असून रु.4512/- एवढी कराची रक्कम भरणा करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर करनिर्धारण नस्तीची पडताळणी केली असता कलम 48(6) नुसार विहीत कालावधीपेक्षा विलंबाने सादर केलेल्या विवरणपत्रासाठी रु.5,000/- प्रमाणे शास्तीची आकारणी करणे आवश्यक असतांना रु.2,000/- एवढी शास्ती आकारण्यात आली आहे. नगर विकास विभाग अधिसुचना दि.20 जुन 2013 नुसार वार्षिक विवरणपत्र वर्ष संपल्यानंतर 90 दिवसांच्या आत सादर केले नसल्याने कलम 48(6) नुसार रु.5000/- एवढी शास्ती आकारणी न करता रु.2000/- एवढी शास्ती आकारण्यात आली आहे. त्यामुळे विभागाने सादर केलेला खुलासा आक्षेपाशी व नियमातील तरतूदीशी सुसंगत नसल्याने मान्य करता येत नाही. तरी नियम 48(6) मधील तरतूदीनुसार वार्षीक विवरणपत्राच्या विलंबासाठी उर्वरित शास्तीची रक्कम रु.3000/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

5) मे.कॅप्टन मेन्स वेअर नोंदणी क्र.68/108 या आस्थापनेचे 2011-12 या वर्षाचे कर निर्धारण जा.क्र.ववि‌शम/स्था.सं.क./7401/2014-15 दि.14/12/2014 अन्वये रु.3147/- एवढया कराचा भरणा करण्याबाबत संबधितास कळविण्यात आले आहे. सदर करनिर्धारण नस्तीची पडताळणी करता कलम 48(6) नुसार विहीत कालावधीपेक्षा विलंबाने सादर केलेल्या विवरणपत्रासाठी रु.5,000/- प्रमाणे शास्तीची आकारणी करणे आवश्यक असतांना रु.2,000/- एवढी शास्ती आकारण्यात आली आहे. तरी नगर विकास विभाग अधिसुचना दि.20 जुन 2013 नुसार वार्षिक विवरणपत्र वर्ष संपल्यानंतर 90 दिवसांच्या आत सादर केले नसल्याने कलम 48(6) नुसार रु.5000/- एवढी शास्ती आकारणी न करता रु.2000/- आकारण्यात आली आहे. त्यामुळे विहीत रकमेपेक्षा कमी शास्तीची आकारणी केल्यामुळे उर्वरीत शास्तीची रक्कम रु.3,000/- वसुलपात्र आहे.

6) मे.आर.के.इंडस्ट्रीज नोंदणी क्र.65/951 या आस्थापनेचे 2011-12 या कालावधीचे कर निर्धारण जा.क्र.ववि‌शम/स्था.सं.क./400/2013-14 दि.30.12.2014 अन्वये करण्यात आले आहे. सदर कर निर्धारण नस्तीची पडताळणी करता संबंधित आस्थापनेकडून रु.1177/- एवढी रक्कम बँकेत भरणा करण्यात आल्याचे चलन वार्षीक करनिर्धारण विवरणपत्रासोबत सादर करण्यात आले आहे. सदर चलनाच्या अनुषंगाने कर निर्धारणात रु.1177/- एवढी रक्कम भरणा करण्यात आल्याबाबत वजावट दर्शविण्यात आली आहे. परंतू सदर चलन रद्द करण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले असल्याने रु.1177/- एवढी रक्कम मनपा फंडात भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही. याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये सोबत चलनाची छायांकीत प्रत सादर केल्याचे नमूद केले आहे. परंतू सदर रक्कम मनपा फंडात जमा झाल्याबाबत प्रमाणित केलेले नाही. त्यामुळे सदर खुलासा मान्य करता येत नाही. तसेच नगर विकास विभाग अधिसुचना दि.20 जुन 2013 नुसार वार्षिक विवरणपत्र वर्ष संपल्यानंतर 90 दिवसांच्या आत सादर केले नसल्याने कलम 48(6) नुसार विहीत कालावधीपेक्षा विलंबाने सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रासाठी रु.5,000/- शास्तीची आकारणी करणे आवश्यक असतांना रु.2,000/- एवढी शास्ती आकारण्यात आली आहे. तरी रु.3000/- एवढी शास्तीची रक्कम वसुलपात्र आहे.

7) मे.कानगीर नोदणी क्र.68/206 या आस्थापनेचे 2011-12 या वर्षाचे कर निर्धारण जा.क्र.ववि‌शम/स्था.सं.क./ 4844

दि.29.04.2014 अन्वये करण्यात आले असून रु.11,108/- एवढा कराचा भरणा करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर कर निर्धारण नस्तीची तपासणी करता नगर विकास विभाग अधिसुचना दि.20 जुन 2013 नुसार वार्षिक विवरणपत्र वर्ष संपल्यानंतर 90 दिवसांच्या आत सादर केले नसल्याने कलम 48(6) नुसार विहीत कालावधीपेक्षा विलंबाने सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रासाठी रु.5,000/- शास्तीची आकारणी करणे आवश्यक असतांना रु.2,000/- एवढी शास्ती आकारण्यात आली आहे. त्यामुळे रु.3,000/- एवढी कमी शास्तीची आकारणी करण्यात आलेली आहे.

याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये सदर व्यापाऱ्याने दि.20/02/2015 रोजी कराचा भरणा केल्याबाबत चलन सादर केले आहे. त्यानुसार करनिर्धारण केल्यानंतर व्यापाऱ्याने 11 महिने विलंबाने कराचा भरणा केल्यामुळे कलम 48(3)(ख) मधील तरतूदीनुसार सदर रक्कमेवर प्रतिमहा 2टक्के व्याज वसुल करणे आवश्यक आहे. त्यानुसार व्याजाची आकारणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे रु.2444/- एवढी व्याजाची रक्कम वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे. तसचे कलम 48(6) नुसार विहीत कालावधीपेक्षा विलंबाने सादर केलेल्या वार्षिक विवरणपत्रासाठी रु.5,000/- शास्तीची वसुली करण्यात आलेली नाही. तरी वरीलप्रमाणे रु.2,000/- एवढी वसुल केलेली शास्ती वजा जाता रु.3000/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

8) मे.आनंद ज्वेलर्स नोंदणी क्र.82/116/2011 या आस्थापनेचे वर्ष 2011-12 या कालावधीचे स्थानिक संस्था कराचे निर्धारण जा.क्र.वविशम/स्था.सं.क./7851/2014-15 दि.27.02.2015 अन्वये करण्यात आले असून रु.17,701/- एवढया कराचा भरणा करण्याबाबत संबंधितास कळविण्यात आले आहे. सदर नस्तीची पडताळणी करता नगर विकास विभाग अधिसुचना दि.20 जुन 2013 नुसार वार्षिक विवरणपत्र वर्ष संपल्यानंतर 90 दिवसांच्या आत सादर केले नसल्याने कलम 48(6) नुसार विहीत कालावधीपेक्षा विलंबाने सादर केलेल्या विवरणपत्रासाठी रु.5,000/- प्रमाणे शास्तीची आकारणी करणे आवश्यक असतांना रु.2,000/- एवढी शास्ती आकारण्यात आली आहे. याबाबत विभागाने रु.17,701/- एवढया रक्कमेचा भरणा केल्याचे चलन खुलाश्या सोबत सादर केले आहे. विलंबाने विवरणपत्र सादर केल्यामुळे विहीत रकमेपेक्षा कमी शास्ती आकारण्यात आल्याबाबत विभागाने सादर केलेला खुलासा आक्षेपाशी व नियमांशी सुसंगत नसल्याने उर्वरीत शास्तीची रक्कम रु.3000/- वसुलपात्र आहे..

9) मे.प्रिन्स मरिन्स नोंदणी क्र.89/03/2011 या आस्थापनेच्या 2011-12 या वर्षाचे स्थानिक संस्था कराचे निर्धारण जा.क्र.वविशम/स्था.सं.क./86/2014 दि.26.05.2014 अन्वये करण्यात आले असून रु.8006/- एवढया कराचा भरणा करण्याबाबत संबंधीतास कळविण्यात आले आहे. सदर करनिर्धारण नस्तीची पडताळणी करता नगर विकास विभाग अधिसुचना दि.20 जुन 2013 नुसार वार्षिक विवरणपत्र वर्ष संपल्यानंतर 90 दिवसांच्या आत सादर केले नसल्याने कलम 48(6) नुसार विहीत कालावधीपेक्षा विलंबाने सादर केलेल्या विवरणपत्रासाठी रु.5,000/- प्रमाणे शास्तीची आकारणी करणे आवश्यक असतांना प्रत्येक सहामाही कालावधीसाठी रु.2,000/- एवढी शास्ती आकारण्यात आली आहे. तसेच करनिर्धारण आदेशानुसार रु.8006/- एवढया कराचा भरणा करण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही. तरी मनपास येणे असलेली रक्कम रु.8006/- कलम 48(3)(ख) मधील तरतूदीनुसार प्रतिमहा 2 टक्के व्याजासह वसुल करणे आवश्यक आहे. याबाबत विभागास खुलासा करण्याबाबत विभागास कळविण्यात आले असता अद्याप सदर व्यापाऱ्याकडून रु.8006/- एवढी कराची रक्कम वसुली प्रलंबीत असल्याचे विभागाने खुलाश्यात नमुद केले आहे. तरी अद्याप सदर रक्कम वसुल करण्यात आली नसल्याने रु.8006/- एवढी रक्कम वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

10) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 मधील कलम 40(3) मधील तरतूदीनुसार कोणताही स्थानिक संस्था कर, शास्ती, व्याज, जप्त केलेली रक्कम किंवा दंड जो, त्याच्या प्रदानासाठी या नियमान्वये आयुक्तांनी काढलेल्या आदेशात उल्लेखिलेल्या वेळेनंतर अदत्त राहिला आहे. तो, “Form-L” मधील नोटीस बजावून मालमत्ता कराची थकबाकी असल्याप्रमाणे वसुल योग्य असेल अशी तरतूद आहे. परंतू त्यानुसार विभागाकडून स्थानिक संस्था कराच्या वसुलीबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात आलेली नाही.

11) स्थानिक संस्था कर विभागाकडून वर्ष 2011-12 व 2012-13 या वर्षातील विवरणपत्रांचे कर निर्धारण 2014-15 या वर्षात करण्यात आले असुन अशी कर निर्धारणाची प्रकरणे लेखा परिक्षणास पडताळणीस उपलब्ध झाली. परंतू 2013-14 व 2014-15 या वर्षातील करनिर्धारण प्रकरणे लेखा परिक्षणास पडताळणीस उपलब्ध झाली नाहीत. याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये व्यापाऱ्यांनी विहीत कालावधीपेक्षा विलंबाने विवरणपत्र सादर केल्यामुळे तसेच व्यापाऱ्यांना नोटीस बजावणे व सुनावणी घेणे या प्रक्रीयेमुळे 2013-14 मधील

प्राप्त विवरणपत्रांपैकी 9058 व 2014-15 मधील प्राप्त विवरणपत्रांपैकी 5988 एवढया आस्थापनांच्या विवरणपत्रांचे करनिर्धारण वर्ष 2015-16 मध्ये झाले असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे सदर विवरणपत्रांचे करनिर्धारण करनिर्धारण तपासणी करता आली नाही.

वसुलपात्र रक्कम रु.56,118/-

FDSANMM7201 (Ref No : 45, Hmm No : 16)

24 स्थानिक संस्था कर निर्धारणानुसार आस्थापनांकडून कराचा भरणा प्रलंबित असल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 02

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 453683.00/-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 मधील कलम 39(9) मधील तरतूदीनुसार "Form-I" मध्ये करनिर्धारण करुन कलम 33(11) नुसार "Form-J" मध्ये संबंधित आस्थापनांस मागणी नोटीस निर्गमित करण्यात आलेली असतांना करनिर्धारण आदेशानुसार संबंधित आस्थापनांकडून महानगरपालिकेस येणे असलेली स्थानिक संस्था कराचा रक्कम रु.4,53,653/- भरणा करण्यात आलेली नसल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 मधील कलम 40(3) मधील तरतूदीनुसार कोणताही स्थानिक संस्था कर, शास्ती, व्याज, जप्त केलेली रक्कम किंवा दंड जो, त्याच्या प्रदानासाठी या नियमान्वये आयुक्तांनी काढलेल्या आदेशात उल्लेखिलेल्या वेळेनंतर अदत्त राहिला आहे. तो, "Form-L" मधील नोटीस बजावून मालमत्ता कराची थकबाकी असल्याप्रमाणे वसुल करण्यात आलेली नाही. तसेच कलम 48(ख) नुसार थकबाकीच्या रकमेवर प्रतिमहा 2 टक्के व्याज आकारणी करुन व्याजाची वसुली करण्यात आलेली नाही.

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमाच्या कलम 152 नुसार वसई विरार मनपा क्षेत्रामध्ये दि.1.04.2011 पासुन स्थानिक संस्था कर लागू करण्यात आला आहे. त्यानुसार स्थानिक संस्था कर विभागाचे 2013-14 व 2014-15 या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण करतांना करनिर्धारणाच्या निवडक प्रकरणांच्या नस्ती व करनिर्धारण नोंदवही यांची पडताळणी करता मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 मधील कलम 39(9) मधील तरतूदीनुसार "Form-I" मध्ये

करनिर्धारण करुन कलम 33(11) नुसार “Form-J” मध्ये संबंधित आस्थापनेस मागणी नोटीस निर्गमित करण्यात आलेली असतांना करनिर्धारण आदेशानुसार संबंधित आस्थापनेकडून महानगरपालिकेस येणे असलेली स्थानिक संस्था कराची रक्कम रु.4,53,653/- भरणा करण्यात आलेली नसल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले आहे. याबाबत लेखा परिक्षणास उपलब्ध केलेल्या अभिलेख्यावरुन निवडक आस्थापनांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	LBT धारकाचे नाव	क्रमांक	करनिर्धारण आदेश क्र. व दिनांक	कालावधी	वसुल न झालेली कराची रक्कम रुपये
स्थानिक संस्था कर विभाग नालासोपारा क-1					
1	सत्यम ज्वेलर्स	31/165	339/23.12.2014	2011-12	3344
2	लक्ष्मी स्टील सेंटर	25/457	235/7.11.2014	2011-12	2448
3	आकांक्षा एंटरप्रायजेस	30/52	45/13.5.2014	2011-12	4017
4	नुतन ज्वेलर्स	30/245	352/30.122014	2011-12	3546
5	बालाजी ज्वेलर्स	33/172	14/7.4.2014	2011-12	10002
6	शु बाजार	38/6	2.6.2014	2011-12	6511
7	युनी स्टाईल	38/246	63/2.6.2014	2011-12	1169
8	महालक्ष्मी इलेट्रॉनिक्स	38/289	230/7.11.2014	2011-12	1908
9	शितल सिरामिक्स	38/421	226/7.11.2014	2011-12	12660
10	महालक्ष्मी मोबाईल	38/331	231/7.11.2014	2011-12	2964
11	ब्युटी फॅशन	38/39	241/7.11.2014	2011-12	2445
स्थानिक संस्था कर विभाग नालासोपारा क-2					
1	श्री सुपर कलेक्शन	40/125	291/14-15/8.12.2014	2011-12	7108
2	स्टार इलेक्टॉनिक्स	40/230	57/14-15/2.6.2014	2011-12	9362
3	सदगुरु ट्रेडर्स	43/55	259/14-15/7.11.2014	2011-12	18798
4	धनतेरस ज्वेलर्स	47/85	275/14-15/7.11.2014	2011-12	5437
5	श्री राधिका ज्वेलर्स	47/88	292/14-15/8.12.2014	2011-12	7159
6	श्री रंगरचना प्रिंटर्स	47/164	301/14-15/8.12.2014	2011-12	15086
7	शिल्पा कलेक्शन	49/27	261/14-15/7.11.2014	2011-12	4614
8	श्री महाराष्ट्र ट्रेडर्स	59/137	293/14-15/8.12.2014	2011-12	11963
9	साईनाथ ट्रेडर्स	59/196	267/14-15/7.11.2014	2011-12	3204
10	चौधरी ॲण्ड कंपनी	59/594	10/14-15/7.4.2014	2011-12	2677
11	शाहि टिंबर मार्ट	59/676	270/14-15/7.11.2014	2011-12	6224
12	मोनिका ज्वेलर्स	43/35	11/13-14/1.1.2014	2011-12	723
13	रामचंद्र ट्रेडर्स	59/285	18/13-14/1.1.2014	2011-12	1030

स्थानिक संस्था कर विभाग -पेल्हार					
1	KOHETOOR TRADERS	27/399	3420/13-14/ 16/01/2014	2011-12	1058
2	MICRO AIR	27/138	6401/14-15/16.10.2014	2011-12	5094
	AMAN FARSAN MART	57/197	11384/14-15/19.3.2015	2011-12	334
3	ANJALI PRINTS	27/699	11386/14-15/25.3.2015	2011-12	16197
4	OMKAR PRINTS	27/698	11385/14-15/25.3.2015	2011-12	17721
5	MIDAS AUTOMOBLES	27/434	11413/14-15/27.3.2015	2011-12	13327
6	IDEAL INDUSTRIES	27/870	7223/14-15/13.12.2014	2011-12	6611
स्थानिक संस्था कर विभाग-विरार					
1	साई टेक इंजिनिअरिंग	04/49	135/13-14-31.12.2013	2011-12	1755
2	आदिनाथडिस्ट्रिब्युटर	10/299	290/13-14/4.03.2014	2011-12	6529
3	एफ.के.ट्रेडिंग &कं	6/418	92/13-14/24.06.2014	2011-12	1970
4	महेश कोल्ड्रींग सेंटर	18/158	47/13-14/16.04.2014	2011-12	2703
5	हायनेस शुज	17/234	22/13-14/16.04.2014	2011-12	238
स्थानिक संस्था कर विभाग- दिवाणमान एच					
1	गौरीसिंग के राजपुत	70/08	484/3.1.2014	2011-12	3308
2	प्राईम एन्टरप्रायजेय	73/101	478/3.1.2014	2011-12	8707
3	जय इंजिनिअर वर्क्स	73/116	479/3.1.2014	2011-12	8428
4	कलश फ्लेमिंग ज्वेलर्स	73/140	492/3.1.2014	2011-12	9854
5	चामुंडा गृह वस्तू भांडार	76/63	3475/23.7.2014	2011-12	29173
स्थानिक संस्था कर विभाग-नवघर माणिकपूर-ड विभाग					
1	रतन इंड इंजि	65/196	391/13-14/30.12.2013	2011-12	9494
2	युनिव्हर्सल रबर प्रोडक्ट	65/208	397/13-14/30.12.2013	2011-12	5793
3	क्विन फार्मा	65/244	392/13-14/30.12.2013	2011-12	4729
4	अपोलो हेट एक्स.प्रा.लि.	65/49	1606/14-15/3.9.2014	2011-12	27112
5	श्री.कृष्णा इंजि.वर्क्स	65/252	8150/14-15/31.3.2015	2011-12	4011
6	एन.ई.मर्केटाईल प्रा.लि.	65/288	5308/14-	2011-12	4039

			15/17.10.2014		
7	विजय लक्ष्मी प्लास्टर	65/147	371/13-14/30.12.2013	2011-12	17199
8	बालाजी इंटरप्रायजेस	65/298	4119/13-14/21.3.2014	2011-12	19334
9	आयुष इंटरप्राईजेस	65/296	4101/13-14/21.3.2014	2011-12	65654
10	वर्धमान स्टील	54/324	7583/22.2.2014	2011-12	2348
11	अर्जून एंटरप्रायजेस	54/318	10633/25.3.2014	2011-12	327
12	हरी साई कॉर्पोरेशन	56/101	10650/25.3.2015	2011-12	6778
13	न्युकुअर अजय साडी	66/418	9572/16.2.2015	2011-12	1735
14	आयुक् शेरी	66/419	5014/3.9.2014	2011-12	6477
15	ईश्वर चिल्ड्रन हॉस्पीटल	67/269	7404/17.11.2014	2011-12	320
16	जय अंम्बे ओटोमोबाईल	67/192	7414/24.11.2014	2011-12	927
			एकूण		453683

याबाबत लेखा परिक्षणास सविस्तर खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.15 दि.26/01/2016 अन्वये विभागास कळविण्यात आले असता स्थानिक संस्था कर विभागाकडून पत्र जा.क्र.व.वि.श.म.स्था.सं.कर/ 2671/15-12 दि.03/03/2016 तसेच जा.क्र.व.वि.श.मं.स्था.सं.कर/04/2016-17 दि.06/04/2016 अन्वये सादर करण्यात आला आहे. सदर खुलासा पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) वरीलप्रमाणे करनिर्धारण आदेशानुसार नोटीस बजावण्यात आलेली असूनही सदर आस्थापनांकडून मनपास येणे असलेल्या कराच्या रु.4,53,683/- एवढया रकमेचा अद्याप भरणा केलेला नाही. तसेच अशा आस्थापनांकडून कलम 48(ख) मधील तरतूदीनुसार प्रतिमहा 2 टक्के व्याजासह मनपास येणे असलेल्या कराची वसुली केलेला नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 मधील कलम 40(3) मधील तरतूदीनुसार कोणताही स्थानिक संस्था कर, शास्ती, व्याज, जप्त केलेली रक्कम किंवा दंड जो, त्याच्या प्रदानासाठी या नियमान्वये आयुक्तांनी काढलेल्या आदेशात उल्लेखिलेल्या वेळेनंतर अदत्त राहिला आहे. तो, "Form-L" मधील नोटीस बजावून मालमत्ता कराची थकबाकी असल्याप्रमाणे वसुलयोग्य असेल अशी तरतूद आहे. सदर तरतूदीनुसार कराचा भरणा न केलेल्या वरील आस्थापनांविरुध्द नमुना नं.8 (एल) मधील नोटीस बजावून प्रलंबीत स्थानिक संस्था कर रु.4,53,683/- ची वसुली मालमत्ता कराची थकबाकी असल्याप्रमाणे वसुली करण्यात आली नाही. याबाबत विभागाकडून सादर केलेल्या खुलाश्यामध्ये काही थकबाकीदारांकडून थकबाकीची रक्कम वसुल करण्यात आल्याचे तसेच काही थकबाकीदारांकडील थकबाकी वसुलीसाठी नोटीस बजावण्यात आल्याचे नमुद केले आहे. खुलाश्यासोबत सादर केलेली थकबाकी भरणा केलेली चलने पडताळणी करता 2011-12 मधील थकबाकीची रक्कम वसुल करतांना कलम 48(ख)नुसार थकबाकीच्या रकमेवर प्रतिमहा 2टक्के व्याज आकारणी करुन व्याजाची वसुली करणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच काही थकबाकीदारांना नोटीस बजावण्यात आल्याचे नमूद केले आहे. परंतू थकबाकीचे वसुलीची कार्यवाही झाली नसल्याने विभागाचा खुलासा मान्य करता येत नाही.

2) विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये पेल्हार विभागाकडील मे.अंजली प्रिंट्स, ओमकार प्रिंट्स व मिदास ऑटोमोबाईल्स यांनी शास्ती व व्याज माफीसाठी अभय योजनेमध्ये अर्ज दाखल केल्याचे नमूद केले आहे. परंतू स्थानिक संस्था कर अभय योजना 2015 ही योजना विवरणपत्रे सादर न केलेल्या आस्थापनांसाठी असून मे.अंजली प्रिंट्स, ओमकार प्रिंट्स व मिदास ऑटोमोबाईल्स या आस्थापनांनी सादर केलेल्या विवरणपत्रानुसार विभागाकडून स्थानिक संसथा कर निर्धारीत करण्यात आला आहे. त्यामुळे सदर आस्थापनांकडून निर्धारीत कराची रक्कम व्याज व दंडाच्या रकमांसह वसुल करणे आवश्यक आहे.

3) वर नमूद केलेल्या आस्थापना या उदाहरणादाखल नोंदविण्यात आल्या आहेत तरी विभागांतर्गत नोंदणीकृत

आस्थापनांनी करनिर्धारण आदेशानुसार मनपास देय असलेल्या रकमेचा भरणा करण्यात आल्याबाबत पडताळणी करुन त्यानुसार महापालिकेस येणे असलेल्या कराच्या थकबाकी वसुलीसाठी वरील तरतूदीनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. याबाबत विभागाकडून पडताळणी करुन अनुपालनात खुलासा करण्यात आलेला नाही. त्यामुळे करनिर्धारण कलेल्या सर्व आस्थापनांकडून निर्धारीत कराचा भरणा करण्यात आला याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

वसूलपात्र रक्कम रु.4,53,683/-
FDSANMM7201 (Ref No : 46, Hmm No : 15)

25 विरार "अ" प्रभाग घरपट्टी विभागातील कर वसुलीच्या थकबाकी रक्कमाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 02

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 132726721.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 132726721.00/-

विरार "अ" प्रभाग घरपट्टी विभागाकडे वर्ष 2013-14 मध्ये वसुलीची रक्कम ही मागणीच्या 58 टक्के एवढी असून वर्ष 2014-15 मध्ये वसुलीचे प्रमाण मागणीच्या 61 टक्के एवढे आहे. घरपट्टी वसुलीबाबत महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील प्रकरण आठ कराधान मधील नियम 42 ते 48 मधील तरतूदीनुसार नोटीस पाठविणे/मालमत्ता ताब्यात घेणे/जप्त करणे, लिलाव करणे इ.कार्यवाही कार्यवाही झाले नसल्याने वर्ष 2014-15 अखेर रु.13,27,26,721/- एवढी घरपट्टीची वसुली थकीत असल्याचे दिसून येते. तसेच घरपट्टीची वसुली तत्कालिन नगरपरिषदेने मंजूर केलेल्या दराने करण्यात येत आहे. मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमातील तरतूदीनुसार घरपट्टी वसुलीचे दरात सुधारणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे घरपट्टीच्या वसुलीत महापालिकेचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे.

वसई विरार महानगरपालिकेच्या विरार "अ" प्रभाग घरपट्टी विभागाकडून लेखा परिक्षणास उपलबध करुन देण्यात आलेल्या 2013-14 व 2014-15 या वर्षाच्या अभिलेख्यांची पडताळणी करता विरार "अ" प्रभागाकडील घरपट्टीच्या मागणी वसुली व थकबाकीच्या रकमांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	वर्ष	मागणी रु.	वसुली रु.	थकबाकी रु.	वसुलीची टक्केवारी
1	2013-14	238171580	138303578	99868002	58%
2	2014-15	345583540	212856819	132726721	61%

वरीलप्रमाणे घरपट्टीच्या मागणी वसुली व थकबाकीच्या रकमांची पडताळणी करुन अर्धसमास पत्र क्र.41 दि.21/03/2016 अन्वये खुलासा करण्याबाबत विभागास कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून लेखा परिक्षणास काहीही खुलासा प्राप्त झाला नाही. तरी खालील प्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) वर्ष 2013-14 या वर्षातील मागणीच्या प्रमाणात वसुलीचे प्रमाण हे 58 टक्के इतके असून 42 टक्के घरपट्टी थकीत असल्याचे तसेच 2014-15 या वर्षात मागणीच्या रकमेच्या प्रमाणात वसुलीचे प्रमाण हे 61 टक्के एवढे असून 39 टक्के घरपट्टी थकीत आहे. यावरुन विभागाकडून घरपट्टीच्या वसुलीसाठी महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील प्रकरण आठ कराधान मधील नियम 42 ते 48 मधील तरतूदीनुसार नोटीस पाठविणे/मालमत्ता ताब्यात घेणे/जप्त करणे, लिलाव करणे इ.कार्यवाही झाली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे वर्ष 2013-14 मध्ये घरपट्टीची थकबाकी रु.9,98,68,002/- एवढी असून वर्ष 2014-15 मध्ये थकबाकीच्या रकमेत वाढ होवून घरपट्टीची थकबाकी रु.13,27,26,721/- एवढी आहे. तरी सदर थकबाकीच्या वसुलीसाठी घरपट्टी विभागाकडून कालबध्द कार्यक्रम निश्चित करुन वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे. तरी वर्ष 2014-15 मधील घरपट्टीच्या थकबाकीची रक्कम रु.13,27,26,721/- वसुलपात्र आहे.

2) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील परिशिष्ट "ड" प्रकरण 8 मधील नियम 7(अ-3) नुसार कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे पोटनियम 1 अन्वये निश्चित केलेल्या भांडवली मुल्यात दर 5 वर्षांनी सुधारणा करता येईल. अशी तरतूद आहे. परंतु कर संकलन विभागाने सदर तरतूदीचा विचार करून त्यानुसार कार्यवाही केलेली नाही. अद्यापही महापालिकेकडून तत्कालिन विरार नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या अनुक्रमांक 53 दि.16/06/2002 रोजीच्या ठरावान्वये मंजूर केलेल्या घरपट्टीच्या दराने (तत्कालिन ग्रामपंचायत क्षेत्र वगळून) महापालिका क्षेत्रात घरपट्टीची वसुली करण्यात येत आहे. दि.3/07/2009 पासून महानगरपालिका अस्तित्वात येवून घरपट्टीच्या दरात सुधारणा करण्यात आली नसल्यामुळे महानगरपालिकेस मालमत्ता करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे.

वसुलपात्र रक्कम रु.13,27,26,721/-

FDSANMM7201 (Ref No : 84, Hmm No : 41)

26 विरार "अ" प्रभाग कर संकलन विभागाकडून नविन कर निर्धारण केलेल्या मालमत्तांच्या घरपट्टीच्या वसुलीतील अनियमिततांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 12

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 1932583.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1932583.00/-

महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमाच्या महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम परिशिष्ट ड प्रकरण 8 कराधान नियम 41 नुसार थकबाकीच्या रकमेवर 2 टक्के शास्तीची आकारणी करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसुचना क्र.स्थासंक 0209/प्र.क्र.65/09/न.वि.34 दि.6 ऑगस्ट 2012 मधील नियम 4 (क) मधील तरतूदीनुसार महापालिका क्षेत्रातील बांधकाम व्यावसायिकाने चौथ्या मजल्यापर्यन्तचे बांधकाम असेल तेथे रु.100/- प्र.चौ.मी., सातव्या मजल्या पर्यन्तचे बांधकाम असेल तेथे रु.150/- प्र.चौ.मी., उत्तूंग इमारातीचे बांधकाम असेल तेथे रु.200/- प्र.चौ.मी. या दराने स्थानिक संस्था कराचा भरणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार बांधकाम विकासकाकडून स्थानिक संस्था कराची वसुली करण्यात आल्याचे आढळून आले नाही.

विरार महानगरपालिकेच्या विरार "अ" प्रभाग घरपट्टी विभागाकडून लेखा परिक्षणास उपलबध करुन देण्यात आलेल्या 2013-14 व 2014-15 या वर्षातील नविन कर आकारणी निवडक प्रकरणांची व कर भरणा रकमांची पडताळणी करता अर्धसमास पत्र क्र.40 दि.21/03/2016 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून काहीही खुलासा प्राप्त झाला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मैत्रीपुजा बिल्डींग नं.02 या इमारतीस नगररचना विभागाच्या क्र.VVCMC/TP/POC/UP-0021/26/13-14 दि.10/05/2013 अन्वये भोगवटा दाखला देण्यात आला असून मा.आयुक्त यांनी दि.18/03/2014 रोजी सदर इमारतीच्या 38 सदनिकांच्या 13293 चौ.फुट एवढया क्षेत्रफळासाठी एकूण 93,529/- एवढी नविन कराचे निर्धारणास मान्यता देण्यात आली आहे. करनिर्धारणानुसार वर्ष 2013-14 मधील घरपट्टीचा भरणा दि.31/03/2014 पुर्वी मनपास न करता दि.25/04/2014 रोजी भरणा करण्यात आला आहे. वर्ष 2013-14 मधील कराचा भरणा विहीत कालावधी पुर्वी करण्यात आला नसल्याने महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमाच्या महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम परिशिष्ट ड प्रकरण 8 कराधान नियम 41 नुसार थकबाकीच्या रकमेवर 2 टक्के शास्तीची आकारणी करणे आवश्यक होते. त्यानुसार रु.1871/- एवढी शास्ती आकारणी करण्यात आली नाही. तरी सदर रक्कम वसुलपात्र आहे.

2) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसुचना क्र.स्थासंक 0209/प्र.क्र.65/09/न.वि.34 दि.6 ऑगस्ट 2012 मधील नियम 4 (क) मधील तरतूदीनुसार महापालिका क्षेत्रातील बांधकाम व्यावसायिकाने चौथ्या मजल्यापर्यन्तचे बांधकाम असेल तेथे रु.100/-प्र.चौ.मी.,सातव्या मजल्या पर्यन्तचे बांधकाम असेल तेथे रु.150/- प्र.चौ.मी., उत्तूंग इमारातीचे बांधकाम असेल तेथे रु.200/- प्र.चौ.मी. या दराने स्थानिक संस्था कराचा भरणा करणे आवश्यक आहे.

अथर्व अपार्टमेंट, मेनिर्माण बिल्डर्स या इमारतीस नगररचना विभाग क्र.VVCMC/TP/ OC/VP-0594/115/2014-15 दि.16/8/2014 अन्वये भोगवटा दाखला देण्यात आला आहे. सदर इमारतीच्या 20 सदनिकांच्या एकूण 6680 चौ.फुट एवढया क्षेत्रफळासाठी वर्ष 2014-15 साठी रु.42,305/- एवढया नविन कर आकारणीस कर मुल्य निर्धारक यांनी दि.12/08/2014 रोजी मान्यता दिली आहे. सदर नस्तीची पडताळणी

करता मे.निर्माण बिल्डर्स यांचे स्थानिक संस्था कर नोंदणी प्रमाणपत्र नस्तीत आढळून आले नाही. त्यामुळे विकासकाकडून इमारतीच्या एकूण क्षेत्रफळावर रु.100/- प्र.चौ.मी याप्रमाणे रु.62,082/- एवढा स्थानिक संस्था कराचा भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

3) रमाबाई अपार्टमेंट, साईदत्त कंन्ट्रक्शन, विरार या अनधिकृत इमारतीच्या नविन करनिर्धारणाच्या नस्तीची पडताळणी करता सदर इमारतीच्या 54 सदनिकांच्या एकूण 12150 चौ.फुट एवढया क्षेत्रफळासाठी रु.1,62,652/- एवढया कर आकारणीस अतिरिक्त आयुक्त यांनी दि.26/02/2013 रोजी मंजूरी दिली आहे. सदर नस्तीची पडताळणी करता एकूण 54 सदनिकांचे कर निर्धारण करण्यात आले असतांना कर आकारणी नोंदवही 50 सदनिकांच्या कर आकारणीची नोंद घेण्यात आले आहे. सदनिका क्र.409 ते 412 या 4 सदनिकांची नोंद घेण्यात आलेली नाही. तसेच नवीन कर आकारणीच्या रु.1,62,652/- एवढया रकमेपैकी पावती क्र.32544 ते 32593 दि.03/07/2013 अन्वये रु.1,50,904/- एवढया कराचा भरणा करण्यात आला आहे. उर्वरीत 04 सदनिकांच्या प्रत्येकी रु.2937/- याप्रमाणे एकूण रु.11,748/- एवढया रकमेचा भरणा करण्यात आलेला नाही. तरी वरील प्रमाणे 04 सदनिकांच्या कराची रक्कम रु.11,748/- वसुलपात्र आहे.

नवीन कर निर्धारणानुसार 2012-13 मधील घरपट्टीचा भरणा दि.31/03/2013 पुर्वी करणे आवश्यक असतांना करनिर्धारणाची रक्कम वर्ष 2014-15 मध्ये दि.03/07/2013 रोजी भरणा करण्यात आली आहे. तरी 2013-14 च्या थकबाकीच्या रकमेवर महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम परिशिष्ट ड प्रकरण 8 कराधान नियम 41नुसार 2टक्के शास्तीची आकारणी करणे आवश्यक असतांना शास्तीची आकारणी करण्यात आली नसल्याने रु.13,012/- एवढी रक्कम वसुलपात्र आहे.

मे.साईदत्त कंन्ट्रक्शन या विकासकाचे स्थानिक संस्था कर नोंदणी प्रमाणपत्र नस्ती आढळून आले नाही. तरी मे.साईदत्त कंन्सट्रक्शन यांनी नगरविकास विभागाच्या उपरोक्त अधिसुचना दि.6 ऑगस्ट 2012 मधील तरतूदीनुसार प्रतीचौ.मी रु.100/- प्रमाणे 12150 चौफुट क्षेत्रफळासाठी रु.1,12,918/- एवढी स्थानिक संस्था कराच्या रकमेचा भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही. तरी स्थानिक संस्था कराची रक्कम रु.1,12,918/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

4) साईश्रध्दा अपार्टमेंट, मे.ओ.के.डेव्हलपर्स या अनधिकृत इमारतीच्या एकूण 53 सदनिकांच्या 12625चौ.फुट क्षेत्रफळासाठी वर्ष 2012-13 या वर्षातील नविन कर निर्धारणास अतिरिक्त आयुक्त यांनी दि26/02/2013 रोजी मान्यता दिली असून रु.1,63,337/- एवढी कराची रक्कम निर्धारीत केली आहे. कर निर्धारणानुसार 2012-13 मधील कराचा भरणा दि.31/3/2013 पूर्वी भरणा न करता पावती क्र.34601 ते 34653 अन्वये दि.10/07/2013 रोजी भरणा करण्यात आला आहे. तरी 2012-13 च्या थकबाकीच्या रकमेवर महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम परिशिष्ट ड प्रकरण 8 कराधान कलम 41 नुसार थकीत कराच्या रकमेवर 2 टक्के प्रमाणे रु.13,067/- एवढी शास्ती आकारण्यात आलेली नाही. त्यामुळे रु.13,067/- एवढी शास्ती वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

मे.ओ.के.डेव्हलपर्स यांचे स्थानिक संस्था कर नोंदणी दाखला नस्ती आढळून आला नाही. तरी सदर विकासकाकडून नगरविकास विभागाच्या उपरोक्त अधिसुचना दि.6 ऑगस्ट 2012 मधील तरतूदीनुसार स्थानिक संस्था कराचा भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही. तरी 53 सदनिकांच्या 12625 चौ.फुट क्षेत्रफळासाठी रु.100/- प्रतीचौ.मी. याप्रमाणे रु.1,17,333/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

5) साईचरण अपार्टमेंट, मे.के.एम.बिल्डर या (तळमजला+5) अनधिकृत इमारतीच्या 77 सदनिकांच्या एकूण 18240 चौ.फुट क्षेत्रफळासाठी 2012-13 च्या नविन कर निर्धारणास अति.आयुक्त यांनी दि.26/02/2013 रोजी

मान्यता दिली असून रु.2,36,071/- एवढी कराची रक्कम निर्धारीत करण्यात आली आहे. कर निर्धारणानुसार 2012-13 मधील कराचा भरणा दि.31/03/2013 पुर्वी करण्यात आला नसून 2013-14 मध्ये करण्यात आला असल्याने थकबाकीच्या रकमेवर महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम परिशिष्ट ड प्रकरण 8 कराधान नियम 41 नुसार 2टक्के शास्ती आकारण्यात आलेली नाही. तसेच नगरविकास विभागाच्या उपरोक्त अधिसुचना दि.6 ऑगस्ट 2012 मधील तरतूदीनुसार मे.के.एम.बिल्डर्स या बांधकाम विकासकाकडून रु.100/- प्रतीचौ.मी प्रमाणे 18240 चौ.फुट बांधकाम क्षेत्रफळासाठी रु.1,69,517/- एवढा स्थानिक संस्था कर वसुल करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही. तरी रु.1,69,517/- स्थानिक संस्था कराची रक्कम वसुलपात्र आहे.

6) समर्थ अपार्टमेंट, समर्थ बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स या अनधिकृत इमारतीच्या 38 सदनिकांच्या 10825.75 चौ.फुट क्षेत्रफळासाठी 2012-13 मधील नविन कर निर्धारणास अति.आयुक्त यांनी दि.26/02/2013 रोजी मान्यता दिली असून रु.1,50,105/- एवढी कराची रककम निर्धारित करण्यात आली आहे. सदर कराचा भरणा दि.31/03/2013 पूर्वी करणे आवश्यक असतांना पावती क्र.31510 ते 31547 अन्वये दि.7/06/2013 रोजी भरणा करण्यात आला आहे. त्यामुळे महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम परिशिष्ट ड प्रकरण 8 कराधान नियम 41 नुसार 2012-13 मधील कराच्या थकबाकीच्या रकमेवर 2 टक्के शास्ती आकारणी करणे आवश्यक असतांना शास्तीची आकारणी करण्यात आलेली नाही. तसेच नगर विकास विभागाच्या उपरोक्त दि.6 ऑगस्ट 2012 अधिसुचनेतील तरतूदीनुसार मे.के.एम.बिल्डर्स या विकासकाकडून सदर इमारतीच्या 18240चौ.फुट बांधकाम क्षेत्रफळावर स्थानिक संस्था कराचा भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही. तरी उपरोक्त अधिसुचनेतील तरतूदीनुसार सदर इमारतीच्या 18240 चौ.फुट तळमजला+5 बांधकामासाठी रु.150/- प्रतीचौ.मी. याप्रमाणे रु.2,54,275/- एवढी स्थानिक संस्था कराची रक्कम वसुलपात्र आहे.

7) साईदिप अपार्टमेंट बि.नं.23 व साईदर्शन अपार्टमेंट बि.नं.17, मे.साई बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स या अनधिकृत इमारतींच्या एकूण 98 सदनिकांच्या 20433 चौ.फुट क्षेत्रफळासाठी रु.2,68,756/- एवढया 2012-13 मधील नविन कर आकारणीस अति.आयुक्त यांनी दि.26/02/2013 रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार 2012-13 मधील कराचा भरणा दि.31/03/2013 पूर्वी करणे आवश्यक असतांना दि.16/07/2015 रोजी भरणा करण्यात आला आहे. तरी महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम परिशिष्ट ड प्रकरण 8 कराधान नियम 41 नुसार 2012-13 मधील थकबाकीच्या रकमेवर 2टक्के प्रमाणे शास्ती आकारणी करणे आहे. त्यामुळे 2012-13 मधील कराच्या थकबाकीवर दि.31/03/2013 ते दि.16/07/2015 या 16 महिन्याच्या कालावधीसाठी रु.2,68,756/- एवढी थकबाकीच्या रकमेवर 2टक्के रु.86,002/- एवढी शास्तीची आकारणी करण्यात आलेली नसल्याने रु.86,002/- शास्ती वसुलपात्र आहे.

तसेच नगर विकास विभागाच्या उपरोक्त अधिसुचनेतील तरतूदीनुसार मे. साई बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स या विकासकाने स्थानिक संस्था कर नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र नविन कर निर्धारणाच्या नस्तीत आढळून आले नाही. त्यामुळे सदर इमारतीच्या बांधकाम क्षेत्रफळावर स्थानिक संस्था कराचा भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही. तरी मे.साईबिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स यांचे कडून सदर इमारतीच्या 20433 चौ.फुट बांधकाम क्षेत्रफळासाठी रु.100/- प्रतीचौ.फुट याप्रमाणे रु.1,89,898/- एवढी स्थानिक संस्था कराची रक्कम वसुलपात्र आहे.

8) न्यु एकविरा अपार्टमेंट, साई रिअलेटर्स या अनधिकृत इमारतीच्या एकूण 39 सदनिकांच्या 7840 चौ.फुट क्षेत्रफळासाठी नविन कर निर्धारणास अति.आयुक्त यांनी दि.26/02/2013 रोजी मान्यता दिली असून 2012-13

साठी रु.1,13,942/- एवढा कर निर्धारीत करण्यात आला आहे. त्यानुसार 2012-13 मधील कराचा भरणा दि.31/3/2013 पूर्वी मनपाकडे भरणा करणे आवश्यक असताना पावती क्र.31901 ते 31939 दि.14/6/2013 अन्वये कराचा भरणा करण्यात आल्याने 2012-13 मधील आहे. महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमाच्या परिशिष्ट ड प्रकरण 8 मधील कलम 41 नुसार कराच्या थकबाकीवर 2% शास्ती वसुल करणे आवश्यक आहे. त्यानुसार शास्ती वसुल करण्यात आलेली नाही. तरी रु.1,13,942/- वरील दि.01/04/20143 ते दि.14/06/2013 या 04 महिन्याच्या कालावधीसाठी 2टक्के प्रमाणे रु.9115/- एवढी शास्तीची रक्कम वसुलपात्र आहे.

तसेच मे.साई रिअलेटर्स यांचे स्था.सं.कर नोंदणी प्रमाणपत्र नस्तीत आढळून आले नाही. तरी नगर विकास विभागाकडील उपरोक्त अधिसूचना दि.6/08/2012 नुसार 7840 चौ.फुट बांधकामाच्या क्षेत्रफळासाठी रु.100/- प्रतीचौ.फुट प्रमाणे रु.72,862/- एवढी स्था.सं.कराची रक्कम विकासकाकडून वसुल करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही. तरी स्थानिक संस्था कराची रक्कम रु.72,862/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

9) साई सिध्दी अपार्टमेंट, मे.के.एम.बिल्डर्स या अनधिकृत इमारतीच्या 48 सदनिकांच्या 10761 चौ.फूट क्षेत्रफळासाठी नविन कर निर्धारणास अतिरिक्त आयुक्त यांनी दि.26/02/2013 रोजी मान्यता दिली असून एकूण रु.1,40,326/- एवढ्या रक्कमेची कर निर्धारण करण्यात आले आहे. सदर नस्तीची पडताळणी करता वर्ष 2012-13 मधील नविन कर निर्धारणास दि.26/3/2013 रोजी मान्यता देण्यात आली. त्यानुसार निर्धारित कराची रक्कम दि.31/3/2013 पूर्वी मनपाकडून भरणा करणे आवश्यक होते. तथापि, 2012-13 मधील कराचा भरणा पावती क्र.31598 ते 31600 व 32001 ते 32045 अन्वये दि.15/6/2013 रोजी करण्यात आला आहे. त्यामुळे 2012-13 मधील थकबाकीच्या रक्कमेवर महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमाच्या परिशिष्ट ड प्रकरण 8 मधील कलम 41 नुसार 2% शास्ती वसुल करणे आवश्यक आहे. त्यानुसार शास्ती आकारणी करण्यात आली नाही. तरी रु.1,40,326/- एवढया रकमेवर 2टक्के प्रमाणे 3 महिन्यासाठी रु.8420/- एवढी शास्ती वसुलपात्र आहे.

तसेच नगर विकास विभाग अधिसूचना दि.6/08/2012 नुसार मे.के.एम.बिल्डर्स या विकासकाचे स्था.सं.कर नोंदणी पत्र नस्तीत उपलब्ध नाही. त्यामुळे सदर अनधिकृत इमारतीच्या बांधकाम क्षेत्रफळावर रु.100/- प्रती चौ.मीटर प्रमाणे स्था.सं.कर वसुल करण्यात आल्याबाबत लेखापरीक्ष्णास खात्री झाली नाही. तरी 10761 चौ.फुट बांधकाम क्षेत्रफळासाठी रु.1,00,009/- एवढी स्थानिक संस्थाकराची रक्कम वसुलपात्र आहे.

10) शुभलक्ष्मी, बालाजी नगर, हिल पार्क, मे.जिवदानी कंस्ट्रक्शन विरार या अनधिकृत इमारतीच्या 8 सदनिकांच्या 22740 चौ.फूट क्षेत्रफळासाठी वर्ष 2013-14 साठी नविन कर निर्धारणास अति.आयुक्त यांनी दि.12/9/2013 रोजी मान्यता दिली असून रु.3,14,219/- एवढा कर निर्धारित केला आहे. त्यानुसार 2013-14 मधील मालमत्ता कराचा दि.31/3/2013 पूर्वी मनपाकडे भरणा करणे आवश्यक असताना कराचा भरणा दि.18/10/2014 रोजी करण्यात आला आहे. तरी 2013-14 वर्षातील कराचा भरणा वर्ष 2014-15 मध्ये करण्यात आल्यामुळे थकबाकीच्या रकमेवर महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमाच्या परिशिष्ट ड प्रकरण 8 मधील कलम 41 नुसार 2% शास्ती वसुल करणे आवश्यक असतांना शास्ती वसुल करण्यात आलेली नाही. तरी रु.3,14,219/- एवढया रकमेवर 19 महिने कालावधीसाठी रु.1,19,403/- एवढी शास्तीची रक्कम वसुलपात्र आहे.

11) श्रीगणेश संकुल बिल्डींग नं.01 श्रीगणेश असोसिएट्स या इमारतीच्या नविन कर निर्धारणाबाबत

विकासकाच्या अर्ज क्र.17626 दि.26/03/2014 नुसार एकूण 92 सदनिकांच्या 37591 चौ.फुट क्षेत्रफळासाठी भोगवटा प्रमाणपत्र क्र.VVCMC/TP/POC/VP-0895/48/2014-15 दि.07/06/2014 नुसार 2014-15 या वर्षात एकूण रु.1,96,692/- एवढा नविन कर निर्धारणास अति.आयुक्त यांनी दि.06/08/2014 रोजी मान्यता दिली आहे. नविन कर निर्धारणानुसार एकूण 92 सदनिकांचा रु.1,96,692/- एवढया कराचा अद्याप भरणा करण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही. त्यामुळे रु.1,96,692/- एवढी नविन कर निर्धारणाची रक्कम वसुलपात्र आहे.

मे.श्रीगणेश असोसिएट्रस या विकासकाचा स्था.सं.कर नोंदणीचे प्रमाणपत्र नस्ती उपलब्ध झाले नाही. त्यामुळे नगरविकास विभाग अधिसुचना दि.6/08/2012 नुसार सदर विकासकाकडून स्था.सं.कर वसुल करण्यात आल्याबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. तरी रु.100/- प्रतीचौ.मी याप्रमाणे 37591 चौ.फुट बांधकाम क्षेत्रफळासाठी रु.3,49,359/-एवढी स्थानिक संस्था कराची रक्कम वसुलपात्र आहे.

12) वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये कर आकरणी केलेल्या व कर भरणा केलेल्या नविन कर निर्धारणाच्या नस्त्यांची पडताळणी करतांना बहुतांशी अनधिकृत इमारतींना कर आकारणी केल्याचे आढळून आले असून अशा संबंधित इमारतींच्या मालक/ विकासक यांचेवर एम्आरटिपी कायद्यानूसार अनधिकृत बांधकामासाठी नोटीस बजावण्यात आलेल्या नाहीत. अनधिकृत इमारतींना कर आकारणी केल्यामुळे महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 142 अन्वये मिळणारे उत्पन्न विकास शुल्क व इतर करांच्या रकमा वसूल झाल्या नाहीत. त्यामुळे महापालिकेचे नुकसान झाले आहे. अशा अनधिकृत इमारतींचे आराखडे नकाशे नस्तीत उपलब्ध नाहीत. विकासकाने कर निर्धारण्यासाठी सादर केलेल्या अर्जात नमूद केलेले क्षेत्रफळानुसार कर निर्धारण करण्यात आले आहे. कर आकारणीचे तक्ते संबंधित प्रकरण मंजूर करणा-या अधिका-याने स्वाक्षरित करुन प्रमाणित केलेले नाहीत.

वसुलपात्र रक्कम रु.19,32,583/-

FDSANMM7201 (Ref No : 96, Hmm No : 40)

27 मालमत्ता कर आकारणीसाठी केलेल्या मालमत्ता सर्व्हेक्षण खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष :मालमत्ता कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 10883426.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 10883426.00/-

मे. सेह निर्माण या संस्थेस वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातील पेल्हार विभागांतर्गत मालमत्ता कर आकारणीसाठी केलेल्या मालमत्ता सर्व्हेक्षण, रिफॉर्म अमलबजावणी करणेसाठी प्रदान रक्कम रु.१०८८३४२६ चे

अभिलेखे लेखा परीक्षणात मागणी करूनही उपलब्ध झाले नाही.

वसई-विरार शहर मनपाचे वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात , प्रमाणक क्र. ६६४९ दिनांक ३१/०३/२०१५ अन्वये रक्कम रु.१०८८३४२६/- मे. सेह निर्माण या संस्थेस वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातील पेल्हार विभागांतर्गत मालमत्ता कर आकारणीसाठी केलेल्या मालमत्ता सर्व्हेक्षण, रिफॉर्म अंमलबजावणी करणेसाठी प्रदान केली आहे. केंद्र शासनाच्या सेटेलाईट सिटीना पायाभूत सुविधा निर्माण करणेकामी विविध रिफॉर्म करणेपैकी मालमत्ता कराचे रिफॉर्म करणे हे एक काम आहे.

सदर खर्चाचे अनुषंगाने निविदा नस्ती , प्रभागात सर्व्हेक्षण पूर्ण केलेल्या ५३३४६ मालमत्तांचे तपशीलवार अहवाल, फोटोग्राफ, सी.डी. इत्यादी अभिलेखे कर विभागाने लेखा परीक्षणात अर्धसमास पत्र क्र.१२८ दिनांक १०/०६/२०१६ अन्वये मागणी करूनही उपलब्ध केले नाहीत. सबब वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये सर्वेक्षणात एकूण किती मालमत्तांचे रिफॉर्म तयार होवून मालमत्तांची नव्याने वाढ-घट झाली. मालमत्ताचे सर्वेक्षणामुळे मालमत्ता कराचे उत्पन्नात एकूण किती वाढ झाली , याबाबतची सविस्तर माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नसल्याने केलेल्या खर्चाची फलश्रुती झाल्याची खात्री करता आली नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 111, Hmm No : 128)

28 वसई "आय" प्रभाग मालमत्ता कर विभागातील नविन कर निर्धारण केलेल्या घरपट्टी वसुलीतील अनियमिततांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 09

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 210675.00/-

नवीन करनिर्धारणाच्या प्रकरणांची तपासणी करतांना मालमत्ता धारकांनी करनिर्धारणासाठी सादर केलेल्या अर्जात मालमत्तेच्या वापराबाबत नमूद केलेल्या कालवधीपासुन नविन कराची आकारणी न करता अर्जाच्या दिनांकापासून कर आकारणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र मनपा अधिनियमातील कलम 150-अ मधील तरतूदीनुसार भोगवटा प्रमाणपत्र किंवा प्रत्यक्ष वापर यातील जी आधीची घटना असेल त्यावेळेपासून कराची आकारणी करणे आवश्यक असतांना अर्जदाराच्या अर्जाच्या दिनांकापासून कर आकारणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम 129 व 132 मधील तरतूदीनुसार महापालिकेकडून मोकळया जागा-जमिनी,

इमारतीवरील मोबाईल टॉवर्स इत्यादींवर मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली नाही.

वसई विरार महानगरपालिकेच्या वसई "आय" प्रभाग घरपट्टी विभागाकडून लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या 2013-14 व 2014-15 या वर्षातील नविन कर आकारणी निवडक प्रकरणांची व कर भरणा रकमांची पडताळणी करता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत अर्धसमास पत्र क्र.72 दि.05/04/2016 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून पत्र क्र.वविशमकर/ VV82/16-17 दि.12/04/2016 अन्वये सादर केलेला खुलासा पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) वार्ड क्र.03 श्री.संदिप दत्तात्रय वसईकर यांच्या दि.02/01/2015 रोजीच्या अर्जानुसार एकूण 1510 चौ.फुट क्षेत्रफळ अनधिकृत बांधकामाच्या निवासी वापराच्या सदनिकेस वर्ष 2014-15 या वर्षात नविन कर आकारणीस करमुल्यनिर्धारक यांनी दि.5/01/2015 अन्वये मान्यता दिली असून रु.18,160/- एवढी कराची रक्कम निर्धारीत करण्यात आली आहे. सदर नस्तीची पडताळणी करता अर्जासोबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात सदर अनधिकृत बांधकाम वर्ष 2013-14 मध्ये केल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार सदर सदनिकेचे नविन कर निर्धारण वर्ष 2013-14 पासून न करता 2014-15 पासून करण्यात आले आहे. तसेच नविन कर निर्धारणानुसार रु.18,160/- एवढया कराचा भरणा न करता पावती क्र.144440 दि.20/02/2015 अन्वये रु.18,104/- एवढी रक्कमेचा भरणा करण्यात आल्याचे आढळून आले आहे. तरी निर्धारित रकमेपेक्षा कमी भरणा करण्यात आल्याबाबत तसेच मा.आयुक्त,व.वि.श.म. यांचे पत्र दि.01/07/2014 नुसार 2 टक्के शास्ती आकारण्यात आलेली नाही. याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये श्री.वसईकर हे प्रत्यक्षात बांधकाम पुर्ण झाल्यानंतर राहायला गेले आहेत. अनधिकृत इमारत असली तरी प्रभागातील अधिकारी/कर्मचारी यांनी एकत्रित पहाणी करुन आकारणी केल्याचे नमूद केले आहे. तथापि, याबाबत पहाणी अहवाल अथवा इमारतीचा प्रत्यक्ष वापर केव्हा करण्यात आला याबाबत अभिलेख सादर केले नाहीत. त्यामुळे वर्ष 2013-14 मधील थकीत कराची रक्कम रु.18160/- तसेच 2 टक्के शास्ती रु.8717/- अशी एकूण रु.26,877/- वसुलपात्र आहे.

2) वार्ड क्र.03 श्री.रॉजर पॅट्रीक लोपीस यांच्या दि.04/10/2014 रोजीच्या अर्जानुसार एकूण 806 चौ.फुट निवासी वापराच्या सदनिकेस वर्ष 2014-15 या वर्षात नविन कर आकारणीस करमुल्यनिर्धारक यांनी दि.01/11/2015 अन्वये मान्यता दिली असून रु.9906/- एवढी कराची रक्कम निर्धारीत करण्यात आली आहे. सदर नस्तीची पडताळणी करता अर्जासोबत सादर केलेल्या दि.31/10/2014 रोजीच्या प्रतिज्ञापत्रात सदर अनधिकृत बांधकाम वर्ष 2013-14 मध्ये केल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार सदर सदनिकेचे नविन कर निर्धारण वर्ष 2013-14 पासून न करता 2014-15 पासून करण्यात आले आहे. याबाबत विभागाने सादर केलेला खुलासा आक्षेपाशी सुसंगत नाही. तरी वर्ष 2013-14 मालमत्ता कराची रक्कम रु.9906/- वसुलपात्र आहे.

3) वार्ड क्र.03 राजेश फेनिक्स डिसिल्वा यांच्या निवासी बांधकामास नविन कर निर्धारण करण्याबाबतच्या दि.29/09/2014 रोजीच्या अर्जास अनुसरुन एकूण 1890 चौफुट अनधिकृत बांधकामास वर्ष 2014-15 मध्ये रु.24,105/- एवढा नविन कर निर्धारित करण्यास कर मुल्य निर्धारक यांनी दि.1/01/2015 रोजी मान्यता दिली आहे. मालमत्ता धारकाने अर्जासोबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार सदर बांधकाम 2013-14 मध्ये करण्यात आल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार सदर मालममत्तेच्या कराचे निर्धारण 2013-14 पासून करणे आवश्यक असतांना 2014-15 पासून कराची आकारणी करण्यात आली आहे. याबाबत विभागाने सादर केलेला खुलासा आक्षेपाशी सुसंगत नाही. तरी वर्ष 2013-14 ची मालमत्ता कराची रक्कम रु.24105/- वसुलपात्र आहे.

4) श्रीमती शमशाद बेगम हरन पटेल व श्री.अंजून हसन पटेल वार्ड क्र.16 यांच्या निवासी अनधिकृत बांधकामाच्या सदनिकेच्या नवीन कर निर्धारणाच्या नस्तीची पडताळणी करता 431 चौ.फुट चटई क्षेत्रफळाच्या बाधकामाच्या सदनिकेसाठी वर्ष 2013-14 मधील रु.4182/- एवढा नविन कर निर्धारणास सहायक आयुक्त यांनी दि.1/02/2014 अन्वये मान्यता दिली आहे. तथापि, सदर सदनिका श्री.शाहिद एफ.एम.शेख यांचे कडून श्रीमती शमशाद बेगम हसन पटेल यांनी 2010-11 मध्ये खरेदी केल्याचे दुय्यम निबंधक वसई-1 यांचेकडील दि.2/08/2010 रोजीच्या खरेदी विक्री करारनामा नोंदणीच्या कागदपत्रांवरुन दिसून येते.त्यामुळे सदर सदनिकेचा निवासी वापर 2010-11 पासून करण्यात येत असल्याने नविन कर आकारणी 2010-11 पासून न करता 2013-14 पासून करण्यात आली आहे. याबाबत विभागाने खुलासा करतांना सदर बाब मान्य केली आहे. तरी वर्ष 2010-11 पासुन सदर मालमत्तेचे करनिर्धारण करणे आवश्यक आहे. तरी वर्ष 2010-11 ते 2011-12 या कालावधीतील मालमत्ता कराची रक्कम रु.8364/- वसुलपात्र आहे.

5) श्री.पितांबर रामचंद्र बडगुजर वार्ड क्र.16 यांच्या निवासी अनधिकृत बांधमाच्या सदनिकेच्या नविन कर निर्धारणाच्या नस्तीची पडताळणी करता 1092 चौ.फुट चटई क्षेत्रफळ बांधकाच्या सदनिकेसाठी वर्ष 2013-14 मधील रु.10,652/- एवढया नविन कराच्या निर्धारणास उपायुक्त यांनी मान्यता दिली आहे. परंतू सदनिका धारकाने सादर केलेल्या अर्जामध्ये सदर बांधकाम 2008 मध्ये करण्यात आल्याचे नामूद केले आहे. तरी मुं.प्रा.मनपा अधिनियमातील कलम 150-अ मधील तरतूदीनुसार सदर सदनिकेच्या नविन कराचे निर्धारण 2008 पासून करणे आवश्यक असतांना 2013-14 पासून कराची आकारणी करण्यात आली आहे. याबाबत विभागाने सादर केलेला खुलासा आक्षेपाशी सुसंगत नाही. सदर मालमत्तेबाबत अधिनियमातील उपरोक्त तरतूदीनुसार मालमत्ता कराची आकारणी करणे आवश्यक आहे. तरी माहे 2008-09 ते 2012-13 या कालावधीतील मालमत्ता कराची रक्कम रु.52,260/- वसुलपात्र आहे.

6) श्रीमती कल्पना सुधीर राऊत वार्ड क्र.19 यांच्या दि.18/06/2013 च्या अर्जानुसार 200 चौ.फुट क्षेत्रफळाच्या वाणिज्यिक वापराच्या सदनिकेस 2013-14 पासून नवीन कर आकारणीस उपायुक्त यांनी मान्यता दिली असून रु.3637/- एवढा नवीन कर निर्धारीत करण्यात आला आहे. अर्जदाराने अर्जासोबत सादर केलेल्या खरेदी विक्री करारनाम्यानुसार सदर सदनिका मे.आर.सी.कंन्ट्रक्शन या विकासकाकडून दि.11/07/2002 मध्ये खरेदी केल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर सदनिकेची नविन कराची आकारणी मुं.प्रा.मनपा अधिनियमातील कलम 150-अ मधील तरतूदीनुसार 2008-09 पासून पुर्वलक्षी प्रभावाने न करता 2013-14 पासून करण्यात आली आहे. याबाबत विभागाने केलेला खुलासा आक्षेपाशी सुसंगत नाही. सदर मालमत्तेचे नविन मालमत्ता कराचे निर्धारण अधिनियमातील उपरोक्त तरतूदीनुसार करणे आवश्यक आहे. तरी 2008-09 ते 2012-13 या कालावधीतील मालमत्ता कराची रक्कम रु.18,185/- वसुलपात्र आहे.

7) वार्ड क्र.09 साई कमल अपार्टमेंट,साई स्वामी कंन्ट्रक्शन या इमारतीच्या नवीन कर निर्धारणाच्या नस्तीची पडताळणी करता सदर इमारतीच्या 17 निवासी सदनिकांच्या एकूण 5237चौ.फुट व 08 वाणिज्य सदनिकांच्या एकूण 1174 चौ.फुट क्षेत्रफळासाठी वर्ष 2012-13 मध्ये एकूण 35,489/- एवढया नवीन कर निर्धारणास अति.आयुक्त यांनी दि.13/06/2013 रोजी मान्यता दिली असून पावती क्र.19180ते19204 अन्वये दि.1/07/2013 रोजी कराचा भरणा करण्यात आला आहे. सदर इमारतीस सिडको प्राधिकरणाकडील क्र.CIDCO/VVSR/OC/BP-4490/W/1295 दि.24/05/2010 अन्वये भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.तरी मुं.प्रा.मनपा अधिनियमातील कलम 150-अ मधील तरतूदीनुसार सदर सदनिकेची नवीन कराची आकारणी दि.24/05/2010 पासून करणे आवश्यक असतांना 2012-13 पासून कर आकारणी करण्यात आली आहे. याबाबत विभागाने सादर केलेला खुलासा आक्षेपाशी सुसंगत नाही. तरी अधिनियमातील उपरोक्त

तरतूदीनुसार सदर मालमत्तेच्या कराची आकारणी भोगवटा प्रमाणपत्राच्या दिनांकापासून करणे आवश्यक आहे. तरी वर्ष 2010-11 ते 2011-12 या कालावधीतील रु.70,978/- वसुलपात्र आहे.

8) वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये कर आकरणी केलेल्या व कर भरणा केलेल्या नविन कर निर्धारणाच्या नस्त्यांची पडताळणी करतांना बहुतांशी अनधिकृत इमारतींना कर आकारणी केल्याचे आढळून आले असून अशा संबंधित इमारतींच्या मालक/ विकासक यांचेवर एम्आरटिपी कायद्यानूसार अनधिकृत बांधकामासाठी नोटीस बजावण्यात आलेल्या नाहीत. अनधिकृत इमारतींना कर आकारणी केल्यामुळे महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम 1966 मधील कलम 142 अन्वये मिळणार उत्पन्न् विकास शुल्क व इतर करांच्या रकमा वसूल झाल्या नाहीत. त्यामुळे महापालिकेचे नुकसान झाले आहे.

9) महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम 129 व 132 मधील तरतूदीनुसार मोकळया जागा-जमिनी, इमारतीवरील मोबाईल टॉवर्स इत्यादींवर कर आकारणी करणे आवश्यक आहे. तथपि, याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्यानुसार महापालिका क्षेत्रात मोकळया जागा-जमिनी, इमारतीवरील मोबाईल टॉवर्स इत्यादींवर कराची आकारणी करण्यात आली नाही. त्यामुळे महापालिकेचे मालमत्ता करापोटी प्राप्त होणाऱ्या महसूलाचे नुकसान झाले आहे.

वसुलपात्र रक्कम रु.2,10,675/-

FDSANMM7201 (Ref No : 133, Hmm No : 72)

29 महिला व बालकल्याण कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना साहित्य वाटपातील अनियमिततेबाबत.

महिला व बालकल्याण कार्यक्रमाच्या इतर योजना व कार्यक्रम (5% म.बा.क.).

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 06

लेखा शीर्ष :महिला व बालकल्याण वि मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 4244306.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4217500.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 26806.00/-

अंगणवाडी/बालवाडीतील अधिकृत विद्यार्थ्यांची संख्या उपलब्ध झाली नाही. अंगणवाडीतील मुलांना वाटप केलेली दप्तर, वॉटर बॅग, टिफीनची संख्या भिन्न असल्याचे दिसून आले. वाटप केलेल्या साहित्याची पोच उपलब्ध झाली नाही. मुलींना वाटप करण्यासाठी एकूण 1000 सायकली खरेदी केल्या. त्यासाठी रक्कम रु.42,17,500/- खर्च केला. परंतु सायकल वाटपाची पोच उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना साहित्य मिळाल्याची लेखा परीक्षणास खात्री करता आली नाही.

कामाचे नाव :- अंगणवाडी/बालवाडी विद्यार्थ्यांना साहित्य वाटप.
प्राकलन :- रु.2.50 कोटी.
प्रशासकिय मंजुरी :- महासभा ठराव क्र.03, दि.16/05/2013 रु.2 कोटी.
स्थायी समिती ठराव क्र.174 दि.10/05/2013 रु.50 लक्ष.
तांत्रिक मंजुरी :- ---
निविदा तारिख :- निविदा सुचना क्र.296/13 दि.11/06/2013, लोकमत दि.12/06/2013.
एल.1 निविदा :- मे.मुरबाडकर बिझनेस इंडस्ट्रीज कल्याण.
मे. श्रीनाथ एंटरप्रायझेस विरार.
मे. आक्सा बुक मॅन्युफॅक्चरिंग वसई.
करार :- केला आहे.
कार्यादेश :- उपलब्ध झाला नाही.
कामाची स्थिती :-
तरतूद :- 2013-14 रु.816.95 कोटी, खर्च रु.300.28 कोटी.

तरतूद :- 2014-15 रु.1050.00 कोटी, खर्च रु.568.78 कोटी.

लेखा परिक्षण काळात खर्च केलेल्या प्रमाणकांचा उदाहरणादाखल तपशिल.

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	तपशिल
3607	31/10/13	21,20,846	मे.मुरबाडकर, सॅक 11653 x दर 182.
3846	20/11/13	31,14,206	मे.मुरबाडकर, दप्तर, कंपास, बुट.
2520	06/09/14	18,18,000	मे.व्हरायटी बुककडून प्लास्टीक टिफीन.
2316	27/08/14	51,22,022	मे.युधी कडून वह्या खरेदी.

अंगणवाडी/बालवाडी, तसेच महापालिका हद्दितील शाळेतील पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना दप्तर, रेनकोट, बुट, वहया, कंपास, ड्रॉईंग पेटी पुरविणेसाठी खर्च केला आहे. या बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.91 दि.07/05/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) अंगणवाडी/बालवाडीत किती विद्यार्थी होते, त्यांची अधिकृत संख्या उपलब्ध झाली नाही. तसेच पहिली ते सातवी मधील विद्यार्थ्यांची अधिकृत संख्या उपलब्ध् झाली नाही.

2) शासन निर्णय, नगर विकास क्र.संकिर्ण/प्र.क्र.255/05/नवि-20 दि.08 नोव्हेंबर 2010 अन्वये महिला व बालकल्याण समितीने राबवायच्या योजना व धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रात महिला व बालकल्याण यासाठी राखीव 5% तरतूदीतून योजना राबविण्याबाबतचे आदेश दिले आहेत. योजना महिला व बालकल्याणची असल्याने त्याचेसाठीच खर्च करणे अपेक्षीत आहे. परंतु महापालिकेने अंगणवाडी/बालवाडी मुलांसोबत पहिली ते सातवी पर्यंत मुलांना शालेय साहित्य, बॅग, गणवेश, बुट, रंग पेटी, कंपास, इ. वस्तुंचे वाटप केले आहे. शासन निर्णयानुसार महिला व बालके यांच्या कल्याणासाठी योजना राबवणे हे मुख्य ध्येय व धोरण लक्षात घेऊन आवश्यक फेरफार करण्यास स्थानिक स्वराज्य संस्थेला सक्षम ठरविले आहे. योजनेतुन खर्च करावयाच्या बाबी नमुद केल्या आहेत. त्यानुसार अंगणवाडी केंद्रातील मुलांकरता आवश्यक शैक्षणीक सहित्य खरेदी करणेकामी खर्च करावयाचा आहे. मुलींच्या शाळेत विविध क्रिडा सुविधा निर्माण करावयाच्या आहेत. एकंदरित महिला कल्याणासाठी खर्च करायचा आहे. तथापि शासनाने मान्य केलेल्या योजना व महानगरपालिका आयुक्तांना आवश्यक असलेल्या इतर योजनावरही खर्च करण्यास सक्षम ठरविले आहे. महापालिकेने शाळेतील पहिली ते सातवी पर्यंतची मुले सुध्दा लाभार्थी म्हणून गणना केली आहेत. योजनेचे उद्दीष्ट महिला व बालकल्याण असल्याने शाळेतील मुलांसाठी वस्तूंचे वाटप करणे करता केलेला खर्च शासन निर्णयानुसार नाही.

अ) मे.मुरबाडकर बिझनेस इंडस्ट्रीज कल्याण यांच्याकडून अंगणवाडी करिता साहीत्य़ खरेदी

परिमाण	दर	रक्कम	तपशील
11653	182	2120846	दप्तर अंगणवाडी करिता (प्र.क्र.3607 दि.31/10/2013)
1750	182	318500	दप्तर अंगणवाडी करिता
13403	182	2439346	एकूण
3614	180	650520	पहिली दप्तर
8255	58	478790	पाचवी ते सातवी कंपॉस
8102	258	2090316	पाचवी ते सातवी बूट

या खरेदीमध्ये बालकल्याण योजनेवर एकूण खर्च रु.2439346 केला आहे. उर्वरीत खर्च रु.3219626 शाळेतील पहिली ते सातवीच्या मुलांसाठी केला आहे.

वरील खरेदीमध्ये अंगणवाडीसाठी दप्तर/सॅक खरेदीचा दर प्रति रु.182 असून पहिलीसाठी खरेदी केलेल्या दप्तराचा दर प्रति रु.180 आहे. म्हणजेच दोन्ही प्रकारच्या दप्तरामध्ये फरक नसतानाही अंगणवाडी मुलांसाठी खरेदी केलेल्या दप्तरात प्रति नग रु.2 जादा खर्च केल्याचे दिसून येते. म्हणजेच अंगणवाडीतील मुलांची संख्या 13403 X रु.2 = 26806 इतका खर्च जादा असल्याचे दिसून येते.

ब) ठेकेदार मे.श्रीनाथ एंटरप्रायझेस विरार यांच्याकडून पुढीलप्रमाणे साहित्य खरेदी केले आहे.

परिमाण	दर	रक्कम	तपशील
14153	35	495355	अंगणवाडीसाठी वॉटर बॅग खरेदी (प्र.क्र.3671 दि.31/10/2013)
14153	18	254754	अंगणवाडीसाठी टिफीन खरेदी (प्र.क्र.3671 दि.31/10/2013)
3476	200	695200	पहिलीसाठी रेनकोट खरेदी
3476	224	778624	पहिलीसाठी बूट खरेदी
3476	32	111232	पहिलीसाठी मोजे
19277	25	481925	ड्रॉईंग बुक
11430	224	2560320	दुसरी ते चौथीसाठी रेनकोट
11430	200	2286000	-//- बूट
11430	38	434340	-//- मोजे
11430	30	342900	कलर पेन्सील
7848	233	1828584	पाचवी ते सातवी रेनकोट
7848	35	274680	मोजे
7848	65	510120	ड्रॉईंग पेटी
		11054034	

या खरेदीचा विचार करता अंगणवाडीतील एकूण 13403 मुलांना सॅग/दप्तर खरेदी केले असून 14153 मुलांना वॉटर बॅग आणि टिफीन खरेदी केलेले आहे. म्हणजेच सॅग दिलेल्या मुलांची संख्या आणि वॉटर बॅग, टिफीन दिलेल्या मुलांची संख्या भिन्न आहे. त्यात 750 ची तफावत आहे. याचा अर्थ- अंगणवाडीतील सर्वच मुलांना सॅक, वॉटर बॅग, टिफीन दिलेले नाही. याबाबत विभागाने कोणताही खुलासा केला नाही.

3) विभागाने सादर केलेल्या टिपणीचे अवलोकन करता महापालिका क्षेत्रात जिल्हापरिषदेच्या एकूण 267 शाळा असून त्यात 14417 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच एकूण अंगणवाड्या 267 असून त्यात 7477 विद्यार्थी आहेत. विद्यार्थ्यांचा विकास व्हावा आणि त्यांच्या शैक्षणिक दर्जात सुधारणा व्हावी, म्हणून महापालिकेने महिला व बालकल्याण विभागाच्या तरतूदीतून खर्च केल्याचे नमूद केले आहे. प्रत्यक्षात महापालिका क्षेत्रात असणाऱ्या शाळा/अंगणवाड्या यांची निश्चित संख्या दर्शविणारी नोंदवही विभागाकडे उपलब्ध झाली नाही. खरेदी केलेले साहित्य लाभार्थ्यांना वाटप केल्याबाबत त्यांची पोच लेखापरीक्षणास दाखविलेली नाही.

जिल्हापरिषदेच्या शाळांना एकात्मिक बालविकास प्रकल्प योजनेतून किंवा जिल्हा निधीतून जे साहित्य वाटप केले जाते. त्याखेरीज अन्य साहित्याचे वाटप महापालिकेने केलेबाबत जिल्हा परिषदेला

पत्रव्यवहार केलेला नाही. त्यामुळे एकाच प्रकारचे साहित्याचे वाटप दुबार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) 2014-15 मध्ये महिला व बालकल्याण योजनेमार्फत सातवी ते नववीमध्ये शिकत असलेल्या मुलींना सायकलिंगचे वाटप केले आहे. महापालिका क्षेत्रातील अ,ब,क,ड,ई अशा प्रभागातील लाभार्थ्यांना लाभ देण्याचे निश्चित केले होते. त्यानुसार लेखापरीक्षण काळात एकूण 1000 हिरो सायकल खरेदी केल्या असून याकामी खर्च रु.42,17,500 केला आहे. खरेदीची नोंद नमुना नं.114 मध्ये घेतली आहे. महिला व बालकल्याण विभागाने सायकली ताब्यात घेतल्याबाबत चलनावर स्वाक्षरी आहे. परंतु वाटप केलेल्या सायकली बाबत संबंधिताची(लाभार्थी) पोच घेण्यात आली नाही.

5) एकंदरीत योजनेच्या निकषानुसार लाभार्थ्यांना वाटप केलेले साहित्य उदा. - दप्तर, कंपास, बुट, मोजे, रेनकोट, पेन्सील, ड्रॉईग पेटी, सॅक, वॉटर बॉटल, इ. ची पोच उपलब्ध् झाली नाही. त्यावर एकूण खर्च रु.42,44,306/- केला आहे. त्यामुळे खरेदी साहित्य लाभार्थ्यांना मिळाल्याची लेखापरीक्षणाची खातरजमा करता आली नाही.

6) 2014-15 मध्ये बालवाडी /अंगणवाडी करता एकूण सॅग/दप्तरे 14340 दर प्रति रु.134 प्रमाणे रक्कम रु.19,21,560/- ची खरेदी केली. तसेच वॉटर बॉटल एकूण 1750 दर प्रति रु.35 प्रमाणे रक्कम रु.61,250 ची खरेदी केली. टिफीन 1750 दर प्रति रु.19 प्रमाणे रक्कम रु.33,250 ची खरेदी केली.

दप्तराची एकूण खरेदी 14,340 नग केली असुन, वॉटर बॉटल आणि टिफीनची खरेदी एकूण 1750 नग केली आहे. म्हणजेच या दोन वस्तु मधील तफावत 12590 आहे. याचा अर्थ अंगणवाडीतील सर्व मुलांना सॅक, वॉटर बॉटल, टिफीन दिले नाहीत किंवा दप्तराची खरेदी जास्त केली आहे. याबाबत विभागाने कोणताही खुलासा केला नाही.

वसुलपात्र रक्कम -
दप्तर खरेदी दरातील तफावत रु.26806/-

आक्षेपाधिन रक्कम -
सायकल वाटपाची पोच नसल्याने रु.4217500/-

DATPMVM6001 (Ref No : 49, Hmm No : 91)

30 नवघर ड प्रभाग निष्कासनासाठी वापरलेल्या मशिनरी भाडे खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 05

लेखा शीर्ष :अनधिकृत बांधकाम तोडण मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 1033300.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1033300.00/-

अतिक्रमण निष्कासन कारवाई नोंदवहीत भाड्याने घेतलेल्या वाहनांची वेळ, वापरलेले तास नमूद केले नाहीत. नोंदवहीत कोणत्या ठेकेदाराचे कोणते वाहन, वाहनाचा क्रमांक नमूद केला नाही. एकूण रक्कम रु.१०३३३००/- प्रमाणके लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे निष्कासित करण्यासाठी वर्ष २०१३-१४ व वर्ष २०१४-१५ मध्ये भाडयाने वापरलेल्या यंत्रसामुग्रीची व वापरलेले मनुष्यबळ यांचे दरानुसार निष्कासन खर्चाची परिगणना करून मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ४७९ अन्वये संबंधित इसमाना मागणी देयके सादर करून प्रतिपूर्ती रक्कम वसूल केलेली नाही.

अतिक्रमण विभागाचे लेखा परीक्षणात, नवघर ड प्रभागाने अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण निष्कासन कारवाईसाठी भाड्याने पोकलेन, जेसीबी. ट्रक्टर ब्रेकर इत्यादी यंत्रसामुग्री , व मनुष्यबळ वापर करून कारवाया केल्या आहेत. सदर ड प्रभागांतर्गत यंत्रसामुग्री , भाडयाने वाहने यावर वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

अ) वर्ष २०१३-१४

अ.क्र	प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	कोणास प्रदान तपशिल
०१	329	22.05.13	20700	शिवशंभू ट्रेडर्स, अतिक्रमण हटविणे, अनधिकृत बांधकाम तोडणे याकामी वाहनभाडे, इतर खर्च
०२	330	22.05.13	40800	शिवशंभू ट्रेडर्स्
०३	523	31.05.13	395038	शिवशंभू ट्रेडर्स्
०४	2142	27.8.13	122400	शिवशंभू ट्रेडर्स्
०५	2145	27.08.13	70200	शिवशंभू ट्रेडर्स्
०६	2158	27.08.13	45000	शिवशंभू ट्रेडर्स्
०७	4686	10.01.14	93600	शिवशंभू ट्रेडर्स्
०८	4687	10.01.14	632400	शिवशंभू ट्रेडर्स्
०९	4688	10.01.14	163200	शिवशंभू ट्रेडर्स्
१०	5989	29.03.14	76500	शिवशंभू ट्रेडर्स्
११	5990	29.03.14	76500	शिवशंभू ट्रेडर्स्
१२	5991	29.03.14	42300	शिवशंभू ट्रेडर्स्
१३	1360	08.07.13	731716	शिवशंभू ट्रेडर्स्
१४	2074	22.08.13	1050	विद्या ट्रेडर्स्

15	2330	31.08.13	81600	मुकुंद प्रिंटर्स
16	2923	07.10.13	540000	एन.एस.ट्रान्सपोर्ट
१७	2967	07.10.13	20000	कामप्पा ट्रेडींग कंपनी
१८	3707	01.11.13	21450	शार्वी कॅटरर्स
१९	4985	30.01.14	10500	शार्वी कॅटरर्स
२०	4986	30.01.14	10500	शार्वी कॅटरर्स
२१	4987	30.01.14	10500	शार्वी कॅटरर्स
२२	4988	30.01.14	10500	शार्वी कॅटरर्स
२३	5099	06.02.14	10500	शार्वी कॅटरर्स
		एकूण -	**3226954**	
	<u>ब) लेखा परीक्षण वर्ष २०१४-१५</u>			
०१	1540	22.07.14	726808	बाबा कन्सट्रक्शन
०२	2046	11.08.14	771600	बाबा कन्सट्रक्शन
०३	3736	25.11.14	182500	बाबा कन्सट्रक्शन
०४	1677	22.07.14	152654	मधुरा एंटरप्रायझेस
०५	1678	22.07.14	148884	मधुरा एंटरप्रायझेस
०६	1682	22.07.14	90738	मधुरा एंटरप्रायझेस
०७	2811	22.09.14	141365	मधुरा एंटरप्रायझेस
०८	2813	22.09.14	141365	मधुरा एंटरप्रायझेस
०९	2814	22.09.14	84272	मधुरा एंटरप्रायझेस
१०	4343	30.12.14	49000	मधुरा एंटरप्रायझेस
११	4344	30.12.14	29458	मधुरा एंटरप्रायझेस
१२	5412	18.02.15	83175	मधुरा एंटरप्रायझेस
१३	1686	22.07.14	22100	शिवशंभू ट्रेडर्स
१४	1687	22.07.14	22100	शिवशंभू ट्रेडर्स
15	1691	22.07.14	11700	शिवशंभू ट्रेडर्स
16	1782	24.07.14	310800	एन.एस.ट्रान्सपोर्ट
१७	2883	29.09.14	156957	द हिंद इलेक्ट्रीकल्स
१८	4223	20.12.14	523350	वेदांत एंटरप्रायझेस
१९	4601	09.01.15	523350	वेदांत एंटरप्रायझेस
		एकूण -	**4172176**	

सदर केलेल्या कारवाई करीता वापरलेली यंत्रसामुग्री , वाहने, मनुष्यबळ याबाबत प्रभागाने नोंदवही ठेवली असून सदर नोंदवहीत कारवाईच्या दिवशी भाड्याने वापरलेल्या पोकलेन , जेसीबी. ट्रक्टर ब्रेकर यांची संख्या नोंदवहीत नमूद केली आहे. सदर नोंदवहीतील नोंदी व भाड्याने पुरविलेल्या यंत्रसामुग्री देयकासोबत अभिलेखे तपासून आढळलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र.७५

दिनांक १३/०४/२०१६ अन्वये कळविले असता विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नाही. सबब लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) सदर नोंदवहीत भाड्याने घेतलेल्या वाहनांची वेळ, वापरलेले तास नमूद केली नाही.

२) सदर नोंदवहीत कोणत्या ठेकेदाराचे कोणते वाहन, वाहनाचा क्रमांक नोंदवहीत नमूद केला नाही.

३) संबंधित नोंदवहीतील नोंदी प्रभागाचे सहा.आयुक्त, अतिक्रमण विभाग प्रमुख यांनी स्वाक्षरी करून साक्षांकित केलेल्या नाहीत.

४) खालील प्रमाणके लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

१. प्र.क्र.३७३६/२५.११.१४ रक्कम रु.१८२५००/- मे.बाबा कन्सट्रक्शन

२. प्र.क्र.१७८२/२७.७.१४ रक्कम रु. ३१०८००/- मे.एन.एस.ट्रान्सपोर्ट

३. प्र.क्र.२९८३/७.१०.१३ रक्कम रु. ५४०००/- मे.एन.एस.ट्रान्सपोर्ट

एकूण रक्कम रु.१०३३३००/-

५) सदर अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे निष्कासित करण्यासाठी वर्ष २०१३-१४ व वर्ष २०१४-१५ मध्ये भाडयाने वापरलेल्या यंत्रसामुग्रीची व वापरलेले मनुष्यबळ यांचे दरानुसार निष्कासन खर्चाची परिगणना करून मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ४७९ अन्वये संबंधित इसमाना मागणी देयके सादर करून प्रतिपूर्ती रक्कम वसूल केलेली नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 57, Hmm No : 75)

31 वसई ई प्रभाग निष्कासनासाठी वापरलेल्या मशिनरी भाडे खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 05

लेखा शीर्ष :अनधिकृत बांधकाम तोडण मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 1875198.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1357450.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 517748.00/-

अतिक्रमण निष्कासन कारवाई नोंदवहीत भाड्याने घेतलेल्या वाहनांची वेळ, वापरलेले तास नमूद केले नाहीत. नोंदवहीत कोणत्या ठेकेदाराचे कोणते वाहन, वाहनाचा क्रमांक नोंदवहीत नमूद केला नाही. प्रमाणके लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे दूर करण्यासाठी वर्ष २०१३-१४ व वर्ष २०१४-१५ मध्ये मध्ये वापरलेल्या यंत्रसामुग्रीची व मनुष्यबळावरील झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ४७९ अन्वये संबंधित इसमाकडून मागणी देयके सादर करून वसूल केलेला नाही. सहाय्यक आयुक्त यांच्या अहवालानुसार वर्ष २०१३-१४ च्या ११४ बांधकाम तोडण्यासाठी झालेला खर्च रु.५१७७४८/- वसूल केला नसून व वर्ष २०१४-१५ मध्ये अशाप्रकारे मागणी केलेली रक्कमेचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही.

अतिक्रमण विभागाचे लेखा परीक्षणात, वसई ई प्रभागाने अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण निष्कासन कारवाईसाठी भाड्याने पोकलेन, जेसीबी. ट्रक्टर ब्रेकर इत्यादी यंत्रसामुग्री , व मनुष्यबळ वापर करून कारवाया केल्या आहेत. सदर केलेल्या कारवाई करीता वापरलेली यंत्रसामुग्री , वाहने, मनुष्यबळ याबाबत प्रभागाने नोंदवही ठेवली असून सदर नोंदवहीत केलेल्या कारवाईच्या नोंदी नमूद केली आहे. सदर ई प्रभागांतर्गत यंत्रसामुग्री, भाडयाने वाहने यावर वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

अ) वर्ष २०१३-१४

अ.क्र	प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	कोणास प्रदान तपशिल
०१	524	31.05.13	262750	एन.एस.ट्रान्सपोर्ट, अतिक्रमण हटविणे, अनधिकृत बांधकाम तोडणे याकामी वाहनभाडे, इतर खर्च
०२	2857	27.09.13	658200	एन.एस.ट्रान्सपोर्ट
०३	3777	11.11.13	688200	एन.एस.ट्रान्सपोर्ट
०४	5362	18.02.14	666600	एन.एस.ट्रान्सपोर्ट
०५	992	21.06.13	406500	ओमकार टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स
०६	5121	06.02.14	7150	आकाश एंटरप्रायझेस
०७	5122	06.02.14	99620	आकाश एंटरप्रायझेस
०८	2004	22.08.13	6683	वरद इंजिनिअरिंग
०९	2005	22.08.13	6930	वरद इंजिनिअरिंग
१०	2012	22.08.13	14490	वरद इंजिनिअरिंग
११	2504	07.09.13	14490	वरद इंजिनिअरिंग
१२	2955	07.10.13	14490	वरद इंजिनिअरिंग
१३	3248	18.10.13	14490	वरद इंजिनिअरिंग
१४	3255	18.10.13	14490	वरद इंजिनिअरिंग
15	4562	08.01.14	14490	वरद इंजिनिअरिंग
16	4571	08.01.14	14490	वरद इंजिनिअरिंग
१७	5641	13.03.14	14490	वरद इंजिनिअरिंग
१८	5954	29.03.14	14490	वरद इंजिनिअरिंग
१९	3427	25.10.13	31680	स्वागत लेबर
२०	3428	25.10.13	31680	स्वागत लेबर
२१	3429	25.10.13	32736	स्वागत लेबर
२२	3533	29.10.13	32736	स्वागत लेबर
२३	3534	29.10.13	31680	स्वागत लेबर
२४	3535	29.10.13	32736	स्वागत लेबर

वर्ष 2014-15 रु.6,77,37,611/- अधिक रु.14,72,660/- एकूण रु.6,92,10,271/-

एकूण रु.7,07,77,552/-

FDSANMM7201 (Ref No : 42, Hmm No : 07)

54 महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे असलेल्या प्रलंबित अग्रीम रक्कमांबाबत.

प्रलंबित अग्रीम रकमा.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 07

लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 131999319.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 131999319.00/-

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 189 नुसार नमुना क्र.147 मधील सर्व अदत्त बाकी पुढील वर्षाच्या अग्रीमधन पुस्तकात मागील थकबाकी म्हणुन ओढुन सक्षम प्राधिकारी म्हणुन मुख्य लेखाधिकारी यांनी साक्षांकीत केल्या आहेत. परंतु त्यांची तपासणी मुख्य लेखापरीक्षा विभागाने केली नाही. अधिकारी व कर्मचाऱ्याना 2006-07 पासुन दिलेल्या अग्रीमाचे समायोजन केले नाही. दिनांक 31.03.2014 अखेर समायोजित न झालेली अग्रीमाची रक्कम रु.38,70,54,611 इतकी आहे. तसेच दिनांक 31.03.2015 अखेर समायोजित न झालेली अग्रीमाची रक्कम रु.13,19,99,319 इतकी आहे. वैद्यकिय अधिकाऱ्याचे मंजूर पद नसताना ठेक्यावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यास दि.05/03/2012 रोजी दिलेले अग्रीम रु.45,000 समायोजीत केले नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 189 नुसार पहिल्या अग्रीमाची वसुली झाल्याशिवाय दुसरे अग्रीम देय नाही. परंतु एकाच अधिकाऱ्यास विभागीय कामासाठी पहिल्या अग्रीमाचे समायोजन बाकी असतांना पुन्हा अग्रीम दिले आहे. कार्यकारी अभियंता म.जी.प्र. यांना दि.02/07/2009 रोजी दिलेले अग्रीम रु.3,00,000 असमायोजीत आहे. महापालिका अस्थापना विभागाने सण अग्रीमाचे अभिलेखे दाखविले नाहीत.

महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळोवळी कार्यालयीन कामासाठी अग्रीम देण्यात आले आहे. प्रलंबित अग्रीमाची यादी अहवालासोबत विवरण पत्र क्र.05 नुसार जोडली आहे. दिनांक 31.03.2014 अखेर एकूण प्रलंबित अग्रीमाची रक्कम रु.38,70,54,611 आहे. तसेच दिनांक 31.03.2015 अखेर एकूण प्रलंबित अग्रीम रक्कम रु.13,19,99,319 आहे. अग्रीम मंजुर करताना विभागाच्या मागणीनुसार आयुक्तांचे मंजुरीने वेळोवेळी अग्रीम दिल्याचे दिसून येते. लेखा शाखेने महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 189 नुसार नमुना क्र.147 मध्ये ठेवलेल्या अग्रीम नोंदीवहीची पडताळणी केली. या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.119 दि.03/06/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचे पत्र क्रमांक निरंक, दिनांक 28/06/2016 नुसार खुलासा केला आहे. तो विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 189 नुसार नमुना क्र.147 मधील सर्व अदत्त बाकी पुढील वर्षाच्या अग्रीमधन पुस्तकात मागील थकबाकी म्हणून ओढली पाहिजे आणि ती साक्षांकित केली पाहिजे. महानगरपालिकेने संगणक प्रणालीत याबाबींच्या नोंदी घेतल्या आहेत. सक्षम प्राधिकारी म्हणून मुख्य

लेखाधिकारी यांनी त्या साक्षांकित केल्या आहेत. परंतु महापालिकेच्या मुख्य लेखा परीक्षा विभागाने त्यांची तपासणी केल्याचे दिसून येत नाही.

2. अधिकारी व कर्मचारी यांना दिलेल्या अग्रीमाची नोंदवही तपासता 2006-07 पासून अग्रीम रक्कमेचे समायोजन झाल्याचे दिसून येत नाही. दिनांक 31.03.2014 अखेर समायोजित न झालेली अग्रीमाची रक्कम रु.38,70,54,611 इतकी आहे. तसेच दिनांक 31.03.2015 अखेर समायोजित न झालेली अग्रीमाची रक्कम रु.13,19,99,319 इतकी आहे.

3. महानगरपालिकेकडे वैद्यकीय अधिकाऱ्याचे मंजुर पद नसल्याने ठेक्यावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यास दिनांक 05.03.2011 रोजी रक्कम रु.45000 अग्रीम दिल्याचे दिसून येते. सदर ठेक्यावरील अधिकारी सद्यस्थितीत महापालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत नसल्याचे दिसून येते. असे असताना असमायोजित अग्रीमाची रक्कम वसुली कशी करणार, याचा खुलासा करावा.

4. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 189 नुसार पहिले अग्रीम दिल्यानंतर त्याची वसुली झाल्याशिवाय दुसरे अग्रीम देय नाही. परंतु एकाच अधिकाऱ्यास विभागीय कामासाठी पहिल्या अग्रीमाचे समायोजन बाकी असतांना पुन्हा अग्रीम दिले आहे

5. दिनांक 02.07.2009 रोजी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना रु.3,00,000/ अग्रीम दिल्याचे नोंदवहीवरुन दिसून येते. कशासाठी अग्रीम दिले याची नोंद नाही. अग्रीमाचे समायोजन मार्च 2015 अखेरपर्यंत झाले नाही. विभागप्रमुखा बरोबर झालेल्या चर्चेनुसार त्यावेळी प्राकलनास तांत्रिक मंजुरी देण्याचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे होते. तांत्रिक मंजुरी देताना प्राकलनाच्या 0.5% फी घेतली जात होती. अशा फी पोटी एकत्रित अग्रीम दिले होते. परंतु त्याचे दि.31.03.2015 पर्यंत समायोजन केलेले नाही.

6. महापालिकेचे पाच स्वतंत्र प्रभाग असून प्रभाग निहाय वेतन भत्याचे प्रदान केले आहे. अशा कर्मचाऱ्यांना सण अग्रीम दिल्याबाबतची अग्रीम नोंदवही आस्थापना विभागाने लेखा परीक्षणास सादर केली नाही. त्यामुळे सण अग्रीमाची समायोजित न केलेली रक्कम नमूद करता येत नाही.

7. दिनांक 31.03.2014 अखेर एकूण 26 अधिकारी/कर्मचारी व ठेकेदार यांच्याकडे अग्रीमाची रक्कम रु.38,70,54,611 थकीत असल्याचे दिसून येते. तसेच दि.31.03.2015 अखेर एकूण 20 अधिकारी/कर्मचारी व ठेकेदार यांच्याकडे अग्रीमाची रक्कम रु.13,19,99,319 थकीत असल्याचे दिसून येते. अग्रीम समायोजनासाठी किंवा वसुलीसाठी महापालिकेने ठोस कार्यवाही केलेली नाही.

वसुलपात्र रकमा

दि.31/03/2014 अखेर रु.38,70,54,611

दि.31/03/2015 अखेर रु.13,19,99,319

DATPMVM6001 (Ref No : 72, Hmm No : 119)

55 निर्मलग्राम पुरस्कार योजना 2007-2008 अंतर्गत जमा झालेली पुरस्कारची रक्कम ग्रा.पं.मर्देस यांच्या खात्यावर अदयाप पडून असलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 200000.00/-

ग्रां.प.मर्देस यांच्या खात्यावर निर्मल ग्राम पुरस्कार योजना 2007-2008 अंतर्गत जमा झालेली पुरस्काराची रक्कम रु.2.00 लक्ष अद्यापपर्यंत पडून आहे. अशी रक्कम महानगरपालिका फंडात जमा झालेली नाही. अशी रक्कम लेखा शाखेने मनपा फंडामध्ये जमा करुन दिर्घ मुदतीच्या ठेवीमध्ये गुंतवणूक न केल्याने व्याजापोटी दुप्पट होणाऱ्या रक्कम रु.2.00 लक्ष एवढे आर्थिक नुकसान झाले आहे.

शासन परिपत्रक क्र.निर्मल 2005/प्र.क्र.20/पा.पु.16, दि.28.05.2009 अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांचे मार्फत ग्रा.पं.मर्देस, ता.वसई. यांना ग्रामपंचायत हागणदारी मुक्त दर्जा टिकवून ठेवलेबाबत रु.2.00 लक्ष धनादेश क्र.477123 दि.08/07/2009 नुसार प्राप्त झाला असून सदरचा धनादेश नजरचुकीने ग्रामपंचात फंडामध्ये जमा होण्याऐवजी 12 व्या वित्त आयोगाच्या रोखकिर्दीला तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया (वसई शाखा खाते क्र.30042599534) खात्यामध्ये जमा झाल्याचे निदर्शनास आले. ग्रा.प.मर्देस जमा बाजुचे 2013-14 प 2014-15 लेखा परीक्षणाचे वेळी सदरची रक्कम व्याजासकट रु.2,70574/- अदयापही पडून आहे. कालांतराने सदर ग्रामपंचायत महानगरपालिकेत समाविष्ट झाली आहे. परंतु सदरची पडून असलेली खात्यामधील रक्कम ग्रा.पं.मार्फत खर्च न झाल्याने शासनाकडे दिर्घ मुदत ठेवीमध्ये गुंतविणेत आलेली नाही. तसेच अशी रक्कम महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आलेली नाही अथवा मनपाने देखील रक्कम वर्ग करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे दिर्घ मुदतीच्या ठेवीच्या व्याजापोटी दुप्पट होणारी रक्कम रू.2.00 लक्ष एवढे आर्थिक नुकसान झाले आहे

निर्मल ग्राम पुरस्कार योजनेची रक्कम रु.2.00 लक्ष अखर्चीत अनुदान शासनास परत करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही विभागाने केली नाही.

लेखा परीक्षणात घेण्यात आलेल्या आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्र.09 दि.25/02/2016 अन्वये खुलासा करणेबाबत विचारणा करणेत आली होती. परंतु खुलासा प्राप्त न झाल्याने सदरचा आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु.2,00,000/-

DATNDMM5801 (Ref No : 93, Hmm No : 09)

56 मालमत्ता कराचा भरणा केलेले धनादेश न वटल्यामुळे थकीत कराच्या व दंडात्मक शुल्काच्या वसुलीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 03

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 2800812.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 2800812.00/-

मालमत्ता धारकांकडून घरपटट्ीचा भरणा केलेले धनादेश न वटल्यामुळे संबंधीत बँकेकडून महापालिकेस परत पाठविण्यात आले असल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले आहे. वर्ष 2013-14 मध्ये मालमत्ता कराच्या न वटलेल्या धनादेशांची रक्कम रु.10,35,632/- एवढी असून वर्ष 2014-15 मध्ये न वटलेल्या धनादेशांची रक्कम रु.17,65,180/- एवढी आहे. अशा मालमत्ता धारकांकडून थकबाकीच्या रकमा रोखीने वसुल करण्यात आलेल्या नाहीत. तसेच Negotiable Instrument चे कलम 138 नुसार संबंधीत मालमत्ताधारकांविरुध्द कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे थकबाकीच्या प्रमाणात वाढ झाली आहे.

वसई विरार महानगरपालिकेच्या विरार "अ" प्रभागाच्या घरपटृटी विभागाचे वर्ष 2013-14 व 2014-15 या वर्षातील घरपटटीच्या जमा रक्कमांची पडताळणी करतांना मालमत्ता धारकांकडून घरपटट्ीचा भरणा केलेले धनादेश न वटल्यामुळे संबंधीत बँकेकडून महापालिकेस परत पाठविण्यात आले असल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले आहे. वर्ष 2013-14 मध्ये मालमत्ता कराच्या न वटलेल्या धनादेशांची रक्कम रु.10,35,632/- एवढी असून वर्ष 2014-15 मध्ये न वटलेल्या धनादेशांची रक्कम रु.17,65,180/- एवढी आहे. वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये मालमत्ता कराच्या न वटलेल्या धनादेशाचा तपशिल सोबतच्या विवरणपत्रात दर्शविण्यात आला आहे. न वटलेल्या धनादेशांच्या रकमा संबधितांकडून वसुल करण्यासाठी विभागाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तसेच वसुलीचा तपशील यासह सविस्तर खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.31 दि.27/03/2016 अन्वये विभागास कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून खुलासा प्राप्त झाला नाही.तरी खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मालमत्ता धारकांचे घ्ररपट्टीच्या वसुलीचे धनादेश न वटल्यामुळे बँकेकडून मनपास परत पाठविण्यात आल्यामुळे संबधितास मालमत्तांधारकांस नोटीस बजावून सदर रकमा बँकेकडील दंडात्मक शुल्कासह रोखीने वसुल करणे आवश्यक आहे. परंतू अशा न वटलेल्या धनादेशांच्या रकमा संबंधिताकडून वसुल करण्यात आल्याचे लेखापरिक्षणास आढळुन आले नाही. त्यामुळे सोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे वर्ष 2013-14 मध्ये मालमत्ता कराच्या न वटलेल्या धनादेशांची रक्कम रु.10,35,632/- तसेच वर्ष 2014-15 मध्ये न वटलेल्या धनादेशांची रक्कम रु.17,65,180/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

2) घरपट्टीचा भरणा करण्यासाठी मालमत्ताधारकाने मनपास दिलेला धनादेश न वटल्यामुळे मनपास येणे

असलेली कराची रक्कम प्राप्त झाली नसल्यामुळे महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील प्रकरण 8 कलम 41 मधील तरतूदीनुसार अशा मालमत्ताधारकांकडून थकबाकीच्या रकमेवर 2% शास्ती वसुल करणे आवश्यक आहे. परंतु न वटलेल्या धनादेशाची रक्कम संबंधित मालमत्ताधारकांकडून शास्तीसह वसुल केलेली नाही.

3) घरपट्टी कराच्या भरणापोटी मनापास दिलेला धनादेश न वटल्यामुळे महापालिकेकडून Negotiable Instrument act चे कलम 138 नुसार संबंधीत मालमत्ताधारकां विरुध्द कारवाई करण्यात आल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले नाही. अशा प्रकारे कार्यवाही करण्यात आली नसल्याने संबंधित मालमत्ता धारकांकडून न वटलेल्या धनादेशांच्या रकमा रोखीने भरणा करण्यात आल्या नाही. त्यामुळे थकबाकीच्या रकमेत मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते.

वसुलपात्र रक्कम वर्ष 2013-14 रु.10,35,632/-
वर्ष 2014-15 रु.17,65,180/-
एकूण रु.28,00,812/-

FDSANMM7201 (Ref No : 51, Hmm No : 31)

57 नवघर-माणिकपूर 'ड' प्रभागाचे मालमत्ता कर आकारणी प्रकरणात कमी कर आकारणी केलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 432384.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 432384.00/-

ब्ल्यूमाउंट इंडीफाईस, नेमिनाथ होम्स व कांतीलाल पी. जैन यांच्या मालमत्तांचे भोगवटा प्रमाणपत्र वर्ष २०१२-१३ मध्ये निर्गमित केले असतानाही संबंधित मालमत्तांची वर्ष २०१२-१३ मधील तिमाही कर आकारणी केली नसल्याने एकूण रक्कम रु.३२७९९६/- ची कमी आकारणी होऊन वसुली केली आहे. रुपेश महादेव पालवे व सुनिता महादेव पालवे, नेल्सन जॉर्ज, कोटियन बिल्डर्स व अशफाक अहमद सिद्दिकी यांच्या इमारतीस महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५०अ नुसार मागील ६ वर्षांची २००८-०९ ते २०१३-१४ कराची एकूण रक्कम रु.५२१९४/- इतकी कर आकारणी केली आहे. सदर इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र नसल्याने शास्तीसह कर आकारणी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नसल्याने कर आकारणी रक्कमेच्या दुप्पट दराची शास्ती रक्कम रु.१०४३८८/- ची कर आकारणीत कमी वसुली झाली आहे.

वसई-विरार शहर मनपाचे वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात , नवघर-माणिकपूर 'ड' प्रभागाचे मालमत्ता कर आकारणीत खालीलप्रमाणे कमी कर आकारणी केल्याचे आढळून आले आहे. कर आकारणी अभिलेखे तपासून आढळलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र.७३ दिनांक १३/०४/२०१६ अन्वये कळविले असता विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नाही. सबब लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) ब्ल्यूमाउंट इंडीफाईस मालमत्ता क्रमांक १३८८/१ ते १३८८/२३७ या इमारतीस २०१३-१४ या आर्थिक वर्षाची एकूण रक्कम रु. ८०६५०६/- इतकी कर आकारणी केली आहे. सदर इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र वर्ष २०१२-१३ मध्ये क्र. VVCMC/TP/OC/VP-0792/527/2012-13 दिनांक ०७/०३/२०१३ अन्वये निर्गमित केले असल्याने तेव्हापासून इमारत रहिवास व्याप्त होत असल्याने वर्ष २०१२-१३ मधील तिमाही कराची आकारणी करणे आवश्यक असताना ती केली नसल्याने रक्कम रु. २०१६२७/- ची कमी वसुली कर आकारणीत झाली आहे.

२) नेमिनाथ होम्स मालमत्ता क्रमांक १३८४/१ ते १३८४/१०९ या इमारतीस २०१३-१४ या आर्थिक वर्षाची एकूण रक्कम रु. ४९२१८८/- इतकी कर आकारणी केली आहे. सदर इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र वर्ष २०१२-१३ मध्ये क्र. VVCMC/TP/OC/VP-0792/527/2012-13 दिनांक ०७/०३/२०१३ अन्वये निर्गमित केले असल्याने तेव्हापासून इमारत रहिवास व्याप्त होत असल्याने वर्ष २०१२-१३ मधील तिमाही कराची आकारणी करणे आवश्यक असताना ती केली नसल्याने रक्कम रु. १२३०४७/- ची कमी वसुली कर आकारणीत झाली आहे.

३) कांतीलाल पी. जैन, वृषभ टॉवर बाजूला सनसिटी, मालमत्ता क्रमांक १३८७/१ व १३८७/२ या २ रो हाऊस इमारतींना २०१३-१४ या आर्थिक वर्षाची एकूण रक्कम रु. १३२८८/- इतकी कर आकारणी केली आहे. सदर इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र वर्ष २०१२-१३ मध्ये क्र. VVCMC/TP/OC/VP-0792/527/2012-13 दिनांक ०७/०३/२०१३ अन्वये निर्गमित केले असल्याने तेव्हापासून इमारत रहिवास व्याप्त होत असल्याने वर्ष २०१२-१३ मधील तिमाही कराची आकारणी करणे आवश्यक असताना ती केली नसल्याने रक्कम रु. ३३२२/- ची कमी वसुली कर आकारणीत झाली आहे.

४) रुपेश महादेव पालवे व सुनिता महादेव पालवे मालमत्ता क्र. ४२१/२५ , नेल्सन जॉर्ज मालमत्ता क्र.४२१/२६, कोटियन बिल्डर्स मालमत्ता क्र.४२१/२८ व अशफाक अहमद सिद्धिकी मालमत्ता क्र.४२१/२७ या धनराज क्लासिक इमारतीस महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५०अ नुसार मागील ६ वर्षांची कर आकारणी केली आहे. सदर मालमत्तांची वर्ष २००८-०९ ते २०१३-१४ कराची एकूण रक्कम रु.५२१९४/- इतकी कर आकारणी केली आहे. भोगवटा प्रमाणपत्र घेतल्याशिवाय नवीन इमारत अथवा त्याचा कोणताही भाग भोगवट्यास घेता येणार नाही अगर इतर कोणासही वापराखाली घेता येणार नाही. अशा भोगवटा न घेतलेल्या इमारती रहिवास व्याप्त केल्यास मालमता कराची आकारणी करताना मालमत्ता कर रक्कमेच्या दुप्पट दराने शास्ती रक्कम आकारणी करणेची आहे. सदर इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र नसल्याने शास्तीसह कर आकारणी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही. सबब अधिनियमातील तरतुदीनुसार कर आकारणी रक्कमेच्या दुप्पट दराची शास्ती रक्कम रु. १०४३८८/- ची कर आकारणी करून वसुली केली नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 55, Hmm No : 73)

58 मालमत्ता कर आकारणी प्रकरणात स्थानिक संस्था कर विभागाने दिलेली प्रमाणपत्रे व कमी वसुली केलेल्या स्थानिक संस्था कर रक्कमेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 141289.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 141289.00/-

ब्ल्यूमाउंट इंडीफाईस सनसिटी, मालमत्ता क्रमांक १३८८/१ ते १३८८/२३७ या इमारतीमधील बिल्डींग क्र. एन(ए,बी,सी,डी,ई,एफ आणि जी) चे क्षेत्र १०१६२.८८ असून शासन निर्णयानुसार रु.१५०/- प्रती मीटर प्रमाणे रक्कम रु.१५२४४३२/- इतकी रक्कम वसुली करणेची असताना स्थानिक संस्था कर विभागाने दिलेला दाखला क्र.वविशम/स्था.स.कर/१३५०/२०१२-१३ दिनांक १.२.२०१३ अन्वये रक्कम रु. १०७५०४५/- इतकी भरणा केली आहे. लीना असोसिएट्स, मालमत्ता क्रमांक ५९९/१ व ५९९/१५ या जी+४ या बंगला इमारतीची कर आकारणी नस्ती तपासता बिल्डींगचे क्षेत्र १२.१० असून शासन निर्णयानुसार रु.१५०/- प्रती मीटर प्रमाणे रक्कम रु.१८१५००/- इतकी रक्कम वसुली करणेची असताना स्थानिक संस्था कर विभागाने दिलेला दाखला क्र.वविशम/स्था.स.कर/१२६३/२०१४ दिनांक ६.१.२०१५ अन्वये रक्कम रु. ४०२११/- इतकी भरणा केली आहे.

वसई-विरार शहर मनपाचे वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात , नवघर-माणिकपूर 'ड' प्रभागाचे मालमत्ता कर आकारणीत स्थानिक संस्था कर विभागाने दिलेली प्रमाणपत्रे व वसूल केलेली स्थानिक संस्था कर रक्कमेची तपासणी करता खालील उदाहरणादाखल प्रकरणात स्थानिक संस्था कर रक्कमेची कमी वसुली केल्याचे आढळून आले आहे. याबाबत आढळलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र.७४ दिनांक १३/०४/२०१६ अन्वये कळविले असता विभागाने याबाबत पत्र क्र.व.वि.श.म.स्था.स.क./१९/२०१६-१७ दिनांक ०५/०५/२०१६ अन्वये खुलासा केला आहे. सदर खुलासा विचारात घेऊन लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) ब्ल्यूमाउंट इंडीफाईस सनसिटी , मालमत्ता क्रमांक १३८८/१ ते १३८८/२३७ या इमारतीची कर आकारणी नस्ती तपासता बिल्डींग क्र. एन(ए ,बी,सी,डी,ई,एफ आणि जी) चे क्षेत्र १०१६२.८८ असून शासन निर्णयानुसार रु.१५०/- प्रती मीटर प्रमाणे रक्कम रु.१५२४४३२/- इतकी रक्कम वसुली करणेची असताना स्थानिक संस्था कर विभागाने दिलेला दाखला क्र.वविशम/स्था.स.कर/१३५०/२०१२-१३ दिनांक १.२.२०१३ अन्वये रक्कम रु. १०७५०४५/- इतकी भरणा केली आहे. सदर प्रकरणी स्थानिक संस्था कर विभागाने केलेल्या खुलाशात मेसर्स मानसरोवर डेव्हलपर्स यांनी स्थानिक संस्था कर नियम २७(४) नुसार ठोक रक्कमेचा पर्याय स्विकारलेला नसून मालाच्या किमतीवर दर सूचीप्रमाणे कराचा भरणा केला असून वर्ष २०११ ते २०१५ पर्यंतची विवरणपत्रे सादर केली असून निर्धारणाची कार्यवाही चालू आहे असा खुलासा केला आहे. विभागाने वर्ष २०११-१२ पासूनचे कर निर्धारण आदेश अथवा सोबत मेसर्स

मानसरोवर डेव्हलपर्स यांनी सादर केलेली विवरणपत्रे सादर केली नाहीत. सबब कमी भरणा रक्कम रु. ४४९३८७/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.
२) लीना असोसिएट्स , मालमत्ता क्रमांक ५९९/१ व ५९९/१५ या जी+४ या बंगला इमारतीची कर आकारणी नस्ती तपासता बिल्डींगचे क्षेत्र १२.१० असून शासन निर्णयानुसार रु.१५०/- प्रती मीटर प्रमाणे रक्कम रु.१८१५००/- इतकी रक्कम वसुली करणेची असताना स्थानिक संस्था कर विभागाने दिलेला दाखला क्र.वविशम/स्था.स.कर/१२६३/२०१४ दिनांक ६.१.२०१५ अन्वये रक्कम रु. ४०२११/- इतकी भरणा केली आहे. सदर प्रकरणी स्थानिक संस्था कर विभागाने केलेल्या खुलाशात मेसर्स लीना असोसिएट्स यांनी स्थानिक संस्था कर नियम २७(४) नुसार ठोक रक्कमेचा पर्याय स्विकारलेला नसून मालाच्या किमतीवर दर सूचीप्रमाणे कराचा भरणा केला असून वर्ष २०११-१२ चे विवरणपत्र सादर केले असून निर्धारणानुसार व्यापाऱ्याने स्थानिक संस्था कर रक्कम भरणा केली आहे असा खुलासा केला आहे. सदर इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र वर्ष २०१३-१४ मध्ये निर्गमित केले असल्याने सदर इमारत बांधकाम वर्ष २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षात देखील चालू होते. सबब विभागाने वर्ष २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षांचेदेखील कर निर्धारण आदेश सादर करणे आवश्यक असताना ते केले नाहीत. सबब स्थानिक संस्था कराची कमी भरणा रक्कम रु. १४१२८९/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

DGPVTTM7001 (Ref No : 56, Hmm No : 74)

59 नालासोपारा 'क' प्रभागाचे मालमत्ता कर आकारणीतील अनियमितताबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 297606.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 297606.00/-

रॉयल पाम्स अपार्टमेंट सोपारा-२ या इमारतीच्या नकाशानुसार १६८२.७६ चौ.मीटर बिल्टअप क्षेत्रावर रक्कम रु.२४४९१४/- स्थानिक संस्था कर वसुली केला नाही. शिवशक्ती अपार्टमेंट आचोळे-२, या अनधिकृत इमारतीचे बिल्डर शिवशक्ती बिल्डर्स यांचे लेटरहेडवरील सदनिकांची बिल्टअप क्षेत्र ५७५४६ चौ.फुट क्षेत्रास रक्कम रु.५३४८१५/- इतकी स्थानिक संस्था कराची रक्कम भरणा करणे आवश्यक असताना कारपेट क्षेत्रावर रक्कम रु.४८९७१०/- ची वसुली केल्याने रक्कम रु.५२६९२/- ची कमी वसुली केली आहे. अनधिकृत इमारतीची कर आकारणी करताना स्थानिक संस्था कराची वसुली इमारतींचे बिल्टअप क्षेत्रावर करणेऐवजी कारपेट क्षेत्रावर केली आहे.

वसई-विरार शहर मनपाचे वर्ष २०१३-१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात , नालासोपारा 'क' प्रभागाचे मालमत्ता कर आकारणीत लेखे तपासून आढळलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.९६ दिनांक १३/०५/२०१६ अन्वये कळविले असता विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नाही. सबब लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) रॉयल पाम्स अपार्टमेंट सोपारा-२ , मालमत्ता क्र.५७४/१ ते ३६ सदर अधिकृत इमारतीचा भोगवटा दाखला क्र.२४७/२०१३-१४ दिनांक २८/२/२०१४ चा आहे. वर्ष २०१४-१५ पासून कर आकारणी केल्याने वर्ष २०१३-१४ मधील तिमाही कर आकारणी रक्कम वसुली करावी. सदर इमारतीचा स्थानिक संस्था कर वसुली केला नाही. इमारतीच्या नकाशानुसार १६८२.७६ चौ.मीटर बिल्टअप क्षेत्र असल्याने रक्कम रु.२४४९१४/- स्थानिक संस्था कर वसुली कमी झाली आहे.

२) शिवशक्ती अपार्टमेंट आचोळे-२ , मालमत्ता क्र.३०६/ १ ते २१५ सदर अनधिकृत इमारतीचे बिल्डर शिवशक्ती बिल्डर्स यांचे लेटरहेडवरील सदनिकांची बिल्टअप क्षेत्र ५७५४६ चौ.फुट क्षेत्रास रक्कम रु.५३४८१५ इतकी स्थानिक संस्था कराची रक्कम भरणा करणे आवश्यक असताना कारपेट क्षेत्रावर रक्कम रु.४८९७१० ची वसुली केल्याने रक्कम रु.५२६९२/- ची कमी झाली आहे.

३) अनधिकृत इमारतीची कर आकारणी करताना स्थानिक संस्था कराची वसुली इमारतींचे बिल्टअप क्षेत्रावर करणे आवश्यक असता कारपेट क्षेत्रावर करण्यात येते.

DGPVTTM7001 (Ref No : 62, Hmm No : 96)

60 आय प्रभागाकडे मालमत्ता कराचा भरणा केलेले धनादेश न वटल्यामुळे थकीत कराच्या व दंडात्मक शुल्काच्या वसुली बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 04

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 335986.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 334234.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1752.00/-

घरपट्टी विभागाकडे मालमत्ताधारकांनी भरणा केलेले घरपट्टीच्या वसुलीचे धनादेश बँकेत न वटल्यामुळे बँकेकडून मनपास परत पाठविण्यात आले आहेत. अशा न वटलेल्या धनादेशांची रक्कम संबंधित मालमत्ताधारकांना नोटीस बजावून रोखीने वसुल करणे आवश्यक आहे. परंतू विभागाने Negotiable Instrument act चे कलम 138 नुसार नोटीस बजावण्यात आलेली नाही. मा.आयुक्त, यांच्या पत्र क्र.व.वि.श.मं./साप्रवि/1000/2014-15 दि.01/07/2014 नुसार अशा मालमत्ताधारकांकडून थकबाकीच्या रकमेवर

2% शास्ती वसुल करणे आवश्यक आहे. परंतू विभागाकडून उपलबध केलेल्या विवरणपत्रानुसार पुर्नभरणा केलेल्या रकमांमध्ये थकबाकीच्या रकमेवर 2% शास्ती आकारण्यात आलेली नाही. पुर्नभरणा केलेल्या रकमांच्या पावत्या पडताळणीस उपलबध करण्यात आलेल्या नाहीत.

वसई विरार महानगरपालिकेच्या वसई "आय" प्रभागाच्या घरपटृटी विभागाचे वर्ष 2013-14 व 2014-15 या वर्षातील घरपटटीच्या जमा रक्कमांची पडताळणी करतांना घरपट्टी विभागाकडे मालमत्ताधारकांनी घरपटटीचा भरणा केलेले वर्ष 2013-14 मध्ये रु.2,40,995/- तसेच वर्ष 2014-15 मध्ये रु.93,239/- एवढया रकमेचे धनादेश न वटल्यामुळे संबंधीत बँकेकडून महापालिकेस परत पाठविण्यात आले असल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले आहे. वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये मालमत्ता कराच्या न वटलेल्या धनादेशाचा तपशिल सोबतच्या विवरणपत्रात दर्शविण्यात आला आहे. याबाबत विभागाकडून अर्धसमासपत्र क्र.71 दि.05/03/2016 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाने पत्र क्र.वविशमकर/VV82/16-17 दि.12/04/2016 अन्वये सादर केलेला खुलासा पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) घरपट्टी विभागाकडे मालमत्ताधारकांनी भरणा केलेले घरपट्टीच्या वसुलीचे धनादेश बँकेत न वटल्यामुळे बँकेकडून मनपास परत पाठविण्यात आल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे. अशा न वटलेल्या धनादेशांची रक्कम संबंधित मालमत्ताधारकांना नोटीस बजावून रोखीने वसुल करणे आवश्यक आहे. तथापि, वसई "आय" प्रभाग घरपट्टी विभागाकडून संबधित मालमत्ताधारकांस नोटीस बजावण्यात आल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले नाही. तसेच विभागाकडून अशा न वटलेल्या धनादेशांची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. न वटलेल्या धनादेशांच्या रकमांच्या वसुलीबाबत उपलब्ध करुन दिलेल्या विवरणपत्राची पडताळणी करता संबधितांकडून न वटलेल्या धनादेशांच्या रकमांचा भरणा करण्यात आल्याबाबतच्या पावत्या पडताळणीस उपलब्ध करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे भरणा केलेल्या रकमांची पडताळणी करुन भरणा रकमांची खात्री करता आली नाही. याबाबत विभागाकडून सादर केलेल्या खुलाश्यासोबत भरणा केलेल्या पावत्या पडताळणीस उपलब्ध झाल्या नसल्याने भरणा रकमांची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे खुलासा मान्य करता येत नाही. तरी न वटलेल्या धनादेशांची वर्ष 2013-14 मधील रक्कम रु.2,40,995/- तसेच वर्ष 2014-15 मधील रक्कम रु.93,239/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2) घरपट्टी कराच्या भरणापोटी मनापास दिलेला धनादेश न वटल्यामुळे संबंधीत मालमत्ताधारकांविरुध्द Negotiable Instrument act चे कलम 138 नुसार कारवाई करण्यात आल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले नाही. त्यामुळे न वटलेल्या धनादेशांमुळे मनपास घरपट्टीकरापोटी प्राप्त होणाऱ्या रकमा गुंतून राहत असल्याचे दिसून येते.

3) घरपट्टीचा भरणा करण्यासाठी मालमत्ताधारकाने मनपास दिलेला धनादेश न वटल्यामुळे मनपास येणे असलेली कराची रक्कम अंतिम दिनांकापुर्वी प्राप्त झाली नसल्यामुळे महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील प्रकरण 8 कलम 41 मधील तरतूदीनुसार तसेच मा.आयुक्त, यांच्या पत्रक्र .व.वि.श.मं./साप्रवि/1000/2014-15 दि.01/07/2014 नुसार अशा मालमत्ताधारकांकडून थकबाकीच्या रकमेवर 2% शास्ती वसुल करणे आवश्यक आहे. परंतू विभागाकडून उपलबध केलेल्या विवरणपत्रानुसार पुर्नभरणा केलेल्या रकमांमध्ये थकबाकीच्या रकमेवर 2% शास्ती आकारण्यात आलेली नाही. त्यामुळे विभागाने सादर केलेला खुलासा संयुक्तीक नसल्याने मान्य करता येत नाही.

4) वर्ष 2014-15 मध्ये मालमत्ता क्र.8883 श्री.आर.एस.सांगवेकर या मालमत्ताधारकाने भरणा केलेला धनादेश न वटल्यामुळे पावती क्र.220897 दि.23/03/2015 च्या पावतीची मालमत्ता कराची रक्कम रु.1332/- अद्याप संबंधिताकडून वसुल करण्यात आलेली नाही. तरी संबंधिताकडून सदर रक्कम दंडनिय शुल्क रु.100/- व 2% शास्ती रु.320/-अशी एकूण रु.1752/- वसुलपात्र आहे.

वसुलपात्र रक्कम रु.1752/-
आक्षेपाधीन रक्कम 2013-14 रु.2,40,995/-
2014-15 रु.93,239/-
एकूण रु.3,34,234/-

FDSANMM7201 (Ref No : 132, Hmm No : 71)

61 पाणीपुरवठा विभागाकडून पाणी देयकांचे प्रदान करतांना एकाच देयकाचे दुबार प्रदान केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 03

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 3372541.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 3850318.00/-

वसई विरार उप प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सुर्या उद्भव या याजनेच्या पाणी देयकापोटी कार्यकारी अभियंता, भातसा कालावा विभाग-1, शहापुर यांना माहे मार्च-2014 व एप्रील 2014 या दोन महिन्याच्या पाणी देयकाची रु.33,72,541/- एवढया रकमेचे दुबार प्रदान करण्यात आले आहे. सदर दुबार प्रदान रक्कमेवर मार्च-2016 अखेर रु.4,77,778/- एवढया व्याजाच्या रकमेचे नुकसान झाले आहे.

वसई विरार महानगरपालिकेच्या विरार अ प्रभागाकडील पाणीपट्टी विभागाकडून वर्ष 2013-14 व 2014-15 या वित्तीय वर्षामध्ये वसई विरार उपप्रादेशिक पाणीपुरवठा योजना सुर्या उद्भव या याजनेच्या पाणी देयकापोटी कार्यकारी अभियंता, भातसा कालावा विभाग-1, शहापुर यांना महिना निहाय अदा केलेल्या रक्कमांची तपासणी करता महापालिकेकडून माहे मार्च-2014 व एप्रील 2014 या दोन महिन्यांच्या पाणी देयकापोटी रु.33,72,541/- एवढया रकमेचे दुबार प्रदान झाल्याचे आढळून आले आहे. याबाबत लेखा परिक्षणास अर्धसमास पत्र क्र.90 दि.02/05/2016 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाने अर्धसमास पत्रावर सादर केलेल्या खुलाश्या मध्ये दुबार प्रदानाची रक्कम पाटबंधारे विभागास पुढील देयकांत समायोजित करण्याची कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात येईल असे नमूद केले आहे. त्यानुसार खालील प्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहे.

1) माहे मार्च-2014 व एप्रील-2014 या 02 महिन्याच्या कालावधीतील पाणी देयकाची थकीत रक्कम रु.33,72,541/- तसेच माहे मे-2014 व जून-2014 या दोन महिन्याच्या कालावधीतील पाणी देयकाची रक्कम रु.33,72,541/- अशी एकूण रु.67,44,301/- एवढया रकमेचे प्रदान प्रमाणक क्र.560 दि.28/08/2014 धनादेश क्र.290284 दि.28/08/2014 अन्वये कार्यकारी अभियंता, भातसा कालवा विभाग क्र.01, शहापूर यांना अदा करण्यात आले असतांना माहे मार्च -201 4 व एप्रील 201 4 या दोन महिन्याच्या पाणी देयकाची रक्कम रु.33,72,541/- प्रमाणक क्र.561 दि.28/08/2014 धनादेश क्र.290285 दि.28/08/2014 अन्वये कार्यकारी अभियंता भातसा कालावा विभाग-1, शहापुर यांना पुन्हा अदा करण्यात आली. यावरुन माहे मार्च -201 4 व एप्रील 201 4 या दोन महिन्याच्या पाणी देयकाचे रु.33,72,541/- एवढया रकमेचे दुबार प्रदान झाले आहे. दुबार प्रदानाची सदर रक्कम रु.33,72,541/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

2) पाणी पुरवठा विभागाने ठेवलेल्या नोंदवहीत विभागाकडे प्राप्त होणाऱ्या देयकांची नोंद घेवून संबंधित देयकाच्या प्रदानाची शिफारस विभाग प्रमुखांनी केली आहे. नोंदवहीत नोंदी घेवूनही त्याचा वापर नियंत्रण नोंदवही असा केलेला दिसून येत नाही. त्यामुळे एका कालावधीच्या देयकाची प्रदानार्थ शिफारस केल्यानंतर पुन्हा त्याच कालावधीच्या देयकाची प्रदानार्थ शिफारस करणे हा निष्काळजीपणा असून सदर बाब ही गंभीर वित्तीय अनियमिता आहे.

3) महापालिकेच्या मुख्यलेखाधिकारी व मुख्य लेखापरीक्षक यांचेकडून एकाच कालावधीच्या देयकांची दुबार प्रदानार्थ शिफारस करण्यात आली. यावरुन संबंधित विभागाकडून देयक नियंत्रण नोंदवही तसेच दुबार प्रदान नोंदवही ठेवण्यात आली नसल्यामुळे अशी अनियमितता घडून आल्याचे दिसून येते.

4) माहे मार्च -201 4 व एप्रील 201 4 या दोन महिन्याच्या पाणी देयकाची रक्कम रु.33,72,541/- प्रमाणक क्र.561 दि.28/08/2014 धनादेश क्र.290285 दि.28/08/2014 अन्वये कार्यकारी अभियंता भातसा कालावा विभाग-1, शहापुर यांना दुबार प्रदान करण्यात आल्यामुळे रु.33,72,541/- एवढा निधी अद्याप अनावश्यकरित्या मनपाच्या लेख्याबाहेर राहिला आहे. सदर रकमेवर द.सा.द.शे.8.50टक्के दराने माहे मार्च-2016 अखेर 21 महिन्यासाठी रु.4,77,778/- एवढे व्याजाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे दुबार प्रदानाच्या रकमेवर रु.4,77,778/- एवढया व्याजाची रक्कम वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु.33,72,541/-
अधिक रु.4,77,778/-
एकूण रु.38,50,318/-

FDSANMM7201 (Ref No : 52, Hmm No : 90)

62 विरार "अ" प्रभाग पाणीपट्टी कर विभागाकडे दैनंदिन जमा रकमांच्या तपासणीत आढळुन आलेल्या अनियमितांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 03

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 2223580.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2223580.00/-

पाणीपट्टी विभागाकडून दि.29/03/2014 रोजी भरणा चलनान्वये रोखशाखेकडे जमा केलेल्या रु.5,99,460/- रकमांची नोंद लेखा विभागाच्या रोखपालाच्या रोखवहीत नोंदविण्यात आल्याचे आढळून आले नाही. पाणीपट्टी कराचा रु.16,24,120/- एवढया रकमेचे भरणा केलेले धनादेश बँकेकडे भरणा करण्यात आल्याबाबतची पोच विभागाकडे उपलब्ध नाही. महिना अखेर धनादेशांच्या एकत्रित रकमेचे चलन रोखशाखेत सादर करण्यात आले आहे. परंतू पोटकिर्द नुसार धनादेशान्वये प्रत्यक्ष जमा व भरणा चलनान्वये दर्शविलेली जमा यात रु.14,400/- एवढी तफावत आहे. धनादेश क्रमांकाच्या नोंदी चलनासोबत उपलब्ध नसल्याने तफावतीच्या रकमेची खात्री करता आली नाही.

वसई विरार महानगरपालिकेच्या विरार "अ" प्रभाग पाणीपट्टी कर विभागाकडे 2013-14 या वित्तीय वर्षात माहे मार्च-2014 मध्ये पाणीपट्टी कराच्या वसुलीच्या दैनंदिन जमा रकमांची पावती पुस्तके, पोटकिर्द, भरणा चलने व रोखपालाकडील रोखवही यांची तपासणी करता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत खुलासा करण्याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.85 दि.28/04/2016 अन्वये कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून काहीही खुलासा करण्यात आला नाही. तरी खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) पाणीपट्टी विभागाकडून पाणीपट्टी कराच्या दैनंदिन वसुलीच्या रकमांचे चलन तयार करुन रोखशाखेकडे भरणा करण्यात येते. विभागाकडून दि.29/03/2014 रोजी संगणक पावत्यान्वये तसेच हस्तलिखित पावत्यान्वये जमा झालेल्या रकमा खालीलप्रमाणे चलनान्वये मनपाच्या रोखशाखेकडे भरणा करण्यात आल्याचे चलनावरील रोखपालाच्या स्वाक्षरीवरुन दिसुन येते. सदर चलनांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

जमेचा दिनांक	भरणा चलन क्रमांक	दिनांक	चलनाची रक्कम रुपये
29/03/2014	2224	29/03/2014	87,240/-
29/03/2014	2223	29/03/2014	72,480/-
29/03/2014	143/3	29/03/2014	1,21,920/-
29/03/2014	143/4	29/03/2014	93,460/-
29/03/2014	143/5	29/03/2014	1,34,300/-
29/03/2014	143/6	29/03/2014	90,060/-
	एकूण		5,99,460/-

त्यानुसार पाणीपट्टी वसुलीची दैनंदिन जमा रकमेच्या भरणा चलनांची रोखपालाकडील रोखवहीशी पडताळणी करता सदर चलनान्वये जमा रकमांची नोंद रोखपालाकडील रोखवहीत घेण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही. त्यामुळे सदर रक्कम मनपा फंडात भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही. त्यामुळे रक्कम रु.5,99,460/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

2) पाणीपट्टी विभागाकडे दैनंदिन जमा होणाऱ्या पाणीपट्टी कराच्या रोख रकमा चलन तयार करुन रोखशाखेकडे भरणा करण्यात येतात. तसेच धनादेशा स्वरुपात प्राप्त होणाऱ्या रकमा विभागाकडून परस्पर बँकेकडे भरणा महिना अखेर एकत्रित चलन तयार करुन रोखशाखेस सादर करण्यात येते. परंतू दैनंदिन जमेचे धनादेश बँकेत भरणा करण्यात आल्याबाबतची पोच विभागाकडे उपलब्ध नाही. माहे मार्च-2014 मधील दैनंदिन जमा रकमांची पोटकिर्द पडताळणी करता दि.01/03/2014 ते 31/03/2014 या कालावधीत एकूण रु.16,24,120/- एवढी रक्कम जमा झाल्याचे दिसून येते. परंतू बँकेकडे भरणा केलेल्या धनादेशांची पोच विभागाकडे उपलब्ध नसल्याने प्राप्त धनादेशांचा बँकेकडे त्वरीत भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

3) धनादेशांच्या प्राप्त रकमाचे दैनंदिन जमा चलन रोखशाखेत सादर न करता महिनाअखेर एकत्रित चलन तयार करुन रोखशाखेकडे सादर करण्यात येते. माहे मार्च-2014 च्या पोटकिर्दवरील नोंदीनुसार धनादेशान्वये प्राप्त रक्कम रु.16,24,120/- एवढी असल्याचे दिसून येते. परंतू विभागाकडून महिना अखेर रोखशाखेकडे सादर केलेले एकत्रित चलन क्र.2226 दि.29/03/2014 अन्वये रु.16,09,720/- एवढी रक्कम जमा दर्शविण्यात आली आहे. सदर चलनासोबत धनादेशांची नोंद उपलब्ध नसल्याने पोटकिर्द व भरणा चलन यामध्ये रु.14,400/- एवढया तफावतीबाबत खात्री करता आली नाही. त्यामुळे रु.16,24,120/- एवढी रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.5,99,460/-
अधिक रु.16,24,120/-
एकूण रु.22,23,580/-

FDSANMM7201 (Ref No : 85, Hmm No : 85)

63 नवघर-माणिकपूर कार्यालय अंतर्गत पाणी पुरवठा विभागाकडील पंपींग मशीनरी स्वत:कडील साहित्य वापरुन देखभाल दुरुस्ती करणे कामातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 03

मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब

पंपीग मशीनरी देखभाल दुरुस्तीसाठी मंजूर निविदाधारकाचे कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र प्रमाणपत्र नुतनीकरण झालेले नसताना ठेका मंजूर केलेला आहे. तसेच जिल्हा दरसुचीनुसार बी-1 निविदा न मागविता वार्षिक दर करारानुसार बी-2 निविदा मागविल्याने सदर कामामध्ये अनियमितता झाल्याचे दिसून आले.

अंदाजपत्रकीय रक्कम	: रु.35, लक्ष
जाहिरात प्रसिध्दी	: दै.हमारा महानगर दि.3.5.2013
प्रशासकीय मंजूरी	: मा.स्थायी समिती ठराव क्र.406 दि.05.06.2013.
प्राप्त निविदा	: एकूण तीन
ठेकेदार	: मे.ॲशलॉन एंटरप्रायझेस (सर्वात कमी दराची)
कार्यादेश	: क्र.716/26.2.14
कामाची मुदत	: 1 वर्ष मुदतवाढ महासभा ठराव क्र.1357 दि.17.1.2014
करारनामा	: दि.6/6/13.

नवघर-माणिकपूर कार्यालयाअंतर्गत पाणीपुरवठा विभागातील पंपींग मशीनरी स्वत:कडील साहित्य वापरुन देखभाल दुरुस्ती करणे या कामासाठी दि.3.5.2013 च्या दै.हमारा महानगर या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देऊन जाहीर निविदा मागविण्यात आली असून सर्वात कमी दराची निविदा वाटाघाटीने दर कमी करुन स्विकारणेत आली असून 1 वर्षाच्या मुदतीत काम पूर्ण करण्याचे कार्यादेश 13.14 या वर्षासाठी देणेत आले आहेत. तसेच 14.15 या वर्षासाठी महासभा ठरावाने ठेक्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. वरील कामावरती झालेल्या अनियमितते बाबत लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

5) प्रस्तुत कामांचा ठेका मे.ॲशलॉन एंटरप्रायझेस यांना देण्यात आला असून याबाबत नस्तीची छाननी करण्यात आली. जाहीरात वृत्तपत्रातील निविदा सूचना बाब क्र.10 नुसार या कामासाठी सदर ठेकेदार हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील नोंदणीकृत ठेकेदार असणे अशी अट आहे. याबाबत कंत्राटदाराचे नोंदणीकृत प्रमाणपत्र तपासता त्यांची नोंदणी मुदत दि.4.6.2010 ते 3.6.2013 पर्यंत अशी असून नोंदणी प्रमाणपत्रातील अट क्र.3 नुसार प्रमाणपत्राचे नुतनीकरणासाठी कंत्राटदाराने विहीत नमुन्यात आणि त्याबरोबर आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रासह प्रमाणपत्राची मुदत संपण्यापूर्वी किमान तीन महिने अगोदर अर्ज करुन मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. परंतु ठेकेदाराला मनपा ने 20.3.2014 व 14/15 ठेक्याची मुदतवाढ देऊनही प्रमाणपत्राचे नुतनीकरण करुन महानगरपालिकेस सादर केले नाही. तसेच विभागानेही असे प्रमाणपत्र कंत्राटदाराकडून घेतल्याचे निदर्शनास आले नाही व कंत्राटदाराचा ठेका तसाच पुढे सुरु केला आहे.

6) कंत्राटदाराच्या नोंदणी प्रमाणपत्रानुसार कंत्राटदारास कामेही घेण्याची पात्रता रु.25.00 लाख एवढी विहीत केलेली असताना सदर ठेक्याचे अंदाज पत्रकीय रक्कम रु.35.00 लाख एवढी असून नियमबाह्यपणे 2013.14 व 2014-15 या वर्षासाठी ठेक्याचे वाटप झाल्याचे निदर्शनास आले.

7) प्रस्तुत कामाचा ठेका बी-2 पध्दतीने जाहीरात प्रसिध्दी देऊन स्विकारणेत आला असून निविदेतील उदाहरणादाखल खालील बाबींचे दर यांची तपासणी केली असता ते 2012-2013 जिल्हा दरसूची पेक्षा जादा दराने स्विकारणेत आले असल्याचे निदर्शनास आले. याबाबत जिल्हा सुचीनुसार बी-1 पध्दतीने सदर कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असत्या तर मनपाचा फार मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा झाला असता परंतु अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

	बाब तपशील	**बी-2 पध्दतीने स्विकारलेले दर रूपये**	**जिल्हा दर सूचीदर रूपये**	**दरामधील फरकाची रक्कम** रूपये.
1	हार्ड मूरुम व बोल्डार मध्ये खोदाई करणे.	400/- घ.मी.	175+10%= 192.50 प्रती घ.मी.	207.50 प्रति घ.मी.
2	सॉफ्ट रॉकमधील खोदाई	550/- घ.मी.	443+10%= 487.30	62.70 प्र.घ.मी.
3	100 मी.मी. व्यास आणि (बी.) क्लास जी.आय.पाईप पुरविणे व बसविणे	1290/- (प्र.र.मी.)	पुरविणे 820/- बसविणे 106+10%= 936.60 प्र.घ.मी.	353.40 प्र.घ.मी.
4	100 मी.मी. व्यास (बी) क्लास जी.आय. कपलिंग पुरविणे व बसविणे	540/- प्रति नग	दर उपलब्ध नाही.	

लेखा परीक्षणात घेण्यात आलेल्या आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्र.68 दिनांक 05/04/2016 अन्वये खुलासा करणेबाबत विचारणा करणेत आली होती. सदरचा खुलासा प्राप्त झाला व त्यावरती खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

मुद्दा क्र.1 :- मे.ॲशलॉन एंटरप्राईझेस यांचे नुतनीकरण झालेले प्रमाणपत्र जोडून सादर केल्याचे नमुद केले आहे. सदरचे प्रमाणपत्र पहाता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी दि.30/05/2014 रोजी नुतनीकरणाला दि.29/05/2017 पर्यंत मंजूरी दिलेली आहे. आक्षेपामध्ये कंत्राटदाराच्या नोंदणी प्रमाणपत्राची मुदत दि.03/06/2013 पर्यंत असल्याचे नमुद केले आहे. तसेच प्रमाणपत्रातील अट क्र.3 नुसार प्रमाणपत्राचे नुतनीकरणासाठी कंत्राटदाराने विहीत नमुन्यात आणि त्याबरोबर आवश्यक असलेल्या कागदपत्रांसह प्रमाणपत्राची मुदत संपण्यापुर्वी ती 01 महिने अगोदर अर्ज करुन मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. परंतु कंत्राटदाराने मुदतवाढीसाठी दि.16/12/2013 रोजी अर्ज करुन नऊ महिने उशीराने प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे कंत्राटदाराच्या प्रमाणपत्राचे नुतनीकरणाची खात्री न करता त्यांना मुदतवाढ देऊन कार्यादेश देणेत आले असून सदरची अनियमितता झालेली आहे.

मुद्दा क्र.2 :- मुद्दा क्र.1 यांच्यासी संबंधित असल्याने कायम ठेवण्यात येत आहे.

मुद्दा क्र.3 : पंपींग मशीनरी देखभाल दुरुस्तीसाठी जिल्हा दर सूचीमध्ये दर उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे. परंतु आक्षेपामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील जिल्हा सूचीचे उदाहरणादाखल दर दर्शविणेत आलेले आहेत. त्यामुळे खुलासा मान्य करता येणार नाही. त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATNDMM5801 (Ref No : 92, Hmm No : 69)

64 प्रभाग समिती ब पेल्हार क्षेत्रातील सिध्दी पारिजात सोसायटी ते त्र्यंबक बंगल्यापर्यंत100 मी.मी.व्यासाची जी.आय.जलवाहिनी अंथरणे टाकणे कामातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 02

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 1037042.00/-

100 मी.मी. व्यासाची जी.आय जल वाहिनी अंथरणे कामामध्ये 25 मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे कामी आवश्यक नसताना मुरुम खडकात खोदाई सी.सी.कॉक्रीट करणे, रबल सोलींग करणे, सी.आय. स्पेशल पुरविणे इत्यादी तांत्रीक बाबी प्राकलनात प्रस्तावित करुन चुकीची मोजमापे नोंदविणेत आलेली असल्याने अनियमितता झालेली आहे.

प्रशासकीय मान्यता	: स्थायी समिती ठराव क्र.1029 दि.21.03.2013.
तांत्रिक मंजूरी	: कार्यकारी अभियंता पत्र क्र.2112 दि.06.05.2014.
अंदाजपत्रकीय रक्कम	: 985971/-
जाहीरात प्रसिध्दी	: दै.महानगर व दै.वार्ताहर दि.03/05/2013
ठेकेदाराचे नाव	: मे.अभिषेक लेंगरे 4.99% जादा दर
कार्यादेश	: 711/दि.18.08.2014
मुदत	: 60 दिवस
काम पूर्ण	: 16/10/2014
मोजमाप नोंदवही	: क्र.06 पान क्र.37 ते 48
एकूण खर्च	: रु.1037042/-
प्रमाणक क्र.	: 275/दि.27.02.2015 पहिले अंतिम

प्रस्तुत जी.आय. जलवाहिनी अंथरणे या कामासाठी दि.03/05/2013 च्या दै.महानगर व दै.वार्ताहर या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या असून सर्वात कमी दराची निविदा मे. अभिषेक लेंगरे यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.99% जादा दर असलेली स्विकारणेत आले असून त्याना या कामाचे कार्यादेश देऊन देणेत येऊन काम पुर्ण झाले आहे. सदरच्या कामावरती एकूण झालेल्या खर्चाबाबत लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) प्रस्तुत कामासाठी तांत्रीक मंजूरी प्राप्त झालेले प्राकलन तसेच या कामाचे ड्रॉईंग व डिझाईनची छाननी करणेत आली.या डिझाईनमध्ये 25 मी.मी.व्यासाची जी.आय.पाईप लाईन टाकणे बाबत कोणतीही बाब प्रस्तावित असल्याचे निदर्शनास आले नाही. प्राकलनात मात्र 25 एम.एम.व्यासाची जी.आ. पाईप लाईन 150 मीटर लांबीस

प्रस्तावित असल्याचे दिसून आले. याबाबत कामाची मोजमाप तपासली असता 25 मी.मी. व्यासाची जी.आय.पाईप म्हणजेच 1'' इंच लाईन अंथरणे या कामासाठी मोठ्या प्रमाणात खोदकाम,मुरुम, बोडींग, रबल सोलींग, सी.सी. क्रॉक्रीटच्या बाबींची तांत्रीक आवश्यकता नसताना चुकीची मोजमापे खालील प्रमाणे नोंदविण्यात आलेली असल्याने तसेच 1''इंची पाईप म्हणजे घरघूती अथवा व्यावसायीक कामासाठी वापरणेत येत असल्याने प्रमाणापेक्षा खालीलप्रमाणे जादा मोजमापे नोंदविण्याने 25 मी.मी. व्यासाची जी.आय.पाईप अंथरणे कामातील खर्चात अनियमितता झालेली आहे.

मोजमाप नोंदवहीत नोंदविलेली मोजमापे (25 मी.मी. व्यासाच्या पाईपसाठी)

<u>बाब क्र.-1</u>:- फेडिशन, स्ट्रेंच मातीमध्ये खोदाई करणे

150मीटर लांबी X 0.40से.मी.रुंदी X 30से.मी.उंची =18घ.मी.

=18घ.मीटर X 147.30प्रति घन मीटर दर

=रु.2651/-

बाब क्र.-4:- मऊ खडक व जून्या सिमेंट कॉक्रीटमध्ये खोदाई

150मीटर लांबी x 0.40से.मी.रुंदी x 0.15से.मी.उंची = 09घ.मी.

= 9 घनमीटर x 487.30प्रति घ.मी. दर

= रु.3936/-

बाब क्र.-14:- रबल सोलींग करणे.

150मीटर लांबी x 0.40से.मी.रुंदी x 0.23से.मी.उंची = 13.80घ.मी.

= 13.80घनमीटर x 988 प्रति घ.मी. दर

= रु.13634/-

बाब क्र.-15:- सी.सी.कॉक्रीट पसरणे.

150मीटर लांबी x 0.40से.मी.रुंदी x 0.30से.मी.उंची = 18घ.मी.

= 18घनमीटर x 4955.50 प्रति घ.मी. दर

= रु.89199/-

बाब क्र.-47:- सी.आय.पाईप स्पेशल पुरविणे.

1 x 150 रनिंग मीटर = 150 रनिंग मीटर

= 150 र.मी. x 31.90 प्रति रनिंग मीटर दर

= रु.4785/-

बाब क्र.-53:- मीडीयम क्लास जी.आय.25मी.मी. व्यासाचे पुरविणे.

150 रनिंग मीटर x 165 प्रति रनिंग मीटर दर

= रु.24750/

एकूण आक्षेपाधिन रक्कम (2651+3936+13634+89199+4785)

= रु.1,14,205/-

2) प्रस्तुत कामाची मोजमाप नोंदवही बाब क्र.14 नुसार 100 मी.मी. व्यासाची तसेच 25 मी.मी. व्यासाची जी.आय. पाईप लाईन टाकणे कामी 0.23 से.मी. जाडीचे खालील प्रमाणे रबल सोलींग केलेले आहे.

<u>100 मी.मी. व्यास पाईप लाईन</u>

220 मीटर लांबी x 0.85 से.मी. रुंदी x 0.23 से.मी.उंची = 43 घ.मी.

<u>25 मी.मी. व्यास पाईप लाईन</u>

150 मीटर लांबी x 0.40 से.मी. रुंदी x 0.23 से.मी.उंची <u>= 13.80 घ.मी.</u>

एकूण वापरलेले साहित्य <u>= 56.81 घ.मी.</u>

वरीलप्रमाणे एकूण सहित्य 56.81 घनमीटरसाठी ठेकेदारास प्रति घनमीटर रु.988.90 प्रमाणे रक्कम रु.56179/- एवढे प्रदान प्रदान केलेले आहे. याबाबत मोजमाप नोंदवहीतील बाब क्र.5 नुसार 220 मीटर लांबीमध्ये कठिण खडकात खोदाई करुन 93 घ.मी. एवढे उपयोगी साहित्य प्राप्त झाले असून महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम यांचे कडिल खंड-2 नियम क्र.127 मधील रेड स्पेशिफिकेशन नुसार कठिण खडकातील खोदाईमधील प्राप्त साहित्य रबल सोलींगसाठी वापर करण्याची तरतूद आहे. परंतु अशा तरतुदीचे पालन झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे झालेला खर्च रु.56179/- लेखा परिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन खर्च रु.56179/-

3) प्रस्तुत कामासाठी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या आहेत. परंतु या

कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा नस्तीसोबत जोडण्यात आलेल्या नाहीत. तसेच वृत्तपत्र कात्रणे ठेवणेत आलेले नाहीत. त्यामुळे ठेकेदारास अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.99% जादा दराने निविदा मंजूर केलेल्या निविदेतील दराबाबत खात्री करता आली नाही. याबाबत आवश्यक अनुपालन लेखा परिक्षणास दाखवावे. तो पर्यंत झालेल्या खर्च रु.1037042/- लेखा परिक्षणात आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

लेखा परीक्षणात घेण्यात आलेल्या आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्र.47 दि.28/03/2016 अन्वये खुलासा करणेबाबत विचारणा करणेत आलेली होती व याबाबत अनुपालन प्राप्त झाले. सदर अनुपालनावर खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

आक्षेप क्र.1 :- खुलाशामध्ये कामाच्या अंदापत्रकात 100 मी.मी. व्यासाची जी.आय. जलवाहिनी 150 मीटर व परीसरातील नळ कनेक्शन शिफ्ट करणेसाठी आवश्यक असलेली 25 मी.मी. व्यासाची जी.आय. जलवाहिनी 150 मीटर प्रस्तावित करण्यात आली असल्याचे नमुद केले आहे. परंतु प्रत्यक्ष मोजमाप नोंदवहीत तपासणीत 25 मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेसाठी स्ट्रेंच मातीमध्ये खोदाई करणे, मऊ खडक व जुन्या कॉक्रीट मध्ये खोदाई, रबल सोलिंग, सी.सी. कॉक्रीट, इत्यादी आवश्यक नसलेल्या बाबी नोंदविण्यात आलेल्या आहेत तसेच प्रत्यक्ष ड्रॉईंग व डिझाईनमध्ये अशी कोणतीही तरतुद असल्याचे दिसून आले नाही, प्रत्यक्ष कामचे फोटोवरुनही अशी वस्तुस्थिती दिसून आली नाही. सदरचा आक्षेप प्रत्यक्ष मोजमाप नोंदवहीतील नोंदीनुसारच घेण्यात आल्यामुळे कायम ठेवण्यात येत आहे.

आक्षेप क्र.2 :- प्राप्त खुलासा मुळ घेण्यात आलेल्या आक्षेपासी सुसंगत नाही कारण जलवाहिनी टाकून झाल्यानंतर त्यावर पुर्वीच्या रस्त्यानुसार सोलींग करणे त्यावर कॉक्रीट करणे आवश्यक असल्याचे खुलाशात म्हटले आहे. परंतु अशी तरतुद प्राकलनात नसून तशा नोंदीही मोजमाप नोंदवहीत घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

आक्षेप क्र.3 :- प्राप्त खुलाशानुसार सदर कामाची मुळ नस्ती लेखा परीक्षणास उपलब्ध् झाली असली तरी आक्षेपामध्ये नमुद केलेली कागदपत्रे नस्तीसोबत जोडलेली नाहीत त्यामुळे सदर आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रु.10,37,042/-

65 प्रभाग समिती ब पेल्हार क्षेत्रातील संतोष भुवन पेट्रोल पंप ते सितारामनगर नाक्यापर्यंत 100 मी.मी.व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे कामातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष : पाणी पुरवठा मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 21120.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 17227.00/-

सार्वजनिक बांधकाम विभागाकडील स्पेसिफिकेशननुसार कठीण खडकात खोदाई करुन प्राप्त झालेले उपयोगी साहित्य रबर सोलींग या बाबीसाठी वापरणे आवश्यक होते. परंतु अशी कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे रबर सोलींग या बाबींसाठी रुपये 18,863/- एवढे जादा प्रदान झाले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणे दरसुचि 2012-13 मधील तरतुदींचे पालन झालेले नाही. कामाच्या निविदा नस्तीसोबत वॉटर डीवॉटरींगसाठी वापरलेले लॉग बुक जोडलेले नाही. तसेच निविदा नस्ती जाहिरात प्रसिध्दी कात्रणे निविदा नस्तीसोबत जोडलेली नाहीत.

प्रशासकीय मान्यता	: स्थायी समिती सभा ठराव क्र.1029 दि.21.03.2013
तांत्रिक मंजूरी	: कार्यकारी अभियंता पत्र क्र.2109 दि.06.05.2014
अंदाजपत्रकीय रक्कम	: रु.9,53,662/-
जाहीरात प्रसिध्दी	: दै. महानगर व दै.वार्ताहर दि.03/05/2013
ठेकेदाराचे नाव	: मे.अभिषेक लेंगरे 4.99% जादादर
कार्यादेश	: 710/दि.18.08.2014
मुदत	: 60 दिवस
कामपूर्ण	: 16/10/2014
मोजमाप नोंदवही	: क्र.06 पानक्र.39 ते 64
एकूण खर्च	: रु.1001250/-
प्रमाणक क्र.	: 277/27.02.2015 पहिले अंतिम

प्रस्तुत जलवाहिनी अंथरणे या कामासाठी दि.03/05/2013 च्या दै.महानगर व दै.वार्ताहर या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या असून सर्वात कमी दर असलेली अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 4.99% जादा दराची निविदा मंजुर करण्यात आली असून ठेकेदार यांना कामाचे कार्यादेश देऊन सदर चे काम विहीत मुदतीत पूर्ण झाले आहे. या कामावरती एकूण झालेल्या

खर्चाबाबत लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) सदर कामाचे अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता कार्यकारी अभियंता यांनी दिली असून याबाबत कामाचे मोजमाप नोंदवही क्र.6 पान क्र.39 ते 64 मोजमापे तपासली असता बाब क्र.14 नुसार 100 मी.मी. व्यास जी.आय.जलवाहिनी टाकणेसाठी 8x15 मीटर लांबी x 0.50 सेमी जाडी x 0.23 से.मी. उंची =13.80 घनमीटर रबरसोलींग करणेसाठी ठेकेदारास प्रति घनमीटर रु.988.90 प्रमाणे रक्कम रु.13683/- प्रदान केले आहेत. याबाबत मोजमाप नोंदवहितील बाब क्र.5 चे अवलोकन केले असता 450 मीटर लांबी x 0.85 सेमी रुंदी x 0.50 सेमी खोली मध्ये याप्रमाणत 191.25 घनमीटर साहित्य कठिण खडकात खोदाई करुन प्राप्त केले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभागाकडील स्पेसीफिकेशन (रेडबुक) खंड क्षेत्र मधील नियम क्र.127 मधील तरतूदीनुसार कठिण खडकातील खोदाई मधून निघालेले उपयोगी दगड रबल सोलींगच्या कामासाठी वापरणे आवश्यक असताना ठेकेदाराने बाहेरुन (क्वारीमधून) साहित्य मागवून वापरल्यामुळे रबल सोलींगसाठी प्रदान झालेली जादा रक्कम रु.13683/- वसुल करुन तसे अनुपालन दाखवावे. वसुलपात्र रक्कम रु.13863/-

2) मोजमाप नोंदवहीतील बाब क्र.21 नुसार 100 मी.मी. व्यासाचे सी.आय. मेकॅनीकल पाईप कॉलर्स कपलिंग 4 नग पुरवठा केले असुन प्रतिनग रु.841/- प्रमाणे ठेकेदारास रु.3365/- एवढे प्रदान केलेले आहे. याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडिल 2012-2013 ची दरसूची पान क्र.88 मधील बाब क्र.1 मधील टिपणी नुसार जी.आय पाईप पुरवठादार हे मेकॅनीकल पाईप कॉलर्स कपलिंगसह असल्याने 100 मी.मी. व्यासाची पाईप लाईन टाकणे कामी ठेकेदारास स्वतंत्र देण्याची आवश्यकता नसताना रु.3364/- जादा प्रदान झाले आहे.

3) मोजमाप नोंदवहीत बाब क्र.17 नुसार 5 बीएचपी मोटर्स प्रती दिवशी 8 तास याप्रमाणे 8 दिवस मोटर डी.वॉटरिंग करणे साठीच्या कामासाठी वापरल्याच्या नोंदी घेण्यात आल्या असुन त्यासाठी ठेकेदारास रु.21120/- एवढे प्रदान केले आहे. सदरची मोजमापे काम पुर्ण होण्याच्या अंतिम दिवशी म्हणजे दि.16/10/2014 रोजी घेण्यात आली आहेत. यावरुन असे निदर्शनास येते की काम पुर्ण झाल्यानंतर ही डी-वॉटरींगसाठी 5 बीएचपी मोटर कार्यान्वीत असल्याचे दिसुन आले सदरच्या विसंगतीबाबत योग्य खुलासा केला नाही. आक्षेपाधिन रक्कम रु.21120/-

4) प्रस्तुत कामाच्या ठेक्यासाठी दिलेली जाहिरात प्रसिध्दीची कात्रणे, तसेच एकूण प्राप्त झालेल्या निविदा

ठेकेदाराने निविदेमध्ये दिलेले दर याबाबतीची कागदपत्रे नस्तीसोबत जोडलेली नाहीत. त्यामुळे प्रत्यक्ष मंजुर झालेला ठेका याबाबतची खात्री लेखापरिक्षणात करता आली नाही.

सदरच्या घेण्यांत आलेल्या आक्षेपाबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 34, दिनांक 25/02/2016 अन्वये विभागास अनुपालन सादर करण्यांविषयी विचारणा करण्यांत आली होती. याबाबत खुलासा प्राप्त झाला असुन त्यावरती खालीलप्रमाणे अभिप्रायदेण्यांत येत आहेत.

मुददा क्रमांक 1:- आक्षेपामध्ये मोजमाप नोंदवहीनुसार कठीण खडकात खोदाई करुन प्राप्त झालेले साहित्य व उपयोगी दगड रबर सोलींग या बाबीसाठी वापरणे आवश्यक असतांना ठेकेदाराने बाहेरुन साहित्य मागवून त्यास अनाठायी सोलींगचे प्रदान केले असल्याचे व त्यामुळे रक्कम रु.13863/- जादा प्रदान झाले असल्याचे आक्षेपात नमुद आहे. प्राप्त खुलाशामध्ये सदर बाबी अंतर्गत खोदण्यांत आलेल्या सी सी कॉंक्रिटची छायाचित्रे सोबत जोडण्यांत आल्याचे म्हटले आहे. प्रत्यक्षात अशी छायाचित्रे जोडण्यांत आलेली नाहीत. तसेच प्राप्त साहित्य तांत्रिकदृष्टया वापरणे शक्य नसल्याचे म्हटले आहे. परंतु स्पेसिफिकेशनमध्ये अशी तरतुद नमुद आहे. तसेच असे साहित्य वापरणेयोग्य नव्हते तर मोजमाप नोंदवहीत अशी टीप देवून त्यास त्याचवेळी सक्षम तांत्रिक अधिका-याची मंजुरी घेणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही झालेली नाही. सबब, सदरचा आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे.

मुददा क्रमांक 2:- आक्षेपामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील दरसुचि पान क्रमांक 88 बाब क्रमांक 1 मधील टीप्पणीचा आधार घेवून आक्षेप नोंदविण्यांत आला आहे. परंतु प्राप्त खुलाशामध्ये या बाबींचा विचार करण्यांत आलेला नाही. सबब, आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहे.

मुददा क्रमांक 3:- प्राप्त खुलासा व आक्षेपात नमुद केलेल्या बाबीशी सुसंगत नसुन कामाच्या देयकासोबत लॉगबुक ऑफ डीवॉटरींग जोडण्यांत आलेले नाही. त्यामुळे खुलासा मान्य करता येत नाही.

मुददा क्रमांक 4:- आक्षेपात नमुद केल्याप्रमाणे जाहिरात प्रसिध्दीची कात्रणे, पेपर तसेच एकुण प्राप्त झालेल्या निविदा व दर नस्तीसोबत जोडलेले नाहीत. त्यामुळे खुलासा मान्य करता येत नाही.

DATNDMM5801 (Ref No : 127, Hmm No : 34)

66 महापालिका रुग्णालये व दवाखाने यांसाठी 2013-2014 व 2014-2015 या वर्षातखरेदी केलेल्या औषधे व उपकरणे खर्चामधील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष :भांडार मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 49100.00/-

मुद्रांक शुल्क अधीनियम प्रकरण 63(1) नुसार कंत्राटदाराशी केलेला करारनामा नोंदणीकृत करतांना रक्कम रु.49100/- कमी मुद्रांक शुल्क वसुल केलेले आहे. दवाखाने व रुग्णालये यासाठी खरेदी केलेली औषधे शासनमान्य दर करार कंपन्यांकडून थेट खरेदी केलेली नाही. त्यामुळे केलेली खरेदी किफायतशीर असल्याची खात्री करता आली

महानगरपालिका रुग्णालये व दवाखाने यासाठी खरेदी केलेल्या औषधे व उपकरणे 2013-2014 व 2014-2015 या वर्षाच्या नस्तींचे लेखापरीक्षण करणेत आले एकूण खरेदीवरील झालेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

2013-2014 मधील उपलब्ध तरतूद व अंदाजित रक्कम रु.5,0000000/-

2013-2014 मध्ये झालेला एकूण खर्च रु.5735400/-

2014-2015 मधील उपलब्ध तरतूद व अंदाजित रक्कम रु.3,63,00,000/-

a. मध्ये झालेला एकूण खर्च रु.1,69,72,046/-

1) महानगरपालिकेच्या विविध प्रभाग समिती कार्यालयाअंतर्गत नागरिकांना दैनंदिनी सोयी सुविधा पुरविणेसाठी दैनंदिन कामकाजासाठी रुग्णालये व दवाखाने यांसाठी संबंधित विभागांच्या मागणी प्रमाणे औषधे व उपकरणे केंद्रीय स्तरावर खरेदी करुन त्या त्या विभागांना वाटप करण्यात आली आहेत. यासाठी केंद्रीय स्तरावरुन वार्षिक दराच्या निविदा मागविण्यात येत असून प्राप्त निविदापैकी ज्या औषधे व उपकरणांचे बाबनिहाय कमीदर असलेल्या निविदाधारकांना निविदा मंजूर करुन खरेदीचे विभागून कार्यादेश देण्यात आलेले आहेत. 2013-2014 साहित्य खरेदीची निविदा प्रक्रिया व खर्चाच्या नस्तीची तपासणी करणेत आली. यामध्ये 2011-2012 मधील मंजूर निविदाधारकांना स्थायी समितीच्या मंजूरीने मुदतवाढ देऊन त्याच दराने वार्षिक दरकरारानुसार औषधे व उपकरणे खरेदी केलेली आहेत परंतु संबंधित मंजूर निविदाधारकांकडून 2013-2014 या वर्षासाठी मुद्रांक शुल्क भरुन नविन करारनामा तयार करणेत आलेला नाही. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियमांच्या प्रकरण - 63(1) नुसार कंत्राटदाराशी केलेला करारनामा नोंदणीकृत करताना कामाच्या किंमतीच्या प्रथम 10 लक्ष किंमतीवर रु.100/- त्यापुढील प्रत्येक एक लाखावर 100/- रुपये पाच लाखाच्या मर्यादेत मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक आहे. सन 2013-2014 या वर्षात कंत्राटाची अंदाजित रक्कम रु.5 कोटी याप्रमाणे करारनामा करुन रक्कम रु.49100/- मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक होते. अशाप्रकारे करारनामा न केल्यामुळे मुद्रांक शुल्कापोटी शासनाचे नुकसान झालेले आहे. वसुलपात्र रक्कम रु.49100/-

2) 2013-2014 व 2014-2015 यावर्षामध्ये निवीदा मागवून वार्षिक दरकरारानुसार रुग्णालये व दवाखाने यांच्यासाठी औषधे व उपकरणे खरेदी केलेली आहेत. याबाबत औषधे व उपकरणे यासाठी शासनाचे दरकरार असलेली कंपनी संचालक वैद्यकिय शिक्षण संस्था (DMER) यांचेशी औषधे खरेदीसाठी लेखी पत्रव्यवहार केल्याचे अथवा त्यांच्याकडे औषधे उपलब्ध नसलेबाबत नाहरकत प्रमाणपत्र घेणेत आल्याचे दिसून आले नाही. तसेच औषधे व उपकरणे खरेदीकरणे पूर्वी बाजार भाव मागवून व त्याप्रमाणे बाजारभावाशी तुलना करुन निविदा मागविण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे खरेदी करणेत आलेल्या औषधांची व उपकरणे यांची किफायतशीर दराने खरेदी केल्याबाबत खात्री करता आली नाही.

सदर बाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 109, दिनांक 27/05/2016 अन्वये आक्षेपाचे अनुपालन सादर करण्याविषयी विभागास विचारणा करण्यांत आली होती. परंतु अनुपालन सादर करण्यांत आलेले नाही.

सबब, आक्षेप कायम ठेवण्यांत येत आहेत.

DATNDMM5801 (Ref No : 129, Hmm No : 109)

67 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाण स्वच्छता सफाई ठेका व भाड्याच्या वाहनाव्दारे यांत्रिक पध्दतीने नाले खोदाई करणे, औषधे फवारणी करणेबाबत (2013-14).

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ते सफाई, नाले खोदाई, औषध फवारणी.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 11

लेखा शीर्ष : घनकचरा व्यवस्थापन मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 542559130.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 542559130.00/-

शहरातले रस्ते सफाई, गटारे खोदाई व औषध फवारणी करीता कामाचा आवाका काढला नाही. मागील ठेकेदारास मुदतवाढ दिली आहे. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार कल्याण विभाग भांखस 1088/(2512)/उद्योग-6, दि.02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.8.3(ह) पुनः र्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑडर) सुधारीत मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात अन्वये निविदा मंजुरी समितीने उचित कार्यवाही केली नाही. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 चे कलम 03 नुसार मुदतवाढ दिल्यानंतर नव्याने करार न केल्याने मुद्रांक शुल्काचे नुकसान झाले. त्यामुळे कामाची विधीग्राहयता दिसून येत नाही. स्थायी समिती ठराव क्र.713, दि.07/12/2012 अन्वये कॉम्पॅक्टर व टिपरच्या भाड्याच्या नोंदवहया उपलब्ध करुन दिल्या नाहीत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 332 नुसार हॉटेल, दुकाने व हॉस्पीटल यांच्या कच-याच्या शुल्काची वसुली केली नाही. महापालिकेच्या आस्थापनेवरील 498 सफाई कामगारांच्या सेवा कोणत्या कामासाठी वापरल्याचा खुलासा केला नाही. घनकचऱ्याच्या विल्हेवाटीबाबत क्षेपणभुमीवरील नोंदवही उपलब्ध करुन दिली नाही. कर्मचाऱ्यांचे हजेरीबाबत बायोमेट्रीक प्रिंट, प्रभागाच्या आरोग्य निरीक्षकाचा अहवाल उपलब्ध करुन दिला नाही. मे.रिलायबल एजन्सी यांना प्रदान करण्यासाठी आयुक्तांनी अधिनियमाचे कलम 73ड नुसार स्थायी समितीची मंजुरी घेतली नाही. कामगार आयुक्तांच्या आदेशानुसार मजुरीच्या वाढीव दराचे प्रदान केल्याची मुळ प्रमाणके उपलब्ध करुन दिली नाहीत.

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाण स्वच्छता- सफाई ठेका व भाड्याच्या वाहनाव्दारे यांत्रिक पध्दतीने नाले खोदाई करणे, औषधे फवारणी करणे.

प्राकलन : रु. 55.34 कोटी.

प्रशासकीय मंजुरी : महासभा ठराव क्र.10, दि.03/03/2011

महासभा ठराव क्र.15, दि.09/03/2012 अन्वये मुदतवाढ

महासभा ठराव क्र.10,दि.08/02/2013 अन्वये 2013-14 करीता मुदतवाढ दिली आहे.

तांत्रिक मंजुरी : --

निविदा तारीख : दि.02/06/2011, मुंबई सकाळ,

सन 2012-13 या वर्षात मुदतवाढ दिली आहे.

व सन 2013-14 या वर्षात मुदतवाढ दिली आहे.

एल-1 निविदा :

अ.क्र.	विभागाचे नाव	मंजूर निविदाधारक	मंजूर मासिक दर (रु.)
1	नवघर - माणिकपुर पुर्व (प्रभाग क्र. 56,65,60,64,62,78,28, 61)	रिलायबल एजेन्सी	41,34,072/-
2	नवघर - माणिकपुर पश्चिम (प्रभाग क्र. 54,55,66,67,68,69,70, 71,73,74,75,76,77,80)	रिलायबल एजेन्सी	62,53,390/-
3	नालासोपारा विभाग पुर्व (ब) (प्रभाग क्र. 26,29,30,31,41,42,42, 43)	साई गणेश एंटरप्रायझेस	42,52,621/-
4	नालासोपारा विभाग पुर्व (क) (प्रभाग क्र. 47,48,49,50,57,58)	बि.पी.तांडेल	27,26,438/-
5	नालासोपारा विभाग पुर्व (अ) (प्रभाग क्र. 39,40,44,45,46,59)	दिनेश बी. संखे	31,95,000/-
6	नालासोपारा पश्चिम (प्रभाग क्र. 32,33,37,38,34,36,52)	लोकसेवा सर्विसेस	33,25,580/-

7	विरार पुर्व (अ) (प्रभाग क्र .4,5,14,15,16,17)	अनंत एंटरप्रायझेस	30,53,115/-
8	विरार पुर्व (ब) (प्रभाग क्र .19,20,21,25)	उजाला लेबर कॉन्ट्रक्टर	40,43,724/-
9	विरार पुर्व (क) (प्रभाग क्र . 1,3,27)	स्वागत लेबर कॉन्ट्रक्टर	9,79,626/-
10	विरार पश्चिम (अ) (प्रभाग क्र .11,12,13,18,22,23)	अनंत एंटरप्रायझेस	25,53,115/-
11	विरार पश्चिम (ब) (प्रभाग क्र .6,10,24)	अनंत एंटरप्रायझेस	11,84,383/-
12	वसई विभाग (प्रभाग क्र .81,82,83,85,86,87,88, 89)	एम .ई .प्रोजेक्ट	13,50,480/-

ई प्रभागात एम.ई.प्रोजेक्ट या ठेकेदाराच्या तक्रारी येत असल्याने मनपाने दि. 02/06/12 रोजी निविदा प्रसिध्द करुन 01/09/2012 पासुन खालील ठेकेदाराची नुमणुक केली व त्यास 2013-14 मध्ये मुदतवाढ दिली आहे.

अ.क्र	विभागाचे नाव	कमी दराच्या निविदाधारकाचे नाव	मंजुर दर (रु .)
1	वसई विभाग (अ) (प्रभाग क्र.82,83 मुख्य रस्त्याच्या उत्तरेकडील भाग व प्रभाग क्र.85,86,87,88,89)	मे .चिराग	25,50,000/-
2	वसई विभाग (ब) (प्रभाग क्र . 80, 81 व क्र .83 मुख्य रस्त्याच्या दक्षिणेकडील भाग	मे .आर.बी .इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा .लि .	14,50,000/-
3	वसई विभाग (क) (प्रभाग क्र .72,84)	मे .दिनेश संखे	7,50,000/-

निविदा मंजुरी : स्थायी समिती ठराव क्र.13 दि.07/09/2011 व क्र.14 दि.27/09/2011 मुदत वाढ महासभा ठराव क्र.15 दि.09/03/2012,पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत मुदत वाढ दिली आहे. तसेच 2013-14 करता मुदतवाढ महासभा ठराव क्र.10, दि.08/02/2013 अन्वये दिली आहे, पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत.

करार :दि. 01/10/2011 (मुदत 31/03/2012 पर्यंत) पुढील मुदतवाढीच्या काळासाठी करार केला नाही.

कार्यादेश : क्र.535, दि.01/10/11. मुदतवाढीचा कार्यादेश दि.31/03/2012 व नविन ठेकेदारास दिलेला कार्यादेश दि.31/08/12.

मुदत :मुदत दि.31/03/13 पर्यंत मुदतवाढ महासभा ठराव क्र.10दि.08/02/13 अन्वये नविन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत जुन्या ठेकेदारास मुदतवाढ दिली आहे.

काम पुर्ण : काम पुर्ण दि.31/03/2014

एकूण खर्च : रु. 54.26 कोटी.

लेखा परीक्षणाच्यावेळी काही निवडक प्रमाणके तपासली. त्याचा उदाहरणा दाखल तपशिल पुढील प्रमाणे-

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	तपशिल
5711	20/03/2014	1,42,786	मे.रिलायबल एजेन्सी यास प्रभाग क्र. ड साफसफाई (जानेवारी 2014) फरक. मा.कामगार आयुक्त मुंबई यांचे पत्र दि.05/02/2014 नुसार जानेवारी 2014 पासुन मजुरीत वाढ झाल्याचे नमुद केले आहे. परंतु जानेवारी 2014 मुळ देयक उपलब्ध करुन देण्यात आले नाही.त्यामुळे फरकाच्या रकमेची परिगणना योग्य असल्याची खात्री करता आली नाही.
5710	20/03/2014	2,30,888	मे.रिलायबल एजेन्सी फरक.
5815	27/03/2014	9,24,000	मे.एन.एस. ट्रान्सपोर्ट दि.01/02/2014 ते दि.28/02/2014 पर्यंत रोज 06 डंम्पर पुरविणे.
5842	--//--	35,71,731	मे.अनंत एन्टरप्रायझेस विरार (पू).अ
5841	--//--	13,57,255	--//-- ब प्रभाग.
5840	--//--	30,71,731	--//-- विरार पश्चिम (अ).
5839	--//--	2,58,000	मे.रॅंबो कन्ट्रक्शन 2/14
5838	--//--	2,58,000	--//-- 1/14
5569	06/03/2014	72,06,724	मे.रिलायबल एजेन्सी नवघर.
5568	--//--	47,23,628	--//-- नवघर माणिकपुर
5567	--//--	7,74,000	--//--
5604	--//--	49,67,629	मे.साई गणेश इंन्टरप्रायझेस नालासोपारा पू.
5603	--//--	32,53,286	मे.बी.पी. तांडेल नालासोपारा पू.(क)
5618	13/03/2014	10,23,000	मे.एन.एस.ट्रान्सपोर्ट जानेवारी 14
5629	--//--	10,75,000	मे.रिलायबल एजेन्सी मजूर पुरवठा दि.01/02/2014 ते 28/02/2014.
6138	31/03/2014	10,75,000	मे.रिलायबल एजेन्सी मजूर पुरवठा दि.01/03/2014 ते

31/03/2014.

वसई विरार शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ सुमारे 312 चौ.कि.मी. आहे. लोकसंख्या10 लक्ष आहे. या महानगरपालिकेची स्थापना 03 जुलै 2009 रोजी झाली. त्यात वसई, विरार, नवघर -माणिकपुर व नालासोपारा या चार नगरपरिषदा व 53 गावांचा समावेश आहे. शहर मुंबई लगत असल्याने झपाट्याने नागरीकरण व औद्योगिकरण झाले आहे. विकसित होणारे मोठे रस्ते, अंतर्गत रस्ते, डिपी रस्ते, उघड्यावरील बाजार इत्यादी दैनंदिन साफसफाई करावी लागते. महापालिका हद्दीत स्वच्छता करणे, धुर फवारणी करणे, औषधांची व जंतुनाशकांची फवारणी, गटार सफाई, कचऱ्याची वाहतुक, गटारातील गाळ काढणे व कॉंक्रिट इ. ची वाहतुक करणेसाठी महापालिकेकडे स्वत:चा कर्मचारीवृंद पुरेसा नसल्याचे विभागाच्या टिपणीत नमुद आहे. दररोज सुमारे 450 ते 500 मेट्रिक टन कचरा निर्माण होतो. लाड समितीच्या अहवालानुसार लोकसंख्येच्या प्रति हजारी 5 सफाई कामगार लागतात. परंतु त्यापेक्षा कमी सफाई कामगारांच्या सहाय्याने काम केल्याचे विभागाच्या टिपणीत नमुद आहे. या कामाकरीता प्रभाग क्रमांकाचे गट करुन महानगरपालिकेने वार्षिक ठेका देऊन काम करुन घेतल्याचे दिसुन येते. या बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.111 दि.30/05/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने दि.10/06/2016 रोजी केलेला खुलासा विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1. घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम 2000 अन्वये रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता व सफाई करीता ठेका व भाड्याच्या वाहनांव्दारे यांत्रिक पध्दतीने नालेसफाई करण्यासाठी महानगरपालिकेने जाहिर निविदा 2011-12 मध्ये मागविल्या. नव्याने निर्माण झालेली महानगरपालिका, विभागाने यासाठी किती खर्च येईल, कामाचा आवाका काय, 5 प्रभाग व 89 नगरसेवक वॉर्ड असलेल्या शहरात प्रत्यक्षात किती कचरा होणार आहे उचलावा लागणार आहे, यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता किती, किती साहित्य/यंत्रसामुग्री, सुविधा, कचरा वाहतुक करणारी वाहने इत्यादी बाबतचा अंदाज निविदा मागविताना केला नाही. महापालिकेच्या मुख्यालयात सार्वजनिक आरोग्य विभागाचे मुख्यालय आहे. स्वच्छता व सफाईचे एकच काम विभागुन केले आहे. याचा परिणाम निविदा मागविण्यावर झाल्याचे दिसुन येते. कारण प्रत्येक प्रभागाच्या गटानुसार निविदाकाराने वेगवेगळे दर दिले आहेत. त्यातुन किफायतशीर दर असणारे 15 स्वतंत्र ठेकेदार निश्चित करण्यांत आले आणि विभागाने त्यांच्या कामावर नियंत्रण ठेवले नाही. एकंदरीत व्यवस्थापन कौशल्याचा अभाव दिसून आला. परिणामी वसई प्रभागातील मे.एम.ई.प्रोजेक्ट या ठेकेदाराच्या तक्रारी येत असल्याने वसई प्रभागासाठी महापालिकेला 02/06/2012 रोजी निविदा सुचना प्रसिध्द करुन दि.01/09/2012 पासुन या विभागात अ,ब,क असे तीन ठेकेदार निश्चित करावे लागले. त्यामुळे वार्षिक खर्चात रक्कम रु.37 लाख वाढ झाली आणि महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले. (याबाबत वित्तीय वर्ष 2012-13 चे लेखापरीक्षण अहवालात स्वतंत्र परिच्छेद घेण्यात आला आहे.)

2. उपरोक्त कामासाठी जाहिर निविदा मागवुन 2011-12 मध्ये ठेकेदार निश्चित केले आहे. निविदेतील अटीशर्ती पाहता निविदा ही 1 वर्षासाठी होती. परंतु महानगरपालिकेने 2012-13 या वित्तिय वर्षासाठी महासभा ठराव क्र.15 दि.09/03/2012 नुसार मुदतवाढ दिली. तसेच 2013-14 या वित्तीय वर्षासाठी महासभा

ठराव क्र.10 दि.08/02/2013 नुसार मुदतवाढ दिली आहे. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार कल्याण विभाग भांखस 1088/(2512)/उद्योग-6, दि.02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.8.3(ह) पुनर्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑडर) सुधारीत मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात अन्वये पुनर्प्रत्ययी आदेश देताना ते 06 महिन्याच्या अवधी करीताच द्यावयाचे आहेत. सदरचे आदेश तात्कालीक / आकस्मिक स्वरुपाचे असावेत. असे आदेश देताना बाजारातील किंमती मुळ आदेशापेक्षा कमी नसल्याची, त्या स्थिर असल्याची शहानिशा करणे आवश्यक आहे. तसेच पुनर्प्रत्ययी आदेशाचे प्रस्ताव खरेदी समितीने / निविदा मंजुरी समितीने मंजुर करणे आवश्यक आहे. असे असताना त्यानुसार उचित कार्यवाही न करता मुदतवाढ दिल्याचे दिसून येते. याबाबत महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधीनियम अध्यादेश, 2011 कलम 06 नुसार आवश्यक ते अभिलेखे विभागाची टिपणी, आयुक्तांचे अभिप्राय मागणी करूनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

3. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 चे कलम 03 मधील तरतुदीनुसार कामाच्या ठेक्याचे संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेड्युल 1 मधील क्र.63 नुसार दि.01/05/2006 पासुन संबंधिताकडुन पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वापरणे आवश्यक आहे.

कामाची रक्कम रु. 10 लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रु.100/-

त्यानंतर प्रत्येकी 1 लाखासाठी- मुद्रांक शुल्क रु.100/- (कमाल रु.5 लाख) मुदतवाढ दिल्यानंतर 2013-14 करिता संबंधित ठेकेदारासोबत नव्याने करार करणे आवश्यक होते. महापालिकेने पुनर्प्रत्ययी आदेश निर्गमित केले आहेत. परंतु वित्तीय वर्षासाठी नव्याने करार केले नाहीत. त्यामुळे शासनाच्या मुद्रांक शुल्क रु.2,87,000/- चे नुकसान झाले आणि कामाची विधीग्राह्यता दिसून येत नाही.

4. स्थायी समिती ठराव क्र.713 दि.07/12/2012 नुसार सॅटेलाईट सिटी योजनेच्या अंतर्गत महापालिकेने खरेदी केलेल्या कॉम्पॅक्टर व टिपरचे मासिक भाडे ठरविण्यात आले आहे. प्रति कॉम्पॅक्टर चे मासिक भाडे रु.65,000/- व मिनी हायड्रोलिक प्रति टिपर भाडे रु.15,000/- महापालिकेच्या प्रत्येक (5) प्रभागात किती कॉम्पॅक्टर व टिपर आहेत, याची नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यापैकी किती यंत्र- सामुग्री कोणत्या ठेकेदाराने वापरली, कोणत्या कालावधीसाठी वापरली, किती रक्कम थकीत आहे, याची माहिती विभागाकडे प्राप्त झाली नाही. संबंधीत अभिलेखे नोंदवह्या उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत.

5. महापलिका हद्दीत असणारे कत्तलखाने, दुकान भाडे, हॉटेल, व्यवसायिक, हॉस्पिटल यांच्या कडुन मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होतो. यांचे सर्वेक्षण विभागाने केले नाही. त्यामुळे त्यांची निश्चित संख्या नमुद करता येत नाही. हा कचरा महापालिकेला उचलावा लागतो. परंतु अशा व्यवसायिकांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 332 नुसार महापालिकेने भाडे किंवा फी ची आकारणी करुन वसुली केली नाही.

6. महापालिकेच्या आस्थापनेवर असलेल्या सफाई कामगारांचा तपशिल आस्थापना विभागाने उपलब्ध करुन दिला नाही. 2013 -14 मध्ये सफाई कामगारांच्या वेतन/ भत्त्यावर रु.7,49,03,184/- खर्च केला आहे. महापालिकेच्या आस्थापनेवर 498 सफाई कामगार काम करत असताना प्रभागनिहाय वॉर्ड सफाईच्या कामी ठेकेदाराने मजुर, साहित्य, मशिनरी इ. सर्व पुरविण्याच्या अटीवर ठेका मंजुर केला आहे. महापालिकेकडे कार्यरत असलेल्या 498 कर्मचाऱ्याच्या सेवा कोणत्या कामासाठी वापरल्या याचा खुलासा आस्थापना विभागाने

केला नाही. या कामगारांच्या सेवा प्रभागनिहाय वॉर्ड साफसफाई करण्याचे कामी वापरल्या नाहीत. त्यामुळे खर्चात बचत झाली नाही.

7. ठेकेदाराने प्रभागातील कचरा डंपिंग ग्राऊंडवर नेऊन टाकायचा आहे. या कामासाठी केलेल्या करारनाम्यातील अट क्र.11 नुसार - घनकचरा विल्हेवाट करणेसाठी नेमुन दिलेल्या क्षेपणभुमीवर वाहन रिकामे केल्याबाबत क्षेपणभुमीवरील कर्मचाऱ्याकडुन नोंदी घेणे आवश्यक आहे. त्यात प्रत्येक वेळी वाहन क्र., वाहन चालकाचे नाव, वेळ व क्षेपणभुमीसाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांची सही इ. बाबी अंतर्भुत असल्या पाहिजे. तसेच सदर नोंदीच्या छायाप्रती देयकासोबत सादर करणे बंधनकारक आहे. परंतु या कामाच्या खर्चाची काही निवडक प्रमाणके तपासता, त्यासोबत क्षेपणभुमीवरील कचरा वाहतुकीच्या नोंदीच्या नोंदवहीची छायाप्रत जोडलेली नाही. म्हणजेच ठेकेदाराने करारातील अटीचे पालन केले नाही. तरीही महापालिकेच्या आरोग्य विभागाने देयकाचे प्रदान करण्याची शिफारस केली. महापालिकेच्या लेखा/ लेखा परीक्षा विभागाने देयकाचे प्रदान केले.

8. करारातील अट क्र.35 व 39 नुसार ठेकेदाराने कार्यालयीन काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे बायोमॅट्रीक हजेरी बाबतची प्रिंट देयकासोबत सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सर्व कंत्राटी कामागारांचे राष्ट्रीयकृत बँकामध्ये खाते उघडुन मासिक पगार धनादेशाव्दारे जमा करावयाचा आहे. त्याशिवाय कंत्रादाराची देयके अदा केली जाणार नाहीत. परंतु तशी कार्यवाही विभागाने केली नाही. तसेच ठेकेदाराने नेमलेल्या कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी, इ.एस.आय.सी., Workmen compensation Insurance, इत्यादि बाबीचा भरणा संबंधीत खात्याकडे केल्याची चलने लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिली नाहीत. त्यामुळे अशा कपातीची निश्चित रक्कम नमुद करता येत नाही.

9. करारातील अट क्र.36 व 40 नुसार कंत्राटी कामगाराचे हजेरी पत्रकानुसार तपासणी केल्याचे व ठेकेदाराने केलेले काम समाधानकारक असल्याने देयकाचे प्रदान करण्यासाठी शिफारस असल्याचे प्रमाणपत्र प्रभागाच्या आरोग्य निरिक्षकाने देयकासोबत जोडले आहे. परंतु संबंधीत अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत.

10. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 ड नुसार स्थायी समितीची मंजुरी न घेता पुढीलप्रमाणे खर्च केला आहे.

प्रभाग समिती ई मधील विभाग (अ) (प्रभाग क्र.82,83 मुख्य रस्त्याच्या उत्तरेकडील भाग प्रभाग क्र. 85,86,87,88,89) दैंनंदिन साफ सफाई, गटार सफाई, औषधे फवारणी, इ. कामासाठी मे.चिराग यांना ठेका दिला असून त्याची या कामी निविदा रु.25,50,000/- प्रति महा स्थायी समिती ठराव क्र.479 दि.29/08/2012 अन्वये मंजूर केली होती. त्याना मनपाने कार्यादेश क्र.13 दि.31/08/2012 अन्वये दिला होता. तसेच सर्वसाधारण सभा ठराव क्र.10 दि.08/02/2013 नुसार पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत मुदतवाढ दिली. ठेकेदाराने त्याच्या ठेक्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिवाळी सणाचा बोनस न दिल्याने कर्मचाऱ्यांनी दि.13/11/2013 पासुन बेमुदत संप पुकारल्याने अत्यावश्यक सेवा बंद होऊ नये म्हणुन आयुक्तांचे परवानगीने मे.रिलायबल एजेन्सी वसई यांना कार्यादेश क्र.703 दि.16/11/2013 नुसार 100 मजुर घेऊन दि.18/11/2013 पासुन शहर सफाईचे काम सुरु करण्याचे आदेश दिले. तसेच आदेश क्र.727 दि.20/11/2013 नुसार 25 मजुर

घेऊन दि.20/11/2013 पासुन शहर सफाईचे काम सुरु करण्याचे आदेश दिले. म्हणजेच 125 मजुरांना प्रति महा, प्रति मजुर रु.8600/- वेतन देण्यास मंजूरी दिली आहे. दर महा रु.10,75,000/- खर्च करण्यात आला. एकूण खर्च 2013-14 मध्ये रक्कम रु.48,37,500/- करण्यात आला.

पुढील प्रमाणकाव्दारे उदाहरणादाखल खर्च केल्याचे दिसून येते.

प्र.क्र. 5629 दि.13/03/2014 रु.10,75,000/- मे.रिलायबल एजेन्सी यांना साफसफाई कामाकरता दि.01/02/2014 ते 28/02/2014 पर्यंतचे पुरविलेल्या मजुरांचे प्रदान.

प्र.क्र.6138 दि.31/03/2014 रु.10,75,000/- मे.रिलायबल एजेन्सी यांना साफसफाई कामाकरता माहे मार्च 2014 पर्यंत पुरविलेल्या मजुरांचे प्रदान.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73ड नुसार रु.5 लाख ते रु.25 लाखा पर्यंत आयुक्तांनी संविदा केल्याच्या तारखे पासुन पंधरा दिवसाचे आत स्थायी समितीला कळविले पाहीजे. अशा संविदेस स्थायी समितीची अवलोकनार्थ मंजुरी घेतली पाहीजे. परंतु या प्रकरणी तशी कार्यवाही केली नाही. तसेच खर्चाचा विचार करता अशा आवर्ती खर्चास व रु.25 लाखापेक्षा जादा होणाऱ्या खर्चासाठी स्थायी समितीची मंजुरी घेण्यात आली नाही. सबब सदरचा खर्च विधी विरुध्द केला आहे.

11. मा.कामगार आयुक्त मुंबई यांचेकडील आदेशानुसार कामगारांच्या मजूरी दरात वाढ झाल्यानंतर, ठेकेदारास मजूरीच्या वाढीव दराचे प्रदान केले आहे. सदर कालावधीतील मुळ प्रदानाची प्रमाणके उपलब्ध करुन दिली नाहीत. त्यामुळे फरकाची गणना बरोबर केल्याची लेखा परीक्षणाची खातरजमा करता आली नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु.54,25,59,130

DATPMVM6001 (Ref No : 67, Hmm No : 111)

68 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाण स्वच्छता- सफाई ठेका व भाड्याच्या वाहनाव्दारे यांत्रिक पध्दतीने नाले खोदाई करणे, औषधे फवारणी करणे बाबत (2014-15).

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ते सफाई, नाले खोदाई, औषध फवारणी.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 14

लेखा शीर्ष : घनकचरा व्यवस्थापन मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 826107861.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 825806861.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 301000.00/-

शहरातले रस्ते सफाई, गटारे खोदाई व औषध फवारणी करीता कामाचा आवाका काढला नाही. माहे ऑगस्ट, 2014 पर्यंत मागील ठेकेदारास मुदतवाढ दिली आहे. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार कल्याण विभाग मांखस 1088/(2512)/उद्योग-6, दि.02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.8.3 (ह) पुन: र्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑर्डर) सुधारीत मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात अन्वये निविदा मंजुरी समितीने उचित कार्यवाही केली नाही. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 चे कलम 03 नुसार ठेकेदारासोबत केलेल्या करारासाठी मुद्रांक शुल्क वापरले नाहीत. कमी मुद्रांका शुल्काची रक्कम रु.287000 वसुलपात्र. करारातील अट क्र.13 नुसार ठेकेदाराच्या देयकातून सुरक्षा अनामतीची 5% रक्कम वसुल केली नाही. झोन क्र.5 पेल्हार ड रेम्बो कंस्ट्रक्शन यांना रक्कम रु.14000 जादा प्रदान केली आहे. स्थायी समिती ठराव क्र.713, दि.07/12/2012 अन्वये कॉम्पॅक्टर व टिपरच्या भाड्याच्या नोंदवहया उपलब्ध करुन दिल्या नाहीत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 332 नुसार हॉटेल, दुकाने व हॉस्पीटल यांच्या कचऱ्याची आकारणी करुन वसुली केली नाही. महापालिकेच्या आस्थापनेवरील 498 सफाई कामगारांच्या सेवा कोणत्या कामासाठी वापरल्या त्याचा खुलासा केला नाही. घनकचऱ्याच्या विल्हेवाटीबाबत क्षेपणभुमीवरील नोंदवही उपलब्ध करुन दिली नाही. कर्मचाऱ्यांचे हजेरीबाबत बायोमेट्रीक प्रिंट, प्रभागाच्या आरोग्य निरीक्षकाचा अहवाल उपलब्ध करुन दिला नाही. मे.रिलायबल एजन्सी यांना प्रदान करण्यासाठी आयुक्तांनी अधिनियमाचे कलम 73 ड नुसार स्थायी समितीची मंजुरी घेतली नाही. कामगार आयुक्तांच्या आदेशानुसार मजुरीच्या वाढीव दराचे प्रदान केलेली मुळ प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिली नाहीत. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत 2013-14 मध्ये झालेल्या खर्चापेक्षा 2014-15 मध्ये 50% जादा खर्च केला आहे.

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाण स्वच्छता- सफाई ठेका व भाड्याच्या वाहनाव्दारे यांत्रिक पध्दतीने नाले खोदाई करणे, औषधे फवारणी करणे.

प्राकलन : रु. 92.06 कोटी.

प्रशासकीय मंजुरी : महासभा ठराव क्र.10,दि.08/02/2013 अन्वये, 2014-15 ची निविदा मंजूर होईपर्यंत

मुदतवाढ

महासभा ठराव क्र.05 दि.11/02/2014 (2014-15).

तांत्रिक मंजुरी : --

निविदा तारीख : दि.03/02/2014 दै. वार्ताहार, प्रहार, जागल्या व मनपा वेब साईट.

एल-1 निविदा :

अ.क्र.	ठेकेदाराचे नाव	प्रभाग क्र.	मंजुर मासिक खर्च		
			रस्ते सफाई	गटार सफाई	औषध फवारणी
1	मे.उजाला लेबर	19,20,21,25 विरार पुर्व (ब)	43,67,22	10,91,80	6,06,55

	कॉन्ट्रक्टर		2	6	8
2	मे.उजाला लेबर कॉन्ट्रक्टर	प्रभाग क्र.29 चा पश्चिम भाग वगळुन व 26 अंशत: पेल्हार (अ)	16,22,376	4,05,594	2,25,330
3	स्वागत लेबर कॉन्ट्रक्टर	प्रभाग क्र.59 व 26 चा उर्वरित भाग पेल्हार (ब)	20,05,380	5,01,345	2,78,525
4	हेना इंटरप्रायझेस	प्रभाग क्र.1,2 पेल्हार (क)	11,08,800	2,77,200	1,54,000
5	मे.रेन्बो कंन्ट्रक्शन	प्रभाग क्र.3,27 पेल्हार (ड)	18,89,436	4,70,359	2,62,422
6	मे.श्री.अनंत एन्टरप्रायझेस	4,5,14,15,16,17 विरार पुर्व (अ)	32,95,204	8,23,801	4,57,667
7	मे.श्री.अनंत एन्टरप्रायझेस	11,12,13,18,22,23 विरार प. (अ)	27,57,364	6,89,341	3,82,967
8	मे.श्री.अनंत एन्टरप्रायझेस	6,10,24 विरार प. (ब)	12,79,133	3,19,783	1,77,657
9	मे.श्री.अनंत एन्टरप्रायझेस	7,8,9 विरार प. (क)	12,86,999	4,07,082	2,26,156
10	मे.दिनेश बी. संख्ये	39,40,44,45,46 नालासोपारा पू.(अ)	28,75,500	7,18,875	3,99,375
11	मे.साई गणेश एन्टरप्रायझेस	30,31,41,42,43,32 चा पुर्व भाग, 25 दक्षिण भाग, 29 चा पश्चिम भाग. नालासोपारा पू. (ब)	45,92,830	11,48,207	6,37,893
12	मे.हेना एन्टरप्रायझेस	47,48,49,50,57,58 नालासोपारा पू. (क)	29,44,553	7,36,138	4,08,965
13	मे.श्री.अनंत एन्टरप्रायझेस	32,33,34,36,37,38 नालासोपारा प. (अ)	35,91,626	8,97,907	4,98,837
14	मे.साई गणेश एन्टरप्रायझेस	35,51,52,53 नालासोपारा प. (ब)	22,36,386	5,59,096	3,10,609
15	मे.रिलायबल एजन्सी	56,60,64,62,63,78,28,61 नवघर माणिकपूर पू. (अ)	45,13,318	10,55,996	6,24,129
16	मे.रिलायबल एजन्सी	79,62 चा अशत: 63 चा अशत: नवघर माणिकपूर पू. (ब)	4,65,427	67,374	67,374

17	मे.रिलायबल एजन्सी	54,55,66,67,68,69,70,71, 73, 74,75,76,77,80 नवघर माणिकपूर प.	66,66,374	18,89,993	6,18,662
18	मे.शिवम एन्टरप्रायझेस	82,83 मुख्य रस्त्याच्या उत्तरेकडील भाग 85,86,87,88,89 वसई विभाग (अ)	32,64,258	4,12,000	1,54,666
19	आर.बी.इन्फ्रा.प्रोजेक्ट प्रा.लि.	प्रभाग क्र.80 चा उर्वरित भाग 81 व 83 मुख्य रस्त्याच्या दक्षिणेकडील भाग वसई (ब)	12,81,611	4,30,190	2,86,907
20	मे.दिनेश बी. संख्ये	प्रभाग क्र.72,84 वसई(क)	15,18,048	3,79,512	2,10,840

निविदा मंजुरी : स्थायी समिती ठराव क्र.203 दि.21/06/2014.

करार : करार केले आहेत.

कार्यादेश : दि.25/08/14, दि.01/09/2014 पासुन काम सुरु.

मुदत : मुदत दि.31/03/15.

काम पुर्ण : कामपुर्ण दि.31/03/2015.

एकूण खर्च : एकूण खर्च 82.61 कोटी.

लेखा परीक्षणाच्यावेळी काही निवडक प्रमाणके तपासली त्याचा उदाहरणा दाखल तपशिल पुढील प्रमाणे.

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	तपशिल
6374	31.03.15	44,50,130	मे.उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर विरार (पूर्व) (ब) रस्ते सफाई सुरक्षा अनामत कपात नाही.
6375	31.03.15	11,18,810	-//- गटारे सफाई
6376	31.03.15	6,20,771	मे.उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर विरार पू (ब) औषध फवारणी
6091	25.03.15	16,45,590	मे.उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर पेल्हार (अ) रस्ते SD नाही.
6090	-//-	4,14,595	मे.उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर पेल्हार गटारे
6089	-//-	2,31,963	मे.उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर पेल्हार औषध फवारणी
6372	31.03.15	20,32,858	मे.स्वागत लेबर कॉन्ट्रॅक्टर पेल्हार ब रस्ते सफाई
6373	-//-	5,11,768	मे.स्वागत लेबर कॉन्ट्रॅक्टर पेल्हार ब गटारे सफाई
6371	31.03.15	2,85,631	मे.स्वागत लेबर कॉन्ट्रॅक्टर पेल्हार ब औषध फवारणी

6088	25.03.15	11,23,013	मे.हेना एंटरप्रायझेस पेल्हार क रस्ते सफाई
6087	25.03.15	2,86,675	मे.हेना एंटरप्रायझेस पेल्हार क गटारे सफाई
6086	25.03.15	1,58,738	मे.हेना एंटरप्रायझेस पेल्हार क औषध फवारणी
6085	25.03.15	30,15,617	मे.हेना एंटरप्रायझेस नालासोपारा पू (क) रस्ते
6084	25.03.15	7,55,088	मे.हेना एंटरप्रायझेस नालासोपारा पू (क) गटार
6083	25.03.15	4,18,440	मे.हेना एंटरप्रायझेस नालासोपारा पू (क) औषध
6177	30.03.15	19,10,412	मे.रेन्बो कंस्ट्रक्शन पेल्हार (ड) जाने 15 रस्ते सफाई
6175	30.03.15	4,81,834	मे.रेन्बो कंस्ट्रक्शन पेल्हार (ड) गटार (2/15) मजूर ठेका रु.4,70359 असताना रु.472359 दाखविल्याने रु.2000 ने जादा प्रदान (कार्या 133, दि.25.08.14 व करारनामा)
6176	30.03.15	2,67,160	-//- औषधे
6188	30.03.15	36,65,059	मे.अनंत एंटरप्रायझेस नालासोपारा प (अ) रस्ते जाने-15
6185	30.03.15	9,17,314	मे.अनंत एंटरप्रायझेस नालासोपारा प (अ) गटारे जाने 15
6186	30.03.15	9,15,346	मे.अनंत एंटरप्रायझेस नालासोपारा प (अ) फेब्रु 15/गटारे
6187	30.03.15	5,13,050	-//- फरक
6190	30.03.15	36,57,952	मे.अनंत एंटरप्रायझेस नालासोपारा प (अ) रस्ते फेब्रु 15
6189	30.03.15	5,14,573	-//- औषध जाने 15
6196	30.03.15	33,61,530	मे.अनंत एंटरप्रायझेस विरार पू रस्ते
6191	30.03.15	8,42,751	-//- गटारे
6194	30.03.15	4,71,880	-//- औषध
6200	30.03.15	12,98,083	मे.अनंत एंटरप्रायझेस बोळींज रस्ते
6197	30.03.15	3,29,258	-//- गटारे
6193	30.03.15	28,23,690	मे.अनंत एंटरप्रायझेस विरार प (अ) रस्ते
6192	30.03.15	7,08,291	-//- गटारे
6201	30.03.15	3,97,180	-//- औषधे
6195	30.03.15	1,82,395	फेब्रु 15
6198	30.03.15	13,03,491	मे.अर्बन एंटरप्रायझेस विरार प (क) रस्ते
6199	30.03.15	4,16,557	-//- गटारे
6202	30.03.15	2,30,894	-//- औषधे

6077	25.03.15	46,87,582	मे.साई गणेश एंटरप्रायझेस नालासोपारा (पू) (ब)फेब्रु 15
6081	25.03.15	11,90,845	-//- गटारे
6078	25.03.15	6,59,212	-//- औषधे
6080	25.03.15	22,79,024	मे.साई गणेश एंटरप्रायझेस नालासोपारा (प) (ब) रस्ते
6082	25.03.15	5,75,678	-//- गटारे
6079	25.03.15	3,21,505	-//- औषधे
6092	25.03.15	33,10,213	मे.शिवम एंटरप्रायझेस वसई (अ) रस्ते
6093	25.03.15	4,19,106	-//- गटारे
6094	25.03.15	1,59,403	-//- औषधे
6180	30.03.15	13,12,405	मे.आर.बी.इन्फ्रा. फेब्रु 15 वसई (प) रस्ते
6182	30.03.15	4,38,244	-//- गटारे
6184	30.03.15	2,95,435	-//- औषधे
6097	25.03.15	68,16,556	मे.रिलायबल एजन्सी नवघर माणिकपूर (प) रस्ते
6095	-//-	19,25,525	-//- गटारे
6096	-//-	6,37,612	-//- औषधे
6099	-//-	4,74,902	मे.रिलायबल एजन्सी नवघर माणिकपूर (पू) (ब) रस्ते
6100	-//-	69,743	-//- औषध फवारणी
6098	-//-	69,743	-//- नाले
4213	20.12.14	15,18,048	मे.दिनेश वी. संखे वसई (क) रस्ते नोव्हेंबर 14
6103	25.03.15	45,93,857	मे.रिलायबल एजन्सी नवघर माणिकपूर (पू) (अ) रस्ते सफाई
6102	-//-	10,77,315	-//- गटारे
6101	-//-	6,43,553	औषध फवारणी

वसई विरार शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ सुमारे 312 चौ.कि.मी. आहे. लोकसंख्या 12 लक्ष आहे. या महानगरपालिकेची स्थापना 03,जुलै 2009 रोजी झाली. त्यात वसई, विरार, नवघर - माणिकपुर व नालासोपारा या चार नगरपरिषदा व 53 गावांचा समावेश आहे. शहर मुंबई लगत असल्याने झपाट्याने नागरीकरण व औद्योगिकरण झाले आहे. विकसित होणारे मोठे रस्ते, अंतर्गत रस्ते, डिपी रस्ते, उघड्यावरील बाजार इत्यादी दैनंदिन साफसफाई करावी लागते. महापालिका हद्दीत स्वच्छता करणे, धुर फवारणी करणे, औषधांची व जंतुनाशकांची फवारणी, गटार सफाई, कचऱ्याची

वाहतुक, गटारातील गाळ काढणे व कॉंक्रिट इ. ची वाहतुक करणेसाठी महापालिकेकडे स्वत:चा कर्मचारीवृंद पुरेसा नसल्याचे विभागाच्या टिपणीत नमुद आहे. दररोज सुमारे 450 ते 500 मॅट्रिक टन कचरा निर्माण होतो. लाड समितीच्या अहवालानुसार लोकसंख्येच्या प्रति हजारी 5 सफाई कामगार लागतात. परंतु त्यापेक्षा कमी सफाई कामगारांच्या सहाय्याने काम केल्याचे विभागाच्या टिपणीत नमुद आहे. या कामाकरीता प्रभाग क्रमांकाचे गट करुन महानगरपालिकेने वार्षिक ठेका देऊन काम करुन घेतल्याचे दिसुन येते. या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.112 दि.30/05/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने दि.10/06/2016 रोजी केलेला खुलासा विचारात घेता लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम 2000 अन्वये रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता व सफाई करीता ठेका व भाड्याच्या वाहनांव्दारे यांत्रिक पध्दतीने नाले सफाई करण्यासाठी महानगरपालिकेने जाहिर निविदा 2014-15 मध्ये मागविल्या. विभागाने यासाठी किती खर्च येईल, कामाचा आवाका काय, 5 प्रभाग व 89 नगरसेवक वॉर्ड असलेल्या शहरात प्रत्यक्षात किती कचरा होणार आहे/ उचलावा लागणार आहे, यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता किती, किती साहित्य/यंत्रसामुग्री, सुविधा, कचरा वाहतुक करणारी वाहने इत्यादी बाबतचा अंदाज न करता निविदा मागविल्या आहेत . महापालिकेच्या मुख्यालयात सार्वजनिक आरोग्य विभागाचे मुख्यालय आहे. स्वच्छता व सफाईचे एकच काम विभागुन दिले आहे. प्रत्येक प्रभागाच्या गटानुसार निविदाकाराने वेगवेगळे दर दिले आहेत. त्यातुन किफायतशीर दर असणारे 20 स्वतंत्र ठेकेदार निश्चित करण्यांत आले. ठेकेदारांचे कामावर विभागाने नियंत्रण ठेवले नाही. त्यामुळे , व्यवस्थापन कौशल्याचा अभाव असल्याचे दिसून येते.

2) उपरोक्त कामासाठी जाहिर निविदा मागवुन 2011-12 मध्ये ठेकेदार निश्चित केले होते. निविदेतील अटीशर्ती पाहता निविदा ही 1 वर्षासाठी होती. परंतु महानगरपालिकेने ऑगस्ट 14 पर्यंत महापालिका ठराव क्र.10 दि.08/02/2013 नुसार मुदतवाढ दिली आहे. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार कल्याण विभाग भांखस 1088/(2512)/उद्योग-6, दि.02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.8.3 (ह) पुनर्प्रत्ययी आदेश(रिपीट ऑडर) सुधारीत मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात अन्वये पुनर्प्रत्ययी आदेश देताना ते 06 महिन्याच्या अवधी करीताच द्यावयाचे आहेत. सदरचे आदेश तात्कालीक/आकस्मिक स्वरुपाचे असावेत, असे आदेश देताना बाजारातील किंमती मुळ आदेशापेक्षा कमी नसल्याची, त्या स्थिर असल्याची शहानिशा करणे आवश्यक आहे. तसेच पुनर्प्रत्ययी आदेशाचे प्रस्ताव खरेदी समितीने / निविदा मंजुरी समितीने मंजुर करणे आवश्यक आहे. असे असताना त्यानुसार उचित कार्यवाही न करता मुदतवाढ दिल्याचे दिसून येते. याबाबत महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधीनियम अध्यादेश, 2011 कलम 06 नुसार आवश्यक ते अभिलेखे विभागाची टिपणी, आयुक्तांचे अभिप्राय मागणी करूनही उपलब्ध् झाले नाहीत.

3) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 चे कलम 03 मधील तरतुदीनुसार कामाच्या ठेक्याचे

संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेड्युल 1 मधील क्र.63 नुसार दि.01/05/2006 पासुन संबंधिताकडुन पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.
कामाची रक्कम रु. 10 लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रु.100/-
त्यानंतर प्रत्येकी 1 लाखासाठी- मुद्रांक शुल्क रु.100/- (कमाल रु.5 लाख) मुदतवाढ दिल्यानंतर ऑगस्ट 2014 पर्यंत जुन्या ठेकेदाराने काम केले. त्यानंतर दि.01/09/2014 पासुन नव्याने ठेकेदार निश्चित करण्यात आले.

प्रभाग/ विभाग निहाय वॉर्ड सफाई करणेसाठी 20 गटातील ठेकेदारास दि.01/09/2014 पासुन कार्यादेश दिलेला आहे. या कामासाठी ठेकेदाराने महापालिकेसोबत करार ही केले आहेत. करारासाठी अनुज्ञेय असलेल्या मुद्रांक शुल्कापेक्षा रु.2,87,000/- कमी रकमेचे मुद्रांक वापरले आहेत. त्याचे परिशिष्ट क्र. _____ सोबत जोडले आहेत.

4) करारातील अट क्र.13 नुसार ठेकेदाराच्या देयकातुन 5% सुरक्षा अनामत वसुल करायची आहे. परंतु 2014-15 मध्ये ठेकेदारांना प्रदान करतांना त्याच्या देयकातुन सुरक्षा अनामतीची 5% रक्कम वसुल केली नाही. एकूण प्रदान रु.82,72,42,000/- च्या 5% होणारी रक्कम रु.4,13,62,100/- सुरक्षा अनामत म्हणुन वसुल केली नाही.

5) एकूण 20 झोन मध्ये जाहिर निविदा मागवुन- रस्ते सफाई, गटार सफाई आणि औषध फवारणीसाठी ठेकेदारांची निवड करण्यात आली. झोन क्र. 5 करीता(प्रभाग क्र.3,27 पेल्हार (ड)) मे.रेन्बो कंस्ट्रक्शन यांना गटार सफाईचे काम दरमहा रक्कम रु.4,70,359/- या दराने दिले आहे. तसेच मे.रेन्बो यांना दिलेला कार्यादेश क्र.133 दि.25/08/2014 व करारानुसार सदरचे कामासाठी रक्कम रु.4,70,359/- दरमहा देय आहे. परंतु लेखा परीक्षणाचे वेळी काही निवडक प्रमाणके तपासता त्याना दरमहा रक्कम रु.4,72,359/- या दराने प्रदान केले आहे.(प्रमाणक क्र.6173 दि.30/03/2015 रु.4,71,834 गटार सफाई व महागाई फरक फेब्रुवारी 2012 प्रदान). सबब सप्टेंबर 2014 ते मार्च 2015 पर्यंत 07 महिन्या करीता जादा प्रदान केलेली रक्कम रु.2000/- प्रमाणे एकूण रक्कम रु.14000/- जादा प्रदान केले आहे.

6) स्थायी समिती ठराव क्र.713 दि.07/12/2012 नुसार सॅटेलाईट सिटी योजनेच्या अंतर्गत महापालिकेने खरेदी केलेल्या कॉम्पॅक्टर व टिपरचे मासिक भाडे ठरविण्यात आले आहे. प्रति कॉम्पॅक्टर चे मासिक भाडे रु.65,000/- व मिनी हायड्रोलिक प्रति टिपर भाडे रु.15,000/- महापालिकेच्या प्रत्येक (5) प्रभागात किती कॉम्पॅक्टर व टिपर आहेत याची नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यापैकी किती यंत्रसामुग्री कोणत्या ठेकेदाराने वापरली, कोणत्या कालावधीसाठी वापरली, भाडयाची किती रक्कम थकीत आहे, याची माहिती विभागाकडे प्राप्त झाली नाही. संबंधीत अभिलेखे नोंदवहया उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत.

7) महापालिका हद्दीत असणारे कत्तलखाने, दुकान भाडे, हॉटेल, व्यवसायिक, हॉस्पिटल यांच्या कडुन

मोठ्या प्रमाणत कचरा निर्माण होतो. हा कचरा महापालिकेला उचलावा लागतो. परंतु अशा व्यवसायिकांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 332 नुसार महापालिकेने भाडे किंवा फी ची आकारणी केलेली नाही. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत होणाऱ्या खर्चाचा विचार करता स्थायी समितीच्या मंजुरीने अशा व्यवसायिकांकडुन फी किंवा भाड्याची वसुली करण्याचा विचार व्हावा. तथापि महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम 332 नुसार आकारणी करुन वसुली केली नाही.

8) महापालिकेच्या आस्थापनेवर असलेल्या सफाई कामगारांचा तपशिल आस्थापना विभागाने उपलब्ध करुन दिला नाही. 2014 -15 मध्ये सफाई कामगारांच्या वेतन/ भत्त्यावर रु.11,22,95,016/- खर्च केला आहे. महापालिकेच्या आस्थापनेवर 498 सफाई कामगार काम करत असताना प्रभागनिहाय वॉर्ड सफाईच्या कामी ठेकेदाराने मजुर, सहित्य, मशिनरी, इ. सर्व पुरविण्याच्या अटीवर ठेका मंजुर केला आहे. महापालिकेकडे कार्यरत असलेल्या 498 कर्मचाऱ्याच्या सेवा कोणत्या कामासाठी वापरल्या याचा खुलासा आस्थापना विभागाने केला नाही. या कामगारांच्या सेवा प्रभागनिहाय वॉर्ड साफसफाई करण्याचे कामी वापरल्या नाहीत. त्यामुळे खर्चात बचत झाली नाही.

9) ठेकेदाराने प्रभागातील कचरा डंपिंग ग्राऊडवर नेऊन टाकायचा आहे. या कामासाठी केलेल्या करारनाम्यातील अट क्र.08 नुसार - घनकचरा विल्हेवाट करणेसाठी नेमुन दिलेल्या क्षेपणभुमीवर वाहन रिकामे केल्याबाबत क्षेपणभुमीवरील कर्मचाऱ्याकडुन नोंदी घेणे आवश्यक आहे. त्यात प्रत्येक वेळी वाहन क्र., वाहन चालकाचे नाव, वेळ व क्षेपणभुमीसाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांची सही इ. बाबी अंतर्भुत असल्या पाहिजे. तसेच सदर नोंदीच्या छायाप्रती देयकासोबत सादर करणे बंधनकारक आहे. परंतु या कामाच्या खर्चाची काही निवडक प्रमाणके तपासता, त्यासोबत क्षेपणभुमीवरील कचरा वाहतुकीच्या नोंदीच्या नोंदवहीची छायाप्रत जोडलेली नाही. म्हणजेच ठेकेदाराने करारातील अटीचे पालन केले नाही. तरीही महापालिकेच्या आरोग्य विभागाने देयकाचे प्रदान करण्याची शिफारस केली. महापालिकेच्या लेखा/ लेखा परीक्षा विभागाने देयकाचे प्रदान केले आहे.

10) करारातील अट क्र.35 व 39 नुसार ठेकेदाराने कार्यालयीन काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचे बायोमॅट्रीक हजेरी बाबतची प्रींन्ट देयकासोबत सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सर्व कंत्राटी कामागारांचे राष्ट्रीयकृत बँकामध्ये खाते उघडुन मासिक पगार धनादेशाव्दारे जमा करावयाचा आहे. त्याशिवाय कंत्रादाराची देयके अदा केली जाणार नाहीत. परंतु तशी कार्यवाही विभागाने केली नाही. तसेच ठेकेदाराने नेमलेल्या कर्मचाऱ्याचा भविष्य निर्वाह निधी, इ.एस.आय.सी., Workmen compensation Insurance, इत्यादि बाबीचा भरणा संबंधीत खात्याकडे केल्याची चलने लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिली नाहीत. त्यामुळे अशा कपातीची निश्चित रक्कम नमुद करता येत नाही.

11) करारातील अट क्र.36 व 40 नुसार कंत्राटी कामगाराचे हजेरी पत्रकानुसार तपासणी केल्याचे व ठेकेदारने केलेले काम समाधानकारक असल्याने देयकाचे प्रदान करण्यासाठी शिफारस असल्याचे प्रमाणपत्र प्रभागाच्या आरोग्य निरिक्षकाने देयकासोबत जोडले आहे. परंतु विभागाने कंत्राटी कामगारांची हजेरीपत्रके उपलब्ध करुन दिली नाहीत.

12) प्रभाग समिती ई मधील विभाग (अ) (प्रभाग क्र.82,83 मुख्य रस्त्याच्या उत्तरेकडील भाग प्रभाग क्र. 85,86,87,88,89) दैंनंदिन साफ सफाई, गटार सफाई, औषधे फवारणी, इ. कामासाठी मे.चिराग यांना ठेका दिला असून त्याची या कामी निविदा रु.25,50,000/- प्रति महा स्थायि समिती ठराव क्र.479 दि.29/08/2012 अन्वये मंजूर केली होती. त्याना मनपाने कार्यादेश क्र.13 दि.31/08/2012 अन्वये दिला होता. तसेच सर्वसाधारण सभा ठराव क्र.10 दि.08/02/2013 नुसार पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत मुदतवाढ दिली होती. ठेकेदाराने त्याच्या ठेक्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिवाळी सणाचा बोनस न दिल्याने कर्मचाऱ्यांनी दि.13/11/2013 पासुन बेमुदत संप पुकारल्याने अत्यावश्यक सेवा बंद होऊ नये म्हणुन आयुक्तांचे परवानगीने मे.रिलायबल एजन्सी वसई यांना कार्यादेश क्र.703 दि.16/11/2013 नुसार 100 मजुर घेऊन दि.18/11/2013 पासुन शहर सफाईचे काम सुरु करण्याचे आदेश दिले. तसेच आदेश क्र.727 दि.20/11/2013 नुसार 25 मजुर घेऊन दि.20/11/2013 पासुन शहर सफाईचे काम सुरु करण्याचे आदेश दिले. म्हणजेच 125 मजुरांना प्रति महा, प्रति मजुर रु.8600/- वेतन देण्यास मंजूरी दिली आहे. दर महा रु.10,75,000/- खर्च करण्यात आला. 2014-15 मध्ये एकूण खर्च रक्कम रु.53,75,000/- करण्यात आला (एप्रिल 2014 ते ऑगस्ट 2014).

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 ड नुसार रु.5 लाख ते रु.25 लाखा पर्यंत आयुक्तांनी संविदा केल्याच्या तारखे पासुन पंधरा दिवसाचे आत स्थायी समितीला कळविले पाहीजे. अशा संविदेस स्थायी समितीची अवलोकनार्थ मंजुरी घेतली पाहीजे. परंतु या प्रकरणी तशी कार्यवाही केली नाही. तसेच खर्चाचा विचार करता अशा आवर्ती खर्चास व रु.25 लाखापेक्षा जादा होणाऱ्या खर्चासाठी स्थायी समितीची मंजुरी घेण्यात आली नाही. सबब सदरचा खर्च विधी विरुध्द केला आहे.

13) मा.कामगार आयुक्त मुंबई, यांचे कडील आदेशानुसार कामगारांच्या मजूरी दरात वाढ झाल्यानंतर, ठेकेदारास मजूरीच्या वाढीव दराचे प्रदान केले आहे. सदर कालावधीतील मुळ प्रदानाची प्रमाणके उपलब्ध् करुन दिली नाहीत. त्यामुळे फरकाची गणना बरोबर केल्याची लेखा परीक्षणाची खातरजमा करता आली नाही.

14) घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत स्वच्छता सफाई, नाले खोदाई, औषध फवारणी या कामावर 2013-14 मध्ये रु.54.26 कोटी खर्च केला. 2014-2015 वित्तीय वर्षात या कामावर रु.82.61 कोटी खर्च केला. म्हणजेच 2013-14 पेक्षा 2014-15 मध्ये कामावर रु.28.35 कोटी जादा खर्च करण्यात आला. मागील वर्षाच्या (2013-14) एकूण खर्चापेक्षा पुढील वर्षात(2014-15) मध्ये 50% जादा खर्च केला आहे. शहराचे क्षेत्रफळ वाढले नाही, लोकसंख्या वाढली नाही, केवळ नव्याने निविदा मागवुन 20 झोन मध्ये रस्ते, गटारे, व औषध फवारणी अशा एकूण 60 कामाच्या स्वतंत्र निविदा मागवुन दि.01/09/2014 पासुन काम करण्याचे कार्यादेश ठेकेदारांना दिले आहेत. त्यामुळे 2014-15 मध्ये या कामासाठी केलेला खर्च अवास्तव आहे.

वसुलपात्र रक्कम

मुद्रांक शुल्काची वसुलपात्र रक्कम 2,87,000 आक्षेपाधीन रककम रु.82,58,06,861

झोन क्र.5 मे.रेन्बो कंन्स्ट्रक्शन जादा प्रदान 14,000

एकूण रु.- 3,01,000

DATPMVM6001 (Ref No : 68, Hmm No : 112)

69 उदयानासाठी इलेक्ट्रीक फिटींग खेळणी व म्युझीक सिस्टीम खरेदीमधील अनियमीततेबाबत...

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : भांडार मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 8086000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 8084500.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1500.00/-

शासन निर्णय, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस-1088/(2512)/उदयोग-06, दि.2 जानेवारी,1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3(ह) पुनर्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑर्डर) सुधारीत मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात अन्वये कार्यवाही केली नाही. 2014-15 मध्ये खेळणी खरेदीकरीता निविदा मागवुन खरेदी केली, परंतु L-1 निविदाधारकाचे दर वाजवी असल्याची खात्री केली नाही. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 चे कलम 03 मधील तरतुदीनुसार मुद्रांक शुल्काची रक्कम रु.1500/- कमी वापरली आहे.

2013-14 व 2014-15 मध्ये उदयानासाठी इलेक्ट्रीक फिटींग खेळणी व म्युझीक सिस्टीम खरेदी बाबतच्या नस्तीची पडताळणी करण्यांत आली असता खालील बाबी दिसून आल्या आहेत.

कामाचे नांव	2013-14 व 2014-15 मध्ये उदयानासाठी इलेक्ट्रीक फिटींग खेळणी व म्युझीक सिस्टीम खरेदी

ठेकेदाराचे नांव	मे. गणेश फॅब्रीकेशन, मे . फन प्ले सिस्टीम, मे. अरिहंत इंड. कॉर्पोरेशन लि.
अंदाजपत्रकीय रक्कम खर्च 2013-14 2014-15	90.00 लक्ष रु.14.35 लक्ष रु.66.51 लक्ष
प्रशासकीय मंजुरी	सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 17, दिनांक 20/04/2013
निविदा मंजुरी	स्थायी समिती ठराव क्रमांक 200, दिनांक 21-06-2014
लेखाशिर्ष	उदयानासाठी इलेक्ट्रीक फिटींग खेळणी व म्युझीक सिस्टीम खरेदी. 551-2491
प्रमाणके	6242/31-3-2014 रु.56600/- मे. बाबा प्लेवर्ड. 6241/31-03-2014 रु.69200/- मे. हनी फन अॅन्ड थ्रीलींग कं.

वसई विरार महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 17, दिनांक 20-04-2013 अन्वये नविन व जुन्या बालोदयानात खेळणी, क्रिडा साहित्य पुरविण्यासाठी वार्षिक दराच्या निविदा मागवून खरेदीस प्रशासकीय मान्यता देण्यांत आली आहे . तदनुसार ई निविदा क्रमांक ववि‌शम /भां/847/13, दिनांक 28-08-2013 व दैनिक आपला वार्ताहर आणि दैनिक महाराष्ट्र जनमुद्रा या वृत्तपत्रात दिनांक 29-08-2013 रोजी जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यांत आल्या होत्या . त्याअनुषंगाने तीन निविदा प्राप्त होवून पात्र निविदाकारांशी दिनांक 23-12-2013 रोजी दराबाबत वाटाघाटी करण्यांत येवून दिनांक 15-07-2014 रोजी करारनामा करण्यांत आला आहे. स्थायी समिती सभा दि.21-06-14 अन्वये निविदेतील दरास मंजूरी देवून संविदा करण्यास मान्यता देण्यांत आली आहे . याबाबतच्या

नस्तीची पडताळणी करुन विभागास अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 92, दिनांक 07/05/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) वसई विरार शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दि. 20-4-13 ठराव क्रमांक 17 अन्वये महानगरपालिकेच्या नविन व जुन्या बालोदयानात क्रिडा साहित्य पुरवठा करण्यासाठी सन 2013-14 करीता 2012-13 चे निविदा दरानुसार खरेदी करण्यास व निविदा प्रक्रिया होईपर्यंत मागील वर्षाचे निविदा दराप्रमाणे खरेदी करण्यास मान्यता देण्यांत आली आहे. तदनुसार सन 2013-14 या वर्षाकरीता जुन्या निविदाकारांकडून बालोदयानाकरीता खेळणी खरेदी करण्यांत आली असुन त्याकरीता रु.14.35 लक्ष इतका खर्च झाला आहे. शासन निर्णय, उदयोग, ऊर्जा व कामगार कल्याण विभाग क्रमांक भांखस -1088/(2512)/उदयोग-06,दि.2जानेवारी,1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3(ह) पुनर्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑर्डर) सुधारीत मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात अन्वये - पुनर्प्रत्ययी आदेश देतांना ते सहा महिन्याच्या अवधी करताच दयावयाचे आहेत. सदरचे आदेश तात्कालिक /आकस्मिक स्वरुपाचे असावे . असे आदेश असतांना बाजारातील किंमती मूळ आदेशापेक्षा कमी नसल्याची, त्या स्थिर असल्याची शहानिशा करणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारची कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

2) सन 2014-15 मध्ये खेळण्यांची खरेदी करतांना निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करण्यांत आली आहे. तथापि खेळण्यांची निर्मिती करणा -या संस्थांकडून दर मागविण्यांत आलेले नाहीत . त्यामुळे प्राप्त झालेले दर योग्य व वाजवी असल्याची खातरजमा लेखापरीक्षणास करता आलेली नाही.

3) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम , 1958 चे कलम 03 मधील तरतुदीनुसार कामाच्या ठेक्याचे संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेड्युल 1 मधील क्र .63 नुसार दि .01/05/2006 पासुन संबंधिताकडुन पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.

कामाची रक्कम 10 लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रु.100/-
त्यानंतर प्रत्येकी 1 लाखासाठी- मुद्रांक शुल्क रु.100/- (कमाल रु.5 लाख)

सन 2014-15 करीता खेळण्यांचे खरेदीसाठी रु .66.51 लक्ष इतका खर्च झाला असुन त्याअनुषंगाने

मुद्रांक शुल्क रु .5800/- रकमेचे मुद्रांक उपयोगात आणणे आवश्यक असतांना रु .4300/- चे मुद्रांक वापरले आहेत . म्हणजेच रु .1500/- चे मुद्रांक कमी वापरण्यांत आले आहेत . सबब, रक्कम रु.1500/- वसुलपात्र आहे.

वसुलपात्र रक्कम रु.1500/-

आक्षेपाधीन रक्कम रु.8084500/-

DATBBPM6301 (Ref No : 82, Hmm No : 92)

70 2013-14 व 2014-15 मध्ये टीसीएल पावडर व क्लोरीन सिलेंडर खरेदीमधील अनियमीतता

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : भांडार मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 9975000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 9971600.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3400.00/-

शासन निर्णय, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस-1088/(2512)/उदयोग-06, दि.2 जानेवारी,1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3(ह) पुनर्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑर्डर) सुधारीत मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात अन्वये कार्यवाही केली नाही. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 चे कलम 03 मधील तरतुदीनुसार मुद्रांक शुल्काची रक्कम रु.1500/- कमी वापरली आहे. खरेदी करण्यांत आलेल्या साहित्याचा विनीयोग दाखविला नसल्याने आवश्यकतेप्रमाणे खरेदी केल्याची खात्री झाली नाही.

सन 2013-14 व 2014-15 मध्ये टीसीएल व क्लोरीन सिलेंडर खरेदी बाबतच्या नस्तीची पडताळणी करण्यांत आली असता खालील बाबी दिसून आल्या आहेत.

कामाचे नांव	2013-14 व 2014-15 मध्ये टीसीएल पावडर व क्लोरीन सिलेंडर खरेदी

ठेकेदाराचे नांव	मे. जी. एस. कमर्शिअल कॉर्पोरेशन, मे. रविराज केमिकल्स
प्रशासकीय मंजुरी	स्थायी समिती ठराव क्रमांक 352, दिनांक 1-6-2013
निविदा मंजुरी	स्थायी समिती ठराव क्रमांक 1231, दिनांक 26-12-2013
लेखाशिर्ष	टीसीएल पावडर व क्लोरीन सिलेंडर खरेदी 310-2512 पाणीपुरवठा क्लोरीनेशन 310-2511 उसगाव क्लोरीनेशन 310-2520-1

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागास द्रवरुप क्लोरीन 900 कि. ग्रॅमचा टर्नर व 100 कि. ग्रॅमचा टर्नर रीफीलींग करुन जलशुध्दीकरण केंद्रावर पुरवठा करणे व टी . सी. एल. पावडर इत्यादि साहित्य पुरवठा करण्यासाठी ई निविदा मागविण्यांत आल्या होत्या . सदर निविदा नस्तीची पडताळणी करण्यांत आली.

खरेदीचा तपशील	लेखाशिर्ष	2013-14 मधील खर्च रक्कम रु. लाखात
टीसीएल पावडर व अॅलम खरेदी	310-2512	14.34
पाणीपुरवठा क्लोरीनेशन	310-2511	1.22
उसगाव क्लोरीनेशन व्यवस्था	310-2520-1	84.19
	एकुण	**99.75**

याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 87, दिनांक 28/04/2016 अन्वये खुलासा

विचारण्यांत आला होता. तथापि विभागाने कोणताही खुलासा केला नाही. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

2) निविदा प्रसिध्द करतांना अंदाजित खर्च रु.74.50 लक्ष प्रस्तावित करण्यांत आला होता. या खर्चास स्थायी समिती ठराव क्रमांक 352, दिनांक 01/06/2013 अन्वये प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली होती. तथापि प्रत्यक्ष खर्च रु .99.75 लक्ष इतका केला आहे. या खर्चास मागील वर्षाची सुध्दा काही देयके समाविष्ठ आहेत . मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम , 1958 चे कलम 03 मधील तरतुदीनुसार कामाच्या ठेक्याचे संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेड्युल 1 मधील क्र .63 नुसार दि .01/05/2006 पासुन संबंधिताकडुन पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.

कामाची रक्कम 10 लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रु.100/-

त्यानंतर प्रत्येकी 1 लाखासाठी- मुद्रांक शुल्क रु.100/- (कमाल रु.5 लाख)

मुद्रांक शुल्क अधीनियमानुसार एकुण रु .9100/- चे मुद्रांक वापरणे आवश्यक होते . निविदाकारांसोबत करारनाम्यासाठी रु .5700/- चे मुद्रांक वापरण्यांत आले असल्याने रु .3400/- चे मुद्रांक कमी वापरण्यांत आले आहेत. सबब, रक्कम रु.3400/- वसुलपात्र आहे.

3) खरेदी करण्यांत आलेल्या साहित्याचा विनियोग दाखविलेला नाही. सबब, आवश्यकते इतके साहित्य खरेदी केल्याची लेखापरीक्षणाची खात्री झाली नाही.

4) स्थायी समिती ठराव क्रमांक 31, दिनांक 12-03-2012 अन्वये सदर कामासाठी सन 2011-12 चे ठेकेदारास मुदतवाढ दिली आहे. तदनंतर स्थायी समिती ठराव क्रमांक 352, दि.1-6-2013 अन्वये पुन्हा जुन्या ठेकेदारास नविन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत - साहित्य पुरवठयाकरीता मुदतवाढ दिली आहे. म्हणजेच दिनांक 1-4-2012 पासुन ते 31-12-2013 पर्यंत जुन्या ठेकेदारास मुदतवाढ दिली होती . मुदतवाढीचा सदर कालावधी 18 महिन्यांचा आहे. शासन निर्णय, उदयोग, ऊर्जा व कामगार कल्याण विभाग क्रमांक भांखस-1088/(2512)/उदयोग-06,दि.2जानेवारी,1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3(ह) पुनर्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑर्डर) सुधारीत मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात अन्वये - पुनर्प्रत्ययी आदेश देतांना ते सहा महिन्याच्या अवधी करताच दयावयाचे आहेत . सदरचे

आदेश तात्कालिक/आकस्मिक स्वरुपाचे असावे. असे आदेश असतांना बाजारातील किंमती मूळ आदेशापेक्षा कमी नसल्याची, त्या स्थिर असल्याची शहानिशा करणे आवश्यक आहे . तथापि अशा प्रकारची कार्यवाही केली नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु.9971600/-

वसुलपात्र रक्कम रु.3400/-

DATBBPM6301 (Ref No : 83, Hmm No : 87)

71 महानगरपालिकेचे रुगणालय व दवाखाने याकरीता श्वान दंशलस पुरवठा करणे याकामावरील झालेल्या खर्चाच्या अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष :भांडार मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब
आक्षेपाधीन रक्कम रु. 16552749.00/-

रुग्णालये व दवाखाने याकरीता खरेदी केलेले श्वानदंश लस खरेदीवर मान्यता दिलेल्या वित्तीय मर्यादेपेक्षा जादा प्रमाणात खर्च झालेला आहे. तसेच खरेदी केलेली औषधे बाजारभावातील प्रचलित दर याची खात्री करुन खरेदी केलेले नाहीत.

महानगरपालिकेच्या विविध प्रभाग समिती कार्यालया अंतर्गत नागरिकांच्या सोयी सुविधेकरीता चालणाऱ्या दैनंदिन कामकाजासाठी वैद्यकिय आरोग्य विभागाच्या मागणीनुसार वेळच्या वेळी रुग्णालयासाठी श्वानदंश प्रतिबंधक लस उपलब्ध् करुन देण्यासाठी भांडार विभागाने 2013-2014 व 2014-2015 या वित्तीय वर्षासाठी प्रत्येकी 75 लक्ष अंदाजित खर्चाची तरतुद केली असुन प्रस्तुत खरेदीसाठी ई.टेंडरिंगव्दारे निविदा मागवुन वार्षिक दरकरारानुसार खर्चास स्थायी समितीची प्रशासकिय व वित्तीय मंजुरी घेऊन खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

2013-2014 अंदाजित आपेक्षित खर्च रु.75 लक्ष

2013-2014 एकूण झालेला खर्च रु.79,75,249/-

2014-2015 अंदाजित आपेक्षित खर्च रु.75 लक्ष

2014-2015 एकूण झालेला खर्च रु.85,77,500/-

प्रस्तुत दोन्ही वर्षामधील श्वानदंश लस खरेदीवरील एकूण झालेल्या खर्चाच्या अनियमिततेबाबत लेखापरिक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) मा.स्थायी समितीने दोन्ही वर्षामधील रक्कम रु.75 लक्ष एवढया खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिलेली असून मान्य खर्चापेक्षा 2013-2014 मध्ये रक्कम रु.4,75,249/- तसेच 2014-2015 मध्ये रक्कम रु.10,77,500/- एवढा जादा खर्च केला आहे. सदरच्या जादा झालेल्या खर्चास स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी घेतलेली नाही.

2) प्रस्तुत श्वानदंश लस इंजेक्शन इंडीरॅब व इंजेक्शन एक्सपीरॅब याबाबतचे खरेदीचे शासन मान्य कंपनीचे (हापकीन बायोफार्मा /डीएमइआर) दरकरार उपलब्ध् असताना अशी खरेदी दरकरारानुसार न करता ई. टेंडरिंगव्दारे निविदा मागवून वार्षिक दरकरारानूसार केली आहे. शासन दरकरार उपलब्ध असले बाबत थेट कंपन्यासोबत कोणतेही लेखी पत्र व्यवहार केला असलेबाबत पुरावे खरेदीच्या नस्ती संदर्भात जोडलेले नाहीत. त्यामुळे दरकरार व ठेकेदाराबरोबर निश्चित केलेले वार्षिक दर यामधील तफावती बाबत खात्री करता आली नाही.

3) प्रस्तुत श्वानदंश लस इंजेक्शन खरेदीची नस्ती तपासणेत आली. सदरची खरेदी ई.टेंडरिंगव्दारे निवीदा मागवून प्राप्त झालेल्या निवीदांपैकी ज्याबाबीसाठी ज्यांचे दर कमी आहेत त्यांना त्याबाबीसाठी खरेदीचे आदेश देऊन खरेदीपोटी रक्कम अदा करणे आली आहे. परंतु अशी खरेदीकरणेपुर्वी अशाबाबींचे त्यावेळीचे बाजारभाव काय होते याची खात्री न करता प्राप्त दर स्विकारणेत येऊन कार्यादेश देण्यात देणेत आले आहेत. याबाबत लेखाशाखेनेही उचीत कार्यवाही केलेली असल्याचे निदर्शनास आले नाही. त्यामुळे खरेदी किफायतशीर झाल्याबाबत आवश्यक खात्री लेखा परिक्षणास करता आली नाही. तरी खरेदीवर एकूण झालेला खर्च रु.(79,75,249 + 85,77,500)= 1,65,52,749/- लेखा परिक्षणात आक्षेपाधिन ठेवणेत येत आहे.

लेखापरीक्षणात घेण्यांत आलेल्या आक्षेपाबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 89, दिनांक 28/04/2016 अन्वये विभागास अनुपालन सादर करणेविषयी कळविण्यांत आले होते. याबाबत खुलासा सादर करण्यांत आला असुन त्यावरती खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

मुददा क्रमांक 1:- आक्षेपामध्ये रुग्णालये व दवाखाने याकरीता श्वानदंश लस खरेदीमध्ये अंदाजे रकमेपेक्षा जादाझालेल्या खर्चास स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी घेवून अनुपालन सादर करणेविषयी कळविण्यांत आले होते. परंतु प्राप्त खुलाशामध्ये सदरचा खर्च प्रशासकीय मंजुरीच्या आत असल्याचे नमुद केले आहे. आक्षेपामध्ये जादा झालेल्या खर्चाचे आकडे हे प्रत्यक्ष लेखा शाखेकडे सन 2013-14 व 2014-15 मध्ये खर्च

पडलेल्या वर्गीकरणावरुन घेण्यांत आलेले असल्याने सादर केलेला खुलासा मान्यता करता येत नाही.

मुददा क्रमांक 2:- आक्षेपामध्ये प्रस्तुत श्वानदंश लस खरेदीबाबत (हाफकीन बायोफार्मा/डीएमईआर) शासनमान्य कंपनीचे दरकरार उपलब्ध असतांना अशा कंपन्यांसोबत दर करार करण्यांत आले नाहीत अथवा अशा कंपन्यांबरोबर पत्रव्यवहार करण्यांत आला होता अगर कसे याबाबत कागदपत्रांची मागणी लेखापरीक्षणात करण्यांत आली होती. तथापि याबाबतचा खुलासा अनुपालनात दिलेला नाही. तसेच खरेदी केलेली औषधे बाजारभावाप्रमाणे खरेदी केल्याचे अनुपालनात नमुद केले आहे. परंतु प्राप्त झालेल्या बाजारभावाची कागदपत्रे उपलब्ध केलेली नाहीत. त्यामुळे खुलासा मान्य करता येत नाही.

मुददा क्रमांक 3 :- आक्षेपात सदर औषधे बाजारभावाप्रमाणे खात्री न करता खरेदी करण्यांत आल्याचे नमुद करण्यांत आले आहे. प्राप्त खुलाशामध्ये सदर दर डी पी सी ओ प्राईज लिस्टमधील दराप्रमाणे व प्रत्यक्ष बाजारभावातील दर याची खातरजमा करुन खरेदी केल्याचे म्हटले आहे. परंतु प्रत्यक्ष बाजारभाव व डी पी सी ओ प्राईज लिस्ट यामधील दर याची खात्री करता आली नाही. सबब, सदरचा खुलासा मान्य करता येत नाही.

आक्षेपाधिन खर्च रु.1,65,52,749

DATNDMM5801 (Ref No : 128, Hmm No : 89)

72 आचोळे नागरी आरोग्य केंद्राकडील ओपीडीच्या जमा रकमांचा विलंबाने भरणा करण्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 03

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 7601.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 7601.00/-

आचोळे विभागाकडील ओपीडीच्या जमा रकमांचा भरणा, रक्कम मिळाल्याच्या लगतच्या कामकाजाच्या दिवशी न करता 3 ते 10 दिवस विलंबाने बँकेत भरणा करण्यात येत असल्याचे वर्ष 2013-14 व 2014-15 मधील भरणा चलनांची पडताळणी करतांना लेखा परिक्षणास आढळून आले आहे. तसेच माहे मार्च 2014 मधील जमा रकमांची पडताळणी करता पोटकिर्दनुसार जमा रक्कम व भरणा चलनात दर्शविलेली जमा यात तफावत असल्याचे आढळून आले आहे.

वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत आचोळे नागरी आरोग्य केंद्राकडील ओपीडीच्या वर्ष 2013-14 व 2014-15 मधील जमा रकमांची तपासणी करतांना आढळून आलेल्या अनियमिततांबाबत खुलासा करण्याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.103 दि.18/05/2016 अन्वये कळविण्यात आले असता विभागाने वैद्यकीय अधिकारी यांचे स्वाक्षरीने दि.30/05/2016 रोजी सादर केलेला खुलासा पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

3) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम क्र.92 नुसार नगरपरिषदेच्या कार्यालयांमध्ये स्विकारण्यात आलेली रक्कम ती मिळाल्याच्या लगतच्या कामकाजाच्या दिवशी संपूर्णपणे बँकेत भरणा करणे आवश्यक आहे. परंतू आचोळे विभागाकडील ओपीडीच्या जमा रकमांचा भरणा, रक्कम मिळाल्याच्या लगतच्या कामकाजाच्या दिवशी न करता 3 ते 10 दिवस विलंबाने बँकेत भरणा करण्यात येत असल्याचे वर्ष 2013-14 व 2014-15 मधील भरणा चलनांची पडताळणी करतांना लेखा परिक्षणास आढळून आले आहे. वर्ष 2013-14 व 2014-15 मधील काही निवडक चलनांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	जमा रकमेचा कालावधी			भरणा चलन क्र.	दिनांक	रक्कम
	पासून	पर्यन्त	भरणा कालावधी			
वर्ष 2013-14 मधील निवडक भरणा चलनांचा तपशील						
1	1/4/2013	5/4/2013	3	13801	5/4/2013	11295
2	6/4/2013	10/4/2013	3	13802	10/4/2013	11390
3	12/4/2013	17/4/2013	4	13803	17/4/2013	15020
4	18/4/2013	23/4/2013	4	13804	23/4/2013	11070
5	24/4/2013	30/4/2013	5	13805	30/4/2013	13930
6	2/5/2013	6/05/2013	3	13806	6/5/2013	10475
7	7/5/2013	13/5/2013	5	13807	13/5/2013	11645
8	14/5/2013	20/5/2013	5	13808	20/5/2013	9995
9	21/5/2013	27/5/2013	5	13809	29/5/213	11315
10	28/5/2013	14/6/2013	16	13810	14/6/2013	6660
11	15/6/2013	25/6/2013	9	13811	25/6/2013	11225
12	26/6/2013	3/7/2013	6	13812	8/7/2013	10220
13	7/9/2013	15/9/2013	7	13824	26/9/2013	10625
14	16/9/2013	21/9/2013	5	13825	26/9/2013	10315
15	22/9/2013	30/9/2013	7	13826	8/10/2013	11830
16	1/10/2013	5/10/2013	3	13827	8/10/2013	7550
17	6/10/2013	15/10/2013	8	13828	18/10/2013	14225
18	7/11/2013	13/11/2013	5	13832	27/11/2013	10930
19	25/11/2013	30/11/2013	4	13835	3/12/2013	10330

20	2/12/2013	7/12/2013	4	13836	9/12/2013	12645
21	9/12/2013	13/12/2013	3	13837	21/12/2013	11875
22	10/12/2013	18/12/2013	7	13838	21/12/2013	11195
23	20/12/2013	28/12/2013	7	13839	31/12/2013	16765
24	30/12/2013	3/1/2014	3	13840	6/1/2014	10920
25	4/1/2014	11/1/2014	6	13841	16/1/2014	14300
26	13/1/2014	18/1/2014	4	13842	21/1/2014	10525
27	20/1/2014	31/1/2014	10	13843	1/2/2014	17440
28	11/2/2014	21/2/2014	9	13846	25/2/2014	20940
29	22/2/2014	11/3/2014	16	13847	13/2/2014	11775
30	12/3/2014	25/3/2014	12	13849	28/3/2014	17900
31	26/3/2014	29/3/2014	2	13850	26/3/2014	11125
वर्ष 2013-14 मधील निवडक भरणा चलनांचा तपशील						
1	1/04/2014	3/04/2014	1	32001	5/4/2014	6160
2	4/04/2014	10/4/2014	5	32002	11/4/2014	9470
3	11/04/2014	15/04/2014	3	32003	16/4/2014	7315
4	16/04/2014	22/04/2014	5	32004	23/4/2014	8460
5	23/4/2014	30/04/2014	6	32005	3/5/2014	9500
6	2/5/2014	5/5//2014	3	32006	7/5/2014	6980
7	6/5/2014	8/5/2014	1	32007	12/5/2014	4460
8	9/5/2014	16/5/2014	6	32008	17/5/2014	9334
9	17/5/2014	24/5/2014	6	32009	26/5/2014	10450
10	29/5/2014	6/6/2014	7	32012	7/6/2014	9445
11	7/6/2014	9/6/2014	1	32013	11/6/2014	2645
12	11/6/2014	13/6/2014	1	32015	13/6/2014	4315
13	14/6/2014	17/6/2014	2	32016	17/6/2014	4250
14	18/6/2014	20/6/2014	1	32018	20/6/2014	3015
15	28/6/2014	30/6/2014	1	32025	30/6/2014	3560
17	21/10/2014	25/10/2014	3	31106	27/10/2014	2460
18	5/11/2014	8/11/2014	2	31114	10/11/2014	4145
19	20/2/2014	22/12/2014	1	31144	23/12/2014	3370
20	28/1/2015	31/1/2015	2	31167	2/2/2015	6032
21	5/2/2015	7/2/2015	1	31171	10/2/2015	4476
22	26/2/2015	28/2/2015	1	31179	2/3/2015	5232
23	7/3/2015	9/3/2015	1	31184	10/03/2015	5516
24	13/3/2015	15/3/2015	1	31188	16/6/2015	3638

25	23/3/2015	26/3/2015	2	31193	27/6/2015	1470
26	27/3/2015	31/3/2015	3	31195	31/3/2015	1115

नागरी आरोग्य केंद्राकडील दैनंदिन जमा रकमा विहीत कालावधीपेक्षा विलंबाने बँकेत भरणा करण्यात आल्यामुळे सदर रकमा मनपाच्या लेख्या बाहेर राहत असल्याचे दिसून येते. याबाबत विभागाने खुलासा करतांना पुरेसा स्टाफ व वाहन उपलब्ध नसल्याकारणाने चलन भरणा लगतच्या दिवशी न होता 10 ते 15 दिवसांचा एकत्रित भरणा केला जात होता असे नमूद केले आहे. सदर खुलासा आक्षेपाशी सुसंगत नसल्याने मान्य करता येत नाही.

4) वरील प्रमाणे दैनंदिन जमा रकमा रक्कम मिळाल्याच्या लगतच्या कामकाजाच्या दिवशी भरणा न करता विलंबाने भरणा करण्यात येत असतांना लेखा विभागाकडून नागरी आरोग्य केंद्रांकडील जमा रक्कमा भरणा करुन घेतांना वरीलप्रमाणे लेखा संहितेनुसार रकमा त्वरीत भरणा करण्याबाबत संबंधित विभागाच्या प्राधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्याचे आढळून आले नाही. यावरुन वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत नागरी आरोग्य केंद्रांकडे जमा होणाऱ्या रकमांबाबत अंतर्गत नियंत्रण व लेखापरिक्षणाचा अभाव असल्याचे दिसून येते.

5) आचोळे नागरी आरोग्य केंद्राकडे माहे मार्च-2014 मधील दैनंदिन जमा रकमांच्या पोटकिर्दनुसार जमा रक्कम व भरणा चलनान्वये जमा केलेल्या रकमांचा मेळ घेतला असता पोटकिर्दनुसार दर्शविलेली प्रत्यक्ष जमा व भरणा चलनांन्वये लेखा शाखेकडे जमा करण्यात आलेली रक्कम यात तफावत असल्याचे पडताळणीत आढळून आले आहे. विभागाकडून उपलब्ध करण्यात आलेल्या पोटकिर्दीनुसार दि.22/2/2014 ते दि.11/03/2014 या कालावधीतील आचोळे ओपीडीची जमा रक्कम रु.14,376/- एवढी असतांना चलन क्र.13847 दि.13/3/2014 अन्वये रु.11,775/- एवढया रकमेचा लेखाशाखेकडे भरणा करण्यात आला आहे. पोटकिर्दनुसार जमा रक्कम व प्रत्यक्ष भरणा यात रु.2601/- एवढी तफावत आहे. दि.12/3/2014 ते 25/3/2014 या कालावधीत पोटकिर्दमध्ये दर्शविलेल्या जमा रकमांची पडताळणी करता रु.22,900/- एवढी रक्कम जमा झाल्याचे दिसून येते. परंतू चलन क्र.13849 दि.28/03/2014 अन्वये रु.17,900/- एवढया रकमेचा लेखाशाखेकडे भरणा करण्यात आला आहे. जमा व प्रत्यक्ष भरणा रकमेत रु.5,000/- एवढी तफावत असल्याचे आढळून आले आहे. दि.26/03/2014 ते 29/03/2014 या कालावधीत पोटकिर्द नुसार रु.6125/- एवढी रक्कम जमा दर्शविण्यात आली आहे. परंतू भरणा चलन क्र.13850 दि.29/03/2014 अन्वये रु.11,125/- एवढया रकमेचा भरणा करण्यात आल्याचे दिसून येते. यावरुन दैनंदिन जमा रकमा कमी अधिक प्रमाणात भरणा करण्यात येत असल्याचे दिसून येते. तरी वरील प्रमाणे रु.2601/- अधिक रु.5000/- अशी एकूण रु.7601/- वसुलपात्र आहे. याबाबत अंतर्गत लेखा परिक्षकांकडून दैनंदिन जमा रकमांची तपासणी करुन दैनंदिन जमा रकमांचा संपूर्ण रकमेचा मनपा फंडात भरणा करण्यात आल्याबाबत तपासणी करणे आवश्यक आहे.

वसुलपात्र रक्कम रु.7601/-

73 वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवा उपक्रम पी. पी. पी. तत्वावर चालविण्यांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 08

लेखा शीर्ष : परिवहन विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 362000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 362000.00/-

महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे पत्र क्रमांक एमव्हीआर-0311/प्र.क्र.70/परि-2, दिनांक 05-07-2011 अन्वये वसई विरार शहर महानगरलिका परिवहन उपक्रमासाठी खाजगीकरणातुन परिवहन सेवा 5 वर्षाकरीता सुरु करण्यांस शासनाने मान्यता दिली. परंतु महानगरपालिकेने 10 वर्षासाठी करार केला. करारनाम्यातील अट क्रमांक 04 नुसार दोन वर्षात 400 बसेस सुरु करावयाच्या असतांना प्रत्यक्षात 119 बसेसची सुविधा उपलब्ध करुन देण्यांत आली. महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे पत्र क्रमांक एमव्हीआर-0311/प्र. क्र. 70/परि-2, दिनांक 05-07-2011 अन्वये परिवहन उपक्रमाने भरावयाचा प्रवासी कर व बालपोषण अधिभार बस कंत्राटदाराकडून वसुल केला नाही. करारनाम्यातील अट क्रमांक 39 नुसार इलेक्ट्रॉनिक/आधुनिक/इतर यंत्रणेची (GPS System) सुरुवात केली नाही. अहिल्याबाई होळकर योजनेनुसार शाळकरी विदयार्थीनींना मोफत बस सेवा उपलब्ध करुन देण्याबाबतचे अभिलेखे उपलब्ध करुन देण्यांत आले नाहीत. त्यामुळे सवलतीबाबतची रक्कम नमुद करता येत नाही. परिवहन सेवेसाठी पुरविलेल्या पाणी पुरवठयाच्या कनेक्शनबाबतचे अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याने पाणीपटटी कराची रक्कम नमुद करता येत नाही. बसेसचा प्रवाशांच्या विम्याचे अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत. प्रवासी तक्रार पुस्तक उपलब्ध झाले नाही.

महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे पत्र क्रमांक एमव्हीआर -0311/प्र.क्र.70/परि-2, दिनांक 05-07-2011 अन्वये वसई विरार शहर महानगरलिका परिवहन उपक्रमासाठी खाजगीकरणातुन परिवहन सेवा सुरु करण्यांस शासनाने मान्यता दिली आहे . तदनुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन सेवा पी . पी. पी. तत्वावर बसेस चालविणेसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यांत येवून प्राप्त निविदाधारकांपैकी मे. भागिरथी ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन प्रा .लि. यांची उच्चतम दराची रुपये 1,000/- प्रतिवर्ष प्रतिबस निविदा मंजूर करण्यांत आली आहे. पत्र क्रमांक वविशम/परिवहन/594/2012, दि.09-09-2012 अन्वये कार्यादेश देण्यांत आला आहे. स्थायी समिती ठराव क्रमांक 430, दि.03-08-2012 अन्वये संविदा करण्यांस मान्यता देण्यांत आली आहे . मे. भागिरथी ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन प्रा . लि. यांचेसोबत दिनांक 08-08-2012 रोजी 10 वर्ष कालावधीसाठी करारनामा करण्यांत येवून परिवहन सेवा उपक्रम दिनांक 03 -10-2012 पासुन सुरु करण्यांत आली आहे . याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 107, दिनांक 25/05/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) शासन पत्र क्रमांक एमव्हीआर -0311/प्र. क्र.70/परि-2, दिनांक 05-07-2011 अन्वये वाहनाच्या लिजची मुदत 5 वर्षे इतकी राहील या अटीच्या अधिन राहून परिवहन सेवा उपक्रम सुरु करण्यांस शासनाने मान्यता दिली आहे . असे असतांना परिवहन सेवा उपक्रमांतर्गत बसेस चालविण्याबाबतचा करारनामा 10 वर्षे कालावधीसाठी करण्यांत आला आहे.
2) बस ऑपरेटरसोबत केलेल्या करारनाम्यातील अट क्रमांक 04 नुसार बस ऑपरेटर यांना वसई विरार शहरांतर्गत परिवहन सेवा सुरु करण्यासाठी सुरवातीस 50 नविन बसेस पहिल्या टप्प्यात सुरु करणे आवश्यक आहे . कार्यादेश मिळालेपासुन 60 दिवसांचे आत परिवहन उपक्रमास सुरवात करायची होती . तदनंतर टप्प्याटप्प्याने (प्रत्येक टप्प्यात 100 बसेस) साधारण 400 बसेस आगामी तीन वर्षात सुरु करणे आवश्यक होते . सदर परिवहन सेवा उपक्रमांतर्गत 2012 -13 मध्ये 86 बसेसची सुविधा उपलब्ध होती . तसेच सन 2013-14 व 2014-15 मध्ये 119 बसेसची सुविधा उपलब्ध होती . करारनाम्यातील अटीनुसार 2013-14 व 2014-15 मध्ये अनुक्रमे 200 व 400 बसेसची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक होते . तथापि बस ऑपरेटर यांनी करारनाम्यातील अटीप्रमाणे परिवहन सेवा उपक्रमांतर्गत तीन वर्षात 400 बसेसची सुविधा उपलब्ध करुन दिली नाही . परिणामी 2013-14 मध्ये महानगरपालिकेस रॉयल्टी पोटी मिळणा-या रक्कम रु.81,000/- (200 बसेस - 119 बसेस =81 बसेस) उत्पन्नास मुकावे लागले आहे. तसेच 2014-15 मध्ये रॉयल्टीपोटी महानगरपालिकेस मिळणा-या रक्कम रुपये 2,81,000/- (400 बसेस - 119 बसेस=281 बसेस) उत्पन्नास मुकावे लागले आहे . त्याचप्रमाणे बसेसच्या संख्येत वाढ न झाल्याने प्रवासी कर व बालपोषण अधिभारापोटी मिळणा -या शासन महसुलाचे नुकसान झाले आहे आणि नागरीकांना पुरेशा प्रमाणात प्रवास व वाहतुकीसाठी बसेसची सुविधा उपलब्ध होवु शकली नाही . त्यामुळे महानगरपालिकेचा नागरीकांना ठेका पध्दतिवर प्रवासी वाहतुकीसाठी बसेस उपलब्ध करुन देण्यांमागील उददेश सफल झाला नाही.
3) महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे पत्र क्रमांक एमव्हीआर-0311/प्र. क्र. 70/परि-2, दिनांक 05-07-2011 अन्वये परिवहन उपक्रमाने भरावयाचा प्रवासी कर व बालपोषण अधिभार बस कंत्राटदाराकडून वसुल करुन महानगरपालिकेने संबंधीत कराधान प्राधिका -याकडे भरणे आवश्यक आहे . सन 2013-14 व 2014-15 मध्ये कंत्राटदाराकडून प्रवासी कर व बालपोषण अधिभार वसुल करुन शासनास भरणा केले संबंधीची कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे संबंधीत कराच्या रकमा नमुद करता येत नाहीत.
4) करारनाम्यातील अट क्रमांक 39 अन्वये नियंत्रण व नागरी सुविधा इ . साठी वसई विरार शहर महानगरपालिका /सक्षम प्राधिकारी यांनी सुचविलेली इलेक्ट्रॉनिक /आधुनिक/इतर यंत्रणेची (GPS System) योग्य ती उभारणी बस ऑपरेटर यांना करणे आवश्यक असुन त्याचा संपूर्ण खर्च बस ऑपरेटर यांनी करावयाचा आहे . या अटीनुसार इलेक्ट्रॉनिक/आधुनिक/इतर यंत्रणेची (GPS System) उभारल्याबाबतचा अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.
5) करारनाम्यातील अट क्रमांक 14 नुसार महानगरपालिका क्षेत्रातील शाळकरी विदयार्थीनींना

अहिल्याबाई होळकर योजनेंतर्गत मोफत बस सेवा बस ऑपरेटर यांनी उपलब्ध करुन दयावयाची असुन त्याकामी मासिक पासापोटी होणारी रक्कम महानगरपालिकेकडून बस ऑपरेटर यांना देण्यांत येईल असे ठरले आहे . तरी सदर अटीनुसार कंत्राटदारास प्रदान केलेल्या रकमांचा तपशील किंवा दिलेली सुट याचा सविस्तर तपशील तत्संबंधीच्या आवश्यक अभिलेख्यासह लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आले नाहीत . त्यामुळे याबाबतची रक्कम नमुद करता येत नाही.

6) करारनाम्यातील अट क्रमांक 20 नुसार बस ऑपरेटर यांना परिवहन उपक्रम चालविण्याकरीता महानगरपालिका हददीत लागणारा पाणीपुरवठा महानगरपालिकेमार्फत केला जाणार असुन पाणीपटटीची रक्कम बस ऑपरेटरने महानगरपालिकेस भरणा करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने बस ऑपरेटरकडून सन 2013-14 व 2014-15 या वर्षात पाणीपुरवठयासाठी किती कनेक्शन मंजुर केली याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याने पाणीपटटी कराची येणे रक्कम नमुद करता येत नाही.
7) अट क्रमांक 13 नुसार बसेसचा प्रवाशांसह (Comprehensive) विमा काढणे अथवा विम्याचे नुतनीकरण करणे हा खर्च संबंधीत बस ऑपरेटर यांना करणे आवश्यक आहे . परिवहन सेवा उपक्रमांतर्गत बसेसचा प्रवाशांसह अदयावत विमा काढल्याबाबतची आवश्यक ती कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.
8) बस वाहतुकीसंदर्भात प्राप्त होणा -या तक्रारी संदर्भातील तक्रार पुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

आक्षेपाधीन रक्कम

2013-14 मधील रॉयल्टीची रक्कम रु.81000/-

2014-15 मधील रॉयल्टीची रक्कम रु.281000/-

एकुण ... रु.362000/-

DATBBPM6301 (Ref No : 87, Hmm No : 107)

74 प्रभाग समिती ई वसई विभागातील गिरीज तलाव लिलाव प्रकरणातील अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 296190.00/-

तलाव लिलाव प्रकरणातील मागील थकबाकी रक्कम रु.62850/- तसेच 2013-2014 व 2014-2015 अशी तलाव लिलावास मुदतवाढ न देता एक वर्षाची मुदतवाढ दिल्यामुळे रक्कम रु.2,23,340/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे अशी मागील थकबाकी सह रक्कम रु.286190/- वसुल करणेत आलेली नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती ई मधील गिरीज येथील तलाव लिलावाची 2013-2014 व 2014-2015 या वर्षाच्या नस्तीचे लेखा परीक्षण करणेत आले. सदर तलाव लिलावाचा दिनांक 01/08/2010 ते 31/07/2013 या कालावधीचा ठेका श्री.मनिष प्रमोद पाटील यांना रक्कम रु.3,35000/- एवढ्या रक्कमेस वाटप करण्यात आलेला होता. सदर तलाव लिलावाची रक्कम सहा समान हप्त्यामध्ये वसूल करण्यात आलेली होती परंतु हप्त्याची रक्कम विहीत मुदतीत भरणा न केल्यामुळे मागील लेखा परीक्षण अहवालात दंडाची रक्कम रु.62850/- वसूल करुन भरणा करणेविषयी आक्षेप नोंदविण्यात आला होता. सदर रक्कम अद्यापही वसूल करण्यात आलेली नसून तद्नंतर 2013-2014 या वर्षामध्ये तलावाच्या कामाचे शुशोभिकरण प्रस्तावित असल्याने मुळ ठेकेदार यांना एक वर्षाची मुदतवाढ प्रभाग समितीच्या ठरावाने मंजूर करण्यात आली. ज्यावेळी अशी मुदत मंजूर करण्यात आली त्यावेळी तलावाचे सुशोभीकरण करण्याचे काम केवळ प्रस्तावित होते. सुशोभिकरण करण्याचे कार्यादेश देखील ठेकेदाराला देण्यात आलेले नव्हेत.तसेचदि.31/03/2016 अखेर पर्यन्त काम देखील सुरु करण्यात आले नसल्याने मुळ तलाव लिलाव 2013-14 व 2014-15 पर्यन्त मुदतवाढीचा ठराव मंजूर करुन घेणे आवश्यक होते. अशी कार्यवाही न झाल्याने प्रती वर्ष रक्कम रु.1,16,670/- प्रमाणे 2013-14 व 2014-15 या दोन वर्षाची रक्कम रु.2,33,340/- तसेच दंडाची रक्कम रु.62,850/- अशी एकूण रक्कम रु.2,96,190/- एवढी थकबाकीची रक्कम वसुल न झाल्याने आर्थिक नुकसान झालेले आहे.

लेखा परीक्षणात घेण्यात आलेल्या आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्र.127 दि.09/06/2016 अन्वये खुलासा करणेबाबत विचारणा करणेत आली होती. परंतु खुलासा प्राप्त न झाल्याने सदरचा आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

वसूलपात्र रक्कम रु.2,86,190/-

75 प्रभाग समिती ई कार्यालयाच्या मालकीच्या कोळीवाडा मासळी मार्केट ठेक्याच्या अनियमिततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 143656.00/-

कोळीवाडा मासळी मार्केट बाजार कर ठेक्याची माहे जुन ते सप्टेंबर 2013 ची रक्कम रु.1,43,656/- ठेकेदाराकडून नोटीस देऊन सुध्दा वसुली करणेत आली नाही. सहाय्यक आयुक्त यांनी आदेश देऊन सुध्दा ठेका रद्द झाल्यानंतर पुढील लिलावाची कार्यवाही करणेत आलेली नाही. तसेच बाजार कराची रक्कम खात्यामार्फत वसुल करण्यात आल्याने मनपाचा कर्मचाऱ्याच्या वेतन भत्यापोटी रु.1,50,000/- खर्च झालेला आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ई कार्यालयाच्या कोळीवाडा मासळी मार्केट बाजार वसुली 2013-2014 च्या नस्तीचे लेखा परीक्षण करणेत आले. या वर्षाचा वसुलीचा ठेका स्थायी समिती ठराव क्र.12 दि.27/02/2013 अन्वये श्रीमती सायली चौधरी यांना लिलाव पध्दतीने एक वर्ष कालावधीसाठी रक्कम रु.361,500/- किंमतीवर मंजूर झाला व त्यांना ठेका पध्दतीने वसूलीसाठी दि.01/04/2013 ते 31/03/2014 पर्यंत देण्यात आला. परंतु ठेकेदार यांनी प्रतिमहा लिलाव हप्ता रक्कम रु.32,864/- प्रमाणे माहे एप्रिल 2013 व मे 2013 ची रक्कम वेळेवर न भरता नोटीस दिल्यानंतर 24 जून 2013 रोजी भरणा केला व तद्नंतर माहे जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर चार महिन्याची हप्त्याची रक्कम रु.131456/- व दंडाची रक्कम रु.12200/- असे एकूण 1,43656/- सप्टेंबर अखेरपर्यंत नोटीस देऊन सुध्दा भरलेली नाही. त्यामुळे त्यांना 27/09/2013 रोजी नोटीस देऊन त्यांचा ठेका रद्द करण्यात आला. सदर ठेक्याची थकित रक्कम रु.1,43,656/- अद्यापपर्यंत वसूल झाल्याचे दिसून आले नाही. ठेकेदार यांचा ठेका रद्द केल्यानंतर ताबडतोब लिलावाची पुढील कार्यवाही करण्याचे आदेश सहाय्यक आयुक्त यांनी संबंधित लिपीक यांना दिलेले असतानाही अशी कार्यवाही न करता माहे ऑक्टोबर -2013 ते

मार्च 2014 पर्यंत लिपीक यांनी खात्यामार्फत दर्शनी मुख्य पावती पुस्तकांच्या आधारे रक्कम रु.1,45,540/- वसूल करुन भरणा केल्याचे दिसून आले. लिलावाची सहाय्यक आयुक्त यांच्या आदेशानुसार कार्यवाही केली असती तर मुळ ठेक्यापेक्षा जादा रक्कम मनपास प्राप्त होऊन आर्थिक फायदा झाला असता याशिवाय लिपीक यांनी स्वत: खात्यामार्फत रक्कम वसूल केल्यामुळे त्यांच्या सहा महिने कालावधीच्या वेतन व भत्यापोटी महानगरपालिकेस जादा रक्कमेचा भुर्दंड सोसावा लागला आहे. त्यामुळे सरासरी प्रतिमहा रु.30000/- प्रमाणे रु.150000/- एवढा वेतन व भत्यापोटी जादा खर्च झाला आहे. याबाबत खुलासा करुन तसे अनुपालन लेखा परीक्षणात दाखवावे तसेच माहे जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर 2013 ची लिलावाच्या मुळ हप्त्याची व दंडाची रक्कम रु.1,43656/- ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावी.

लेखा परीक्षणात घेण्यात आलेल्या आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्र.126 दि.09/06/2016 अन्वये खुलासा करणेबाबत विचारणा करणेत आली होती. परंतु खुलासा प्राप्त न झाल्याने सदरचा आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

वसूलपात्र रक्कम रु.1,43656/-

DATNDMM5801 (Ref No : 90, Hmm No : 126)

76 नवघर माणिकपुर प्रभाग कार्यालयांतर्गत परवाना विभागाकडील जमा रकमांच्या तपासणीतील अनियमितताबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 04

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 806500.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 806500.00/-

परवाना विभागाकडे वर्ष 2013-14 मध्ये थकबाकीचे प्रमाण हे 65% एवढे असून 2014-15 मध्ये थकबाकीचे प्रमाण हे 69% एवढे आहे. विभागाकडून परवाना मंजुरी व नुतनीकरणाच्या थकीत रकमांची वसुली करण्यात आली नसल्याने महापालिकेस कर स्वरुपात प्राप्त होणाऱ्या रकमा अनावश्यक गुंतून राहिल्या आहेत. मागणी

नोंदवहीत व्हाईट इंकचा वापर करुन खाडाखोड, उपरीलेखन करुन सुधारीत केलेल्या नोंदी साक्षांकित केलेल्या नाहीत.

नवघर माणिकपुर प्रभागाकडील परवाना विभागाचे वर्ष 2013-14 व 2014-15 या वर्षातील जमा रकमा, पावतीपुस्तके, भरणा चलने व मागणी नोंदवहीची तपासणी करता आढळून आलेल्या अनियमितांबाबत खुलासा करण्याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.132 दि.16/06/2016 अन्वये कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून खुलासा प्राप्त झाला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये नवघर माणिकपुर प्रभागाच्या परवाना विभागाकडील मागणी वसुली व थकबाकीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

वर्ष	मागणी			वसुली			थकबाकी			थकबाक टक्के
	मागील रु.	चालू रु.	एकूण रु.	मागील रु.	चालू रु.	एकूण रु.	मागील रु.	चालू रु.	एकूण रु.	
2013-14	942000	443100	1001700	53700	252200	305900	490900	192900	653800	65%
2014-15	687500	458600	1146100	88200	261900	350100	591300	199700	791000	69%

वरीलप्रमाणे परवाना विभागाकडे वर्ष 2013-14 मध्ये थकबाकीचे प्रमाण हे 65% एवढे असून 2014-15 मध्ये थकबाकीचे प्रमाण हे 69% एवढे आहे. विभागाकडून परवाना मंजुरी व नुतनीकरणाच्या थकीत रकमांची वसुली करण्यात आली नसल्याने महापालिकेस कर स्वरुपात प्राप्त होणाऱ्या रकमा अनावश्यक गुंतून राहिल्या आहेत. याबाबत विभागाकडून थकीत रकमांच्या वसुलीबाबत उचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

2) विभागाकडून उपलब्ध करण्यात आलेल्या 2013-14 व 2014-15 च्या मागणी नोंदवहीची तपासणी करता मागणी नोंदवहीतील बऱ्याच नोंदी (उदा.क्र.125 वासंती वाघरी थकबाकी रु.1000/- क्र.141 लालमणी मिश्रा थकबाकी रु.12,000/- क्र.174 योगेश भानुशाली थकबाकी रु.12,000/-, अ.क्र.177 रमेश यादव थकबाकी रु.12,000/- अ.क्र.184 शिवाजी मिश्रा थकबाकी रु.9,000/-) या पेन्सिलने नोंदविण्यात आलेल्या आहेत. मागणी नोंदवहीत व्हाईट इंकचा वापर करुन खाडाखोड, उपरीलेखन करुन सुधारीत केलेल्या नोंदी साक्षांकित केलेल्या नाहीत. त्यामुळे सदर नोंदींच्या वैधतेबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही. तरी मागणी नोंदवहीतील अनियमितता पहाता विभागाकडील जमा रकमांबाबत अंतर्गत नियंत्रणाचा अभाव असल्याचे दिसून येते.

3) वर्ष 2013-14 च्या थकबाकीच्या रक्कमेची नोंद 2014-15च्या मागणी नोंदवहीत घेण्यात आलेली नाही. सदर परवानाधारकांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

मागणी नोंदवहीतील अ.क्र.	परवानाधारकाचे नाव	2013-14ची थकबाकी
45	राजकुमार पांडये	रु.1000/-
57	हजारी दास	रु.1000/-
67	शीतल प्रसाद जयस्वाल	रु.1000/-
75	अशोककुमार मिश्रा	रु.9000/-
82	कृष्णा गायतोंडे	रु.1000/-

121-अपंग परवाने		
6	जयतू ह. अन्सारी	रु.1000/-
50	कैलाश म.घरत	रु.500/-
64	अनिल नरहरी घरत	रु.500/-
68	अमित वा.लोपिस	रु.500/-
	एकूण	रु.15500/-

त्यामुळे 2014-15 मध्ये थकबाकीची रक्कम वगळून चालू मागणीची रक्कम वसुल करण्यात आली आहे. त्यामुळे थकबाकी वसुल झाली नसल्याने महापालिकेच्या महसूलाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे 2013-14 ची वसुल न करण्यात आलेली थकबाकीची रक्कम रु.15,500/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

4) सावित्रीबाई फुले मार्केटच्या 2014-15 च्या मागणी नोंदवहीची तपासणी करता एकूण 59 परवानाधारकाच्या नोंदी घेण्यात आल्या असून सदर नोदी पेन्सिलने नोंदविण्यात आल्या आहेत. मागणी नोंदवहीतील नोंदी संबंधित विभागाप्रमुखाने साक्षाकित करुन प्रमाणित केलेल्या नाहीत. त्यामुळे सदर मागणी नोंदवहीच्या व नोदवहीतील नोंदीच्या वैधतेबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

वसुलपात्र रक्कम रु.15,500/-

अधिक रु.7,91,000/-

एकूण रु.8,06,500/-

FDSANMM7201 (Ref No : 121, Hmm No : 132)

77 ठेका पध्दतीने घेतलेल्या वाहनांच्या भाडयावरील खर्चातील अनियमीततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 890143.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 146300.00/-

वाहन विभागातील ठेका पध्दतीने घेतलेल्या वाहनांच्या लॉगबुकातील नोंदीखेरीज जादा प्रदान केलेली रक्कम रु.146300/- वसुलपात्र. ठेकेदाराने करारातील अटीनुसार नोंदणी प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र, चालक परवाना, मालकीबाबतचे कागदपत्र महानगरपालिकेस सादर केले नाहीत. मुदतवाढ देतांना शासन निर्णय, उदयोग, ऊर्जा व कामगार कल्याण विभाग क्रमांक भांखस-1088/(2512)/उदयोग-6, दिनांक 2 जानेवारी, 1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3 (ह) पुनर्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑर्डर) सुधारीत मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात नुसार कार्यवाही केली नाही. खर्चाच्या देयकासोबत वाहनाची लॉगबुके लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिली नाहीत

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व प्रभाग व विभागामध्ये कार्यरत असलेली 123 वाहने असुन सदर वाहने कार्यालयीन कामकाज, कचरा वाहतूक, आग विझवणे, पाणीपुरवठा पाईप लाईन दुरुस्ती, अनधिकृत बांधकामे निष्कासित करणे, इत्यादि कामासाठी उपयोगात आणली जातात. कार्यरत असलेली वाहने महानगरपालिकेच्या कामकाजाच्या दृष्टीने अपु -या प्रमाणात असल्याने व तातडीची कामे करुन घेण्यासाठी भाडेतत्वावर वाहने व यंत्रसामग्रीचे वार्षिक दर मंजुर करुन घेणेसाठी 2013-14 या वित्तीय वर्षासाठी सर्वसाधारण सभा दिनांक 08-02-2013, ठराव क्रमांक 8 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यांत आली आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 58, दिनांक 31/03/2016 अन्वये खुलासा विचारला होता. उपायुक्त, वाहन यांनी दिनांक 02/05/2016 नुसार खुलासा केला आहे. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) स्थानिक संस्था कर विभागासाठी ठेक्याचे वाहन क्रमांक MH-48/P-5116 हे वाहन स्थानिक संस्थ् कर विभागाच्या अधिकारी /कर्मचारी यांनी लॉगबुकातील नोंदीनुसार दिनांक 19-04-2013 ते 16-02-2014 या कालावधीत वापरण्यांत आले आहे . तथापि प्रमाणक क्रमांक 6039, दिनांक 29-03-2014 चे देयकाव्दारे मे. शिवशंभु ट्रेडर्स यांना दिनांक 01-02-2013 ते 16-02-2014 या कालावधीत सदरहू वाहन वापरल्याबाबत रक्कम रु.7,23,900/- अदा करण्यांत आले आहेत . प्रत्यक्षात लॉग बुकातील नोंदीनुसार सदर वाहन दिनांक 19-04-2013 ते 16-02-2014 या कालावधीत वापरण्यांत आले आहे . म्हणजेच स्थानिक संस्था कर विभागाने दिनांक 01-02-2013 ते 18-04-2013 या कालावधीत सदरहू वाहन उपयोगात आणलेले नसल्याने रक्कम रु .1,46,300/- अनुज्ञेय नसतांना मे . शिवशंभु ट्रेडर्स यांना अदा करण्यांत आली आहे . याबाबत विभागाने केलेल्या खुलाशानुसार संबंधीत ठेकेदाराने वाहन क्रमांक MH-48/A-1131 हे वाहन पुरवठा केले होते. पुरवठा केलेले वाहन दिनांक 18-04-2013 पर्यंत वापरले. त्यानंतर ते नादुरुस्त झाल्याने दिनांक 19-04-2013 पासुन वाहन क्रमांक MH-48/P-5116 हे वाहन स्थानिक संस्था कर विभागास उपलब्ध करुन देण्यांत आले . या दोन्ही वाहनांच्या नोंदी एकाच लॉगबुकात घेतल्याचे वाहन विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यात दिसून आले आहे . परंतु प्रत्येक वाहनानुसार स्वतंत्र लॉगबुकात नोंदी घेतलेल्या नाहीत . ठेकेदाराचे देयकात वाहन क्रमांक MH-48/P-5116 चे प्रदान म्हणून नोंद घेण्यांत आली आहे. ही नोंद अनावधानाने घेतल्याचे विभागाने खुलाशात नमुद केले आहे. ते संयुक्तिक नाही. सबब, या प्रकरणी दिनांक 01-02-2013 ते 18-04-2013 या कालावधीतील रक्कम रु.1,46,300/- संबंधीतांकडून वसुलपात्र आहे.

2) विभागाने ठेकेदारासोबत केलेल्या करारातील अटी व शर्तीनुसार वाहने पुरवठादाराने वाहन नोंदणी प्रमाणपत्र, आर .सी.टी.सी. बुक, विमा प्रमाणपत्र, वाहन चालकाचा वाहन परवाना,

वाहने व यंत्रसामग्री स्वतं :चे मालकीची असल्याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास मागणी करुनही उपलब्ध करुन दिली नाहीत. (H.M. No.58 दि.31-03-2016)

3) 2014-15 या वित्तीय वर्षासाठी महानगरपालिकेस भाडे तत्वावर वाहने व यंत्रसामग्री घेण्यासाठी सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 20, दिनांक 11-02-2014 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत आली आहे . तथापि निवडणूक काळातील आचार संहितेमुळे मा. आयुक्त यांनी दिनांक 03-03-2014 अन्वये पुढील निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालु निविदेस मुदतवाढ दिलेली आहे . शासन निर्णय, उदयोग, ऊर्जा व कामगार कल्याण विभाग क्रमांक भांखस -1088/(2512)/उदयोग-06, दिनांक 2 जानेवारी, 1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.3 (ह) पुनर्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑर्डर) सुधारीत मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात अन्वये - पुनर्प्रत्ययी आदेश देतांना ते सहा महिन्याच्या अवधी करताच दयावयाचे आहेत. सदरचे आदेश तात्कालिक /आकस्मिक स्वरुपाचे असावे . असे आदेश असतांना बाजारातील किंमती मूळ आदेशापेक्षा कमी नसल्याची, त्या स्थिर असल्याची शहानिशा करणे आवश्यक आहे . असे असतांना सदर ठेक्याचे कामाबाबत महानगरपालिकेने जुन्या ठेकेदारास दिनांक 01-04-2014 ते 31-03-2015 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. तसेच बाजारभाव किंमतीची शहानिशा केल्याची कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

4) वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये खाली निर्दिष्ट एकुण रु .890143/- खर्चाचे देयकांबाबतची लॉगबुके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

प्रमाणक क्रमांक व दिनांक	**रक्कम रुपये**	**ठेकेदाराचे नांव**	**वाहन क्रमांक**
6033/29-03-2014	94500/-	मे. ओमकार टुर्स	MH-48/P-1622
6032/29-03-2014	4500/-	मे. ओमकार टुर्स	MH-48/P-1622
6251/31-03-2015	328714/-	-----	युटीलिटी वाहन
5778/10-03-2015	59226/-	मे. आर. एस. एंटरप्रायजेस	MH-04/CZ-616 MH-04/BC-801
6121/26-03-2015	59969/-	मे. आदिनाथ टुर्स व ट्रॅव्हल्स	MH-04/BB-504
6122/26-03-2015	88258/-	मे. आदिनाथ टुर्स व	MH-48/N-1980

		ट्रॅव्हल्स	
6120/26-03-2015	254976/-	मे. आदिनाथ टुर्स व ट्रॅव्हल्स	MH-04/N-1790
एकुण ..	**890143/-**		

वसुलपात्र रक्कम रु.146300/-

आक्षेपाधीन रक्कम रु.890143/-

DATBBPM6301 (Ref No : 107, Hmm No : 58)

78 महानगरपालिका हद्दितील सर्व भाषित शाळेत (इंग्रजी माध्यम सोडून) शिकत असलेल्या मुलींना परिवहन सेवेचा मोफत पास योजनेमधील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 2642650.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1700.00/-

महानगरपालिका हद्दितील सर्व भाषित शाळेत (इंग्रजी माध्यम सोडून) शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांना परिवहन सेवेचा मोफत पास योजनेची रु.26,42,650/- एवढी रक्कम मे.भागिरथी ट्रान्स कॉर्पो.प्रा.लि. यांना अदा करण्यात आली आहे. परंतु सदर योजना राबविण्यासाठी अटी व शर्तींबाबत करारनामा केलेला दिसून येत नाही. करारनामा केलेला नसल्यामुळे मुद्रांक शुल्काची रक्कम रु.1700/- संबधितांकडून वसूल केली नाही.

महिला व बालकल्याण विभागाच्या वित्तीय वर्ष 2013-14 परिवहन सेवेचा मासिक पास योजनेच्या लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेख्यांचे व प्रमाणक क्र.3299 दि.19/10/2013 रक्कम रु.26,42,650/- ची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 142, दिनांक 24/06/2016 अन्वये खुलासा विचारण्यात आला होता. सदर

अर्धसमास ज्ञापनाच्या अनुषंगाने विभागाने कोणताही खुलासा केलेला नाही. नगर विकास विभाग, शासन निर्णय दिनांक 8/11/2010 नुसार महिला व बालकल्याण समितीच्या 5% तरतूदीमधुन आयुक्तांना योजना तयार करुन राबविण्याचा अधिकार असल्याने त्याअनुषंगाने महापालिका हद्दीतील शाळेपासून ज्या विद्यार्थीनींचे घर दोन कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर आहे त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनातर्फे राबविण्यात आलेल्या अहिल्याबाई होळकर योजनेच्या धर्तीवर मुलींकरीता परिवहन सेवेची मोफत पास योजना राबविण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत एकूण 2390 विद्यार्थ्यांना मोफत पास देण्यात आले असून मे.भागिरथी ट्रान्स कॉर्पो.प्रा.लि. यांना रु.26,42,650/- चे प्रदान करण्यात आले आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) महानगरपालिका हद्दितील सर्व भाषित शाळेत (इंग्रजी माध्यम सोडून) शिकत असलेल्या मुलींना परिवहन सेवेचा मोफत पास योजनेची रु.26,42,650/- एवढी रक्कम मे.भागिरथी ट्रान्स कॉर्पो.प्रा.लि. यांना अदा करण्यात आली आहे. परंतु सदर योजना राबविण्यासाठी अटी व शर्तीबाबत करारनामा केलेला दिसून येत नाही.

उपरोक्त रु.26,42,650/- एवढया रकमेच्या परिवहन सेवेचा मोफत पास योजनेसाठी करारनामा केलेला नसल्यामुळे शासनाचे रु.1700/- महसुलाचे नुकसान झाले आहे. मुंबई मद्रांक शुल्क अधिनियम 1958 मधील कलम 63 व 54 (ii) नुसार 10 लाखाच्या वरील करारनाम्यांकरीता प्रथम रु.10 लाखा करीता रु.100/- व त्यापुढील प्रत्येक लाख रुपयांपर्यंतच्या करारनाम्याकरीता रु.100/- एवढया रकमेच्या स्टँप पेवरवर करारनामा करणे आवश्यक होते. महिला व बालकल्याण विभागाने उपरोक्त अधिनियमातील तरतूदीचे उल्लंघंन केले असून करारनामा केला नसल्यामुळे मुद्रांक शुल्क रक्कम रु.1700/- इतका शासनाचा महसुल बुडाला आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 142 दिनांक 24/06/2016 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. परंतु विभागाकडून खुलासा करण्यात आलेला नाही. स्टँप पेवरवर करारनामा करुन मुद्रांक शुल्काची रक्कम रु.1700/- संबधितांकडून वसूल केली नाही.

2) परिवहन सेवेचा मोफत पास योजनेची रक्कम रु.26,42,650/- मे.भागिरथी ट्रान्स कॉर्पो.प्रा.लि. यांना अदा केली आहे. नियमानुसार मनपाने अदा करावयाची कोणतीही रक्कम धनादेशाने देणे आवश्यक आहे. अशाप्रकारे सदर रक्कम मे.भागिरथी ट्रान्स कॉर्पो.प्रा.लि.यांना प्रदान केल्याबाबतची पोच नस्तीमध्ये दिसून येत नाही. त्यामुळे प्रदान धनादेशाने केल्याबाबत लेखापरीक्षणाची खात्री होत नाही. सदर योजना ही फक्त मुलींसाठी राबवायची आहे. परंतु मोफत पास योजनेचा लाभ शाळेतील मुलांनाही दिल्याचे दिसून येत आहे. तसेच ही योजना इंग्रजी माध्यम सोडून इतर भाषिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राबवायची असून न्यु इंग्लिश स्कूल, वसई (प.), सोपारा इंग्लिश स्कूल, सोपारा(प.), एस वाय एम इंग्लिश स्कूल, विरार (प.), शाह एम के हायस्कूल, वसई (प.), सेंट जेम्स हायस्कूल, आगाशी अशा इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनाही परिवहन सेवेचा मोफत पास योजनेचा लाभ दिलेला आहे. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णय दिनांक 8/11/2010 मधील तरतुदीनुसार व महाराष्ट्र शासनातर्फे राबविण्यात आलेल्या अहिल्याबाई होळकर योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार, महापालिकेने मुलींसाठीची परिवहन सेवेची मोफत पास योजना राबविली नसल्याने मे.भागिरथी ट्रान्स कॉर्पो.प्रा.लि.यांना मोफत पास योजनेची प्रदान केलेली रक्कम रु.26,42,650/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

करारनामा केला नसल्यामुळे मुद्रांक शुल्काचे झालेले नुकसान रक्कम रु.1700/- वसूलपात्र व

मार्गदर्शक तत्वानुसार मोफत पास योजना राबविली नसल्याने रु.26,42,650/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.
आक्षेपाधिन रक्कम रु.26,42,650/-
वसूलपात्र रक्कम रु.1,700/-

DATAMSM6401 (Ref No : 110, Hmm No : 142)

79 रजा रोखीकरणात झालेल्या जादा प्रदानाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष :आस्थापना मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ब
गुंतलेली रक्कम रु. 4306.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 4306.00/-

श्री. कांती सना सोलंकी यांना सेवानिवृत्तीनंतर प्रदान अर्जित रजा रोखीकरणात रक्कम रु.१२२२ तर श्री गणपत काळू गुरव यांच्या मृत्यूपश्चात प्रदान अर्जित रजा रोखीकरणात रक्कम रु.३०८४ चे जादा प्रदान झाले आहे.

वसई विरार मनपाचे वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात कर्मचाऱ्यांची निवृत्तीवेतन प्रकरणे नस्ती व सेवापुस्तके तपासणीत आढळून आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र. १५१ दिनांक २४/०६/२०१६ अन्वये कळविले असता विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नाही. सबब लेखा परीक्षणात आढळलेल्या अनियमितता खालीलप्रमाणे आहेत.

१) श्री कांती सना सोलंकी , सफाई कामगार हे दिनांक ३१/०५/२०१३ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. दिनांक ०१/०१/२०१३ ते दिनांक ३१/०५/२०१३ या कालावधीची अर्जित रजा जमेस १३ दिवस दर्शविणे आवश्यक असता १५ दिवस जमेस धरून एकूण १४६ दिवसांचे अर्जित रजा रोखीकरण रक्कम प्रदान केली आहे त्यामुळे २ दिवसांचे जादा प्रदान संबंधितास झाले आहे. तरी खालीलप्रमाणे दोन दिवसांची रजा रोखीकरण रक्कम रु. १२२२/- संबंधिताकडून वसूलपात्र आहे.

दिलेले रजा रोखीकरण रक्कम = वेतन ८५९०+१६०० ग्रेड पे+महा.भत्ता ८१५२ **x** १४६ = ८९२६४
३०० दिवस

देय रजा रोखीकरण रक्कम = वेतन ८५९०+१६०० ग्रेड पे+महा.भत्ता ८१५२ **x** १४४ = ८८०४०
३०० दिवस वसुली रक्कम १२२२

२) श्री. गणपत काळू गुरव , लिपीक यांचा दिनांक १२/०५/२०१३ रोजी मृत्यू झाला आहे. दिनांक ०१/०१/२०१३ ते दिनांक ३१/०५/२०१३ या कालावधीची अर्जित रजा जमेस ११ दिवस दर्शविणे आवश्यक

असता १५ दिवस जमेस धरून एकूण १५७ दिवसांचे अर्जित रजा रोखीकरण रक्कम प्रदान केली आहे त्यामुळे ४ दिवसांचे जादा प्रदान त्यांचे कुटुंबास झाले आहे. तरी खालीलप्रमाणे ४ दिवसांची अर्जित रजा रोखीकरण रक्कम रु. ३०८४/- संबंधिताकडून वसूलपात्र आहे.

दिलेले रजा रोखीकरण रक्कम = वेतन १०४५०+२४०० ग्रेड पे+महा.भत्ता १०२८० **x** १५७= १२१०४७
३०० दिवस

देय रजा रोखीकरण रक्कम = वेतन १०४५०+२४०० ग्रेड पे+महा.भत्ता १०२८० **x** १५३= ११७९६३
३०० दिवस वसुली रक्कम ३०८४

DGPVTTM7001 (Ref No : 116, Hmm No : 151)

80 वसई विरार शहर मनपा प्रभाग समिती कार्यालयातील विविध कार्यालयीन कामे करणेसाठी अभिकर्त्यामार्फत विविध कंत्राटी सेवा पुरविणेच्या ठेक्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 09

लेखा शीर्ष :आस्थापना मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 23713195.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 23713195.00/-

निविदा मागविणेपूर्वी अंदाजित खर्च रक्कम दर्शवून निविदा प्रक्रिया केलेली नसून अंदाजित खर्च रक्कमेस स्थायी समितीची मंजुरी नाही. मे.युनिव्हर्सल इंटरप्रायजेस व मे.वरद इंटरप्रायजेस यांनी ईपीएफ, ईएसआयसी, सेवाकर शासनखाती विलंबाने भरणा केला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 5 मधील कलम 1(1)(अ)(ब) मधील कार्यपध्दतीनुसार करारनामाच्या सर्व पृष्ठांवर करारनामा करणेस प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याची व संबंधित ठेकेदार यांच्या स्वाक्षऱ्या नसून सर्व पृष्ठांवर मनपा मोहोर ठसवून सचिव यांनी स्वाक्षरी केलेली नाही त्यामुळे करारनामा विहित पद्धतीने केला नाही. ठेका कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबतची प्रमाणपत्रे/अहवाल प्रभागांचे सहाय्यक आयुक्त/विभागप्रमुख यांनी देणे आवश्यक असता लिपीक/वरिष्ठ लिपीक यांनी दिलेली आहेत. नालासोपारा प्रभागाची मे.वरद इंटरप्रायजेस यांची उपस्थिती P व A नमूद असलेली हजेरीपत्रके लेखा परीक्षणास प्राप्त झाली. सदर हजेरीपत्रकात संबंधित ठेका कर्मचाऱ्यांची उपस्थितीबाबत स्वाक्षरी घेतलेली नाही. मे.वरद इंटरप्रायजेस यांच्या ठेक्याच्या करारनाम्यासंदर्भात श्री. यशवंत गायकवाड यांचे तक्रारीत प्राप्त झालेला मूळ करारनामा व बदललेला करारनामा (झेरॉक्स प्रत) यामधील मूळ करारनामा महानगरपालिकेकडून लेखा परीक्षणास उपलब्ध झाला नसल्याने करारनामा बदलल्याबाबत खात्री लेखा परीक्षणात करता आली नाही. उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भां १०८८/(२५१२)/उद्योग-६ दिनांक २ जानेवारी ११९२ मधील परीच्छेद क्रमांक ८.३(ह) पुनर्प्रत्ययी आदेश देताना ते

६ महिन्यांच्या कालावधी करिताच देणेचे आहेत असे असताना वर्ष २०१२-१३ च्या ठेकेदारास वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये मुदतवाढ दिली असून मुदतवाढ मिळालेल्या कालावधीत नव्याने अतिरिक्त कंत्राटी ठेका कर्मचारी नियुक्त करता येत नसतानादेखील नवीन अतिरिक्त नेमणूकीचे कार्यादेश दिले असून त्यांस स्थायी समितीची मंजुरी घेतली नाही. नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक वविम-१९११/प्र.क्र..६४९/नवि/-२३ दिनांक ०९/०९/२०१४ नुसार एकूण १७७ पदनामांची मंजूर पदे १२४२ अधिक नवनिर्मित पदे १६१० अशी एकूण २८५२ पदांना मंजुरी दिली आहे. सदर मंजुरीमुळे महानगरपालिकेत कार्यरत असणारे नियमित कर्मचारी व ठेका कर्मचारी यांचा मेळ घेऊन अतिरिक्त ठरलेले एकूण २८५१ ठेका कर्मचारी यांच्या सेवा किमान पुढील महिन्यात कार्यवाही करून समाप्त करणे आवश्यक असता अशी कार्यवाही विलंबाने दिनांक ०६/०१/२०१६ चे आदेशान्वये केल्याने अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांना लेखा परीक्षण वर्ष २०१४-१५ मध्ये ६ महिने कालावधी जादा कामावर ठेवले गेले त्यामुळे महानगरपालिकेस अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर नियमबाह्य खर्च सोसावा लागला आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेचे वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात महानगरपालिकेने वर्ष २०१३-१४ या वर्षासाठी मनपा अभिकर्त्यामार्फत विविध कंत्राटी सेवा पुरविणेच्या ठेक्यासाठी वार्षिक निविदा मागविल्या होत्या त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

निविदा प्रसिद्धी :- दि. ६ जानेवारी २०१४ "मुंबई तरुण भारत" व "दै.जागल्या"

संकेत स्थळ :-vvcmc.maharashtra.etenders.in

निविदा स्विकृती :- दि. ०३/०२/२०१४ (मुदतवाढ)

निविदा उघडणे :- दि. ०६/०२/२०१४

आर्थिक व प्रशासकीय मंजुरी स्थायी समिती ठराव क्रमांक ९ दिनांक ०८/०२/२०१३

सदर निविदा प्रक्रियेत खालीलप्रमाणे प्रभागनिहाय एकूण निविदा प्राप्त झाल्या होत्या.

१) प्रभाग समिती अ एकूण १२ निविदा

२) प्रभाग समिती ब एकूण ०९ निविदा

३) प्रभाग समिती क एकूण ०७ निविदा

४) प्रभाग समिती ड एकूण ०८ निविदा

५) प्रभाग समिती ई एकूण ०४ निविदा

६) मुख्यालय(एकत्रित) एकूण ०७ निविदा

सदर निविदांतील प्राप्त कमी दरांचे वाटाघाटी संदर्भात उप आयुक्त (आस्थापना) यांनी त्यांचे पत्र क्र.वविशम/आस्था/१०१३/२०१३-१४ दिनांक २४/०२/२०१४ अन्वये आकाश इंटरप्रायजेस, जीवदानी फायर सर्व्हिस ओम साई इंटरप्रायजेस, द हिंद इलेक्ट्रिकल्स, युनिव्हर्सल इंटरप्रायजेस व क्लासिक इंटरप्रायजेस यांना कळविले असून त्यांनी वाटाघाटीत दर कमी केले आहेत. स्थायी समिती ठराव क्रमांक २०५ दिनांक २१/०६/२०१४ नुसार

दिनांक ०१/०८/२०१४ पासून संबंधित अभिकर्त्यांना खाली दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा पुरविणेचे कार्यादेश दिले आहेत.

सदर ठेक्याबाबत परिशिष्ट 6 मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण ६० प्रमाणके उपलब्ध झाली. त्या व्यतिरिक्त अन्य प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या सदर प्रमाणकातील खर्चाबाबत अर्धसमास पत्र क्र.१५२, दिनांक २७/०६/२०१६ अन्वये कळविले असता विभागाने त्यांचे पत्र क्र. ववि़शम/ आस्था /३३७ दिनांक २८/०६/२०१६ अन्वये केलेला खुलासा विचारात घेऊन खालील अभिप्राय लेखा परीक्षणात देण्यात येत आहेत.

१) निविदा मागविणेपूर्वी प्रभाग कार्यालयांकडून किती मनुष्यबळ लागणार आहे याची मागणी करून त्याप्रमाणे अंदाजित खर्च रक्कम दर्शवून निविदा प्रक्रिया केलेली नसल्याने अंदाजित खर्च रक्कमेस स्थायी समितीची मंजुरी नाही.

२) वरील ठेकेदारांपैकी मे.वरद इंटरप्रायजेस यांना सेवाकर प्रदान करण्यात आला असून ईपीएफ, ईएसआयसी, सेवाकर शासनखाती विलंबाने भरणा केला आहे.

३) ठेकेदारांबरोबर केलेले करारनामे सचिव कार्यालयात नोंदणी केलेले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 5 मधील कलम 1(1)(अ)(ब) मधील कार्यपध्दतीनुसार करारनामाच्या सर्व पृष्ठांवर करारनामा करणेस प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याची व संबंधित ठेकेदार यांच्या स्वाक्षऱ्या नसून सर्व पृष्ठांवर मनपा मोहोर ठसवून सचिव यांनी स्वाक्षरी केलेली नाही त्यामुळे करारनामा विहित कार्यपध्दती अवलंबून केला नाही.

४) करारनाम्यातील तरतुदीनुसार कामाच्या उपस्थितीबाबतची प्रमाणपत्रे/अहवाल प्रभागांचे सहाय्यक आयुक्त/विभागप्रमुख यांनी देणे आवश्यक असता लिपीक/वरिष्ठ लिपीक यांनी दिलेली आहेत. विभागाने केलेल्या खुलाशात वरिष्ठ लिपीक/लिपीक यांना विभाग प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले आहे हा खुलासा केला आहे तथापि प्रत्येक प्रभागात प्रभारी सहायक आयुक्त हे प्रभाग अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

५) नालासोपारा प्रभागाची मे.वरद इंटरप्रायजेस यांची उपस्थिती P व A नमूद असलेली हजेरीपत्रके लेखा परीक्षणास प्राप्त झाली. संबंधित ठेका कर्मचाऱ्यांची हजेरीपटावर स्वाक्षरी घेतलेली नाही.

६) मे.वरद इंटरप्रायजेस यांच्या ठेक्याच्या करारनाम्यासंदर्भात संचालक स्थानिक निधी लेखा परीक्षा यांचेकडून श्री यशवंत गायकवाड यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने आस्थापना विभागाकडे मूळ करारनामा व बदललेला करारनामा अर्धसमास पत्र क्रमांक १२९ दिनांक १०/०६/२०१६ व १४० दिनांक २४/०६/२०१६ अन्वये मागणी केली असता विभागाने त्यांचे पत्र क्र.ववि़शम/आस्था/३२१/२०१६ दिनांक २३/०६/२०१६ अन्वये महानगरपालिकेने कोणताही करारनामा बदललेला नाही. महानगरपालिकेच्या अभिलेख्यात असलेला करारनामा हाच मूळ करारनामा असून तो लेखा परीक्षणास सादर केला आहे असा खुलासा विभागाने केला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 5 मधील कलम 1(1)(अ)(ब) मधील कार्यपध्दतीनुसार करारनामाच्या सर्व पृष्ठांवर करारनामा करणेस प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याची व संबंधित ठेकेदार यांच्या स्वाक्षऱ्या नसून सर्व पृष्ठांवर मनपा मोहोर ठसवून सचिव यांनी स्वाक्षरी केलेली

नसल्याने तक्रारीत प्राप्त झालेला मूळ करारनामा व बदललेला करारनामा (झेरॉक्स प्रत) यामधील मूळ करारनाम्यातील बदलाबाबत खात्री लेखा परीक्षणात करता आली नाही.

७) श्री गायकवाड यांचे तक्रारीनुसार मूळ करारनाम्यातील बायोमेट्रिक हजेरीसंदर्भातील अट बदलून त्याऐवजी शासनाने कंत्राटी कामगारांच्या मासिक वेतनात व विशेष भत्त्यात वाढ केल्यास सदरची रक्कम कंत्राटदारास देय होईल अशी अट बदलेली आहे असे कळविले होते. सदर बायोमेट्रिक हजेरीसंदर्भातील अटीचा समावेश मूळ निविदेच्या अटी व शर्तीमध्ये आढळून आला नाही. लेखा परीक्षणास उपलब्ध झालेल्या वरद इंटरप्रायजेस यांच्या ब व क प्रभागाच्या करारनाम्यात अट क्रमांक ८ वर बायोमेट्रिक हजेरी अट नमूद नसून मासिक वेतन व विशेष भत्त्यात वाढ झाल्यास रक्कम कंत्राटदारास देय आहे अशी अट आहे. सदर अटीनुसार संबंधित ठेकेदार मे. वरद इंटरप्रायजेस यांना देयकांत कामगार आयुक्त मुंबई यांनी किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत कामगारांकरीता वेळोवेळी मंजूर केलेले विशेष महागाई भत्यानुसार महागाई भत्ता रक्कम रु.५५६/- अधिक सेवाकर रु.६९/- याप्रमाणे एकूण रु. ६२५/- फरक रक्कम देयकांत प्रदान केल्याचे आढळून आले आहे. विभागाने केलेल्या खुलाशात किमान वेतन कायदा 1948 व शासन अधिसुचना उद्योग, उर्जा व कामगार विभाग दि.28/09/2010 व त्यानंतर वेळोवेळी निघालेल्या अधिसुचनानुसार शासनाकडून अनुसुचीत रोजगारातील कामगारांना वेळोवेळी द्यावयाचे किमान वेतन निर्धारित केल्याप्रमाणे महापालिकेकडून कंत्राटी कामगारांना किमान वेतन प्रदान करण्यात येते. श्री गायकवाड यांच्या तक्रारीत अट क्रमांक ६ मध्ये साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टी महानगरपालिकेकडून अनुज्ञेय असेल तथापि आवश्यकतेनुसार विना तक्रार साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीचा अतिकालिक भत्ता महानगरपालिकेमार्फत देण्यात येईल असा वाढीव मजकुराचा समावेश केला आहे असे नमूद आहे. परंतु असा वाढीव मजकूर असलेला करारनामा विभागाने लेखा परीक्षणात उपलब्ध करून दिला नसून केलेल्या खुलाशात महानगरपालिकेच्या अभिलेख्यात असलेला करारनामा हाच मूळ करारनामा असून तो लेखा परीक्षणास सादर केला आहे असा खुलासा केला आहे. तथापि लेखा परीक्षणात प्राप्त मूळ करारनाम्यात अशी अट आढळून आली आहे. त्याअनुषंगाने लेखा परीक्षणात तपासणी करता ठेकेदारांच्या देयकात सुट्टीचे दिवसांसह कर्मचाऱ्यांचे उपस्थितीचे एकूण दिवस दर्शविले आहेत. सुट्टीच्या दिवशी कर्मचाऱ्यांनी काम केल्याचे हजेरीपत्रकावरून दिसून आले तथापि मंजूर दराच्या अधिकतम ५०% इतका अतिकालिक भत्ता देयकांत अदा करणेत आल्याचे आढळून आले नाही.

८) उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भां १०८८/(२५१२)/उद्योग-६ दिनांक २ जानेवारी ११९२ मधील परीच्छेद क्रमांक ८.३(ह) पुनर्प्रत्ययी आदेश देताना ते ६ महिन्यांच्या कालावधी करिताच देणेचे आहेत असे असताना वर्ष २०१२-१३ च्या ठेकेदारास वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये मुदतवाढ दिली आहे. तसेच सदर मुदतवाढ मिळालेल्या कालावधीत नव्याने अतिरिक्त कंत्राटी ठेका कर्मचारी नियुक्त करता येत नसतानादेखील वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये नवीन अतिरिक्त नेमणूकीचे कार्यादेश दिले असून त्यांस स्थायी समितीची मंजुरी घेतली नाही. विभागाने यासंदर्भात केलेल्या खुलाशात महासभा ठराव क्र. ९ दिनांक ०८/०२/२०१३ अन्वये मुदतवाढीस मान्यता घेतलेली आहे असे कळविले आहे. तथापि मुदतवाढीत नवीन कार्यादेश देता येत नसल्याने केलेला खुलासा मान्य करता येत नाही.

९) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक ववि‍म-१९११/प्र.क्र..६४९/नवि/-२३ दिनांक ०९/०९/२०१४ नुसार एकूण १७७ पदनामांची मंजूर पदे १२४२ अधिक नवनिर्मित पदे १६१० अशी एकूण २८५२ पदांना मंजुरी दिली आहे. सदर मंजुरीमुळे महानगरपालिकेत कार्यरत असणारे नियमित कर्मचारी व ठेका कर्मचारी यांचा मेळ घेऊन अतिरिक्त ठरलेले कर्मचारी यांच्या सेवा किमान पुढील महिन्यात कार्यवाही करून समाप्त करणे आवश्यक असता अशी कार्यवाही विलंबाने दिनांक ०६/०१/२०१६ चे आदेशान्वये केली आहे. त्यामुळे अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांना वर्ष २०१४-१५ मध्ये ६ महिने कालावधी जादा कामावर ठेवले गेले त्यामुळे महानगरपालिकेस अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर नियमबाह्य खर्च सोसावा लागला आहे. विभागाने यासंदर्भात केलेल्या खुलाशात ०४ नगरपरिषदा व ५५ महसुली गावांचा महानगरपालिकेत समावेश होवून महानगरपालिकेचे एकूण क्षेत्रफळ ३११ चौ.किलोमीटर असल्याने नागरिकांना सोयी, सुविधा देणेकामी आवश्यकता विचारात घेऊन बांधकाम, पाणीपुरवठा, सामान्य प्रशासन, दिवाबत्ती, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक वाचनालय, अग्निशमन, वाहन, महिला बालकल्याण इत्यादी कामे करण्यासाठी विहित पद्धतीने मनुष्यबळ पुरवठा करणेसाठी ठेकेदारांची नेमणूक केली होती. शासनाने महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे सुधारित आकृतीबंधात २८५२ पदे मंजूर केल्याने महानगरपालिका आयुक्त यांनी ३० ऑक्टोबर २०१५ रोजी समिती गठीत केल्यानंतर समितीचा अहवाल १८ नोंव्हेबर २०१५ रोजी प्राप्त झाला त्यात लिपीक, संगणक चालक, शिपाई, व मजूर या संवर्गातील एकूण २८५१ कर्मचारी अतिरिक्त ठरले सदरचे अतिरिक्त कर्मचारी माहे १ फेब्रुवारी २०१६ पासून कपात केले आहेत. प्रत्यक्षात शासनाने मंजूर केलेल्या २८५२ पदांचा विचार करता त्यातील बरीचशी पदे निरनिराळ्या संवर्गातील आहेत अशा संवर्ग निहाय पदांच्या वेतन व भत्त्यांचा विचार करता मंजूर पदावरील वेतन व भत्त्यावरील खर्चाच्या मर्यादेत महानगरपालिकेने खर्च केला असून जादा ठरलेल्या ठेका कर्मचाऱ्यांच्या वेतनावर झालेला खर्च हा एकूण मंजूर पदांच्या खर्चाच्या आत आहे, विभागाने केलेला सदरचा खुलासा संयुक्तिक नसून अतिरिक्त ठरलेल्या ठेका कर्मचाऱ्यांचे वेतनावरील केलेला खर्च हा नियमबाह्य असून आक्षेपाधीन आहे.

उपरोक्त नमूद व लेखा परीक्षणास प्राप्त केलेल्या प्रमाणकान्वये झालेला एकूण खर्च रक्कम रु.२३७१३१९५ लेखा परीक्षणात आक्षेपाधीन करणेत येत आहे.

DGPVTTM7001 (Ref No : 117, Hmm No : 152)

81 वसई विरार मनपाच्या विविध प्रभागांतर्गत गाळाभाडे / जागा भुईभाडे कराच्या थकीत रकमांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 03

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 11828263.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 11828263.00/-

कार्यालयांकडील गाळाभाडे/भूईभाडे वसुलीच्या रकमांच्या वर्ष 2013-14 मधील थकबाकीचे प्रमाण हे 87% एवढे असून 2014-15 मध्ये गाळाभाडे/भूईभाडे वसुलीच्या थकबाकीचे प्रमाण हे 86% एवढे आहे. तरी संबंधित प्रभाग कार्यालयांकडून गाळाभाडे/भूईभाडे वसुलीची कार्यवाही करण्यात आली नसल्याने गाळे भाडे/जागा भूईभाडयापोटी मनपा प्राप्त होणाऱ्या महसुलीची रक्कम रु.1,18,28,263/- गुंतून राहिली आहे.

वसई विरार महानगरपालिकेच्या विविध प्रभागांकडील गाळाभाडे/जागा भुईभाडे कराच्या वसुलीबाबत वर्ष 2013-14 व 2014-15 या वर्षातील मागणी नोंदवहीची तपासणी करता आढळून आलेल्या अनियमितांबाबत अर्धसमासपत्र क्र.146 दि.24/06/2016 अन्वये विभागास कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून काहीही खुलासा प्राप्त झाला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मनपाच्या विविध प्रभाग कार्यालयांकडील वर्ष 2013-14 व 2014-15 मधील गाळाभाडे/जागा भुईभाडे कराच्या मागणी, वसुली व थकबाकीचा तपशील सोबत परिशिष्ट क्र.-------- मध्ये दर्शविण्यात आला आहे.

परिशिष्टात दर्शविण्यात आल्याप्रमाणे प्रभाग कार्यालयांकडील गाळाभाडे / भूईभाडे वसुलीच्या रकमांच्या वर्ष 2013-14 मधील थकबाकीचे प्रमाण हे 87 % एवढे असून 2014-15 मध्ये गाळाभाडे / भूईभाडे वसुलीच्या थकबाकीचे प्रमाण हे 86 % एवढे आहे. तरी संबंधित प्रभाग कार्यालयांकडून गाळाभाडे / भूईभाडे वसुलीची कार्यवाही करण्यात आली नसल्याने गाळेभाडे/जागा भूईभाडयापोटी मनपा प्राप्त होणाऱ्या महसुलीची रक्कम गुंतून राहिली आहे. तरी वर्ष 2014-15 अखेर गाळाभाडे / भूईभाडयाची थकीत रक्कम रु.1,18,28,263/- वसुलपात्र आहे.

2) प्रभाग कार्यालयांकडून लेखा परिक्षणास पडताळणीस उपलब्ध करण्यात आलेल्या 2013-14 व 2014-15 च्या मागणी नोंदवहयांची तपासणी करता मागणी नोंदवही संबधित कर्मचारी तसेच विभाग प्रमुखांनी स्वाक्षरी करुन प्रमाणित केलेल्या नाहीत. त्यामुळे मागणी नोंदवहीतील नोंदीच्या वैधतेबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

3) महाराष्ट्र शासन राजपत्र भाग 1 मध्ये उपविभाग नगरविकास विभाग दि.3/07/2009 अन्वये वसई विरार शहर महानगरपालिका स्थापन झाली असून त्यात 4 नगरपरिषदा व 53 गावे समाविष्ट केली आहेत. परंतू तत्कालिन नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग कार्यालयाकडील गाळाभाडे/भूईभाडे कराची वसुली तत्कालिन नगरपरिषदांनी मंजूर केलेल्या दराने करण्यात येत आहे. प्रत्येक प्रभागाकडील वसुलीचे दर हे वेगवेगळे आहेत. महाराष्ट्र मनपा अधिनियमातील परिशिष्ट ड प्रकरण 8 कराधान कलम 7-अ नुसार महापालिकेच्या करांच्या दरात प्रत्येक पाच वर्षात सुधारीत करण्याची तरतूद आहे. त्यानुसार गाळाभाडे / जागाभूई भाडयाच्या दरात सुधारीत करण्यात आली नसल्यामुळे महापालिकेचे मोठयाप्रमाणे आर्थिक नुकसान होत आहे. तरी याबाबत विभागाकडून धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

वसुलपात्र रक्कम रु.1,18,28,263/-

FDSANMM7201 (Ref No : 125, Hmm No : 146)

82 वसई विरार मनपाच्या विविध प्रभागांतर्गत जाहिरात कराच्या थकीत रकमांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 9ब

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 3012287.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 3012287.00/-

वसई विरार मनपाच्या प्रभाग कार्यालयांकडील जाहिरात कराच्या वसुलीचे वर्ष 2013-14 मधील थकबाकीचे प्रमाण हे 65% एवढे असून 2014-15 मध्ये जाहिरात कराच्या वसुलीच्या थकबाकीचे प्रमाण हे 49% एवढे आहे. तरी संबंधित प्रभाग कार्यालयांकडून जाहिरात कराच्या थकीत रकमां वसुल होणे आवश्यक आहे. जाहिरात कराच्या थकीत वसुलीबाबत विभागाकडून थकीत रकमा वसुल करण्याची कार्यवाही करण्यात आली नसल्याने जाहिरात करापोटी महापालिकेस प्राप्त होणारी रु.30,12,287/- एवढी रक्कम गूंतून राहिली आहे.

वसई विरार महानगरपालिकेच्या विविध प्रभागांकडील जाहिरात कराच्या वसुलीबाबत वर्ष 2013-14 व 2014-15 या वर्षातील मागणी नोंदवहीची तपासणी करता आढळून आलेल्या अनियमितांबाबत अर्धसमास पत्र क्र.148 दि.24/06/2016 च्या पत्रान्वये खुलासा करण्याबाबत विभागास कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून काहीही खुलासा करण्यात आला नाही.

1) मनपाच्या विविध प्रभाग कार्यालयांकडील वर्ष 2013-14 व 2014-15 मधील जाहिरात कराच्या मागणी, वसुली व थकबाकीचा तपशील परिशिष्ट क्र.---------- मध्ये दर्शविण्यात आला आहे.

परिशिष्टात दर्शविण्यात आल्याप्रमाणे प्रभाग कार्यालयांकडील जाहिरात कराच्या वसुलीच्या रकमांच्या वर्ष 2013-14 मधील थकबाकीचे प्रमाण हे 65% एवढे असून 2014-15 मध्ये जाहिरात कराच्या वसुलीच्या थकबाकीचे प्रमाण हे 49% एवढे आहे. तरी संबंधित प्रभाग कार्यालयांकडून जाहिरात कराच्या थकीत रकमां वसुल होणे आवश्यक आहे. तरी जाहिरात कराच्या थकीत रक्कम वसुल करण्याची कार्यवाही करण्यात आली नसल्याने जाहिरात करापोटी महापालिकेस प्राप्त होणारी रक्कम रु.30,12,287/- गूंतून राहिली आहे. तरी वर्ष 2014-15 अखेर जाहिरात कराची थकीत रक्कम रु.30,12,287/- आहे.

2) प्रभाग कार्यालयांकडून लेखा परिक्षणास पडताळणीस उपलब्ध करण्यात आलेल्या 2013-14 व 2014-15 च्या मागणी नोंदवहयांची तपासणी करता मागणी नोंदवही संबधित कर्मचारी तसेच विभाग प्रमुखांनी स्वाक्षरी करुन प्रमाणित केलेल्या नाहीत. त्यामुळे मागणी नोंदवहीतील नोंदीच्या वैधतेबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन राजपत्र भाग 1 मध्ये उपविभाग नगरविकास विभाग दि.3/07/2009 अन्वये वसई विरार शहर महानगरपालिका स्थापन झाली असून त्यात 4 नगरपरिषदा व 53 गावे समाविष्ट केली आहेत. परंतू तत्कालिन नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग कार्यालयाकडील जाहिरात कराची वसुली तात्कालिन नगरपरिषदांनी

मंजूर केलेल्या दराने करण्यात येत आहे. प्रत्येक प्रभागाकडील वसुलीचे दर हे वेगवेगळे आहेत. महाराष्ट्र मनपा अधिनियमातील परिशिष्ट ड प्रकरण 8 कराधान कलम 7-अ नुसार महापालिकेच्या करांच्या दरात प्रत्येक पाच वर्षात सुधारीत करण्याची तरतूद आहे. त्यानुसार जाहिरात कराच्या दरात सुधारणा करण्यात आली नसल्यामुळे महापालिकेचे मोठयाप्रमाणे आर्थिक नुकसान होत आहे.

वसुलपात्र रक्कम रु.30,12,287/-

FDSANMM7201 (Ref No : 126, Hmm No : 148)

83 नालासोपारा प्रभाग "क" येथील कला - क्रीडा महोत्सवातील झालेल्या खर्चाच्याअनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष : कला क्रिडा मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 3701298.00/-

कला क्रिडा महोत्सवासाठी खरेदी केलेल्या अथवा भाडयाने घेतलेल्या साहित्याचे निविदेतील दर बाजारभावातील दराच्या तुलनेतकिफायतशीर असल्याची खात्री न करता निविदा मंजुर केलेली आहे. सीसीटीव्ही यंत्रणा उभारणी करणे, मंडप टाकणे, विदयुतीकरण करणे याबाबत तांत्रिक प्राकलन तयार करुन त्यात संबंधीत अधिका-याची मंजुरी घेतलेली नाही. ठेकेदाराशी केलेल्या करारनाम्यावर स्थायी समितीच्या दोन सदस्यांची स्वाक्षरी घेण्यांत आलेली नाही. निविदा स्वीकारतांना त्या मोहोरबंद नसुन केवळ साधे लखोटा पध्दतीने स्वीकारल्या गेलेल्या आहेत.

नालासोपारा प्रभाग "क" येथील सन 2013-14 व 2014-15 च्या कला - क्रीडा महोत्सवाच्या झालेल्या खर्चाच्या अभिलेख्याचे लेखापरीक्षण करणेत आले. एकूण झालेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदवण्यात येत आहे.

2013-14 मध्ये झालेला एकूण खर्च खालीलप्रमाणे.

प्रमाणक क्र.	दिनांक	खर्चाची रक्कम	खर्चाचा तपशिल	ठेकेदाराचे नाव
851	30/12/2013	496162	स्टेज, मंडप, डेकोरेशन व इतर व्यवस्था	राजकुमार इलेक्ट्रीकल्स
852	30/12/2013	512350	--//--	साई डेकोरेटर

853	30/12/2013	14640	विद्युतीकरण, ध्वनी प्रक्षेपण व इतर व्यवस्था	--//--
854	30/12/2013	524900	--//--	साईवैभव इलेक्ट्रीकल्स
855	30/12/2013	182500	फोटोग्राफी व व्हीडीयोचित्रीकरण	प्रिती इंटरप्राईझेस
856	30/12/2013	140000	सी.सी.टीव्हीभाडयाने घेणे.	टेक्नोटेलीकॉम
716	25/11/2013	240000	संध्या पाटील यांचे नावे	अग्रीम
1003 व 1004	27/01/2014	56542		अग्रीमापेक्षा जादा झालेला खर्च
एकूणखर्च		**2167094**		

2014-15 मध्ये झालेला एकूण खर्च खालीलप्रमाणे.

प्रमाणक क्र.	दिनांक	खर्चाची रक्कम	खर्चाचा तपशिल	ठेकेदाराचे नाव
1207	12/12/2014	48097	डेटाएंट्री	जिवदानी कॉम्प्यूटर
1298	02/01/2015	134980	फोटोग्राफीवव्हीडीयोचित्रीकरण	प्रिती इंटरप्राईझेस
1352	24/01/2015	200481	सी.सी.टीव्हीभाडयाने घेणे.	सी.टी.एम एन्फोटेक
1567	16/02/2015	524470	स्टेज, मंडप, डेकोरेशन व इतर व्यवस्था	साई डेको ॲण्ड सर्व्हिस
1566	16/02/2015	366000	स्टेज, मंडप, डेकोरेशन व इतर व्यवस्था	राजकुमार इलेक्ट्रीकल्स
1585	17/02/2015	260176	संध्या पाटील यांचे नावे	अग्रीम
एकूणखर्च		**1534204**		

1) कला क्रिडा महोत्सवासाठी मंडप व्यवस्था करणे, विद्युत व्यवस्था करणे, ध्वनीक्षेप नव्यवस्था करणे, सी.सी. टीवी कॅमेरा व्यवस्था करणे, फोटोग्राफी वव्हिडीयो चित्रीकरण करणे, इत्यादि बाबी प्रस्तावीत असल्याने यासाठी जाहिरात प्रसिध्दी करुन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. ज्या निविदाधारकांचे बाबनिहाय कमी दर आहेत, अशा निविदाधारकांना मंजूरी देऊन साहित्य पुरविणे तसेच आवश्यक साहित्य भाडयान घेणेबाबत कार्यादेश देण्यात आलेले आहेत. परंतु निविदा स्विकारतांना साहित्याचे दर तसेच भाडयाचे दर याबाबत बाजारभाव पहाता किफायतशीर असल्याची खात्री केल्याचे दिसून आले नाही. सादर केलेल्या टिपणी मध्ये बाजार भावची खात्री करुनच कार्यादेश दिल्याचे नमुद केले आहे. परंतु प्रत्यक्षात बाजार भाव काय आहेत याची लेखा परिक्षणाची खात्री पटवुन दिलेली नाही.

2) प्रस्तुत झालेल्या खर्चामधील मंडप टाकणे, विद्युतीकरण करणे, स्टेज उभारणे, जी.आय.पोल उभारणे

सी.सी.टीव्ही यंत्रणा उभारणे इत्यादि बाबी तांत्रिक असल्याने तसे प्राकलन तयार करुन व त्यास तांत्रिक मंजूरी घेऊन निविदा मागविणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.
3) ठेकेदाराशी करारनामा झाल्यानंतर समक्ष स्थायी समितीच्या दोन सदस्याची स्वाक्षरी घेऊनच करारनामा करणे आवश्यक होते. परंतु करारनाम्यावर सदस्याच्या स्वाक्षऱ्या घेतले असल्याचे दिसून आले नाही.
4) जाहिरात प्रसिध्दी करताना मोहरबंद असलेल्या निविदा मागविण्याची अट असताना प्राप्त झालेल्या निविदा मोहरबंद प्राप्त झाले असल्याबाबत दिसून आले नाही. त्यामुळे प्राप्त निविदा विहीत पध्दतीने स्विकारल्या गेल्याचे दिसून येत नाही. वरील सर्व बाबीची पुर्तता होईपर्यंत कला क्रिडा महोत्सवासाठी झालेला खर्च रु.3701298/- लेखापरीक्षाणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

सदर बाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 145, दि.24/06/2016 अन्वये विभागास खुलासा सादर करण्यांविषयी कळविण्यांत आले होते. परंतु खुलासा प्राप्त झालेला नाही.

आक्षेपाधिन खर्च रु.37,01,298/-

DATNDMM5801 (Ref No : 130, Hmm No : 145)

84 वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मनपाने उपलब्ध करुन दिलेल्या 3 लक्ष झाडांची लागवड करणे व देखभाल करुन तीन वर्षापर्यंत जोपासना करणे करीता 50,000 लोखंडी ट्री गार्डस पुरवून सिमेंट, वाळू, खडीचा वापर करुन झाडांभोवती बसविणेच्या कामातील अनियमीततेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : उदयान मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ब
आक्षेपाधीन रक्कम रु. 14933334.00/-

निविदा मंजुर करतांना प्रचलित बाजारभावाशी तुलना केल्याची कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत. ठेकेदाराबरोबर केलेल्या करारनाम्यातील अट क्रमांक 15 व 16 चे पालन केले गेले नाही. झाडाच्या लागवडीबाबतची सीडी उपलब्ध करुन दिली नाही. वृक्ष लागवडी संबंधी प्राधिकरणाचा तपासणी अहवाल उपलब्ध करुन दिला नाही.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात अधिकाधिक क्षेत्रावर मोठया प्रमाणावर वृक्ष लागवड करण्याचे दृष्टीकोनातून महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या झाडांची लागवड करणे व त्यांची देखभाल करुन तीन वर्षापर्यंत जगविणे आणि मांडवी वन क्षेत्रातील वन विभागाच्या अवनत वन क्षेत्रावर मजूर लावून पूर्व

पावसाळी व पावसाळी कामांतर्गत वृक्षांची लागवड करुन तीन वर्षापर्यंत संगोपन व संवर्धन करणे करीता निविदा मागविण्यांत आल्या होत्या. त्याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

कामाचे नांव	नागरी वनीकरणे करणे, अंदाजे 3 लक्ष झाडांची लागवड करुन 3 वर्षापर्यंत संगोपन करणे व किमान 50,000 गोलाकार लोखंडी ट्री गार्ड पुरवून बसविणे.
ठेकेदाराचे नांव	मे. हिरावती एंटरप्रायजेस, मुंबई.
प्रशासकीय मंजुरी	सर्वसाधारण सभा दिनांक 20-01-2014 ठराव क्रमांक 24
लेखाशिर्ष	नागरी वनीकरण भांडवली कामे
प्रमाणके	8) प्रमाणक क्रमांक 106, दिनांक 31-03-2015 रु.7169529/- 9) प्रमाणक क्रमांक 105, दिनांक 31-03-2015 रु.4524660/- 10) प्रमाणक क्रमांक 104, दिनांक 31-03-2015 रु.3239145/-
करारनामा	दिनांक 04-03-2014
कामाचा कालावधी	05-03-2014 ते 04-03-2017

वसई विरार शहर महानगरपालिका हददीमध्ये महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या झाडांची लागवड करुन तीन वर्षापर्यंत देखभाल करणे व गोलाकार ट्री गार्डचा पुरवठा करुन बसविणेकरीता दैनिक आपला महानगर व दैनिक जागल्या या स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात देवून निविदा मागविण्यांत आल्या होत्या. याबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 116, दिनांक 30/05/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचे पत्र क्रमांक 186/16, दिनांक 04/06/2016 अन्वये खुलासा केला आहे. तो विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे देण्यांत येत आहेत.

6) प्राप्त झालेल्या निविदांचे तुलनात्मक दरपत्रकावर मे. हिरावती एंटरप्रायजेस यांनी सादर केलेले दर हे प्राप्त दरांपैकी कमी असुन बाजारभावाशी तुलना करता वाजवी आहेत असे नमुद केले आहे. तथापि प्रचलित बाजारभाव नमुद करण्यांत आले नसल्याने सदर दर वाजवी असलेची लेखापरीक्षणाची खात्री झाली नाही.

7) करारनाम्यातील अटीनुसार कार्यादेश दिल्यानंतर तीन महिन्यांच्या आत (15-07-2014) पुर्वी कार्यादेशात नमुद केल्याप्रमाणे झाडे लावणे बंधनकारक राहील. सदर झाडे महानगरपालिकेच्या धुकटन येथील नर्सरीमधुन वाहतूक करुन दिनांक 15-07-2014 पुर्वी लागवड पूर्ण करणे आवश्यक

आहे अन्यथा विलंबाबाबत विलंब शुल्क मा. आयुक्तांचे मान्यतेने आकारण्यांत येईल. तसेच लागवड केलेल्या झाडांचे डीजीटल कॅमेराव्दारे शुटींग करुन सीडी महानगरपालिका कार्यालयास सादर करावी लागेल. याबाबत नोंदवही क्रमांक 109 ची पडताळणी करण्यांत आली असता ठेकेदाराने माहे जुलै, 2014 अखेर 154506 इतक्या झाडांची लागवड केल्याचे दिसून येते. सबब, करारनाम्यातील अट क्रमांक 15 व 16 चे पालन झाले नाही, परंतु संबंधीताविरुध्द केलेल्या कार्यवाहीचा तपशील व लागवड केलेल्या झाडांचे डीजीटल कॅमेराव्दारे शुटींग केल्याची सीडी लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यांत आली नाही.

8) झाडे लावण्यासाठी महानगरपालिकेने दर्शविलेल्या जागी व दिलेल्या मोजमापाचे उन्हाळयामध्ये खडडे खोदून ते लाल माती, शेणखत, नैसर्गिक खते व जंतूनाशके इ त्यादि साहित्याने भरुन नंतर त्यात झाडे लावणे आवश्यक आहे. सदर खडडयात भरावयाची लाल माती व खताचे मिश्रण 3:1 असे असावे व सदर साहित्य वृक्ष प्राधिकरण विभागाकडून तपासून घेवून नंतरच खडडयात भरण्यांत येईल अशा करारात तरतुदी आहेत. तथापि वृक्ष लागवडी संबंधीच्या देयकासोबत वृक्ष प्राधिकरणाचा लाल माती व खताचे मिश्रणासंबंधीचा तपासणी अहवाल आढळून आलेला नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु.14933334

DATBBPM6301 (Ref No : 134, Hmm No : 116)

कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

---------- निरंक ----------

भाग दोन

सर्वसाधारण अनियमितता

कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

85 महापालिकेमध्ये समाविष्ट केलेल्या ग्रामपंचायतीचे क्षेत्रातील कर वसूलीबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 07

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालये मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ड
गुंतलेली रक्कम रु. 28706449.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 28706449.00/-

वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना दिनांक 7 जुलै, 2009 रोजी झाली. महानगरपालिकेत विलीन झालेल्या 29 गावांचे बाबत मा. न्यायालयाने महापालिका दराने मालमत्ता कराच्या वसूलीस दिलेला स्थगिती आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिला नाही. भुतपूर्व ग्रामपंचायत उपविभागातील कर विभागाचे लेखे संबंधीत अधिका-यांनी प्रमाणित केले नाहीत. जुन्या ग्रामपंचायतीकडे शासन अनुदानाच्या अखर्चित रकमा लेखापरीक्षण तारखेपर्यंत शिल्लक आहेत. ग्रामपंचायतीचे मालकीची दुकाने, गाळे, इमारती इ. चे भाडयाची वसुली वेळीच केली जात नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 81 क नुसार थकबाकी वसुल करण्याचा प्रयत्न केला नाही. स्थानिक संस्था कर विभागाने दोन वर्षात वसुल केलेल्या रकमा अनुक्रमे रु. 78181/- व रु.37510/- ची पावती पुस्तके उपलब्ध करुन दिली नाहीत. ग्रामिण स्तरावर रोखपालाची रोकडवही (नमुना क्र.18) ठेवणे आवश्यक असतांना सामान्य कॅशबुक ठेवण्यांत आले आहे.

महानगरपालिकेच्या कराची वसुली उप प्रभाग/ प्रभागाकडून केली जाते. लेखा परिक्षणाच्या वेळी उप प्रभागाने केलेल्या कराच्या वसुलीचे अभिलेखे तपासण्यासाठी काही निवडक उप प्रभागाचे (वालीव, सातीवली) लेखा परिक्षण केले असता पुढील बाबी निदर्शनास आल्या. याबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.03, दिनांक 11/02/2016 अन्वये खुलासा विचारण्यांत आला होता. परंतु विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1)वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना शासन आदेशानुसार दिनांक 7 जुलै 2009 रोजी झाली. त्यात वसई, नवघर- माणिकपूर, नालासोपारा, विरार या चार नगरपरिषदा व 53 गावे समाविष्ट करण्यात आली. त्यापैकी 29 गावांचे बाबत त्यांनी जुन्या ग्रामपंचायत दराने मालमत्ता कराची वसुली केली आहे. उदा. मातीचे घरासाठी प्रति चौ.फुट 0.15 पैसे, दगडाचे घरासाठी प्रति चौ. फुट 0.50 पैसे, आर.सी.सी. घरासाठी प्रति चौ. फुट रु.1.50 दराने वसुली करण्यांत येत आहे. मा. न्यायालयाने महापालिका दराने मालमत्ता कर वसुली बाबत स्थगिती आदेश दिला आहे. परंतु सदर स्थगिती आदेशाची प्रत लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिली नाही.

2) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 128"अ"नुसार कराची आकारणी करावयाची असुन त्यानुसार वसुली करावयाची आहे. महानगरपालिकेत समाविष्ठ केलेल्या 29 ग्रामपंचायत क्षेत्रात जुन्या ग्रामपंचायत दराने कराची वसुली केल्याचे वालीव व सातिवली ग्रामपंचायतीचे 2013-14 व 2014-15 चे लेखे तपासता दिसून आले. तसेच मालमत्ताधारका कडून शिक्षण कर, रोजगार हमी कर, वृक्ष कर, विशेष स्वचछता कर, अग्निशमन उपकर यांची वसुली केलेली नाही. शासनास देय असलेल्या शिक्षण व रोजगार हमी करांची देखील वसुली केली नसल्याने, शासनास या करापोटी मिळणाऱ्या उत्पन्नास मुकावे लागले आहे. भुतपूर्व ग्रामपंचायत उपप्रभागात घरपट्टी व दिवाबत्ती कर ग्रामपंचायत दराने म्हणजे - मातीचे घरासाठी प्रति चौ.फुट 0.15 पैसे, दगडाचे घरासाठी प्रति चौ. फुट 0.50 पैसे, आर.सी.सी. घरासाठी प्रति चौ. फुट रु.1.50 दराने वसुली करण्यांत येत आहे. त्यासाठी मागणी नोंदवही व आकारणी नोंदवही ठेवली असून प्रत्येक वर्षी होणारी वाढ/ घट दाखविली आहे. परंतु मागणी व आकारणी नोंदवहीत उपप्रभागात काम करणाऱ्या लिपीक किंवा समन्वयकाने स्वाक्षरी केल्याचे दिसून येत नाही. मुख्यालयात असलेल्या कर निर्धारक व संकलक किंवा संबंधित अधिकाऱ्यांनी उप प्रभागातील आकारणी व मागणी नोंदवही मधील नोंदी बरोबर असल्याची खात्री केली नाही. एकंदरी महापालिका उत्पन्नाचा स्त्रोत असलेल्या कर विभागाच्या कामावर नियंत्रण नसल्याचे दिसून येते.

उप प्रभागाने महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 74 नुसार नमुना नं.43 मध्ये आकारणी नोंदवही व नियम 76(1) नुसार नमुना नं.47 मध्ये मागणी नोंदवही ठेवली नाही. तसेच राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका 2005 मधील तरतुदीनुसार नमुना सर्वसाधारण.20 मध्ये मागणी नोंदवही ठेवली नाही.

3) ग्रामपंचायती महापालिकेत समाविष्ठ होतांना त्यांच्याकडे असलेल्या शासकिय अनुदानाच्या रक्कमा उदा.-बारावा वित्त आयोग, महाराष्ट्र ग्रामिण रोजगार योजना, दलित वस्ती सुधार योजना, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता योजना, इत्यादीची रक्कम रु.6079/- लेखापरीक्षण कालावधीत (2013-14 व 2014-15) शिल्लक आहे. या शासकीय अनुदानाच्या रक्कमेतून काही कामे झाली असून शिल्लक रक्कम असल्याचे दिसुन येते. लेखा विभागाने अशा शिल्लक रक्कमांचा मेळ घेवून अखर्चीत असलेल्या शासकिय अनुदानाच्या रक्कमा शासनास परत करण्याची कार्यवाही अदयाप केली नाही. तसेच महापालिकेत समाविष्ट झालेल्या उर्वरित ग्रामपंचायतींची शासन अनुदानाची अखर्चीत रक्कम किती शिल्लक आहे, याचे विवरणपत्र लेखा परिक्षणास सादर केले नाही.

4) महापालिकेत समाविष्ट झालेल्या काही ग्रामपंचायतींचे (उपप्रभागाचे) गाळा भाडे, दुकान भाडे, भुईभाडे, इमारत भाडे या बाबतच्या वसुलीकडे प्रभागाच्या अधिकाऱ्यांनी किंवा मुख्यालयाकडुन पाठपुरावा केला नाही. त्यामुळे अशा थकित रक्कमा वेळीच वसुल होत नाहीत. सातिवली व वालीव ग्रामपंचायतीची 31-3-2015 अखेर दुकान भाडे, भुईभाडे, इमारत भाडे इ. ची थकबाकी अनुक्रमे रु.29900/- व रु.249365/- आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 81 क नुसार थकबाकी वसुल करण्याचा प्रयत्न केला नाही.

5) काही ग्रामपंचायतीने सामान्य पावतीपुस्तके स्थानिक संस्था कर विभागास दिलेली आहेत. स्थानिक

संस्था कर विभागाने या पावती पुस्तकाव्दारे एल.बी.टी नोंदणी फी म्हणून रक्कमा वसुल केल्या आहेत. उदा.-वालीव उपप्रभागाने 2013-14 मध्ये एल.बी.टी. नोंदणी फी म्हणून रु.78,181/- वसूल केली आहे. 2014-15 मध्ये रु.37,510/- वसूल केली आहे. परंतु वसुलीची सदर पावती पुस्तके लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिली नाहीत. पावतीपुस्तका अभावी वसुलीची रक्कम बरोबर असल्याची लेखा परिक्षणाची खातरजमा करता आली नाही.

6) ग्रामिण भागात (जुन्या ग्रामपंचायती) सामान्य कॅश बुक ठेवण्यात आले आहे. त्यात बँक खात्यानुसार रोज भरणा केलेल्या रक्कमा दाखविल्या आहेत. आणि त्यानुसार रोजची शिल्लक काढली आहे. महापालिकेने या खात्यातुन रक्कम काढल्यानंतर उपप्रभागात खर्च दाखविला आहे. आणि शिल्लक रक्कम बँकेच्या खाते निहाय दाखविली आहे. ही बँकेची खाती महानगरपालिकेच्या नावावर असल्याने अशा प्रकारे उपप्रभागात रोजची शिल्लक दाखविण्याची आवश्यकता नाही. उपप्रभागात महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 39 नुसार रोखपालाची रोकड वही नमुना नं.18 ठेवून त्यात जमा बाजूला (डाव्या) जमेच्या नोंदी घेवून, खर्च बाजूला (उजव्या) महापालिकेच्या खात्यात रक्कम भरणा केल्याची चलनानीशी नोंद घेवून अखेर शिल्लक निरंक दाखविणे आवश्यक आहे. असे केल्याने अनेक खात्यांचा ताळमेळ घेणे सुलभ होईल.

7) महापालिकेत समाविष्ट केलेल्या जुन्या ग्रामपंचायतीचे (उपविभागाचे) वालीव व सातिवलीचे उदाहरणादाखल लेखे तपासता उपप्रभागाच्या कराची वर्ष अखेर असलेली थकबाकी किती आहे याची खातरजमा कर विभागाने करणे आवश्यक आहे.

वालीव ग्रामपंचायत कराची दिनांक 31-3-2014 ची थकबाकी रु.25091519/-

----------//---------- 31-3-2015 ची थकबाकी रु.22673128/-

सातिवली ग्रामपंचायत कराची दिनांक 31-3-2014 ची थकबाकी रु.5693970/-

----------//---------- 31-3-2015 ची थकबाकी रु.5754056/-

या सर्व ग्रामपंचायत उपप्रभागाची एकूण थकबाकी 2013-14 अखेर व 2014-15 अखेर किती आहे. याचे विवरणपत्र करनिर्धारण विभागाने लेखा परिक्षणास सादर केले नाही. तसेच महापालिकेचे मत्ता-दायीत्व विवरणपत्र तयार करताना, त्यात या सर्व थकबाक्या- वसुल करावयाची कराची रक्कम म्हणून मत्ता बाजुला दाखविल्याचे अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत.

वसुलपात्र रकमेचा तपशील

गाळा भाडे, भुईभाडे वसुलपात्र रक्कम रु.29900

----------//---------- रु.249365/-

कराची थकबाकी 31-03-2015 रु.22673128/-

----------//---------- रु.5754056/-

एकुण रक्कम रु.28706449/-

---

86 पेल्हार प्रभाग कार्यालयाचे कामकाजातील अनियमीतता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 07

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालय मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1035933.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1035933.00/-

प्रभागात ग्रामपंचायत कालीन एकुण 55 कर्मचारी आहेत. त्यापैकी दिनांक 01/11/2005 पुर्वी नेमणूक झालेल्या जुन्या ग्रामपंचायत कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम परिगणीत केली नाही. व अशी रक्कम महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास दाखविले नाहीत. त्यामुळे अशी रक्कम नमुद करता येत नाही. भनिनि खातेवही नमुना क्रमांक 98 व बृहतपत्रक नमुना क्रमांक 99 उपलब्ध करुन दिले नाही. कर्मचा-यांना भ.नि.नि. शिल्लक रकमेवर दयाव्या लागणा-या व्याजापेक्षा योजनेच्या खाती असलेल्या शिलकी रकमेवर मिळणारे व्याज कमी आहे. भ.नि. नि., निवृत्तीवेतन निधी, परिभाषित निधी, जल-मल निधी, सर्वसाधारण निधी असे स्वतंत्र निधी ठेवले आहेत. शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा जादा दराने जाहिरातीसाठी खर्च केला आहे. दावे आणि खटले यांचे अभिलेखे दाखविले नाहीत.

आयुक्त, वसई - विरार शहर महानगरपालिका यांचेकडील आदेश क्र .आस्था/738/2012, दि.17/01/2012 अन्वये महानगरपालिकेच्या 5 प्रभाग समित्यांना लेखा विषयक अधिकार प्रदान करण्यात आले आहेत . त्यानुसार प्रभाग समिती निहाय लेखा विषयक कामकाज पार पाडण्याकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 84(1) नुसार लेखापाल/वरिष्ठ लेखा लिपीक यांना प्राधिकृत करण्यात आले आहेत . तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील तरतुदीनुसार प्रभाग समितीचे संपुर्ण लेखा विषयक कामकाज प्रभाग समिती मार्फत पार पाडले जाईल . त्यासाठी मुख्य निधीतुन प्रत्येक प्रभागास वेळोवेळी ठराविक रक्कम वर्ग करण्यात आली आहे . प्रभाग समित्यांच्या अधिकाऱ्यांनी निधी निहाय स्वतंत्र लेखे ठेवायचे आहेत . बँक खात्याचे व्यवहार प्रभाग कार्यालयापुरते मर्यादित ठेवले आहेत . बँक खात्याचे व्यवहार करण्याचे अधिकार संबंधीत उपायुक्त व प्रभागाचा लेखापाल/वरिष्ठ लेखा लिपीकास दिले आहेत. त्यासाठी वेतन भत्ते, शासकिय देणी, विद्युत, दुरध्वनी, डिझेल खर्च , इतर कामांचा खर्च , इत्यादी बाबत रक्कम रु .5.25 लाख पर्यंत प्रति काम

खर्चाची मर्यादा घालुन दिली आहे . तसेच कोणत्याही कामाचे एकपेक्षा अधिक भाग करुन खर्च करता येणार नाही. स्थानिक संस्था कराचे काम पेल्हार कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहे. नगररचना विभाग, सॅटे लाईट सिटी योजना व मुख्यालयातील आस्थापनेचे व्यवहार बोळींज कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहेत. अपरिहार्य परिस्थिती खेरिज सर्व प्रदाने ई .सी.एस. व्दारे करावयाची आहेत . रुग्णालय व्यवस्थापनाचे काम वसई कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहे . मर्यादेत नसणारी सर्व प्रदाने मुख्य लेखाधिकारी व आयुक्त यांच्या संयुक्त स्वाक्षरीने करावयाची आहे.

पेल्हार प्रभाग कार्यालयाचे लेखा विभागाच्या कामाचे लेखा परीक्षण केले . प्रभागाने सर्वसाधारण निधी, जल-मल प्रवाह निधी , निवृत्ती वेतन निधी , भविष्य निर्वाह निधी , परिभाषीत निधी यासाठी स्वतंत्र रोखवह्या व स्वतंत्र बँक खाती ठेवली आहेत . याबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 133, दिनांक 20/06/2016 अन्वये खुलासा विचारला होता. प्रभागाने त्यांचे पत्र क्रमांक निरंक, दिनांक 24/06/2016 रोजी खुलासा केला आहे . तो विचारात घेवून लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

9) <u>भविष्य निर्वाह निधी-</u>

प्रभाग कार्यालयाच्या क्षेत्रात असलेल्या उप विभाग म्हणजेच ग्रामपंचायती चे एकुण 55 कर्मचारी आहेत. त्यापैकी ज्यांची नेमणुक दि .01/11/2005 पुर्वीची आहे , अशा जुन्या कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम परिगणीत केली नाही. व अशी रक्कम महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास दाखविले नाहीत . सदरची रक्कम तत्कालीन ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामसेवक यांच्या संयुक्त खात्यावर शिल्लक होती . ग्रा.प. काळात अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना होती. नगरपालिका/ महानगरपालिका काळात अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना नाही . या ग्रामीण भागातील ग्रामपंचायती महापालिकेत समाविष्ठ करण्यांत येवू नये अशी याचिका न्यायप्रविष्ठ आहे. ग्रामीण कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची किती रक्कम महापालिकेस प्राप्त झाली, याचा हिशेब लेखा परिक्षणास दाखविला नाही . आस्थापनेवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याची भ .नि. नि. वर्गणी वसुल केली जाते . परंतु नमुना क्र .98 मधील भ.नि.नि. खाते वही, नमुना क्र.99 मधील बृहत पत्रक लेखा परीक्षणास प्राप्त झाले नाही.

<u>दि.31/03/2015 रोजी भ.नि.नि. रोखवहीनुसार शिल्लक</u>

बँक ऑफ महाराष्ट्र (खाते क्र.60098610663) रु.83,284

--//-- मुदत ठेव 9,50,771

--//-- --//-- 3,40,000

एकूण 13,74,055

कर्मचाऱ्याना भविष्य निर्वाह निधीचे व्याज 2013-14 व 2014-15 मध्ये 8.70% दराने महापालिकेने दिले आहे. परंतु बँकेतील मुदत ठेवीवर मिळणारे व्याज 7% च्या मर्यादेत आहे. व्याजाचे दरातील तफावत 1.70% आहे. या तफावती ची रक्कम विभागाने परिगणीत केली नाही . वर्षभरात होणाऱ्या तफावतीच्या रकमेबाबत प्रशासनाने महापालिका सभागृहासमोर टिपणी सादर करुन सदरची रक्कम सभागृहाच्या मंजुरीने महानगरपालिका फंडातुन भ .नि.नि. खात्याकडे वर्ग करण्यासाठी प्रयत्न केले नाहीत.

10) निवृत्ती वेतन निधी -

दि.31/03/2015 शिल्लकेचा तपशिल

बँक ऑफ महाराष्ट्र (खाते क्र.60128839171) रु.6,50,176

--//-- मुदत ठेव 11,95,254

--//-- --//-- 2,00,000

एकूण 20,45,430

सेवानिवृत्त होणा -या कर्मचा -यांना या निधीच्या खात्यातुन निवृत्तीवेतनविषयक लाभाचे प्रदान करण्यांत येते. या निधीत जमा होणारे अंशदान व त्यातुन करावा लागणारा खर्च याचा ताळमेळ वर्षअखेर घेतला नाही . नियम 51 नुसार रोकडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन प्राधिकृत अधिका-याने स्वाक्षरी केली नाही.

11) परिभाषीत निधी -

दि.31/03/2015 शिल्लकेचा तपशिल

बँक ऑफ महाराष्ट्र (खाते क्र.60128839488) रु. 1,137

--//-- मुदत ठेव 3,20,000

एकूण 3,21,137

परिभाषीत निधीत अंशदान देणा -या कर्मचा-यांना वर्षअखेर त्यांच्या खाती जमा झालेली अंशदानाची रक्कम, महानगरपालिकेचा हिस्सा, व्याज दर्शविणारे विवरणपत्र देण्यात आले नाही.

12) जल-मल प्रवाह निधी -

दि.31/03/2015 शिल्लकेचा तपशिल

बँक ऑफ महाराष्ट्र (खाते क्र.60090791893) रु.19,14,282

रोखवहीतील शिल्लक व बँकेतील पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 नियम 40 व 51 नुसार दरमहा घेतलेला नाही. नियम 51 नुसार रोकडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन उपायुक्त यांनी स्वाक्षरी केली नाही.

13) सर्वसाधारण निधी -

दि.31/03/2015 शिल्लक

बँक ऑफ महाराष्ट्र (खाते क्र.60090791906) रु.3,67,37,241

--//-- अनामत (खाते क्र.60090791688) 2,926

एकूण रु.3,67,40,167

रोखवहीतील शिल्लक व बँकेतील पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही. नियम 51 नुसार रोकडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन उपायुक्त यांनी स्वाक्षरी केली नाही.

14) पुढील प्रमाणकाव्दारे वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यासाठी खर्च केला आहे .

जाहिरातीचे शासनमान्य दर (माहिती व जन संपर्क विभाग) उपलब्ध झाले नाहीत . त्यामुळे शासनाने ठरवुन दिलेल्या दरानुसार प्रदान झाल्याची खातरजमा करता आली नाही.

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम	तपशिल
876	02/03/15	26,400	मे.मयुरेश पब्लीसीटी, दर रु.412.50X 64 सेमी = 26,400.
879	--//--	6,947	मे.मयुरेश पब्लीसीटी,मटा दर रु.108.55X64 सेमी =

6,947.

937 24/03/15 22,464 मे.मयुरेश पब्लीसीटी, नवकाळ
दर रु.52 X 432 सेमी =
22,464.

1022 31/03/15 13,541 नवभारत प्रेस (प्रमाणक
उपलब्ध् झाले नाही).

15) दावे आणि खटले फी म्हणून पुढील खर्च केला आहे.

2013-14 रु.286400/-

2014-15 रु.749533/-

लेखापरीक्षण काळात प्रमाणक क्र.999 दि.31/03/2015 रु.75,000 प्रभाग समिती ब पेल्हार विधी पॅनलचे व्यवस्थापन कामी- विधी सल्लागार फी म्हणून खर्च केला आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम क्र.121 नुसार नमुना क्र.90 दावा, खटला पुस्तक ठेवायचे आहे आणि त्यात खटला चालविण्यासाठी दिलेल्या आगाऊ रकमा , कोर्टाच्या हुकुमनाम्यानुसार देय असलेल्या रकमांची वसुली व प्रदान दर्शवायचे आहे . परंतु याबाबतची नोंदवही उपलब्ध् झाली नाही. प्रभागात एकूण किती प्रकरणे न्यायालयात आहेत , त्यापैकी किती निकाल मनपाच्या बाजुने लागले , किती प्रलंबित आहेत, याबाबतचे अभिलेखे प्राप्त झाले नाहीत.

आक्षेपाधीन रक्कम रु.1035933/-

DATPMVM6001 (Ref No : 100, Hmm No : 133)

87 नवघर-माणिकपुर प्रभाग कार्यालयाचे कामकाजातील अनियमीतता.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 07

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालय मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 3461895.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3461895.00/-

प्रभागात ग्रामपंचायत कालीन एकुण 147 कर्मचारी आहेत. त्यापैकी दिनांक 01/11/2005 पुर्वी नेमणूक झालेल्या जुन्या ग्रामपंचायत कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम परिगणीत केली नाही. व अशी रक्कम महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास दाखविले नाहीत. अनिनि खातेवही नमुना क्रमांक 98 व बृहतपत्रक नमुना क्रमांक 99 उपलब्ध करुन दिले नाही. कर्मचा-यांना भ.नि.नि. शिल्लक रकमेवर दयाव्या लागणा-या व्याजापेक्षा योजनेच्या खाती असलेल्या शिलकी रकमेवर मिळणारे व्याज कमी आहे. भ.नि.नि., निवृत्तीवेतन निधी, परिभाषित निधी, जल मल प्रवास निधी, सर्वसाधारण निधी असे स्वतंत्र निधी ठेवले आहेत. परंतु रोखवहीतील शिल्लक व बँक पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ घेतला नाही.(रोखवहीतील शिल्लक व बँक पासबुकातील शिल्लक यातील तफावत निधीनिहाय नमुद केली आहे.) दावे आणि खटले यांचे अभिलेखे दाखविले नाहीत. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 मधील नियम 51 नुसार रोखवहीतील लेखे बंद करुन त्यांचा ताळमेळ घेतला नाही.

आयुक्त, वसई - विरार शहर महानगरपालिका यांचेकडील आदेश क्र .आस्था/738/2012, दि.17/01/2012 अन्वये महानगरपालिकेच्या 5 प्रभाग समित्यांना लेखा विषयक अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार प्रभाग समिती निहायक लेखा विषयक कामकाज पार पाडण्याकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 84(1) नुसार लेखापाल/वरिष्ठ लेखा लिपीक यांना प्राधिकृत करण्यात आले आहेत . तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील तरतुदीनुसार प्रभाग समितीचे संपुर्ण लेखा विषयक कामकाज प्रभाग समिती मार्फत पार पाडले जाईल . त्यासाठी मुख्य निधीतुन प्रत्येक प्रभागास वेळोवेळी ठराविक रक्कम वर्ग करण्यात आली आहे . प्रभाग समित्यांच्या अधिकाऱ्यांनी निधी निहाय स्वतंत्र लेखे ठेवायचे आहेत . बँक खात्याचे व्यवहार प्रभाग कार्यालयापुरते मर्यादित ठेवले आहेत. बँक खात्याचे व्यवहार करण्याचे अधिकार संबंधीत उपायुक्त व प्रभागाचा लेखापाल/वरिष्ठ लेखा लिपीकास दिले आहेत. त्यासाठी वेतन भत्ते, शासकिय देणी, विद्युत, दुरध्वनी, डिझेल खर्च, इतर कामांचा खर्च , इत्यादी बाबत रक्कम रु .5.25 लाख पर्यंतच्या खर्चाची मर्यादा प्रति काम घालुन दिली आहे. तसेच कोणत्याही कामाचे एकपेक्षा अधिक भाग करुन खर्च करता येणार नाही. स्थानिक संस्था कराचे काम पेल्हार कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहे. नगररचना विभाग, सॅटे लाईट सिटी योजना व मुख्यालयातील आस्थापानेचे व्यवहार बोळींज कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहेत. अपरिहार्य परिस्थिती खेरिज सर्व प्रदाने ई .सी.एस. व्दारे करावयाची आहेत . रुग्णालय व्यवस्थापनाचे काम वसई कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहे . मर्यादेत नसणारी सर्व प्रदाने मुख्य

लेखाधिकारी व आयुक्त यांच्या संयुक्त स्वाक्षरीने करावयाची आहे.

नवघर- माणिकपूर प्रभाग कार्यालयाचे लेखा विभागाच्या कामाचे लेखा परीक्षण केले . प्रभागाने सर्वसाधारण निधी, जल-मल प्रवाह निधी, निवृत्ती वेतन निधी, भविष्य निर्वाह निधी, परिभाषीत निधी यासाठी स्वतंत्र रोखवह्या व स्वतंत्र बँक खाती ठेवली आहेत. याबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 134, दिनांक 20/06/2016 अन्वये खुलासा विचारला होता . प्रभागाने त्यांचे पत्र क्रमांक निरंक, दिनांक 24/06/2016 नुसार खुलासा केला आहे . प्रभागाचा खुलासा विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

4) भविष्य निर्वाह निधी रोखवही दिनांक 31/03/2015 अखेरची शिल्लक रु.31825384/-

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम रु.	पासबुकानुसार रक्कम रु.	तफावत रु.
युनियन बँक खाते क्रमांक 320602010061942	7825384	7948017	122633
गुंतवणूक	24000000	---	----
एकुण	31825384	------	122633

रोखवहीतील शिल्लक व बँकेतील पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही . तसेच 31-3-2013 रोजी प्रभारी लेखापाल यांची स्वाक्षरी आहे. परंतु नियम 51 नुसार रोकडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन लेखापाल व उपायुक्त यांनी स्वाक्षरी केली नाही.

प्रभाग कार्यालयाच्या क्षेत्रात असलेल्या उप विभाग म्हणजेच ग्रामपंचायत स्तरावरील जुने 147 कर्मचारी आहेत आणि ज्यांची नेमणुक दि.01/11/2005 पुर्वीची आहे. अशा जुन्या कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम परिगणीत केली नाही . व संबंधीत अभिलेखे लेखापरीक्षणास दाखविले नाहीत .

सदरची रक्कम तत्कालीन ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामसेवक यांच्या संयुक्त खात्यावर शिल्लक होती. ग्रा.प. काळात अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना होती . नगरपालिका/ महानगरपालिका काळात अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना नाही . या ग्रामीण भागा तील ग्रामपंचायती महापालिकेत समाविष्ठ करण्यांत येवू नये अशी याचिका न्यायप्रविष्ठ आहे. आस्थापानेवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याची भ.नि. नि. वर्गणी वसुल केली जाते . परंतु नमुना क्र .98 मधील भ.नि.नि. खाते वही, नमुना क्र.99 मधील बृहत पत्रक लेखा परीक्षणास प्राप्त झाले नाही . त्यामुळे पुढील प्रमाणकाव्दारे केलेल्या प्रदानाच्या नोंदी नमुना नं.98 व 99 मध्ये तपासुन पाहता आल्या नाहीत.

35/11-03-2015 श्री. सदानंद यशवंत पाटील, नापरतावा रु.150000/-

36/11-03-2015 श्री. मिलींद प्रभाकर पाटील, नापरतावा रु.100000/-

37/11-03-2015 श्री. सेबेस्टीन घोन्साल्वीस, परतावा(24 ह.)रु.15000

38/23-03-2015 श्री. अमोल किसन राजे, नापरतावा रु.50000/-

कर्मचाऱ्याना भविष्य निर्वाह निधीचे व्याज 2013-14 व 2014-15 मध्ये 8.70% दराने दयावे लागले आहे. परंतु बँकेतील मुदत ठेवीवर मिळणारे व्याज 7% च्या मर्यादेत आहे. व्याजाचे दरातील तफावत 1.70% आहे. या तफावती ची परिगणना केली नाही . वर्षभरात होणाऱ्या तफावतीच्या रकमेबाबत प्रशासनाने महापालिका सभागृहासमोर टिपणी सादर करुन सदरची रक्कम सभागृहाच्या मंजुरीने महानगरपालिका फंडातुन भ.नि.नि. खात्याकडे वर्ग करण्यासाठी प्रयत्न केले नाहीत.

5) निवृत्ती वेतन निधी दि.31/03/2015 शिल्लकेचा तपशिल

युनियन बँक (खाते क्र.32060210061940) रु.39,01,335

--//-- मुदत ठेव रु.10,00,000

एकूण रु.49,01,335

बचत खात्यात असलेली रक्कम मुदत ठेवीमध्ये ठेवल्यास मिळणाऱ्या व्याजाचा लाभ होईल.

6) परिभाषीत निधी दि.31/03/2015 शिल्लकेचा तपशिल

युनियन बँक (खाते क्र.320602010061939) रु.13,77,926/-

--//-- मुदत ठेव रु.33,00,000

एकूण रु.46,77,926

ग्रामपंचायतकालीन जुन्या कर्मचा -यांची परिभाषीक योजनेची शिल्लक परिगणीत केली नाही व महापालिकेच्या किर्दीकडे ओढल्याचे दिसून आले नाही.

7) जल-मल प्रवाह निधी दि.31/03/2015 अ. शिल्लक रु.16,03,320

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम रु.	पासबुकानुसार रक्कम रु.	तफावत रु.
युनियन बँक खाते क्रमांक 320602010061938	1603320	1702131	98811

रोखवहीतील शिल्लक व बँकेतील पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही. तसेच दि. 31-3-2015 रोजी प्रभारी लेखापाल यांची स्वाक्षरी आहे. परंतु नियम 51 नुसार रोकडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन उपायुक्त यांनी स्वाक्षरी केली नाही.

8) सर्वसाधारण निधी दि.31/03/2015 अखेर शिल्लक रु.103706602.59

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम रु.	पासबुकानुसार रक्कम रु.	तफावत रु.
युनियन बँक खाते क्रमांक 320602010061937	71908706	95443046.41	23534340.41
आयसीआयसीआय बँक खाते क्रमांक 02205000057	1989379	1986051	(-) 3318
युनियन बँक ऑफ	2312741	4568165	2255424

इंडिया खाते क्रमांक 320602061943			
गुंतवणूक	27500000	---	
वसई विकास सहकारी बँक खाते क्रमांक 1131	0.59	---	0.59
एकुण..	103710816.59		25786447

रोखवहीतील शिल्लक व बँकेतील पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही. तसेच दि. 31-3-2015 रोजी प्रभारी लेखापाल यांची स्वाक्षरी आहे. परंतु नियम 51 नुसार रोकडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन उपायुक्त यांनी स्वाक्षरी केली नाही.

9) दावे आणि खटले फी म्हणून पुढील खर्च केला आहे.

2013-14 रु.1738874/-

2014-15 रु.1723021/-

खर्चाची प्रमाणके संबंधीत विभागाने उपलब्ध करुन दिली नाहीत . महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम क्र .121 नुसार नमुना क्र .90 दावा, खटला पुस्तक ठेवायचे आहे आणि त्यात खटला चालविण्यासाठी दिलेल्या आगाऊ रकमा , कोर्टाच्या हुकुमनाम्यानुसार देय असलेल्या रकमांची वसुली व प्रदान दर्शवायचे आहे . परंतु याबाबतची नोंदवही उपलब्ध् झाली नाही. ब प्रभागात एकूण किती प्रकरणे न्यायालयात आहेत , त्यापैकी किती निकाल मनपाच्या बाजुने लागले , किती प्रलंबित आहेत, याबाबतचे अभिलेखे प्राप्त झाले नाहीत.

10) प्रभाग कार्यालयाचे काम करण्यासाठी आयुक्तांचे आदेशानुसार प्रभागात लेखापाल/वरिष्ठ लिपीकाची नेमणूक केली आहे . उपायुक्तांना प्रतिस्वाक्षरीचे अधिकार दिले आहेत. प्रभाग कार्यालयात रोखवही लिहीण्याचे काम लेखापालाने केले असुन त्याबाबत स्वाक्षरी केली आहे . सहाय्यक आयुक्तांना कोणतेही आर्थिक अधिकार दिले नाहीत . धनादेशावर लेखापाल व उपायुक्त सही करतात. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 चे नियम क्रमांक 62(2) महिन्यातुन किमान एकदा तरी उपायुक्ताने रोकडवहीतील शिल्लक

पडताळून पाहिली पाहिजे . परंतु वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये उपायुक्तांनी कधीही रोकडवहीतील शिल्लक पडताळून पाहिली नाही वा स्वाक्षरी केली नाही . नियम 40 नुसार रोखवहीतील जमा व संवितरणे यांचा मेळ जमा खर्चाच्या मासिक गोषवा -याबरोबर घेतला नाही. नियम 51 नुसार रोखवहीतील लेखे बंद करुन त्याचा ताळमेळ घेतला नाही.

आक्षेपाधीन रक्कम

दावे आणि खटले अभिलेखे न दाखविलेली रक्कम रु.3461895/-

DATPMVM6001 (Ref No : 101, Hmm No : 134)

88 वसई प्रभाग कार्यालयाचे कामकाजातील अनियमीतता...

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 08

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालय मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1347200.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1347200.00/-

प्रभागात ग्रामपंचायत कालीन एकुण 50 कर्मचारी आहेत. त्यापैकी दिनांक 01/11/2005 पुर्वी नेमणूक झालेल्या जुन्या ग्रामपंचायत कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम परिगणीत केली नाही. अनिनि खातेवही नमुना क्रमांक 98 व बृहतपत्रक नमुना क्रमांक 99 उपलब्ध करुन दिले नाही. कर्मचा-यांना भ.नि.नि. शिल्लक रकमेवर दयाव्या लागणा-या व्याजापेक्षा योजनेच्या खाती असलेल्या शिलकी रकमेवर मिळणारे व्याज कमी आहे. भ.नि.नि., निवृत्तीवेतन निधी, परिभाषित निधी, अनामत, जल मल प्रवास निधी, सर्वसाधारण निधी असे स्वतंत्र निधी ठेवले आहेत. परंतु रोखवहीतील शिल्लक व बँक पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ घेतला नाही. .(रोखवहीतील शिल्लक व बँक पासबुकातील शिल्लक यातील तफावत निधीनिहाय नमुद केली आहे.) दावे आणि खटले यांचे अभिलेखे दाखविले नाहीत. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 मधील नियम 51 नुसार रोखवहीतील लेखे बंद करुन त्यांचा ताळमेळ घेतला नाही.

आयुक्त, वसई - विरार शहर महानगरपालिका यांचेकडील आदेश क्र .आस्था/738/2012, दि.17/01/2012 अन्वये महानगरपालिकेच्या 5 प्रभाग समित्यांना लेखा विषयक अधिकार प्रदान करण्यात आले आहेत . त्यानुसार प्रभाग समिती निहाय लेखा विषयक कामकाज पार पाडण्याकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 84(1) नुसार लेखापाल/वरिष्ठ लेखा लिपीक

यांना प्राधिकृत करण्यात आले आहेत . तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील तरतुदीनुसार प्रभाग समितीचे संपुर्ण लेखा विषयक कामकाज प्रभाग समिती मार्फत पार पाडले जाईल . त्यासाठी मुख्य निधीतुन प्रत्येक प्रभागास वेळोवेळी ठराविक रक्कम वर्ग करण्यात आली आहे . प्रभाग समित्यांच्या अधिकाऱ्यांनी निधी निहाय स्वतंत्र लेखे ठेवायचे आहेत . बँक खात्याचे व्यवहार प्रभाग कार्यालयापुरते मर्यादित ठेवले आहेत . बँक खात्याचे व्यवहार करण्याचे अधिकार संबंधीत उपायुक्त व प्रभागाचा लेखापाल/वरिष्ठ लेखा लिपीकास दिले आहेत. त्यासाठी वेतन भत्ते, शासकिय देणी, विद्युत, दुरध्वनी, डिझेल खर्च, इतर कामांचा खर्च, इत्यादी बाबत रक्कम रु .5.25 लाख पर्यंतच्या प्रति काम खर्चाची मर्यादा घालुन दिली आहे . तसेच कोणत्याही कामाचे एकपेक्षा अधिक भाग करुन खर्च करता येणार नाही. स्थानिक संस्था कराचे काम पेल्हार कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहे. नगररचना विभाग, सॅटे लाईट सिटी योजना व मुख्यालयातील आस्थापानेचे व्यवहार बोळींज कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहेत. अपरिहार्य परिस्थिती खेरिज सर्व प्रदाने ई .सी.एस. व्दारे करावयाची आहेत . रुग्णालय व्यवस्थापनाचे काम वसई कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहे . मर्यादेत नसणारी सर्व प्रदाने मुख्य लेखाधिकारी व आयुक्त यांच्या संयुक्त स्वाक्षरीने करावयाची आहे.

वसई प्रभाग कार्यालयाचे लेखा विभागाच्या कामाचे लेखा परीक्षण केले . प्रभागाने सर्वसाधारण निधी , जल-मल प्रवाह निधी , निवृत्ती वेतन निधी , भविष्य निर्वाह निधी , परिभाषीत निधी, अनामत निधी यासाठी स्वतंत्र रोखवहया व स्वतंत्र बँक खती ठेवली आहेत . याबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 135, दिनांक 20/06/2016 अन्वये खुलासा विचारला होता . सहाय्यक आयुक्त, आस्थापना यांनी पत्र क्रमांक 325, दिनांक 24/06/2016 नुसार खुलासा केला आहे . सदर खुलासा विचारात घेवून लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

5) भविष्य निर्वाह निधी रोखवही दिनांक 31/03/2015 अखेरची शिल्लक रु.12502654.97

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम रु.	पासबुका नुसार रक्कम रु.	तफावत रु.

बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक 690710529	7502654.97	7581907	79252.03
गुंतवणूक	5000000	---	----
एकुण	12502654.97	------	79252.03

रोखवहीतील शिल्लक व बँकेतील पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही. तसेच दि. 31-3-2015 रोजी प्रभारी लेखापाल यांची स्वाक्षरी आहे. परंतु नियम 51 नुसार रोकडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन उपायुक्त यांनी स्वाक्षरी केली नाही.

प्रभाग कार्यालयाच्या क्षेत्रात असलेल्या उप विभाग म्हणजेच ग्रामपंचायत स्तरावरील 50 जुने कर्मचारी आहेत आणि ज्यांची नेमणुक दि.01/11/2005 पुर्वीची आहे. अशा जुन्या कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम परिगणीत केली नाही. सदरची रक्कम तत्कालीन ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामसेवक यांच्या संयुक्त खात्यावर शिल्लक होती . ग्रा.प. काळात अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना होती. नगरपालिका/ महानगरपालिका काळात अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना नाही . या ग्रामीण भागातील ग्रामपंचायती महापालिकेत समाविष्ठ करण्यांत येवू नये अशी याचिका न्यायप्रविष्ठ आहे. ग्रामीण कर्मचाऱ्याची भविष्य निर्वाह निधीची किती रक्कम महापालिकेस प्राप्त झाली याचा हिशेब लेखा परिक्षणास दाखविला नाही.

कर्मचाऱ्याना भविष्य निर्वाह निधीचे व्याज 2013-14 व 2014-15 मध्ये 8.70% दराने दयावे लागले आहे. परंतु बँकेतील मुदत ठेवीवर मिळणारे व्याज 7% च्या मर्यादेत आहे. व्याजाचे दरातील तफावत 1.70% आहे. या तफावती ची परिगणना केली नाही . वर्षभरात होणाऱ्या तफावतीच्या रकमेबाबत प्रशासनाने महापालिका सभागृहासमोर टिपणी सादर करुन सदरची रक्कम सभागृहाच्या मंजुरीने महानगरपालिका फंडातुन भ.नि.नि. खात्याकडे वर्ग करण्यासाठी प्रयत्न केले नाहीत.

6) निवृत्ती वेतन निधी दि.31/03/2015 अखेरची शिल्लक रु.1508439.95

बँकेचे नांव	रोखवहीतील	पासबुकानुसार	तफावत

	रक्कम रु.	रक्कम रु.	रु.
बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक 60090712005	1508439.95	590780	917659.95

7) परिभाषीत निधी दि.31/03/2015 अखेरची शिल्लक रु.11742799

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम रु.	पासबुकानुसार रक्कम रु.	तफावत रू.
बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक 600958551679	11742799	9445116	2297683

ग्रामपंचायतकालीन जुन्या कर्मचा -यांची (01-11-2005 नंतरची) परिभाषीक योजनेची शिल्लक परिगणीत करुन महापालिकेच्या किर्दीकडे ओढल्याचे दिसून आले नाही. तसेच या निधीतुन किती खर्च करावा लागणार आहे याची परिगणना प्रभागाने केली नाही . महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियमाचे कलम 92 नुसार शिलकी पैशाची गुंतवणूक करणे आवश्यक आहे . बचत खात्यात असलेली जादा रक्कम मुदत ठेवीमध्ये गुंतवणूक न केल्याने व्याजाचा लाभ झाला नाही.

8) अनामत निधी दि.31/03/2015 अखेरची शिल्लक रु.22363884

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम रु.	पासबुकानुसार रक्कम रु.	तफावत रु.
बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक 60090707561	12363884	12728984	365100

गुंतवणूक	10000000	---	----
एकुण	22363884		365100

महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 मधील नियम 190(3) नुसार 3 वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी न केलेल्या सर्व शिल्लकी रकमा प्रत्येक वर्ष अखेर व्यपगत करावयाच्या असून त्या "संकिर्ण - इतर बाबी- व्यपगत ठेवी" या शिर्षाखाली स्थानांतरीत करावयाच्या आहेत. तसेच नियम 190(4) नुसार महसुलात जमा केलेल्या ठेवी महापालिकेच्या मंजुरी विना परत करता येणार नाहीत . असे असतांना तीन वर्षापुवीच्या मागणी न केलेल्या ठेवीच्या रकमा व्यपगत केल्या नाहीत . (याबाबतचा सविस्तर आक्षेप परि. क्र.73 नुसार घेण्यांत आला आहे.)

9) जल-मल प्रवाह निधी दि.31/03/2015 अखेरची शिल्लक रु.6495177

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम रु.	पासबुकानुसार रक्कम रु.	तफावत रु.
बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक 60090707695	6495177	6359823	135354

रोखवहीतील शिल्लक व बँकेतील पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही . तसेच 31-3-2015 रोजी प्रभारी लेखापाल यांची स्वाक्षरी आहे . परंतु नियम 51 नुसार रोकडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन उपायुक्त यांनी स्वाक्षरी केली नाही.

10) सर्वसाधारण निधी दि.31/03/2015 अखेरची शिल्लक रु.57077964

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम रु.	पासबुकानुसार रक्कम रु.	तफावत रु.
बँक ऑफ महाराष्ट्र	52077964	78555365	26477401

खाते क्रमांक 60090705564			
गुंतवणूक	5000000	----	----
एकुण	57077964		26477401

रोखवहीतील शिल्लक व बँकेतील पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही. तसेच 31-3-2015 रोजी प्रभारी लेखापाल यांची स्वाक्षरी आहे. परंतु नियम 51 नुसार रोकडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन उपायुक्त यांनी स्वाक्षरी केली नाही.

11) दावे आणि खटले फी म्हणून पुढील खर्च केला आहे.

2013-14 रु.368000/-

2014-15 रु.979200/-

लेखापरीक्षण काळात लेखापरीक्षणाचे वेळी काही निवडक प्रमाणके तपासली असता त्यात श्री . दिगंबर देसाई, वकील यांना प्रमाणक क्रमांक 2053, दिनांक 23/03/2015 रक्कम रु.84600/- प्रदान केले आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम क्र .121 नुसार नमुना क्र .90 दावा, खटला पुस्तक ठेवायचे आहे आणि त्यात खटला चालविण्यासाठी दिलेल्या आगाऊ रकमा , कोर्टाच्या हुकुमनाम्यानुसार देय असलेल्या रकमांची वसुली व प्रदान दर्शवायचे आहे . परंतु याबाबतची नोंदवही उपलब्ध् झाली नाही. ब प्रभागात एकूण किती प्रकरणे न्यायालयात आहेत , त्यापैकी किती निकाल मनपाच्या बाजुने लागले, किती प्रलंबित आहेत, याबाबतचे अभिलेखे प्राप्त झाले नाहीत.

12) कार्यालयाचे काम करण्यासाठी आयुक्तांचे आदेशानुसार प्रभागात लेखापाल /वरिष्ठ लिपीकाची नेमणूक केली आहे . उपायुक्तांना प्रतिस्वाक्षरीचे अधिकार दिले आहेत . प्रभाग कार्यालयात रोखवही लिहीण्याचे काम लेखापालाने केले असुन त्याबाबत स्वाक्षरी केली आहे. सहाय्यक आयुक्तांना कोणतेही आर्थिक अधिकार दिले नाहीत . धनादेशावर लेखापाल व उपायुक्त सही करतात . महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता , 1971 चे

नियम क्रमांक 62(2) महिन्यातुन किमान एकदा तरी उपायुक्ताने रोकडवहीतील शिल्लक पडताळून पाहिली पाहिजे . परंतु वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये उपायुक्तांनी कधीही रोकडवहीतील शिल्लक पडताळून पाहिली नाही व स्वाक्षरी केली नाही. नियम 40 नुसार रोखवहीतील जमा व संवितरणे यांचा मेळ जमा खर्चाच्या मासिक गोषवा-याबरोबर घेतला नाही . नियम 51 नुसार रोखवहीतील लेखे बंद करुन त्याचा ताळमेळ घेतला नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु.1347200/-

DATPMVM6001 (Ref No : 102, Hmm No : 135)

89 नालासोपारा प्रभाग कार्यालयाचे कामकाजातील अनियमीतता...

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 07

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालय मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 3351100.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3351100.00/-

प्रभागात ग्रामपंचायत कालीन एकुण 64 कर्मचारी आहेत. त्यापैकी दिनांक 01/11/2005 पुर्वी नेमणूक झालेल्या जुन्या ग्रामपंचायत कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम परिगणीत केली नाही. भनिनि खातेवही नमुना क्रमांक 98 व बृहतपत्रक नमुना क्रमांक 99 उपलब्ध करुन दिले नाही. कर्मचा-यांना भ.नि.नि. शिल्लक रकमेवर दयाव्या लागणा-या व्याजापेक्षा योजनेच्या खाती असलेल्या शिलकी रकमेवर मिळणारे व्याज कमी आहे. भ.नि.नि., सेनिवृत्तीवेतन निधी, परिभाषित निधी, अनामत, जल मल प्रवास निधी, सर्वसाधारण निधी असे स्वतंत्र निधी ठेवले आहेत. परंतु रोखवहीतील शिल्लक व बँक पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ घेतला नाही. दावे आणि खटले यांचे अभिलेखे दाखविले नाहीत. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 मधील नियम 51 नुसार रोखवहीतील लेखे बंद करुन प्रत्येक महिनाअखेरचा ताळमेळ घेतला नाही.

आयुक्त, वसई - विरार शहर महानगरपालिका यांचेकडील आदेश क्र .आस्था/738/2012, दि.17/01/2012 अन्वये महानगरपालिकेच्या 5 प्रभाग समित्यांना लेखा विषयक अधिकार प्रदान

करण्यात आले आहेत . त्यानुसार प्रभाग समिती निहाय लेखा विषयक कामकाज पार पाडण्याकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 84(1) नुसार लेखापाल/वरिष्ठ लेखा लिपीक यांना प्राधिकृत करण्यात आले आहेत . तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील तरतुदीनुसार प्रभाग समितीचे संपुर्ण लेखा विषयक कामकाज प्रभाग समिती मार्फत पार पाडले जाईल . त्यासाठी मुख्य निधीतुन प्रत्येक प्रभागास वेळोवेळी ठराविक रक्कम वर्ग करण्यात आली आहे . प्रभाग समित्यांच्या अधिकाऱ्यांनी निधी निहाय स्वतंत्र लेखे ठेवायचे आहेत . बँक खात्याचे व्यवहार प्रभाग कार्यालयापुरते मर्यादित ठेवले आहेत . बँक खात्याचे व्यवहार करण्याचे अधिकार संबंधीत उपायुक्त व प्रभागाचा लेखापाल/वरिष्ठ लेखा लिपीकास दिले आहेत. त्यासाठी वेतन भत्ते, शासकिय देणी, विद्युत, दुरध्वनी, डिझेल खर्च, इतर कामांचा खर्च, इत्यादी बाबत रक्कम रु .5.25 लाख पर्यंतच्या प्रति काम खर्चाची मर्यादा घालुन दिली आहे . तसेच कोणत्याही कामाचे एकपेक्षा अधिक भाग करुन खर्च करता येणार नाही. स्थानिक संस्था कराचे काम पेल्हार कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहे. नगररचना विभाग, सॅटे लाईट सिटी योजना व मुख्यालयातील आस्थापानेचे व्यवहार बोळींज कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहेत. अपरिहार्य परिस्थिती खेरिज सर्व प्रदाने ई .सी.एस. व्दारे करावयाची आहेत . रुग्णालय व्यवस्थापनाचे काम वसई कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहे . मर्यादेत नसणारी सर्व प्रदाने मुख्य लेखाधिकारी व आयुक्त यांच्या संयुक्त स्वाक्षरीने करावयाची आहे.

नालासोपारा प्रभाग कार्यालयाचे लेखा विभागाच्या कामाचे लेखा परीक्षण केले . प्रभागाने सर्वसाधारण निधी, जल-मल प्रवाह निधी, निवृत्ती वेतन निधी, भविष्य निर्वाह निधी, परिभाषीत निधी, अनामत निधी यासाठी स्वतंत्र रोखवहया व स्वतंत्र बँक खाती ठेवली आहेत . याबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 143, दिनांक 24/06/2016 अन्वये खुलासा विचारला होता. सहाय्यक आयुक्त, आस्थापना यांनी पत्र क्रमांक 324, दिनांक 24/06/2016 नुसार खुलासा केला आहे . सदर खुलासा विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) भविष्य निर्वाह निधी रोखवही दिनांक 31/03/2015 अखेरची शिल्लक रु.1,15,33,868.60

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम	पासबुकानुसार रक्कम	तफावत रु.

	रु.	रु.	
इंडियन बँक खाते क्रमांक 6010652258	16,37,527.60	16,37,527.60	-
ठाणे जिल्हा म.स.बँक	3,96,341	3,96,341	पासबुक उपलब्ध् झाले नाही.
गुंतवणूक	95,00,000	---	----
एकुण	1,15,33,868.60	------	-

महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियमाचे कलम 92 नुसार शिलकी पैशाची गुंतवणूक करणे आवश्यक आहे. त्यानुसार बचत खात्यात असलेली रक्कम मुदत ठेवीमध्ये ठेवल्यास मिळणाऱ्या व्याजाचा लाभ होईल. रोखवहीतील शिल्लक व बँकेतील पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 नियम 40 व 51 नुसार प्रत्येक महिना अखेर घेतलेला नाही.

प्रभाग कार्यालयाच्या क्षेत्रात असलेल्या उप विभाग म्हणजेच ग्रामपंचायत स्तरावरील जे जुने कर्मचारी आहेत आणि ज्यांची नेमणुक दि .01/11/2005 पुर्वीची आहे. अशा जुन्या कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम, कर्मचारी महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्यानंतर हिशेबात घेतल्याचे दिसुन आले नाही. सदरची रक्कम तत्कालीन ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामसेवक यांच्या संयुक्त खात्यावर शिल्लक होती. ग्रा.प. काळात अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना होती . नगरपालिका/ महानगरपालिका काळात अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना नाही . या ग्रामीण भागातील ग्रामपंचायती महापालिकेत समाविष्ठ करण्यांत येवू नये अशी याचिका न्यायप्रविष्ठ आहे. ग्रामीण कर्मचाऱ्याची भविष्य निर्वाह निधीची किती रक्कम महापालिकेस प्राप्त झाली, याची परिगणना करुन अभिलेखे लेखा परिक्षणास दाखविले नाहीत.

कर्मचाऱ्याना भविष्य निर्वाह निधीचे व्याज 2013-14 व 2014-15 मध्ये 8.70% दराने दयावे लागले आहे. परंतु बँकेतील मुदत ठेवीवर मिळणारे व्याज 7% च्या मर्यादेत आहे . व्याजादरातील तफावत

1.70% आहे. या तफावती बाबत प्रभागाने / मुख्यालयाने कोणतीही कार्यवाही केली नाही . वर्षभरात होणाऱ्या तफावतीच्या रकमेबाबत प्रशासनाने महापालिका सभागृहासमोर टिपणी सादर करुन सदरची रक्कम सभागृहाच्या मंजुरीने महानगरपालिका फंडातुन भ .नि.नि. खात्याकडे वर्ग करण्यासाठी प्रयत्न केले नाहीत.

भ.नि.नि च्या रोखवहीत दि.31/03/2014 अखेर शिल्लक रु.90,06,708.60

दि.31/03/2014 रोजी मिळालेले व्याज _____ रु. 8,06,181.00

एकूण रु.98,12,889.60

परंतु रोखवहीत नविन वर्षाची सुरुवात करताना दि .01/04/2014 रोजी सुरुवातीची शिल्लक रु.96,43,316.60 दाखविली आहे. म्हणजेच रक्कम रु .1,69,573 कमी दाखवुन रोखवहीत व्यवहार लिहीले आहेत. याबाबत खुलासा केला नाही.

2) सेवा निवृत्ती वेतन निधी दि.31/03/2015 अखेरची शिल्लक रु.2,70,87,878

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम रु.	पासबुकानुसार रक्कम रु.	तफावत रु.
बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक 20023590695	1,85,812	-	-
इंडियन बँक खाते क्रमांक 6010653320	1,81,295		
गुंतवणूक	35,00,000 1,77,44,754 51,72,096 3,03,921		

एकूण	2,70,87,878		

उपरोक्त निधीची पासबुके लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिली नाहीत.

3) परिभाषीत निधी दि.31/03/2015 अखेरची शिल्लक रु.2,94,468

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम रु.	पासबुकानुसार रक्कम रु.	तफावत रु.
इंडियन बँक खाते क्रमांक 925211558	2,04,417	-	-
गुंतवणूक	90,051		
एकूण	2,94,468		

उपरोक्त निधीची पासबुके लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिली नाहीत.

परिभाषीक निधीच्या रोखवहीत दि .31/03/2014 रोजी अखेर शिल्लक रु .1,53,815 आहे. दि.01/04/2014 रोजी सुरुवातीची शिल्लक रु .1,84,315 दाखविली आहे. म्हणजेच रक्कम रु.30,500 जादा दाखविली आहे. याबाबत खुलासा केला नाही.

ग्रामपंचायतकालीन जुन्या कर्मचा-यांची परिभाषीक योजनेची शिल्लक परिगणीत करुन महापालिकेच्या किर्दीकडे ओढल्याचे दिसून आले नाही.

4) अनामत निधी दि.31/03/2015 अखेरची शिल्लक रु.50,29,059

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम रु.	पासबुकानुसार रक्कम रु.	तफावत रु.
इंडियन बँक खाते	29,059	13,059	16,000

क्रमांक 6010651152			
गुंतवणूक	50,00,000	---	----
एकुण	50,29,059		16,000

रोखवहीतील शिल्लक व बँकेतील पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 नियम 40 व 51 नुसार प्रत्येक महिना अखेर घेतलेला नाही.

महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 मधील नियम 190(3) नुसार 3 वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी न केलेल्या सर्व शिल्लकी रकमा प्रत्येक वर्ष अखेर व्यपगत करावयाच्या असून त्या "संकिर्ण - इतर बाबी- व्यपगत ठेवी" या शिर्षाखाली स्थानांतरीत करावयाच्या आहेत. तसेच नियम 190(4) नुसार महसुलात जमा केलेल्या ठेवी महापालिकेच्या मंजुरी विना परत करता येणार नाहीत . असे असतांना तीन वर्षापुवीच्या मागणी न केलेल्या ठेवीच्या रकमा व्यपगत केल्या नाहीत. (याबाबतचा सविस्तर आक्षेप परि. क्र.73 नुसार घेण्यांत आला आहे.)

5) जल-मल प्रवाह निधी दि.31/03/2015 अखेरची शिल्लक रु.72,93,088

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम रु.	पासबुकानुसार रक्कम रु.	तफावत रु.
इंडियन बँक खाते क्रमांक 6010647168	72,93,088	81,80,847	8,87,759

रोखवहीतील शिल्लक व बँकेतील पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 नियम 40 व 51 नुसार प्रत्येक महिना अखेर घेतलेला नाही.

6) सर्वसाधारण निधी दि.31/03/2015 अखेरची शिल्लक रु.2,05,97,110.20

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम	पासबुकानुसार रक्कम	तफावत रु.

	रु.	रु.	
इंडियन बँक खाते क्रमांक 6010648989	1,47,52,215	1,15,34,009	32,18,206
ॲक्सीस बँक खाते क्रमांक 912010013077056	58,44,895.20	33,28,769.20	25,16,126
एकुण	2,05,97,110.20		57,34,332

रोखवहीतील शिल्लक व बँकेतील पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 नियम 40 व 51 नुसार प्रत्येक महिना अखेर घेतला नाही.

7) दावे आणि खटले फी म्हणून पुढील खर्च केला आहे.

2013-14 रु.13,86,700

2014-15 रु.19,64,400

लेखापरीक्षण काळात लेखापरीक्षणाचे वेळी काही निवडक प्रमाणके तपासली असता त्यात श्री . अतुल दामले, वकील हायकोट मुंबई यांना प्रमाणक क्रमांक 1708 , दिनांक 26/03/2015 रक्कम रु.15,000/- प्रदान केले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम क्र.121 नुसार नमुना क्र.90 दावा, खटला पुस्तक ठेवायचे आहे आणि त्यात खटला चालविण्यासाठी दिलेल्या आगाऊ रकमा, कोर्टाच्या हुकुमनाम्यानुसार देय असलेल्या रकमांची वसुली व प्रदान दर्शवायचे आहे . परंतु याबाबतची नोंदवही उपलब्ध् झाली नाही. प्रभागात एकूण किती प्रकरणे न्यायालयात आहेत , त्यापैकी किती निकाल मनपाच्या बाजुने लागले, किती प्रलंबित आहेत, याबाबतचे अभिलेखे प्राप्त झाले नाहीत.

दावे/खटले, फी खर्चाचे अभिलेखे न दाखविलेली -

आक्षेपाधीन रक्कम रु.3351100/-

90 बोळींज प्रभाग कार्यालयाचे कामकाजाबाबत...

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 09

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालय मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1489100.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1489100.00/-

प्रभागात ग्रामपंचायत कालीन एकुण 84 कर्मचारी आहेत. त्यापैकी दिनांक 01/11/2005 पुर्वी नेमणूक झालेल्या जुन्या ग्रामपंचायत कर्मचा-यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम परिगणीत केली नाही. व अशी रक्कम महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास दाखविले नाहीत. त्यामुळे अशी रक्कम नमुद करता येत नाही. भनिनि खातेवही नमुना क्रमांक 98 व बृहतपत्रक नमुना क्रमांक 99 उपलब्ध करुन दिले नाही. कर्मचा-यांना भ.नि.नि. शिल्लक रकमेवर दयाव्या लागणा-या व्याजापेक्षा योजनेच्या खाती असलेल्या शिलकी रकमेवर मिळालेले व्याज कमी आहे. भ.नि.नि., सेनिवृत्तीवेतन निधी, परिभाषित निधी, जल मल प्रवास निधी, सर्वसाधारण निधी असे स्वतंत्र निधी ठेवले आहेत. परंतु रोखवहीतील शिल्लक व बँक पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ घेतला नाही. दावे आणि खटले यासाठी 2013-14 मध्ये रु.918200/- खर्च केला आहे, व 2014-15 मध्ये रु.570900/- खर्च केला असुन त्याचे अभिलेखे दाखविले नाहीत. पदाधिकारी व अधिका-यांना भ्रमणध्वनि सेवा/मोबाईल सिमकार्ड दिले असून अनुज्ञेय खर्चापेक्षा जादा झालेल्या बिलाची रक्कम रु.9714/- संबंधीतांकडून वसुल केली नाही. शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा जादा दराने जाहिरातीसाठी खर्च केला आहे. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 मधील नियम 51 नुसार रोखवहीतील लेखे बंद करुन प्रत्येक महिनाअखेरचा ताळमेळ घेतला नाही.

आयुक्त, वसई - विरार शहर महानगरपालिका यांचेकडील आदेश क्र .आस्था/738/2012, दि.17/01/2012 अन्वये महानगरपालिकेच्या 5 प्रभाग समित्यांना लेखा विषयक अधिकार प्रदान करण्यात आले आहेत . त्यानुसार प्रभाग समिती निहायक लेखा विषयक कामकाज पार पाडण्याकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 84(1) नुसार लेखापाल /वरिष्ठ लेखा लिपीक यांना प्राधिकृत करण्यात आले आहेत . तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील तरतुदीनुसार प्रभाग समितीचे संपुर्ण लेखा विषयक कामकाज प्रभाग समिती मार्फत पार पाडले जाईल . त्यासाठी मुख्य निधीतुन प्रत्येक प्रभागास वेळोवेळी ठराविक रक्कम वर्ग करण्यात आली आहे . प्रभाग समित्यांच्या अधिकाऱ्यांनी निधी निहाय स्वतंत्र लेखे ठेवायचे आहेत . बँक खात्याचे व्यवहार प्रभाग

कार्यालयापुरते मर्यादित ठेवले आहेत . बँक खात्याचे व्यवहार करण्याचे अधिकार संबंधीत उपायुक्त व प्रभागाचा लेखापाल/वरिष्ठ लेखा लिपीकास दिले आहेत. त्यासाठी वेतन भत्ते, शासकिय देणी, विद्युत, दुरध्वनी, डिझेल खर्च, इतर कामांचा खर्च, इत्यादी बाबत रक्कम रु .5.25 लाख पर्यंतच्या प्रतिकामाचे खर्चाची मर्यादा घालुन दिली आहे . तसेच कोणत्याही कामाचे एकपेक्षा अधिक भाग करुन खर्च करता येणार नाही. स्थानिक संस्था कराचे काम पेल्हार कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहे. नगररचना विभाग, सॅटे लाईट सिटी योजना व मुख्यालयातील आस्थापनेचे व्यवहार बोळींज कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहेत. अपरिहार्य परिस्थिती खेरिज सर्व प्रदाने ई .सी.एस. व्दारे करावयाची आहेत . रुग्णालय व्यवस्थापनाचे काम वसई कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहे . मर्यादेत नसणारी सर्व प्रदाने मुख्य लेखाधिकारी व आयुक्त यांच्या संयुक्त स्वाक्षरीने करावयाची आहेत.

बोळींज प्रभाग कार्यालयाचे लेखा विभागाच्या कामाचे लेखा परीक्षण केले असता प्रभागाने सर्वसाधारण निधी, जल-मल प्रवाह निधी , निवृत्ती वेतन निधी , भविष्य निर्वाह निधी , परिभाषीत निधी यासाठी स्वतंत्र रोखवहया व स्वतंत्र बँक खती ठेवली आहेत . याबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 144, दिनांक 24/06/2016 अन्वये खुलासा विचारला होता . प्रभागाने त्यांचा खुलासा दि.27/06/2016 केला. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

16) भविष्य निर्वाह निधी रोखवही दिनांक 31/03/2015 अखेरची शिल्लक रु.74,69,545.64

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम रु.	पासबुकानुसार रक्कम रु.	तफावत
इंडियन बँक खाते क्रमांक 6009866524	22,94,927	22,94,927	-
ठाणे जिल्हा	2,55,743.64	2,65,321.64	-9,578

मध्यावरती सहकारी बँक खाते क्रमांक 030/4976			
गुंतवणूक	49,18,875	---	----
एकुण	74,69,545.64	------	-9,578

रोखवहीतील शिल्लक व बँकेतील पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही. तसेच 31-3-2015 रोजी प्रभारी लेखापाल यांची स्वाक्षरी आहे. परंतु नियम 51 नुसार रोकडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन प्राधिकृत अधिका-याने स्वाक्षरी केली नाही.

प्रभाग कार्यालयाच्या क्षेत्रात असलेल्या उप विभाग म्हणजेच ग्रामपंचायत स्तरावरील जे जुने कर्मचारी आहेत आणि ज्यांची नेमणुक दि .01/11/2005 पुर्वीची आहे. महानगरपालिकेने अशा कर्मचा-यांची रक्कम परिगणीत करुन लेखापरीक्षणास दाखविली नाही . सदरची रक्कम तत्कालीन ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामसेवक यांच्या संयुक्त खात्यावर शिल्लक होती . ग्रा.प. काळात अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना होती . नगरपालिका/ महानगरपालिका काळात अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना नाही . या ग्रामीण भागातील ग्रामपंचायती महापालिकेत समाविष्ठ करण्यांत येवू नये अशी याचिका न्यायप्रविष्ठ आहे. ग्रामीण कर्मचाऱ्याची भविष्य निर्वाह निधीची किती रक्कम महापालिकेस प्राप्त झाली याचा हिशेब लेखा परिक्षणास दाखविला नाही.

कर्मचाऱ्याना भविष्य निर्वाह निधीचे व्याज 2013-14 व 2014-15 मध्ये 8.70% दराने दयावे लागले आहे. परंतु बँकेतील मुदत ठेवीवर मिळा लेले व्याज 7% च्या मर्यादेत आहे . व्याजदरातील तफावत 1.70% आहे. या तफावतीची परिगणना महानगरपालिकेने केलेली नाही . वर्षभरात होणाऱ्या तफावतीच्या रकमेबाबत प्रशासनाने महापालिका सभागृहासमोर टिपणी सादर करुन सदरची रक्कम सभागृहाच्या मंजुरीने महानगरपालिका फंडातुन भ.नि.नि. खात्याकडे वर्ग करण्यासाठी प्रयत्न केले नाहीत.

17) निवृत्ती वेतन निधी दि.31/03/2015 अखेरची शिल्लक रु.4611781.70

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम रु.	पासबुकानुसार रक्कम रु.	तफावत रु.
इंडियन बँक खाते क्रमांक 6009866068	127866.67	595127.67	-467261
विजया बँक खाते क्रमांक 505201010001362	503008	500956	2052
ठाणे जिल्हा मध्यावरती सहकारी बँक खाते क्रमांक 030/5715	11330.03	11330.03	-
गुंतवणूक	3969577		
एकूण	4611781.70		-465209

रोखवहीतील शिल्लक व बँकेतील पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही.

18) परिभाषीत निधी दि.31/03/2015 अखेरची शिल्लक रु.3117497

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम रु.	पासबुकानुसार रक्कम रु.	तफावत

इंडियन बँक खाते क्रमांक 6040746162	1117497	1117497	-
गुंतवणूक	2000000		
एकूण	3117497		-

महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 नियम 51 नुसार रोकडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन प्राधिकृत अधिका-याने स्वाक्षरी केली नाही.

ग्रामपंचायतकालीन जुन्या कर्मचा-यांची परिभाषीक योजनेची शिल्लक महानगरपालिकेने परिगणीत करुन किर्दीकडे ओढल्याचे दिसून आले नाही . बचत खात्यात असलेली रक्कम मुदत ठेवीमध्ये ठेवल्यास मिळणाऱ्या व्याजाचा लाभ होईल.

19) जल-मल प्रवाह निधी दि.31/03/2015 अखेरची शिल्लक रु.8869521.50

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम रु.	पासबुकानुसार रक्कम रु.	तफावत रु.
इंडियन बँक खाते क्रमांक 6009866954	3869521.50	1781040	2088481.50
गुंतवणूक	5000000		
एकूण	8869521.50		2088481.50

रोखवहीतील शिल्लक व बँकेतील पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता,

1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही. तसेच 31-3-2015 रोजी प्रभारी लेखापाल यांची स्वाक्षरी आहे . परंतु नियम 51 नुसार रोकडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन प्राधिकृत अधिका-याने स्वाक्षरी केली नाही.

20) सर्वसाधारण निधी दि.31/03/2015 अखेरची शिल्लक रु.32311621.39

बँकेचे नांव	रोखवहीतील रक्कम रु.	पासबुकानुसार रक्कम रु.	तफावत रु.
इंडियन बँक खाते क्रमांक 6009864210	5570997.03	4054229.03	1516768
इंडियन बँक खाते क्रमांक अनामत 6009864946	938024	946565	-8541
युनियन बँक खाते क्रमांक 410002010054204	22242968.87	31814722	-9571753.13
वसई विकास बँक पासबुक उपलब्ध् झाले नाही.	559631.49		
गुंतवणूक	3000000	----	----
एकुण	32311621.39		-8063526.13

रोखवहीतील शिल्लक व बँकेतील पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही. तसेच 31-3-2015 रोजी प्रभारी लेखापाल यांची स्वाक्षरी आहे . परंतु नियम 51 नुसार रोकडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन प्राधिकृत अधिका-याने स्वाक्षरी केली नाही.

21) दावे आणि खटले फी म्हणून पुढील खर्च केला आहे.

2013-14 रु.918200

2014-15 रु.570900

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम क्र .121 नुसार नमुना क्र .90 दावा, खटला पुस्तक ठेवायचे आहे आणि त्यात खटला चालविण्यासाठी दिलेल्या आगाऊ रकमा , कोर्टाच्या हुकुमनाम्यानुसार देय असलेल्या रकमांची वसुली व प्रदान दर्शवायचे आहे . परंतु याबाबतची नोंदवही उपलब्ध् झाली नाही. प्रभागात एकूण किती प्रकरणे न्यायालयात आहेत, त्यापैकी किती निकाल मनपाच्या बाजुने लागले, किती प्रलंबित आहेत, याबाबतचे अभिलेखे प्राप्त झाले नाहीत.

22) महानगरपालिकेच्या पदाधिकारी व अधिकाऱ्यांना भ्रमणध्वनी सेवा / मोबाईल सिमकार्ड देणेबाबत स्थायी समिती ठराव क्र .12 दि.01/06/2011 अन्वये मंजूरी दिली आहे . दैनंदिन कामासाठी अधिकारी, पदाधिकारी व अत्यावश्यक सेवेतील क्षेत्रीय कर्मचारी एकमेकांच्या संपर्कात राहण्यासाठी ही सेवा उपलब्ध् करून देण्यांत आली आहे . त्यासाठी आयडीया सोल्युशन लिमीटेड यांच्याकडुन सिमकार्ड सेवा उपलब्ध करुन दिली आहे . आयडीया मोबाईल सेवा प्रति महा रु .149 मासिक भाडयाचा सी.यु.जी प्लॅन घेण्यात आला आहे. तसेच जादा होणाऱ्या खर्चाचे बिल संबंधीताने भरावयाचे ठरावात नमुद केले आहे.

लेखापरीक्षणाचे वेळी काही निवडक प्रमाणके तपासता - संबंधीत अधिकारी व पदाधिकारी यांनी वित्तीय मंजूरीपेक्षा जादा खर्चाची मोबाईल सेवा वापरली आहे . परंतु जादा होणाऱ्या बिलाच्या खर्चाची रक्कम संबंधीताकडून वसूली केली नाही. त्याचा उदा. तपशिल

प्रमाणक क्र. 2093 दि.11/03/2014 रु.33431 मे.आडीया सोल्युशन लि. यांना 52 कर्मचाऱ्याचा मोबाईल खर्चाचे प्रदान.

नाव	वापरलेल्या मोबाईल सेवेच्या देयकाची रक्कम रु.	देय खर्चाची रक्कम ठ .क्र.12 दि.01/06/2011	जादा खर्च रु.
श्री.उमेश धोडी फायरमन	2680.63	149	2531.63
श्रीमती.संगीता	575.43	149	426.43

घाडीगावकर लिपीक			
श्री.अविनाश पारेख लिपीक	1014.84	149	865.84
श्री.अशोक मांद्रे व.लि.	1054.50	149	905.50
श्री.मोहन संख्ये लिपीक	795.73	149	646.73

प्र.क्र.3948 दि.31/03/2016 रु.37981 मे.आडीया सोल्युशन लि.

यांना 66 कर्मचाऱ्याचा

मोबाईल खर्चाचे प्रदान.

नाव	वापरलेल्या मोबाईल सेवेच्या देयकाची रक्क्म	देय्य खर्चाची रक्कम ठ .क्र.12 दि.01/06/2011	जादा खर्च रु.
श्री.उमेश धोडी फायरमन	2720	149	2521
श्रीमती.संगीता घाडीगावकर लिपीक	1164.61	149	1015.61
श्री.अविनाश पारेख लिपीक	950.34	149	801.34

अशा प्रकारे अनुज्ञेय खर्चापेक्षा जादा झालेल्या खर्चाबाबत महानगरपालिका मुख्य लेखा परीक्षकाकडून देयकांची तपासणी करुन जादा खर्चाची रक्कम निश्चित करुन वसुल करणे आवश्यक आहे.

23) पुढील प्रमाणकाव्दारे वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यासाठी खर्च केला आहे . जाहिरातीचे शासन मान्य दर (माहिती व जन संपर्क विभाग) उपलब्ध झाले नाहीत. शासनाने ठरवुन दिलेल्या दरापेक्षा जादा दराने केलेले प्रदान वसुलपात्र आहे.

प्रमाणक क्र. दिनांक रक्कम तपशिल

2065 06/03/2014 268112 मे.मयुरेश पब्लीकेशन
जाहिरात Times of India
104 x दर 2578 =
268112

24) कार्यालयाचे काम करण्यासाठी आयुक्तांचे आदेशानुसार प्रभागात लेखापाल /वरिष्ठ लिपीकाची नेमणूक केली आहे. उपायुक्तांना प्रतिस्वाक्षरीचे अधिकार दिले आहेत. प्रभाग कार्यालयात रोखवही लिहीण्याचे काम लेखापालाने केले असुन त्याबाबत स्वाक्षरी केली आहे . सहाय्यक आयुक्तांना कोणतेही आर्थिक अधिकार दिले नाहीत . धनादेशावर लेखापाल व उपायुक्त सही करतात. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता , 1971 चे नियम क्रमांक 62(2) महिन्यातुन किमान एकदा तरी उपायुक्ताने रोकडवहीतील शिल्लक पडताळून पाहिली पाहिजे . परंतु वित्तीय वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये उपायुक्तांनी कधीही रोकडवहीतील शिल्लक पडताळून पाहिली नाही व स्वाक्षरी केली नाही . नियम 40 नुसार रोखवहीतील जमा व संवितरणे यांचा मेळ जमा खर्चाच्या मासिक गोषवा -याबरोबर घेतला नाही . नियम 51 नुसार रोखवहीतील लेखे बंद करुन त्याचा ताळमेळ घेतला नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु.1489100

DATBBPM6301 (Ref No : 104, Hmm No : 144)

91 केंद्र शासनाचे सॅट लाईट सिटींना पायभुत सुविधा निर्माण करणे- भुयारी गटार मलनिसा:रण योजनेच्या कामातील अनियमीतता

U.I.DS अंर्तगत भुयारी गटारी योजना.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 07

लेखा शीर्ष :नगररचना केंद्र, राज्य, मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 162374604.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 114093372.00/-

या कामासाठी दिलेल्या रु.114093372/- मोबिलायझेशन अग्रीमासाठी घेतलेली रु. 114093372/- ची बँक गॅरंटी व तिची विधीग्राहयता लेखापरीक्षणास दाखविली नाही. प्रकल्पाच्या अंमलबजावणीतुन काय साध्य झाले याचा अहवाल शासनास पाठविला नाही. प्राप्त अनुदानानुसार खर्च रु.162374604/- चे विनीयोग प्रमाणपत्र शासनास

पाठविले नाही. अखर्चित रकमेवरील प्राप्त व्याजाची रक्कम रु.37,10,710/- शासनास कळविली नाही. कामाचे देयकातुन सुरक्षा अनामतीची 5% रक्कम रु.1258532/- पुढील काळात वसुल केली नाही व त्याबाबतची बँक गॅरंटी रु. 1258532/- लेखापरीक्षणास दाखविली नाही. मोजमाप पुस्तकात नोंदी प्रचलित पध्दतीनुसार घेतल्या नाहीत. कामाची नोंद नमुना क्रमांक 139 मध्ये घेतलेली नाही.

केंद्र शासनाने सॅटेलाईट सिटींना पायाभुत सुविधा पुरविणे अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेची निवड झाली असुन महापालिकेने नोडल एजन्सी मार्फत विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन राज्य शासना मार्फत केंद्र शासनाकडे पाठविला होता. केंद्र शासनाने घनकचरा व्यवस्थापन व भुयारी गटार मलनिसा:रण योजनेच्या कामास मंजुरी दिली आहे. या योजने अंतर्गत मिळणारे अनुदान- केंद्र हिस्सा 80%, राज्य हिस्सा 10%, मनपा हिस्सा 10% या प्रमाणे आहे. या कामासाठी पुढील दर्शविल्याप्रमाणे अनुदान मिळाले असुन महापालिकेने खर्च केला आहे.

भुयारी गटार मलनिसा:रण रक्कम रु.(हजारात)

अनुदान	31/3/2013 पर्यंत प्राप्त झालेले	2013-14	2014-15	31/03/15 पर्यंत एकूण	खर्च	2012-13 पर्यंत खर्च झालेले	2013-14	2014-15	एकूण 31/3/2015 पर्यंत
भुयारी गटार मल निस:रण					भुयारी गटार मलनिस:रण				
केंद्र हिस्सा	132452	-	-	132452	सल्लागार समिती सदस्य मानधन	300	6858	955	8113
राज्य हिस्सा	16556	-	-	16556	मे.घारपुरे इं.	114093	162375	699919	976387
मनपा हिस्सा	16556	207687	685253	909496	मे.टंडन अर्बन प्रकल्प सल्लागार	11443	27966	9700	49109
					रेल्वे-परवाना	-	-	722	722
एकूण	165564	207687	685253	1058504	एकूण	125836	197199	711296	1034331

कामाचे नाव-: भुयारी गटार योजना संकलन प्रणाली, प्रक्रीया केंद्र आणि पुनर्वापर, कार्यान्वय आणि

देखभाल-दुरुस्ती टप्पा 1 व टप्पा 2 विरार.

प्राकलन -: रु.100.65 कोटी. सुधारित रु.131.64 कोटी.

प्रशासकिय मंजुरी -: प्रशासकीय ठराव क्र.290 दि.15/03/2010

महासभा ठराव 15, दि.20/12/2010.

तांत्रिक मंजुरी -: नगर अभियंता (Item Rate, Turnkey Estimate)

सुधारित मंजुरी दि.12/07/2012

निविदा तारिख -: दि.20/03/2012 महाराष्ट्र टाईम्स, सकाळ, इंडियन एक्सप्रेस.

एल-1 निविदा -: मे. घारपुरे इंजिनियअरिंग ॲण्ड कंन्सक्ट्रशन प्रा.लि.पुणे

महापालिकेच्या प्रकल्प खर्च रु.131.64 कोटी पेक्षा 8.9% जादा दराने मंजुर.

त्यामुळे होणारा खर्च रु.153.84 कोटी.

करार-: दि.26/03/2013

कार्यादेश-: क्र.वशिशम/सॅसे/280/2012-13, दि.26.03.13

मुदत :- 25-03-2015 पर्यंत

मुदतवाढ :- 31-12-2015 (स्थायी समिती ठराव 477, दिनांक 10-05-2015)

31-05-2016 (स्थायी समिती ठराव 278, दिनांक 09-03-2016)

कामाची स्थिती-: काम अपुर्ण

खर्च-: 31.03.2013 पर्यत रु.11,40,93 हजार

2013-14 मधील रु.16,23,75 हजार

एकूण रु.27,64,68 हजार

मे.घारपुरे इंजिनिअरींग (लेखा परिक्षण कालावधीत पुढील प्रमाणकाव्दारे खर्च केला आहे)

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	मोबीलाईझेशन मु.वसुली रु.	मोबीलाईझेशन व्याज वसुली रु.	तपशिल
16	10/09/13	1,89,14,955	-	-	M.B.no.325,P-01 ते 03
39	21/12/13	4,30,61,430	-	6,44,000	M.B.no.325,P-04 ते 11
52	28/02/14	7,52,27,585		56,31,135	--//--
58	29/03/14	2,51,70,634		71,99,919	M.B.no.325,P-12 ते 29
एकूण		16,23,74,604	-	1,34,75,054	

वसई विरार महानगरपालिकेने भुयारी गटार योजनेचा एकूण रु.557 कोटीचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविला होता. अपुऱ्या निधिमुळे केंद्र शासनाने STP 2 साठी रु.66.22 कोटीचा प्रस्ताव मंजुर केला

व घनकचरा व्यवस्थापनचा रु.31.72 कोटीचा प्रस्ताव मंजुर केला. महानगरपालिकेने STP 1 व 2 चे काम प्रथम हाती घेतले. शासनाच्या अनुदानापेक्षा जादा होणारा खर्च महापालिका निधीतुन करण्याबाबत स्थायी समिती ठराव क्र.1020 दि.12/03/2013 अन्वये महासभेने मंजुरी दिली आहे. या कामाबाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.24 दि.05.03.2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाचे पत्र क्र. निरंक दि.05/04/2016 अन्वये दिलेला खुलासा विचारात घेता लेखा परिक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

(मागील लेखा परिक्षण अहवाल 2012-13 मधील परिच्छेद क्र.25)

1) या कामासाठी ठेकेदारास दि.30/03/2013 रोजी मोबीलाईझेशन अग्रिम रु.11,40,93,372 दिले आहे. (10%) हे अग्रिम देण्यासाठी महानगरपालिकेने संबंधिताकडून बँक गॅरंन्टी घेतल्याचे विभागाच्या दिनांक 05-04-2016 रोजीच्या खुलाशानुसार समजते. परंतु सदरच्या बँक गॅरंटीची विधी- ग्राह्यता तपासुन पाहण्यासाठी संबधित अभिलेखे लेखा परीक्षणास दाखविले नाहीत. निविदा भाग-1 सर्वसाधारण अट क्रमांक 14.2 नुसार मोबिलायझेशन अग्रीम व्याजासह देण्याची तरतूद आहे. त्यानुसार ठेकेदाराच्या देयकातुन अग्रीमाची रक्कम वसुल करायची आहे. 31/03/2014 पर्यंत सदरच्या अग्रिमाची वसुली केलेली दिसून येत नाही. मात्र व्याजाची रक्कम रु.1,34,75,054 संबंधित ठेकेदाराचे देयकातुन वसुल केली आहे. सबब मोबिलायझेशन अग्रिमाची रक्कम रु.11,40,93,372 वसुलपात्र आहे. तसेच त्यावरील व्याजाची होणारी रक्कम वसुलपात्र आहे.

2) योजनेचे प्राप्त अनुदाना बाबत-शासन निर्णय क्र.यु.आय.डी.-2013, प्र.क्र.244(1)/नवि33, दि.21/02/2014 व शासन निर्णय क्र.यु.आय.डी.-2013, प्र.क्र.244(2)/नवि33 दि.21/02/2014 नुसार प्रस्तुत योजने अंर्तगत प्रकल्पांची अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर या योजनेतुन काय साध्य झाले,) योजनेचे प्राप्त अनुदाना बाबत-शासन निर्णय क्र.यु.आय.डी.-2013, प्र.क्र.244(1)/नवि33, दि.21/02/2014 व शासन निर्णय क्र.यु.आय.डी.-2013, प्र.क्र.244(2)/नवि33 दि.21/02/2014 नुसार प्रस्तुत योजने अंर्तगत प्रकल्पांची अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर या योजनेतुन काय साध्य झाले, या बाबतचा अहवाल नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी- राज्य शासन व केंद्र शासनास सादर करावयाचा आहे. त्यानुसार प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर कार्यवाही करावी.

3) ही केंद्र राज्य पुरस्कृत योजना असल्याने प्राप्त अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र केंद्र राज्य शासनास पाठवणे बंधनकारक आहे, असे शासन निर्णय क्रमांक युआयडी-2012/प्र.क्र.68/नवि-33, दिनांक 31-03-2012 मधील क्रमांक 3 मध्ये नमुद आहे. परंतु अनुदानातुन खर्च केलेली रक्कम रु.162374604/- चे विनियोग प्रमाणपत्र शासनास पाठविलेले नाही.

4) उपसचिव (NURM-1) नवी दिल्ली यांचे कार्यालयीन ज्ञापन आदेश (मेमोरेंडम) No.k-14012/46/2012-NURM-1GOI Dt. 7th Mar 2013 अन्वये - अ) प्रकल्पास वितरीत केलेला निधी अखर्चित राहीला व त्यावर व्याज जमा झाल्यास त्याची माहीती केंद्रास कळविणे आवश्यक आहे. व्याजाच्या रकमेचे समायोजन पुढील निधी वितरीत करताना केले जाणार आहे. ज्या प्रकल्पास निधी

वितरीत करणे बाकी नाही, परंतु व्याजाची रक्कम जमा झाली आहे. त्याचा परतावा केंद्र शासनास करावा लागणार आहे.

ब) प्रकल्प कार्यान्वीत होऊ शकले नाहीत व निधी अखर्चित पडून आहे, त्यावर 9.5% दराने व्याज आकारुन ते केंद्रास परत करण्याची जबाबदारी मनपाची राहील.

क) अपूर्ण प्रकल्पाचे उत्तर दायित्व मनपाचे असेल.

ड) प्रकल्प राबवितांना Financial/procurement नियमांचे मनपाने काटेकोरपणे पालन करावे.

या योजनेची रोखवही तपासता 2013-14 या वर्षात एकूण व्याजाची रक्कम रु. 37,10,710/- प्राप्त झाली आहे. परंतु याची माहिती केंद्र शासनास कळविली नाही. सदरचे व्याजाची रक्कम केंद्र शासनास परत करावी लागेल किंवा त्याचे समायोजन पुढील निधी वितरीत करताना केले जाणार आहे.

5) या कामाचे बाबत ठेकेदाराचे देयकातून सुरक्षा अनामत म्हणून 5% रक्कम सुरवातीला वसुल केली होती. त्यानंतरच्या कालावधीमध्ये सुरक्षा अनामत रक्कम रु.1258532/- वसुल केली नाही. याबाबत लेखा परिक्षणाच्या वेळी चर्चा केली असता, ठेकेदाराने बँक गॅरंटी दिल्याने अनामत रक्कम वसुल केली नाही, असे सांगण्यात आले. परंतु बँक गॅरेंटी व तिची विधी गाह्यता लेखा परीक्षणास दाखविली नाही.

6) मे.घारपुरे यांनी सादर केलेली निविदा रक्कम रु.153.84 कोटीची असल्याने महापालिकेने सुधारीत प्राकलन रु.131.64 कोटीचे केले. महापालिकेने प्राकलनाच्या 8.9% जादा दराने निविदा मंजुर केली आहे. परंतु मोजमाप पुस्तकामध्ये नोंदी घेताना, त्यांना दाखवलेला दर हा प्राकलन दर नमूद करुन एकूण होणाऱ्या रक्कमेवर 8.9% जादा दर दाखवून, होणाऱ्या एकूण रक्कमेतून नियमित वजाती केल्यानंतर निव्वळ प्रदान करावयाचे आहे. असे असताना मोजमाप पुस्तकात देकार रक्कमेचा दर (ठेकेदाराने सादर केलेला दर) दाखवून प्रदान केले आहे. म्हणजेच मोजमाप पुस्तकात नोंदी प्रचलित पध्दतीनुसार घेतल्या नाहीत.

7) कामास दिनांक 31-05-2016 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. लेखा परीक्षण काळात काम अपूर्ण आहे. काम पूर्ण झाल्यानंतर त्याच्या खर्चाच्या तपशिलवार नोंदी- महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम 182(1) नुसार नमुना नं.139 मधील नोंदवहीत घेवून पुढील लेखापरीक्षणास दाखवावे.

वसुलपात्र मोबिलायझेशन अग्रिमाची रक्कम रु.11,40,93,372

DATPMVM6001 (Ref No : 5, Hmm No : 24)

92 केंद्र शासनाचे सॅट लाईट सिटींना पायभुत सुविधा निर्माण करणे- भुयारी गटार मलनिसा:रण योजनेच्या कामातील अनियमीततेबाबत

U.I.DS अंतर्गत भुयारी गटारी योजना.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 07

लेखा शीर्ष :नगररचना केंद्र, राज्य, मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 699919414.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 699919414.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 191857.00/-

या कामासाठी दिलेल्या मोबिलायझेशन अग्रीम रु.114093372/- साठी घेतलेली रु.114093372/- ची बँक गॅरंटी व तिची विधीग्राहयता लेखापरीक्षणास दाखविली नाही. अग्रीमावरील व्याजाची रक्कम रु.191857/- वसुलपात्र. प्रकल्पाच्या अंमलबजावणीतुन काय साध्य झाले याचा अहवाल शासनास पाठविला नाही. प्राप्त अनुदानानुसार खर्च रु.699919414/- चे विनीयोग प्रमाणपत्र शासनास पाठविले नाही. अखर्चित रकमेवरील प्राप्त व्याजाची रक्कम शासनास कळविणे आवश्यक आहे, परंतु प्राप्त व्याजाची नोंद रोखवहीत नाही. कामाचे देयकातुन सुरक्षा अनामतीची 5% रक्कम रु.4548914/- वसुल केली नाही व त्याबाबतची बँक गॅरंटी दाखविली नाही. मोजमाप पुस्तकात नोंदी प्रचलित पध्दतीनुसार घेतल्या नाहीत. कामाची नोंद नमुना क्रमांक 139 मध्ये घेतलेली नाही.

केंद्र शासनाने सॅटेलाईट सिटींना पायाभुत सुविधा पुरविणे अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेची निवड झाली असुन महापालिकेने नोडल एजन्सी मार्फत विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन राज्य शासना मार्फत केंद्र शासनाकडे पाठविला होता. केंद्र शासनाने घनकचरा व्यवस्थापन व भुयारी गटार मलनिसा:रण योजनेच्या कामास मंजुरी दिली आहे. या योजने अंतर्गत मिळणारे अनुदान- केंद्र हिस्सा 80%, राज्य हिस्सा 10%, मनपा हिस्सा 10% या प्रमाणे आहे. या कामासाठी पुढील दर्शविल्याप्रमाणे अनुदान मिळाले असुन महापालिकेने खर्च केला आहे.

भुयारी गटार मलनिसा:रण रक्कम रु.(हजारात)

अनुदान	31/3/2013 पर्यंत प्राप्त झालेले	2013-14	2014-15	31/03/15 पर्यंत एकूण	खर्च	2012-13 पर्यंत खर्च झालेले	2013-14	2014-15	एकूण 31/3/2015 पर्यंत
भुयारी गटार मल निस:रण					भुयारी गटार मलनिस:रण				
केंद्र हिस्सा	132452	-	-	132452	सल्लागार समिती सदस्य मानधन	300	6858	955	8113

राज्य हिस्सा	16556	-	-	16556	मे.घारपुरे इं.	114093	162375	699919	976387
मनपा हिस्सा	16556	207687	685253	909496	मे.टंडन अर्बन प्रकल्प सल्लागार	11443	27966	9700	49109
					रेल्वे-परवाना	-	-	722	722
एकूण	165564	207687	685253	1058504	एकूण	125836	197199	711296	1034331

कामाचे नाव- भुयारी गटार योजना संकलन प्रणाली, प्रक्रीया केंद्र आणि पुनर्वापर,
कार्यान्वय आणि देखभाल दुरुस्ती टप्पा 1 व टप्पा 2 विरार.

प्राकलन -: रु.100.65 कोटी. सुधारित रु.131.64 कोटी.

प्रशासकिय मंजुरी -: प्रशासकीय ठराव क्र.290 दि.15/03/2010
महासभा ठराव 15, दि.20/12/2010.

तांत्रिक मंजुरी -: नगर अभियंता (Item Rate, Turnkey Estimate)
सुधारित मंजुरी दि.12/07/2012

निविदा तारिख -: दि.20/03/2012 महाराष्ट्र टाईम्स, सकाळ, इंडियन एक्सप्रेस.

एल-1 निविदा -: मे. घारपुरे इंजिनियअरिंग ॲण्ड कंस्ट्रक्शन प्रा.लि.पुणे
महापालिकेच्या प्रकल्प खर्च रु.131.64 कोटी पेक्षा 8.9% जादा दराने मंजुर.
त्यामुळे होणारा खर्च रु.153.84 कोटी.

करार-: दि.26/03/2013

कार्यादेश-: क्र.वशिशम/सॅसे/280/2012-13, दि.26.03.13

मुदत :- 25-03-2015 पर्यंत

मुदतवाढ :- 31-12-2015 (स्थायी समिती ठराव 477, दिनांक 10-05-2015)
31-05-2016 (स्थायी समिती ठराव 278, दिनांक 09-03-2016)

कामाची स्थिती-: काम अपुर्ण

खर्च-: 31.03.2014 पर्यत रु. 27,64,68 हजार
2014-15 मधील रु. 69,99,19 हजार
एकूण रु. 97,63,87 हजार

मे.घारपुरे इंजिनिअरींग (लेखा परिक्षण कालावधीत पुढील प्रमाणकाव्दारे खर्च केला आहे)

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	मोबीलाईझेशन मु.वसुली रु.	मोबीलाईझेशन व्याज वसुली	तपशिल

				रु.	
04	02/05/14	4,71,74,124		7,13,084	325,P-30 ते 45
09	03/06/14	5,43,62,645			325,P-46 ते 71
22	07/08/14	6,35,07,156	1,00,00,000		325,P-72 ते 91
30	22/08/14	1,80,99,361			Escalation-1 325,P-92 ते 97
34	06/09/14	5,14,74,812	1,28,68,703		326,P-01 ते 22
38	10/10/14	5,76,15,451	1,44,03,870	21,97,996	326,P-23 ते 69
43	07/11/14	39,19,735			व्याजाची जादा वसुली रक्कम परत
44	11/11/14	2,80,36,544			Escalation-2, M.B.no.327 P-1ते 08
56	20/12/14	5,33,95,077	1,33,48,769	9,37,608	326,P-62 ते 86
63	05/01/15	4,95,13,818	1,23,78,455	16,14,837	326,P-87 ते 100 148 P-01 ते 20
67	21/01/15	2,74,67,958	68,66,990	7,53,769	148,P-21 ते 46
71	13/02/15	6,18,53,564	1,54,63,391	5,25,708	148,P-47 ते 73
75	10/03/15	2,22,79,294			Escalation-3, M.B.no.327 P-09ते 17
79	23/03/15	7,02,41,595	1,75,60,399	3,30,310	148,P-74 ते 100
83	31/03/15	9,09,78,280	1,12,02,795		149,P-01 ते 53
एकुण		69,99,19,414	11,40,93,972	70,73,312	

वसई विरार महानगरपालिकेने भुयारी गटार योजनेचा एकूण रु.557 कोटीचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविला होता. अपुऱ्या निधिमुळे केंद्र शासनाने STP 2 साठी रु.66.22 कोटीचा प्रस्ताव मंजुर केला व घनकचरा व्यवस्थापनचा रु.31.72 कोटीचा प्रस्ताव मंजुर केला. महानगरपालिकेने STP 1 व 2 चे काम प्रथम हाती घेतले. शासनाच्या अनुदानापेक्षा जादा होणारा खर्च महापालिका निधीतुन करण्याबाबत स्थायी समिती ठराव क्र.1020 दि.12/03/2013 अन्वये महासभेने मंजुरी दिली आहे. या

कामाबाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.24 दि.05.03.2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाचे पत्र क्र. निरंक दि.05/04/2016 अन्वये दिलेला खुलासा विचारात घेता लेखा परिक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

(मागील लेखा परिक्षण अहवाल 2012-13 मधील परिच्छेद क्र.25)

1) या कामासाठी ठेकेदारास दि.30/03/2013 रोजी मोबीलाईझेशन अग्रिम रु.11,40,93,372 दिले आहे. (10%) हे अग्रिम देण्यासाठी महानगरपालिकेने संबंधिताकडून रु.114093372/- बँक गॅरंन्टी घेतल्याचे विभागाने केलेल्या दिनांक 05-04-2016 रोजीच्या खुलाशानुसार समजते. परंतु सदरच्या बँक गॅरंटीची विधी- ग्राह्यता तपासुन पाहण्यासाठी संबधित अभिलेखे लेखा परीक्षणास दाखविले नाहीत. निविदा भाग-1 सर्वसाधारण अट क्रमांक 14.2 नुसार मोबिलायझेशन अग्रीम व्याजासह देण्याची तरतूद आहे. 31/03/2015 पर्यंत सदरच्या अग्रिमाची पूर्ण वसुली केलेली आहे. व्याजाची रक्कम 2014-15 मध्ये रु.70,73,312/- संबंधित ठेकेदाराचे देयकातुन वसुल केली आहे. विभागाने ठेवलेल्या नोंदवहीनुसार 31-03-2015 पर्यंत व्याजाची रक्कम रु.1,91,857/- वसुलपात्र आहे.

2) योजनेचे प्राप्त अनुदाना बाबत-शासन निर्णय क्र.यु.आय.डी.-2013, प्र.क्र.244(1)/नवि33 दि.21/02/2014 व शासन निर्णय क्र.यु.आय.डी.-2013, प्र.क्र.244(2)/नवि33 दि.21/02/2014 नुसार प्रस्तुत योजने अंर्तगत प्रकल्पांची अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर या योजनेतुन काय साध्य झाले, या बाबतचा अहवाल नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी- राज्य शासन व केंद्र शासनास सादर करावयाचा आहे. त्यानुसार प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर कार्यवाही करावी.

3) ही केंद्र राज्य पुरस्कृत योजना असल्याने प्राप्त अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र केंद्र राज्य शासनास पाठवणे बंधनकारक आहे. परंतु अनुदानाच्या खर्च रु.669919414/- चे विनियोग प्रमाणपत्र शासनास पाठविलेले नाही.

4) उपसचिव (NURM-1) नवी दिल्ली यांचे कार्यालयीन ज्ञापन आदेश (मेमोरेंडम) No.k-14012/46/2012-NURM-1GOI Dt.7th Mar 2013 अन्वये - अ) प्रकल्पास वितरीत केलेला निधी अखर्चित राहीला व त्यावर व्याज जमा झाल्यास त्याची माहीती केंद्रास कळविणे आवश्यक आहे. व्याजाच्या रकमेचे समायोजन पुढील निधी वितरीत करताना केले जाणार आहे. ज्या प्रकल्पास निधी वितरीत करणे बाकी नाही, परंतु व्याजाची रक्कम जमा झाली आहे. त्याचा परतावा केंद्र शासनास करावा लागणार आहे.

ब) प्रकल्प कार्यान्वीत होऊ शकले नाहीत व निधी अखर्चित पडून आहे, त्यावर 9.5% दराने व्याज आकारुन ते केंद्रास परत करण्याची जबाबदारी मनपाची राहील.

क) अपूर्ण प्रकल्पाचे उत्तर दायित्व मनपाचे असेल.

ड) प्रकल्प राबवितांना Financial/procurement नियमांचे मनपाने काटेकोरपणे पालन करावे.

या योजनेची रोखवही तपासता 2014-15 या वर्षात एकूण व्याजाची रक्कम प्राप्त झाल्याची नोंद नाही. व्याज प्राप्त झाल्यास त्याची माहिती केंद्र शासनास कळविणे आवश्यक आहे. प्राप्त व्याजाची

रक्कम केंद्र शासनास परत करावी लागेल किंवा त्याचे समायोजन पुढील निधी वितरीत करताना केले जाणार आहे.

5) या कामाचे बाबत ठेकेदाराचे देयकातून सुरक्षा अनामत म्हणून 5% रक्कम ऑगस्ट 2014 पर्यंत वसुल केली होती. त्यानंतरच्या कालावधीमध्ये सुरक्षा अनामत रक्कम वसुल केली नाही. याबाबत लेखा परिक्षणाच्या वेळी चर्चा केली असता, ठेकेदाराने बँक गॅरंटी दिल्याने अनामत रक्कम वसुल केली नाही, असे सांगण्यात आले. परंतु बँक गॅरेंटी व तिची विधी गाहयता लेखा परीक्षणास दाखविली नाही.

6) मे. घारपुरे यांनी सादर केलेली निविदा रक्कम रु.153.84 कोटीची असल्याने महापालिकेने सुधारीत प्राकलन रु.131.64 कोटीचे केले. असे निविदा मंजुर टीपणीनुसार दिसून येते. महापालिकेने प्राकलनाच्या 8.9% जादा दराने निविदा मंजुर केली आहे. परंतु मोजमाप पुस्तकामध्ये नोंदी घेताना, त्यांना दाखवलेला दर हा प्राकलन दर नमूद करुन एकूण होणाऱ्या रक्कमेवर 8.9% जादा दर दाखवून, होणाऱ्या एकूण रक्कमेतून नियमित वजाती केल्यानंतर निव्वळ प्रदान करावयाचे आहे. असे असताना मोजमाप पुस्तकात देकार रक्कमेचा दर (ठेकेदाराने सादर केलेला दर) दाखवून प्रदान केले आहे. म्हणजेच मोजमाप पुस्तकात नोंदी प्रचलित पध्दतीनुसार घेतल्या नाहीत. याबाबत विभागाने समर्पक खुलासा केला नाही.

7) कामास दिनांक 31-05-2016 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. लेखा परीक्षण काळात काम अपूर्ण आहे. काम पूर्ण झाल्यानंतर त्याच्या खर्चाच्या तपशिलवार नोंदी- महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम 182(1) नुसार नमुना नं.139 मधील नोंदवहीत घेण्यांत याव्या.

वसुलपात्र मोबिलायझेशन अग्रिमाच्या व्याजाची रक्कम रु.1,91,857/-

DATPMVM6001 (Ref No : 6, Hmm No : 24)

93 विरार (प) मार्गावरील फाटक क्र.40 च्या ठिकाणी रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष : सार्व. बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 12605000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 12605000.00/-

फाटक क्र.40 च्या ठिकाणी रेल्वे पुलाचे बांधकाम करण्याच्या जागेबाबत वाद निर्माण झाला होता. याबाबतचे प्रकरण मा.न्यायालयात प्रलंबित आहे. याबाबतचे अभिलेखे दाखविले नाहीत.

कामाचे नाव :- विरार (प) मार्गावरील फाटक क्र.40 च्या ठिकाणी रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम करणे.

प्राकलन :- रु.589.63 लक्ष
सुधारीत रु.930 लक्ष
सुधारीत रु.1282.74 लक्ष

सदरचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई यांचेकडून करण्यात आले . या कामाचा खर्च पुढील प्रमाणे करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते.

रेल्वे 50%	रु.641.37 लक्ष
वसई-विरार मनपा 25%	रु.341.37 लक्ष
सिडको 25% (कमाल 300 लक्ष)	रु.300 लक्ष
एकूण	रु.1282.74 लक्ष

मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग , ठाणे यांच्याकडून या प्रकल्पाचे काम करण्यासाठी ठेकेदाराची नेमणूक केली. तांत्रिक मान्यता 09/02/2005 रोजी रु.589.63 लक्ष रक्कमेस दिली होती. कार्यादेश 24/5/2006 रोजी दिला असून 2 वर्षात काम पूर्ण करावयाचे होते . महापालिकेने या कामासाठी पुढीलप्रमाणे खर्च केला आहे.

2013 मध्ये	रु.2,03,95,000
प्रमाणक क्र.200 दि.19/5/2014	रु.1,26,05,000
एकूण	रु.3,30,00,000

कामास दोन मुदतवाढी दि.8/11/2012 आणि दि.31/03/2013 अशा दिलेल्या आहेत. उड्डाण पुलाचे काम 26/01/2014 रोजी पूर्ण झाले आहे. या कामा बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.27 दि.11/03/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्याचे पत्र क्र.निरंक दि.17/03/2016 अन्वये खुलासा केला आहे. तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचा अभिप्राय पुढील प्रमाणे आहे.
या कामाबाबत तत्कालीन नगरपरिषद विरार व पश्चिम रेल्वे यांच्यात सामंजस्य करार झाला होता. त्यानुसार महापालिकेने रेल्वे प्रशासनाकडे कामाची उपरोक्त रक्कम सुपुर्त केली आहे. हे काम रेल्वेने सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन करुन घेतले. उडडाण पुलाचे काम पूर्ण झाले असुन, जनतेस सदरची सुविधा उपलब्ध करुन देण्यांत आली आहे.
पुलासाठी जागा उपलब्ध करुन देण्याचे काम महानगरपालिकेचे होते. त्यानुसार रेल्वे प्रशासनास जागा उपलब्ध करुन देण्यांत आली. नंतरच्या काळात उड्डाण पुलाच्या जागेबाबत वाद निर्माण झाला होता. आणि याबाबतचे प्रकरण मा.न्यायालयात प्रलंबित असल्याचे समजते. याबाबतचे अभिलेखे लेखा

परीक्षणास दाखविले नाहीत.

आक्षेपाधिन रक्कम रु.1,26,05,000

DATPMVM6001 (Ref No : 12, Hmm No : 27)

94 वसई विरार महानगरपालिका हद्दीत विरार (पू) भागात विविध ठिकाणी पट्टे रंगवणे व स्थलदर्शक फलक लावणे कामाचा विमा उतरविला नसल्याबाबत...

विविध ठिकाणी पट्टे रंगवणे व स्थलदर्शक फलक लावणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष : सार्व. बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 4641071.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 12505.00/-

कामासाठी ठेकेदारास मुदतवाढ दिली आहे. वाढीव कालावधीसाठी कामाचा विमा उतरविला नसल्याने रक्कम रु.12,505 वसुलपात्र.

कामाचे नाव -: वसई विरार महानगरपालिका क्षेत्रात विरार (पु.) भागात विविध ठिकाणी पट्टे रंगवणे व स्थलदर्शक फलक लावणे.

प्राकलन -: रु.4303165

प्रशासकिय मंजुरी -: स्थायी समिती ठराव 13, दि.07/12/2013

तांत्रिक मंजुरी -: शहर अभियंता दि.07-12-2013.

निविदा तारिख -: दि.09/01/2014 नवभारत, वृत्तमानस, ई निविदा

एल-1 निविदा -: मे.शिखर एंटरप्रायझेस 4.89% अधिक दराने

निविदा मंजुरी -: स्थायी समिती ठराव क्र.39 (1796) दि.21/02/2014.

करार -: दि.25/02/2014

कार्यादेश -: क्र.2766 दि.21/02/2014

मुदत :- 150 दिवस.

मुदत वाढ दि.24/06/2014 ते 31/12/2014.

कामाची स्थिती-: काम पूर्ण दि.17/10/2014.

खर्च-: रु.4641071/-

(चौथे व अंतिम देयक प्र.क्र. 5391/- दि.13/02/2015 रु.1250544/-).

M.B.no.211 p 44 ते 51.

या कामा बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.30 दि.15/03/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्याचे पत्र क्र.निरंक दि.06/04/2016 अन्वये खुलासा केला आहे. तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचा अभिप्राय पुढील प्रमाणे आहे.

कामास मुदतवाढ 24/06/2014 ते 31/12/2014 पर्यंत दिली आहे. ठेकेदाराने विमा संचालनालयाकडे कामाचा विमा काढला असून त्याची मुदत दि.21/02/2014 ते 20/07/2014 पर्यंत आहे. मुदत वाढ दिल्यानंतर ठेकेदाराने वाढीव कालावधीसाठी कामाचा विमा उतरविला नाही. विमा संचालक, शासकीय विमा निधी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक प्रविनी-2300/सहविमा/जीप-2, दिनांक 7 जानेवारी, 2004 नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या एक टक्का विमा कामासाठी व कामगारांच्या सुरक्षेसाठी विमा निधीत भरणे आवश्यक आहे. या कामाचे बाबत मुदतवाढीच्या कालावधीसाठी विमा उतरविलेला नाही. त्यामुळे प्रदानातुन एक टक्का प्रमाणे रक्कम कपात करुन शासकीय विमा निधीकडे भरणा आवश्यक होते. चौथे व अंतिम देयकाचे प्रदान प्रमाणक क्र.5391/- दि.13/02/2015 रु.1250544/- केले आहे. या कालावधीसाठी विमा उतरविला नसल्याने 1% विम्याची रक्कम रु.12505/- वसुलपात्र आहे.

वसुलपात्र रक्कम रु.12505/-

DATPMVM6001 (Ref No : 13, Hmm No : 30)

95 वॉर्ड नं.63 मध्ये सातिवली तलावाचे सुशोभिकरण करणे.

राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष : सार्व. बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 10939207.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 328176.00/-

मूल्यवर्धीत कर अधिनियम 2002 मध्ये सुधारणा नुसार दि.01/04/2012 पासुन नोंदणी प्रमाणपत्र सादर न करणा-या ठेकेदाराकडून मुल्यावर्धीत कराची रक्कम 5% दराने वसुल करावयाची असताना 2% दराने रक्कम वसुल केली आहे. पुर्ण झालेल्या कामाची नोंद नमुना नं.139 मध्ये घेतली नाही.

कामाचे नाव :- वॉर्ड नं.63 मध्ये सातिवली तलावाचे सुशोभीरण करणे.
प्राकलन -: रु.1,08,20,562
प्रशासकिय मंजुरी -: महासभा ठराव क्र.09 दि.20/06/2013
तांत्रिक मंजुरी -: शअ. दि.21/06/2013
निविदा तारिख -: दि.09/07/2013, नवाकाळ, महाराष्ट्र जनमुद्रा

एल-1 निविदा -: मे. हमीद जलील शेख 4.99% जादा.
निविदा मंजुरी -: स्थायी समिती ठराव क्र.759, दि.16/09/2013
करार -: दि.17/09/2013
कार्यादेश -: क्र.891 दि.17/09/2013
मुदत :- 12 महिने.
कामाची स्थिती-: काम पुर्ण दि.09/09/2014

खर्च-	प्रथम धावते देयक	रु.77,52,964.
	प्र.क्र.4619 दि.09/01/2015	रु.3186243 M.B.no.226 p71 ते 89.

	एकूण	रु.10939207

या कामा बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.35 दि.19/03/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासन राजपत्र दि.4/04/2012 नुसार अधिसूचना जाहीर केली असुन मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 मध्ये सुधारणा केली आहे. त्यानुसार 01/04/2012 पासून पाच टक्के मूल्यवर्धित कराची वसुली करायची आहे. ठेकेदाराने मूल्यवर्धित कराचे नोंदणी प्रमाणपत्र सादर न केल्याने, त्याचेकडून या कराची पाच टक्के रक्कम वसुलपात्र आहे. असे असताना महापालिकेने ठेकेदाराचे देयकातून दोन टक्के दराने या कराची वसुली केली आहे. एकूण प्रदान रु.10939207/- च्या तीन टक्के रक्कम रु.328176/- वसुल पात्र आहे.
2) देयकासोबत जोडलेल्या पूर्णत्वाच्या दाखल्यानुसार सदरचे काम दिनांक 09-09-2014 रोजी पुर्ण झाले आहे. परंतु पुर्ण झालेल्या कामाची नोंद नमुना नं. 139 मध्ये घेतली नाही.

वसुलपात्र रक्कम रु.328176/-

96 वॉर्ड नं.69 मध्ये बालाजी हॉटेल ते नाना नानी पार्क पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.

खडीकरण व डांबरीकरण करणे

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष : सार्व. बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 4463790.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 10728.00/-

मोजमाप पुस्तक क्र.05 मधील पृ.क्र.63 वरील नोंदीनुसार बाब क्र.14 नुसार परिमाण व खर्च दाखवला आहे. पुन्हा बाब क्र.16 मध्येही 14 चा खर्च अंतभुत केला आहे. त्यामुळे जादा प्रदान रु.10,728 झाले आहे.

कामाचे नाव :- वॉर्ड नं.69 मध्ये बालाजी हॉटेल ते नाना नानी पार्क पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.

प्राकलन -: रु.51,40,083

प्रशासकिय मंजुरी -: स्थायी समिती ठराव क्र.1429 दि.30/01/2014

तांत्रिक मंजुरी -: शअ. दि.30/01/2014

निविदा तारिख -: दि.05/02/2014, महाराष्ट्र जनमुद्रा, लोकमत, मनपा वेबसाईट.

एल-1 निविदा -: मे. जय भवानी एंटरप्रायझेस 4.97% जादा.

निविदा मंजुरी -: स्थायी समिती ठराव क्र.1890, दि.25/02/2014

करार -: दि.26/02/2014

कार्यादेश -: दि.28/02/2014

मुदत -: 06 महिने.

कामाची स्थिती -: काम पुर्ण दि.08/05/2014

खर्च -: प्र.क्र.5155 दि.28/02/2015 रु.4463790

M.B.no.05 p 59 ते 65.

या कामा बाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र .36 दि.19/03/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही . लेखा परीक्षणाचा अभिप्राय पुढील प्रमाणे आहे.

कामाचे मोजमाप पुस्तकातील नोंदी तपासता पृ.क्र.63 वर पुढील नोंदी आहेत.

14. Providing & lying bituminous tackcote

@ rate of ..... 5652 sqm

(-) 1335 ded.WBM area.

4137

15. Providing & lying hotmix 5652 282.60 cum
(डांबरमिश्रीत खडी जागेवर आणणे व पसरवणे.)

16. Providing & lying 5652 5652
(डांबरमिश्रीत खडी जागेवर आणणे व पसरवणे.) 4317

9969 cum

त्यामुळे अनु क्र.14 मधील परिमाण 5652, अनु. क्र.16 मध्ये दाखवुन एकुण परिमाणानुसार प्रदान केले आहे. त्यामुळे जादा प्रदान केले आहे. परिमाण 4317 X दर 24.89 = रु.10,727.59 जादा प्रदान झाले आहे. सदरची रक्कम रु.10728 वसुलपात्र आहे.
वसुलपात्र रक्कम रु.10728.

DATPMVM6001 (Ref No : 15, Hmm No : 36)

97 वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वालीव, सातीवली, गौराईपाडा, नवघर (पूर्व) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये मुलभुत सुविधा (रस्ता, गटारे व पुल) निर्माण करणे.

विकास निधी अंतर्गत रस्तेइतर विकास कामेविकास निधी अंतर्गत गटार

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 06

लेखा शीर्ष : सार्व. बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 242222385.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 242222385.00/-

खडीकरण, डांबरीकरण, ब्रिज, गटार या कामासाठी चौदा निरनिराळी अंदाजपत्रके तयार करण्यात आली, ठेकेदार एकच असल्याने एकत्रित प्रदान केले आहे. प्रत्येक कामावर किती खर्च झाला हे समजु शकत नाही. ठेकेदारास दिलेल्या रु.58500000/- अग्रीमाच्या नोंदी मोजमाप पुस्तकात घेतल्या नाहीत. सदरचे अग्रीम व व्याजाची ठेकेदाराच्या देयकातुन वसूली केली आहे. अग्रीम वुसलीबाबतच्या नोंदी नमुना क्र.147 मध्ये घेतल्या नाहीत. अग्रीमासाठी घेतलेली रु.58500000/- बँक गॅरेंटी व तिची विधीग्राह्यता लेखा परीक्षाणास दाखविली नाही. करारातील अट क्र.14 व 22 नुसार कामाची छायाचित्रे व रॉयल्टी बाबत उचीत कार्यवाही केली नाही. कामासाठी 14 प्राकलने तयार करण्यात आली. त्यानुसार मोजमाप पुस्तके नोंदी घेऊन एकत्रीत प्रदान करण्यात आले. सुधारीत प्राकलन व सुधारीत तांत्रिक मंजुरी लेखा परीक्षणात दाखविली नाही.

कामाचे नाव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वालीव, सातीवली,गौराईपाडा,नवघर (पूर्व) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये मुलभुत सुविधा(रस्ता,गटारे व पुल) निर्माण करणे.

प्राकलन -: रु.39,10,03,486

प्रशासकिय मंजुरी -: महासभा ठराव क्र.12 दि.20/07/2011
9 ते 16 दि.18/08/2011
04 दि.04/11/2011

तांत्रिक मंजुरी -: एकुण 14 कामांना शअ. दि.08/11/2011 रोजी
तांत्रिक मंजुरी दिली आहे

निविदा तारिख -: दि.21/11/2011,लोकमत, महाराष्ट्र बुलंद टाईम्स
(निविदा उघडल्याची दि.19/12/2011).

एल-1 निविदा -: मे.एन.जी.प्रोजेक्ट लि. 14.11% जादा दराने, वाटाघाटीने
4.95% जादा दराने.

निविदा मंजुरी -: स्थायी समिती ठराव क्र.33, दि.12/03/2012

करार -: दि.21/03/2012 मुदांक शुल्क रु.3,90,200

कार्यादेश -: क्र.ववि‍शम /श.अ/बा.वि./14/11-12,दि.21/03/2012

मुदत :- 1 वर्ष
आयुक्तांनी मुदतवाढ दि.15/11/2014 पर्यंत दिली आहे.

कामाची स्थिती-: काम अपुर्ण

खर्च -: मागील लेखापरिक्षण अहवाल 2012-2013 मधील परिच्छेद क्र.28 नुसार खर्च रु.5,85,00,000 अग्रीम
(मोबीलायझेशन अग्रीम व मशीनरी अग्रीम)
कामावरील खर्च रु.1,71,17,976.(व्याजाची वसुल केलेली रक्कम रू.13,90,031)
2013-2014 24,22,22,385
एकूण 25,93,40,361

लेखापरिक्षण काळात केलेल्या खर्चाची काही निवडक प्रमाणके पुढील प्रमाणे

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	लेखाशिर्ष	तपशिल
तिसरे धावते.				
65	09/05/13	15849620	गटार बांधकाम	मे.एन.जी.प्रोजेक्ट M.B.no.03 p 1ते26
216	--//--	665606	रस्ता बांधकाम	--//--
215	--//--	2456623	ब्रिज बांधकाम	--//--

या कामाबाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.37 दि.19/03/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्याचे पत्र क्र. निरंक दि.06/04/2016 रोजी खुलासा केला आहे. तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचा अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) या कामात खडीकरण- डांबरीकरण, ब्रिज, गटार ही सर्व कामे अंतर्भूत आहेत. यासाठी 14 निरनिराळी अंदाजपत्रके तयार करण्यात आली होती. मोजमापे वेगवेगळया पृष्टावर घेतली आहेत आणि त्याचे एकत्रीत

प्रदान देयकात केले आहे. त्यामुळे किती खर्च प्रत्येक कामावर झाला आहे, हे समजु शकत नाही. कामाच्या खर्चाची नोंदवही ठेवली नाही. रस्ते, गटारे, नाले ही स्वतंत्र कामे आहेत. कामात वाढ झाल्याने सुधारीत प्राकलने तयार करुन त्यास मंजूरी घेण्यांत आली आहे.

2) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता प्रकरण 10 बांधकाम लेखे "घ"कंत्राटदारांना आगाऊ रकमा देणे, परिच्छेद 10.2.21,10.2.22 अन्वये नियमानुसार कंत्राटदाराला आगाऊ रकमा देण्यास मनाई आहे. जागेवर आणलेल्या सामानाच्या मुल्याच्या 75% पेक्षा अधिक नसेल, इतक्या आगाऊ रकमा मंजुर करता येतील. त्यासाठी ठेकेदाराने जागेवर आणलेल्या सामानाची नोंद मोजमाप पुस्तकात घेऊन, त्याचे प्रमाणात अग्रीम दिल्याची नोंद घेणे जरुर आहे. महापालिकेच्या निविदेतील अटी/ शर्ती पाहाता पृ.क्र.143 व 144 अट क्र. 56 नुसार मोबीलाझेशन अग्रीम प्राकलनाच्या 10% व मशीनरी अग्रीम 90% असुन द.सा.स.से. 12% व्याजाने अग्रीम देण्याची तरतुद आहे. उपरोक्त दर्शविलेल्या एकूण रु.585 लक्ष आग्रीमा पैकी रु.390 लक्ष मोबीलायझेशन आग्रीम व रु.195 लक्ष मशीनरी आग्रीम दिलेले आहे. या आग्रीमांच्या नोंदी मोजमाप पुस्तकात नाहीत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा - संहिता, 1971 मधील नियम 189 नुसार दिलेले आग्रीम वसुलीबाबतच्या नोंदी नमुना क्र.147 मध्ये घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही विभागाने केली नाही.

3) कामासाठी दिलेल्या अग्रीमासाठी संबंधीत ठेकेदाराकडून बँक गॅरंटी रु.58500000/- घेतली आहे. परंतु मुळ बँक गॅरंटी व तिची विधीग्राहयता लेखापरिक्षणास दाखविली नाही.

4) करारातील अट क्र.14 नुसार झालेल्या कामाची छायाचित्रे देयकासोबत जोडायची आहेत. परंतू तशी कार्यवाही केली नाही. तसेच करारातील अट क्र. 22 नुसार रॉयल्टीची चलने प्रत्येक देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. तसे न करता विभागाने रॉयल्टीची चलने सरसकट एका नस्तीमध्ये ठेवली आहेत. त्यामुळे प्रत्येक देयकानुसार रॉयल्टीची होणारी रक्कम शासनखाती भरणा केल्याची तपासणी करता आली नाही.

5) या कामासाठी रस्ते, गटारे, ब्रिज इ. साठी 14 प्राकलने तयार करण्यात आली होती. महासभेच्या मान्यतेने एकत्रित निविदा मागविणेत आल्या आणि एकाच ठेकेदारास काम देण्यात आले. प्राकलनानुसार मोजमाप पुस्तकात नोंदी घेतल्या आहेत. परंतू अनेक कामांचे बाबत एकत्रित देयक तयार केले आहे, आणि त्याचे प्रदान केले आहे. पुढील काळात मागील देयकाचा खर्च वळता करुन प्रदान केले आहे अशा वेळी प्रत्येक कामावर मागील काळात किती खर्च झाला, त्याची प्रगती बेरीज किती, याच्या नोंदी नोंदवहीत घेतल्या नाहीत. काम करताना कामात वेळोवेळी वाढ झाल्याने सुधारीत प्राकलन तयार करावे लागले आहे. सुधारीत प्राकलन तयार करताना ते बाबवार तयार केल्याचे सांगितले. सुधारीत प्राकलन व त्यास शहर अभियंता यांनी दिलेली तांत्रिक मंजुरी लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिली नाही. प्रत्यक्षात प्रत्येक कामानुरुप प्राकलन + सुधारीत वाढ = एकूण, या बाबी समजून येत नाहीत. त्यामुळे कोणत्या कामावर/बाबीवर कीती वाढ/घट झाली समजत नाही. वाढीव खर्चाची रक्कम नमुद करता येत नाही. या बाबत विभागाने खुलासा केला नाही.

6) सदरचे काम लेखा परीक्षण काळात अपुर्ण आहे. कामास मुदतवाढ दिली आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.24,22,22,385

DATPMVM6001 (Ref No : 16, Hmm No : 37)

98 वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वालीव, सातीवली, गौराईपाडा, नवघर (पूर्व) येथील औद्‌योगिक वसाहतीमध्ये मुलभुत सुविधा (रस्ता, गटारे व पुल) निर्माण करण्याचे कामातील अनियमितते बाबत.

विकास निधी अंतर्गत रस्तेइतर विकास कामेविकास निधी अंतर्गत गटार

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 06

लेखा शीर्ष : सार्व. बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 235399465.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 235399465.00/-

खडीकरण, डांबरीकरण, ब्रिज, गटार या कामासाठी चौंदा निरनिराळी अंदाजपत्र तयार करण्यात आली, ठेकेदार एकच असल्याने एकत्रित प्रदान केले आहे. प्रत्येक कामावर किती खर्च झाला हे समजु शकत नाही. 06 प्रमाणकांची मोजमाप पुस्तके दाखवली नाही. ठेकेदारास दिलेल्या रु.58500000/- अग्रीमाच्या नोंदी मोजमाप पुस्तकात नाहीत. सदरचे अग्रीम व व्याजाची ठेकेदाराच्या देयकातुन वसूली केली आहे. अग्रीम वसलीबाबतच्या नोंदी नमुना क्र.147 मध्ये घेतल्या नाहीत. अग्रीमासाठी घेतलेली रु.58500000/- ची बँक गॅरेंटी व तिची विधीग्राह्यता लेखा परीक्षणास दाखविली नाही. करारातील अट क्र.14 व 22 नुसार कामाची छायाचित्रे व रॉयल्टी बाबत उचीत कार्यवाही केली नाही. कामासाठी 14 प्राकलने तयार करण्यात आली. त्यानुसार मोजमाप पुस्तके नोंदी घेऊन एकत्रीत प्रदान करण्यात आले. सुधारीत प्राकलन व सुधारीत तांत्रिक मंजुरी लेखा परीक्षणात दाखविली नाही.

कामाचे नाव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील वालीव, सातीवली, गौराईपाडा, नवघर पूर्व) येथील औद्‌योगिक वसाहतीमध्ये मुलभुत सुविधा (रस्ता, गटारे व पुल) निर्माण करणे.

प्राकलन -: रु.39,10,03,486

प्रशासकिय मंजुरी -: महासभा ठराव क्र.12 दि.20/07/2011, 9 ते 16 दि.18/08/2011
04 दि.04/11/2011

तांत्रिक मंजुरी -: एकुण 14 कामांना शअ. दि.08/11/2011 रोजी तांत्रिक मंजुरी दिली आहे

निविदा तारिख -: दि.21/11/2011 लोकमत, महाराष्ट्र बुलंद टाईम्स(निविदा उघडल्याची दि.19/12/2011)

एल-1 निविदा -: मे.एन.जी.प्रोजेक्ट लि. 14.11% जादा दराने, वाटाघाटीने 4.95% जादा दराने.

निविदा मंजुरी -: स्थायी समिती ठराव क्र.33, दि.12/03/2012

करार -: दि.21/03/2012 मुदांक शुल्क रु.3,90,200

कार्यादेश -: क्र.वविशम /श.अ/बा.वि./14/11-12,दि.21/03/2012

मुदत :- 1 वर्ष आयुक्तांनी मुदतवाढ दि.15/11/2014 पर्यंत दिली आहे.

कामाची स्थिती-: काम अपुर्ण

खर्च -: 31/03/2014 पर्यंत 25,93,40,361

2014-2015 23,53,99,465

एकूण 49,47,39,826

लेखापरिक्षण काळात केलेल्या खर्चाची काही निवडक प्रमाणके पुढील प्रमाणे

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	लेखाशिर्ष	तपशिल
दहावे धावते			मे.एन.जी.प्रोजेक्ट	
70	15/05/14	17891282	गटार बांधकाम	M.B. दाखवली नाही
193	--//--	21486798	रस्ता बांधकाम	--//--
194	--//--	2062587	ब्रिज बांधकाम	--//--
2968	10/10/14	9498539	रस्ता बांधकाम	--//--
पंधरावे धावते				
1241	05/03/15	11349356	गटार बांधकाम	--//--
5713	-//-	13272013	रस्ता बांधकाम	--//--

या कामाबाबत लेखा परीक्षणचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.37 दि.19/03/2016 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्याचे पत्र क्र. निरंक दि.06/04/2016 रोजी खुलासा केला आहे. तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचा अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) या कामात खडीकरण- डांबरीकरण, ब्रिज, गटार ही सर्व कामे अंतर्भूत आहेत. यासाठी 14 निरनिराळी अंदाजपत्रके तयार करण्यात आली होती. मोजमापे वेगवेगळया पृष्टावर घेतली आहेत आणि त्याचे एकत्रीत प्रदान एकाच देयकात केले आहे. किती खर्च प्रत्येक कामावर झाला आहे, हे समजु शकत नाही. कामाच्या खर्चाची नोंदवही ठेवली नाही. कोणते काम किती वाढले हे समजु शकत नाही. कामाच्या खर्चाची नोंदवही ठेवली नाही. रस्ते, गटारे, नाले ही स्वतंत्र कामे आहेत. कामात वाढ झाल्याने सुधारीत प्राकलने तयार करुन त्यास मंजूरी घेण्यात आली आहे. तसेच 06 प्रमाणकाव्दारे रक्कम रु.75560572/- खर्च केला असून त्याची मोजमाप पुस्तके दाखविली नाहीत.

2) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता प्रकरण 10 बांधकाम लेखे "घ" कंत्रादारांना आगाऊ रकमा देणे, परिच्छेद 10.2.21,10.2.22 अन्वये नियमानुसार कंत्राटदाराला आगाऊ रकमा देण्यास मनाई आहे. जागेवर आणलेल्या सामानाच्या मुल्याच्या 75% पेक्षा अधिक नसेल, इतक्या आगाऊ रकमा मंजुर करता येतील. त्यासाठी ठेकेदाराने जागेवर आणलेल्या सामानाची नोंद मोजमाप पुस्तकात घेऊन, त्याचे प्रमाणात अग्रीम दिल्याची नोंद घेणे जरुर आहे. महापालिकेच्या निविदेतील अटी/ शर्ती पाहाता पृ.क्र.143 व 144 अट क्र.56 नुसार मोबीलाझेशन अग्रीम प्राकलनाच्या 10% व मशीनरी अग्रीम 90% असुन द.सा.स.से. 12% व्याजाने अग्रीम देण्याची तरतुद आहे. उपरोक्त दर्शविलेल्या एकूण रु.585 लक्ष आग्रीमा पैकी रु.390 लक्ष मोबीलायझेशन आग्रीम व रु.195 लक्ष मशीनरी आग्रीम दिलेले आहे. या आग्रीमांच्या नोंदी मोजमाप पुस्तकात नाहीत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा - संहिता, 1971 मधील नियम 189 नुसार दिलेले आग्रीम वसुलीबाबतच्या नोंदी नमुना क्र.147 मध्ये घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही विभागाने केली नाही.

3) कामासाठी दिलेल्या अग्रीमासाठी संबंधीत ठेकेदाराकडून रु.58500000/- ची बँक गॅरंटी घेतली आहे. परंतु मुळ बँक गॅरंटी व तिची विधीग्राहयता लेखापरिक्षणास दाखविली नाही.

4) करारातील अट क्र.14 नुसार झालेल्या कामाची छायाचित्रे देयकासोबत जोडायची आहेत. परंतू तशी कार्यवाही केली नाही. तसेच करारातील अट क्र.22 नुसार रॉयल्टीची चलने प्रत्येक देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. तसे न करता विभागाने रॉयल्टीची चलने सरसकट एका नस्तीमध्ये ठेवली आहेत. त्यामुळे प्रत्येक

देयकानुसार रॉयल्टीची होणारी रक्कम शासनखाती भरणा केल्याची तपासणी करता आली नाही.

5) या कामासाठी रस्ते, गटारे, ब्रिज इ. साठी 14 प्राकलने तयार करण्यात आली होती. महासभेच्या मान्यतेने एकत्रित निविदा मागविणेत आल्या आणि एकाच ठेकेदारास काम देण्यात आले. प्राकलनानुसार मोजमाप पुस्तकात नोंदी घेतल्या आहेत. परंतू अनेक कामांचे बाबत एकत्रित देयक तयार केले आहे आणि त्याचे प्रदान केले आहे. पुढील काळात मागील देयकाचा खर्च वळता करुन प्रदान केले आहे अशा वेळी प्रत्येक कामावर मागील काळात किती खर्च झाला, त्याची प्रगती बेरीज किती, याच्या नोंदी नोंदवहीत घेतल्या नाहीत. काम करताना कामात वेळोवेळी वाढ झाल्याने सुधारीत प्राकलन तयार करावे लागले आहे. सुधारीत प्राकलन तयार करताना ते बाबवार तयार केल्याचे सांगितले. सुधारीत प्राकलन व त्यास शहर अभियंता यांनी दिलेली तांत्रिक मंजुरी लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिली नाही. प्रत्यक्षात प्रत्येक कामानुरुप प्राकलन + सुधारीत वाढ = एकूण या बाबी समजून येत नाहीत. त्यामुळे कोणत्या कामावर/बाबीवर कीती वाढ/घट झाली समजत नाही. वाढीव खर्चाची रक्कम नमुद करता येत नाही.

3) मागणी नोंदवही (नमुना सर्वसाधारण -20)
4) मागणी बील नोंदवही (नमुना सर्वसाधारण -20)
5) बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसाधारण -21)
6) नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसाधारण -23)
7) नोटीस फी, वारंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसाधारण - 24)
8) परतावा Remission व write off नोंदवही (नमुना सर्वसाधारण-25)
9) परतावा Remission गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसाधारण- 26)
10) काढुन टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसाधारण- 26)
11) Summary statement of Bills Raised (नमुना P & T-1)
12) Summary statement of Demand Adjustment Raised (नमुना P &OT -2)
13) Summary statement of year wise Head wise collection of Property & Other taxes (नमुना & OT -3)
14) Summary statement of Refunds & Remmissions (नमुना P & OT-4)

परंतु विरार "अ" प्रभाग घरपट्टी विभागाने वरिलप्रमाणे विहीत नमुन्यात लेखे ठेवलेले नाहीत. याबाबत वर्ष 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणात परिच्छेद क्र.53 अन्वये लेखा आक्षेप नोदविण्यात आला आहे. परंतू त्यानुसार विभागाकडून राष्ट्रीय नगरपालिका लेखा नियम पुस्तीका 2004 मधील तरतुदीनुसार मालमत्ता कराचे लेखे ठेवलेले नाहीत.

2) भांडार विभागाकडून घरपट्टी विभागास वर्ष 2013-14 व 2014-15 मध्ये सर्वसाधारण जमा रकमांच्या पावती पुस्तकांच्या विनियोगाच्या पडताळणीसाठी घरपट्टी विभागाकडुन प्राप्त पावती पुस्तकांची साठा नोंदवही लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही. त्यामुळे विभागास प्राप्त साठा, विनियोग व शिल्लक साठा यांची पडताळणी करता आली नाही.

FDSANMM7201 (Ref No : 53, Hmm No : 32)

111 ग्रामीण उपविभागाकडील मालमत्ता कर वसुलीबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 05

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ड

राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार विहित केलेल्या नमुन्यांत उपविभागांचे लेखे ठेवलेले नाहीत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ नियम १२८-अ नुसार आकारणी करावयाच्या करांची आकारणी केली जात नसुन ग्रामीण उपविभागाची मालमत्ता कर वसुली घरपट्टी ही ग्रामपंचायतीच्या पूर्वीच्या मंजूर दराने केली जात आहे. ग्रामीण उपविभागांकडील वसुलीचे दैनंदिन चलन तयार करून मुख्यालयास अगर प्रभागास पाठविले जात नाही. महानगरपालिकेच्या लेख्यात म्हणजे रोखवहीत उपविभागांची जमा रक्कम उशिराने जमा दर्शविली जाते त्यामुळे सदरच्या जमा रक्कमांचे वेळच्या वेळी लेखांकन होत नाही. महानगरपालिका क्षेत्रातील ग्रामीण उपविभागात मोकळया जमिनीवर व मोबाईल टॉवर्सवर मालमत्ता कराची मागणी करून कर वसुल केली जात नाही.

वसई-विरार शहर मनपाचे वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात , ग्रामीण उपविभागाकडील (बोळींज, उमराळे-करमाळे, चिखलडोंगरे, वटार, कोफराड, आगाशी, देवदळ व कामण) वसुलीचे लेखे तपासून आढळलेल्या अनियमिततेाबाबत अर्धसमास पत्र क्र.१२ दिनांक २९/०२/२०१६ अन्वये कळविले असता विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नाही. सबब लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) उपविभागांचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यांत लेखे ठेवणे आवश्यक असताना ते ठेवलेले नाहीत.

१) वसुली नोंदवही (नमुना सर्वसा ११)

२) दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा १२)

३) मागणी नोंदवही (नमुना सर्वसा २०)

४) मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा २१)

५) बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २२)

६) नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसा २३)

७) नोटीस फी, वारंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २४)

८) परतावा, Remission व Write Off नोंदवही(नमुना सर्वसा २५)

९) परतावा, व Remission गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २६)

१०) काढून टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्रे (नमुना सर्वसा २६) तसेच याव्यतिरिक्त

११) Summary Statement of Bills Raised (नमुना P&OT-१)

१२) Summary Statement of Demand Adjustments Raised (नमुना P&OT-२)

१३) Summary Statement of Year-wise, Head-wise collection of Property &Other Taxes

(नमुना P&OT-३)

१४) Summary Statement of Refunds and Remissions (P&OT-४)

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्ये उप-विभाग नगरविकास विभाग अधिसूचना दिनांक ३१ मे , २०११ नुसार महानगरपालिकेत ग्रामपंचायती विलीन झाल्या असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ नियम १२८-अ नुसार आकारणी करावयाच्या करांची आकारणी केली नसुन आजतागायत ग्रामीण उपविभागाची मालमत्ता कर वसुली घरपट्टी ही ग्रामपंचायतीच्या मंजूर दराने केली जात आहे. सदर विभागात महापालिका क्षेत्रातील दरानुसार आकारणी करून कर वसूल केला जात नसल्याने महानगरपालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. तसेच सदर उपविभागातील मालमत्ताधारकांकडून शिक्षण कर, रोजगार हमी कर हे शासनास देय असलेल्या करांचीदेखील वसुली केली जात नसल्याने शासनास देखील सदर करापोटी मिळणाऱ्या उत्पन्नास मुकावे लागले आहे.

३) कर आकारणी मंजूर केलेल्या एकाही प्रकरणांच्या आकारणी तक्त्यावर संबंधित लिपीक , विभागप्रमुख, प्रभारी सहाय्यक आयुक्त , उपायुक्त/अतिरिक्त आयुक्त यांनी स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे सक्षम अधिकाऱ्याने कर आकारणी तक्ता मंजूर करून त्याची प्रत संबंधित भोगवटाधारकास निर्गमित केलेली नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ , महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (डिसेंबर २०१२ पासून) मधील कलम ४७८ , ४७९ व ४८० नुसार कोणतेही बांधकाम लेखी

परवानगी मिळाल्याशिवाय केले असेल तर अनधिकृत आहे असे समजण्यात येते. या तरतुदी नुसार संबंधित मालकास/भोगवटा धारकास लेखी नोटीसी द्वारे ते काढून टाकण्यास किंवा पाडून टाकण्यास फर्मावणे आवश्यक आहे. संबंधितांने न ऐकल्यास असे बांधकाम महापालिकेच्या वतीने काढून टाकले जाईल. अशी अधिनियमात तरतुद असतांना ग्रामीण उपविभागात शास्तीसह कर आकारणी प्रकरणे मोठया प्रमाणावर असल्याने यावरून असे दिसून येते की , कोणतीही परवानगी न घेता , इमारती, वाणिज्य इमारती बांधल्या जातात, आणि अशी मालमत्ता प्रकरणे कर आकारणीस प्राप्त झाल्यानंतर संबंधित उपविभागाचा लिपिक/समनव्यक टिपणी तयार करून त्यास प्रभागातील कर निरिक्षक/अधिक्षक व प्रभारी सहाय्यक आयुक्तांची मंजूरी घेतली जाते. त्यानंतर काही प्रकरणात मुख्यालयातील उपआयुक्त दर्जाचे अधिकारी मंजूरी देतात. काही प्रकरणी आयुक्तांची मंजूरी घेतली जाते. त्यानुसार ग्रामीण भागातील आकारणी नोंदवहीत मंजूरीचा क्रमांक व दिनांक किंवा टिपणीचा दिनांक नमुद केला जातो. संबंधितास घरपट्टीच्या दुप्पट शास्ती लावली जाते. परंतु आकारणी नोंदवहीत अनधिकृत बांधकाम असा शिक्का मारला जात नाही.

४) ग्रामीण उपविभागांकडील वसुलीचे दैनंदिन चलन तयार करून मुख्यालयास अगर प्रभागास पाठविले जात नाही तर १५ दिवसांचे/१ महिन्याचे चलन प्रभागास पाठविले जाते व त्यानंतर प्रभागाकडून ते मुख्यालयास पाठविले जाते यामुळे प्रत्यक्षात उपविभागाच्या बँकेत रक्कम वेळीच जमा होते. परंतु महानगरपालिकेच्या लेख्यात म्हणजे रोखवहीत ही रक्कम उशिराने जमा दर्शविली जाते त्यामुळे सदरच्या जमा रक्कमांचे वेळच्या वेळी लेखांकन होत नाही.

५) महानगरपालिका क्षेत्रातील ग्रामीण उपविभागात मोकळया जमिनीवर व मोबाईल टॉवर्सवर मालमत्ता कराची आकारणी केल्याचे लेखा परीक्षणात आढळून आले नाही , त्यामुळे ग्रामीण भागात मोबाईल टॉवर्स व मोकळ्या जागा आकारणीची सद्यस्थिती लेखा परीक्षणात तपासता आली नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 54, Hmm No : 12)

112 नवघर-माणिकपूर 'ड' प्रभागाचे मालमत्ता कर थकबाकीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 48885928.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 48885928.00/-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ कराधान नियम ४२ ते ४८ नुसार नोटीस पाठवणे, मालमत्ता ताब्यात घेणे/जप्त करणे, लिलाव करणे तसेच कर आकारणी प्रकरणांचे बाबत मोजमापे घेवून हरकती मागवून, बिले पाठविण्याची कामे वेळीच न झाल्याने आकारणी/मागणी करणे इ. सारखी कामे

महानगरपालिका कर विभागाने त्या त्या वित्तीय वर्षात केल्याचे आढळून आले नाही परिणामतः थकबाकी रक्कम रु. ४८८८५९२८/- प्रलंबित राहिली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मोकळ्या जागांवर कर आकारणी केल्याचे आढळून आले नाही. व त्याबाबतचे कर आकारणी, मागणी व वसुलीचे लेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही. २०१३-१४ व २०१४-१५ या वित्तीय वर्षाअखेर मालमत्ता करापोटी धनादेशाद्वारे वसूल केलेल्या रक्कमांपैकी एकूण किती धनादेश न वटलेले होते व त्यात किती रक्कम गुंतलेली होती, याबाबतची माहिती व प्रभाग क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावर थकीत रक्कम असलेल्या मालमत्ता धारकांची यादी/ माहिती रक्कमेसह लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. प्रभाग क्षेत्रातील एकूण किती मोकळ्या जागा, जुन्या चाळी, घरे, इमारती पाडून त्याजागी नव्याने बांधलेल्या इमारतीना नवीन कर आकारणी लागू करणेपूर्वी तेथील इमारती/ मालमत्ताचा थकीत करांची वसुली केल्याबाबत लेखा परीक्षणाची साधार खात्री प्रभागाने पटविली नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिकेचे २०१३-१४ व २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात, नवघर-माणिकपूर 'ड' प्रभागाचे मालमत्ता कराची वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ अखेर खालीलप्रमाणे मोठया प्रमाणावर थकित रक्कम असल्याचे दिसून आले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.९७ दिनांक १३/०५/२०१६ अन्वये कळविले असता विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नाही. सबब लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

वर्ष २०१३-१४			**वर्ष २०१४-१५**		
अ.क्र.	तपशिल	रक्कम रु.	अ.क्र.	तपशिल	रक्कम रु.
०१	२०१२-१३ थकबाकी मागणी	३१२४५३०३	०१	२०१३-१४ थकबाकी मागणी	४६११९१६५
०२	२०१३-१४ ची चालू मागणी	१२८२२६८३०	०२	२०१४-१५ ची चालू मागणी	१३१७३२३७५
०३	२०१३-१४ नव्याने आकारणी	३९३७५३५	०३	२०१४-१५ नव्याने आकारणी	४६९९३६२
०४	एकूण मागणी	१६३४०९६६८	०४	एकूण मागणी	१८२५५०९०२
०५	२०१३-१४ मध्ये थकबाकी वसुली	१०१९२७१०	०५	२०१४-१५ मध्ये थकबाकी वसुली	२४६३००३५
०६	२०१३-१४ चालू मागणी वसुली	१०७०९७७९३	०६	२०१४-१५ चालू मागणी वसुली	१२५६५८०४९
०७	आगावू वसुली	निरंक	०७	आगावू वसुली	१६६२३११०
०८	एकूण वसुली	११७२९०५०३	०८	एकूण वसुली	१५०२८८०८४
०९	एकूण थकबाकी	४६११९१६५	०९	एकूण थकबाकी	४८८८५९२८
१०	वसुली टक्केवारी	७१.७८%	१०	वसुली टक्केवारी	८२.३३

१) सहाय्यक आयुक्त , नवघर-माणिकपूर विभाग यांनी लेखा परिक्षणांस सादर केलेल्या विवरणपत्रानुसार, अभिलेख्यानुसार २०१३-२०१४ या वित्तीय वर्षाकरीता मालमत्ता करांची एकुण मागणी रक्कम रुपये १६३४०९६६८/- इतकी असून एकुण वसूली रुपये १०७०९७७९३/- आहे तर एकुण थकबाकी रक्कम रुपये ४६११९१६५/- इतकी दर्शविली आहे. म्हणजेच वसूलीची टक्केवारी सुमारे ७१.७८% आहे. तर थकबाकीची टक्केवारी २९.२२% आहे. तसेच २०१४-१५ या वित्तीय वर्षाकरीता मालमत्ता करांची एकुण मागणी रक्कम रुपये १८२५५०९०२/- इतकी असून एकुण वसूली रुपये १५०२८८०८४/- आहे तर एकुण थकबाकी रक्कम रुपये ४८८८५९२८/- इतकी दर्शविली आहे. म्हणजेच वसूलीची टक्केवारी सुमारे ८२.३३% आहे. तर थकबाकीची टक्केवारी १७.६६% आहे. यावरून असे दिसून येते की , एकंदरीत थकबाकीचे प्रमाण कमी आहे. तथापि थकबाकीदारांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ कराधान नियम ४२ ते ४८ नुसार नोटीस पाठवणे, मालमत्ता ताब्यात घेणे/जप्त करणे , लिलाव करणे तसेच कर आकारणी प्रकरणांचे बाबत मोजमापे घेवून हरकती मागवून, बिले पाठविण्याची कामे वेळीच न झाल्याने आकारणी/मागणी करणे इ. सारखी कामे महानगरपालिका कर विभागाने त्या त्या वित्तीय वर्षात केल्याचे आढळून आले नाही परिणामतः थकबाकी रक्कम प्रलंबित राहिली आहे.

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मोकळ्या जागांवर कर आकारणी करणेचे आहे. महानगरपालिका क्षेत्रात अशा मोकळया जमिनी-जागा असल्याचे अभिलेखे व अशा मालमत्तावर कर आकारणी, मागणी व वसुलीचे लेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही.

३) २०१३-१४ व २०१४-१५ या वित्तीय वर्षाअखेर मालमत्ता करापोटी धनादेशाद्वारे वसूल केलेल्या रक्कमांपैकी एकूण किती धनादेश न वटलेले होते व त्यात किती रक्कम गुंतलेली होती , याबाबतची माहिती व प्रभाग क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावर थकीत रक्कम असलेल्या मालमत्ता धारकांची यादी/ माहिती रक्कमेसह लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे धनादेशाद्वारे प्राप्त झालेल्या सर्व मालमत्ता कराच्या रक्कमा मनपा निधीत जमा झाल्याची व मोठ्या प्रमाणावर थकबाकी असलेल्या मालमत्ताधारकाकडून कर वसुलीसाठी केलेली कार्यवाही लेखा परीक्षणास अवगत झाली नाही.

४) महानगरपालिका ड प्रभाग क्षेत्रात एकूण किती मोकळ्या जागा , जुन्या चाळी, घरे, इमारती पाडून त्याजागी नव्याने बांधलेल्या इमारतीना नवीन कर आकारणी लागू करणेपूर्वी तेथील इमारती/ मालमत्तांच्या थकीत करांची वसुली केल्याबाबतची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 63, Hmm No : 97)

113 नालासोपारा 'क' प्रभागाचे मालमत्ता कर थकबाकीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 343276118.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 343276118.00/-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ कराधान नियम ४२ ते ४८ नुसार नोटीस पाठवणे, मालमत्ता ताब्यात घेणे/जप्त करणे, लिलाव करणे तसेच कर आकारणी प्रकरणांचे बाबत मोजमापे घेवून हरकती मागवून, बिले पाठविण्याची कामे वेळीच न झाल्याने आकारणी/मागणी करणे इ. सारखी कामे महानगरपालिका कर विभागाने त्या त्या वित्तीय वर्षात केल्याचे आढळून आले नाही परिणामतः थकबाकी रक्कम रु.३४३२७६११८/- प्रलंबित राहिली आहे. २०१३-१४ या वित्तीय वर्षामध्ये नव्याने कर आकारणी केलेल्या मालमत्तांची मागणी रक्कम रु.२८०४०७७८ इतकी आहे त्यानुसार वर्ष २०१३-१४ ची मागणी रक्कम रु.३४८४४८८४० इतकी होती सदर मागणी रक्कम वर्ष २०१४-१५ मध्ये चालू मागणी असणे आवश्यक असता २०१४-१५ या वित्तीय वर्षाची मागणी रक्कम रु.३४५५६६८५३/- इतकी दर्शविली आहे. म्हणजेच २०१४-१५ या वित्तीय वर्षामध्ये रक्कम २८८१९८७/- इतकी रक्कम प्रभागाने कमी दर्शविली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मोकळ्या जागांवर कर आकारणी केल्याचे आढळून आले नाही. व त्याबाबतचे कर आकारणी, मागणी व वसुलीचे लेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही. २०१३-१४ व २०१४-१५ या वित्तीय वर्षाअखेर मालमत्ता करापोटी धनादेशाद्वारे वसूल केलेल्या रक्कमांपैकी एकूण किती धनादेश न वटलेले होते व त्यात किती रक्कम गुंतलेली होती, याबाबतची माहिती व प्रभाग क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावर थकीत रक्कम असलेल्या मालमत्ता धारकांची यादी/ माहिती रक्कमेसह लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. प्रभाग क्षेत्रातील एकूण किती मोकळ्या जागा, जुन्या चाळी, घरे, इमारती पाडून त्याजागी नव्याने बांधलेल्या इमारतीना नवीन कर आकारणी लागू करणेपूर्वी तेथील इमारती/ मालमत्ताचा थकीत करांची वसुली केल्याबाबतचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

वसई-विरार शहर मनपाचे २०१३-१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात, नालासोपारा 'क' प्रभागाचे मालमत्ता कराची २०१३-१४ व २०१४-१५ या वित्तीय वर्षाअखेर खालीलप्रमाणे मोठया प्रमाणावर थकित रक्कम असल्याचे दिसून आले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.९८ दिनांक १३/०५/२०१६ अन्वये कळविले असता विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नाही. सबब लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

वर्ष २०१३-१४			**वर्ष २०१४-१५**		
अ.क्र.	तपशिल	रक्कम रु.	अ.क्र.	तपशिल	रक्कम रु.
०१	२०१२-१३ थकबाकी मागणी	२३७५२८५९५	०१	२०१३-१४ थकबाकी मागणी	२८८०७५३८८
०२	२०१३-१४ ची चालू मागणी	३२०४०८०६२	०२	२०१४-१५ ची चालू मागणी	३४५५६६८५३
०३	२०१३-१४ नव्याने आकारणी	२८०४०७७८	०३	२०१४-१५ नव्याने आकारणी	३००४८८४५

०४	एकूण मागणी	५८५९७७४३५	०४	एकूण मागणी	६६३६९१०८६
०५	२०१३-१४ मध्ये थकबाकी वसुली	७९३१३६२७	०५	२०१४-१५ मध्ये थकबाकी वसुली	१०५७४६२५०
०६	२०१३-१४ चालू मागणी वसुली	२१८५८८४२०	०६	२०१४-१५ चालू मागणी वसुली	२२४९७४०४६
०७	आगावू वसुली	निरंक	०७	आगावू वसुली	१०३०५७२१
०८	एकूण वसुली	२९७९०२०४७	०८	एकूण वसुली	३३०७२०२९६
०९	एकूण थकबाकी	२८८०७५३८८	०९	एकूण थकबाकी	३४३२७६११८
१०	वसुली टक्केवारी	५०.८४%	१०	वसुली टक्केवारी	४९.८३%

१) कर निरीक्षक , नालासोपारा प्रभाग यांनी लेखा परिक्षणांस सादर केलेल्या विवरणपत्रानुसार , अभिलेख्यानुसार २०१३-२०१४ या वित्तीय वर्षाकरीता मालमत्ता करांची एकुण मागणी रक्कम रुपये ५८५९७७४३५/- इतकी असून एकुण वसूली रुपये २९७९०२०४७/- आहे तर एकुण थकबाकी रक्कम रुपये २८८०७५३८८/- इतकी दर्शविली आहे. म्हणजेच वसूलीची टक्केवारी सुमारे ५०.८४% आहे. तर थकबाकीची टक्केवारी ४९.१६%आहे. तसेच २०१४-१५ या वर्षाकरीता मालमत्ता करांची एकुण मागणी रक्कम रुपये ६६३६९१०८६/- इतकी असून एकुण वसूली रुपये ३३०७२०२९६/- आहे तर एकुण थकबाकी रक्कम रुपये ३४३२७६११८/- इतकी दर्शविली आहे. म्हणजेच वसूलीची टक्केवारी सुमारे ४९.८३% आहे. तर थकबाकीची टक्केवारी ५०.१७% आहे.यावरून असे दिसून येते की, एकंदरीत वसूलीचे प्रमाण फारच कमी आहे. थकबाकीदारांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ८ कराधान नियम ४२ ते ४८ नुसार नोटीस पाठवणे , मालमत्ता ताब्यात घेणे/जप्त करणे, लिलाव करणे तसेच कर आकारणी प्रकरणांचे बाबत मोजमापे घेवून हरकती मागवून, बिले पाठविण्याची कामे वेळीच न झाल्याने आकारणी/मागणी करणे इ. सारखी कामे महानगरपालिका कर विभागाने त्या त्या वित्तीय वर्षात वेळीच केलेली नाहीत. कर वसुली संदर्भात अशी कारवाई न केल्याने वसूलीचे प्रमाण कमी होऊन महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नात घट झाली आहे.

२) नालासोपारा क प्रभागाची वरील तपशिलाप्रमाणे वर्ष २०१३-१४ ची चालू मागणी ३२०४०८०६२/- इतकी होती सदर मागणीत २०१३-१४ या वित्तीय वर्षामध्ये नव्याने कर आकारणी केलेल्या मालमत्तांची मागणी रक्कम रु.२८०४०७७८/- इतकी आहे त्यानुसार वर्ष २०१३-१४ ची मागणी रक्कम रु.३४८४४८८४०/- इतकी होती सदर मागणी रक्कम वर्ष २०१४-१५ मध्ये चालू मागणी असणे आवश्यक असता वर्ष २०१४-१५ ची मागणी रक्कम रु.३४५५६६८५३/- इतकी दर्शविली आहे. म्हणजेच वर्ष २०१४-१५ मध्ये रक्कम २८८१९८७ इतकी रक्कम प्रभागाने कमी दर्शविली आहे.

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मोकळ्या जागांवर कर आकारणी करणेचे आहे. महानगरपालिका क्षेत्रात अशा मोकळया जमिनी-जागा असल्याचे अभिलेखे व अशा मालमत्तावर कर आकारणी, मागणी व वसुलीचे लेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही.

३) २०१३-१४ या वित्तीय वर्षाअखेर मालमत्ता करापोटी धनादेशाद्वारे वसूल केलेल्या रक्कमांपैकी एकूण किती धनादेश न वटलेले होते व त्यात किती रक्कम गुंतलेली होती , याबाबतची माहिती व महानगरपालिका क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावर थकीत रक्कम असलेल्या मालमत्ता धारकांची यादी/माहिती रक्कमेसह लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे धनादेशाद्वारे प्राप्त झालेल्या

सर्व मालमत्ता कराच्या रक्कमा मनपा निधीत जमा झाल्याची व मोठ्या प्रमाणावर थकबाकी असलेल्या मालमत्ताधारकाकडून कर वसुलीसाठी केलेली कार्यवाही लेखा परीक्षणास अवगत झाली नाही.

४) महानगरपालिका क्षेत्रात एकूण किती मोकळ्या जागा , जुन्या चाळी, घरे, इमारती पाडून त्याजागी नव्याने बांधलेल्या इमारतीना नवीन कर आकारणी लागू करणेपूर्वी तेथील इमारती/ मालमत्ताचा थकीत करांची वसुली केल्याबाबतचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

DGPVTTM7001 (Ref No : 64, Hmm No : 98)

114 महानगरपालिका क्षेत्रातील मोबाईल टॉवरच्या मालमत्ता कराच्या कर आकारणीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन पत्र क्र.टीपीएस 1806/प्र.क्र.563/06/न.वि.-13 दि.07/08/2007 अन्वये अधिकृत / अनधिकृत मोबाईल टॉवर्सवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1966 नुसार नोटीस बजावुन मालमत्ता कर वसुली करण्याबाबत आदेश आहेत. परंतू मालमत्ता कर विभागाकडून त्याबाबतचा अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध झाला नसल्याने शासन आदेशानुसार अधिकृत/अनधिकृत मोबाईल टॉवर्सवर मालमत्ता कर निर्धारीत करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन पत्र क्र. टीपीएस 1806/प्र.क्र.563/06/न.वि.-13 दि.07/08/2007 अन्वये अधिकृत /अनधिकृत मोबाईल टॉवर्सवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1966 नुसार नोटीस बजावुन मालमत्ता कर वसुली करण्याबाबत आदेश आहेत. परंतू मालमत्ता कराच्या जमा रकमांची तसेच नविन कर निर्धारणाच्या प्रकरणांची पडताळणी करतांना अधिकृत / अनधिकृत मोबाईल टॉवर्सच्या नविन कर निर्धारणाची प्रकरणे लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आली नाहीत. त्यामुळे वसई विरार महानगरपालिकेच्या विरार “अ” प्रभागाच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेली मोबाईल टॉवर्सच्या मालमत्ता कराच्या आकारणी वसुली, नवीन कर निर्धारण यांच्या पडताळणीसाठी खालील अभिलेख लेखा परीक्षणास उपलब्ध करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.33 दि.17/03/2016 अन्वये विभागास कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून काहीही खुलासा प्राप्त झाला नाही.

1) महापालिका क्षेत्रातील अधिकृत / अनधिकृत मोबाईल टॉवरची संख्या.

2) 2012-13 मध्ये मान्यता देण्यात आलेले मोबाईल टॉवर व नवीन कर निर्धारणाची प्रकरणे.
3) वर्ष 2011-12 मधील मोबाईल टॉवर्सच्या मालमत्ता कराची थकबाकी, वर्ष 2012-13 ची मागणी, वर्ष 2012-13 मधील प्रत्यक्ष वसुली, वर्षाअखेर एकूण थकबाकीचा तपशिल.

विभागाकडून मोबाईल टॉवरच्या कर निर्धारणाचा अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आला नाही अथवा त्याबाबत लेखा परिक्षणास खुलासा करण्यात आला नसल्याने मोबाईल टॉवरचे मालमत्ता कर निर्धारण करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

FDSANMM7201 (Ref No : 69, Hmm No : 33)

115 वसई "आय" प्रभाग घरपटटी विभागाकडील जमा रकमांच्या तपासणीत आढळुन आलेल्या अनियमितांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 06

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 2839325.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2839325.00/-

राष्ट्रीय नगरपालिका लेखा नियम पुस्तीका 2004 मधील तरतुदीनुसार मालमत्ता विभागाचे लेखे खालीलप्रमाणे विहित नमुन्यात ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार विभागाकडून विहीत नमुन्यात लेखे ठेवण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही. विभागाकडून घरपट्टीच्या दैनंदिन जमा रकमांबाबत माहे मार्च- 2015 मधील दिवसाअखेर एकूण जमेची पोटकिर्द ठेवण्यात आलेली नाही. मार्च-15 मध्ये महिन्यामध्ये पावतीनिहाय जमा रकमांची संगणकावरील एकत्रित प्रत उपलब्ध करण्यात आली. सदर प्रतीवरुन दिवसाअखेर जमा झालेली एकूण रक्कम नोंदविण्यात आली नाही. दिवसाअखेर जमा रक्कम व भरणा चलनाची रक्कम यांचा मेळ घेवून चलनाची रक्कम योग्य असल्याबाबत खात्री करता आली नाही. विभागाकडून उपलबध करण्यात आलेली संगणकीय पोटकिर्दची प्रत संबधीत विभाग प्रमुखांकडून प्रमाणित करण्यात आलेली नाही.

वसई विरार महानगरपालिकेच्या विरार "अ" प्रभाग घरपट्टी विभागाचे 2013-14 व 2014-15 यावर्षाचे लेखापरिक्षण करतांना आढळुन आलेल्या अनियमिततांबाबत खुलासा करण्याबाबत अर्धसमासपत्र क्र.70 दि.05/04/2016 अन्वये विभागास कळविण्यात आले असता याबाबत विभागाने पत्र क्र.वविशम/कर/UV82/16-17 दि.12/04/2016 अन्वये सादर केलेला खुलासा पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) राष्ट्रीय नगरपालिका लेखा नियम पुस्तीका 2004 मधील तरतुदीनुसार मालमत्ता विभागाचे लेखे खालील

प्रमाणे विहित नमुन्यात ठेवणे आवश्यक आहे.

1) वसुली नोंदवही (नमुना सर्वसाधारण -11)

2) दैंनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसाधारण -12)

3) मागणी नोंदवही (नमुना सर्वसाधारण -20)

4) मागणी बील नोंदवही (नमुना सर्वसाधारण -20)

5) बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसाधारण -21)

6) नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसाधारण -23)

7) नोटीस फी, वारंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसाधारण - 24)

8) परतावा Remission व write off नोंदवही (नमुना सर्वसाधारण-25)

9) परतावा Remission गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसाधारण- 26)

10)काढुन टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसाधारण- 26)

11) Summary statement of Bills Raised (नमुना P & T-1)

12) Summary statement of Demand Adjustment Raised
(नमुना P &OT -2)

13) Summary statement of year wise Head wise collection
of Property & Other taxes (नमुना& OT -3)

14) Summary statement of Refunds & Remmissions (नमुना P &OT-4)

परंतु वसई "आय" प्रभाग घरपट्टी विभागाने वरिलप्रमाणे विहीत नमुन्यात लेखे ठेवलेले नाहीत. याबाबत वर्ष 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणात परिच्छेद क्र.53 अन्वये लेखा आक्षेप नोदविण्यात आला आहे. परंतू त्यानुसार विभागाकडून राष्ट्रीय नगरपालिका लेखा नियम पुस्तीका 2004 मधील तरतुदीनुसार मालमत्ता कराचे लेखे ठेवलेले नाहीत. याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये शासनाचे आदेशानुसार NMAM प्रमाणे ठेवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. परंतू स्थायी समितीच्या मान्यतेने सध्या महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नुसार लेख ठेवण्यात आले आहेत. असे नमूद केले आहे. सदर खुलाश्यावरुन आक्षेपाची पुर्तता होत नसल्याने खुलासा मान्य करता येत नाही.

2) वर्ष 2014-15 मध्ये घरपट्टी विभागाकडील दैनंदिन जमा रकमां प्रभागाकडील लेखा शाखेकडे भरणा करण्यात आल्या आहेत. परंतू अशा दैनंदिन जमा रकमांची हस्तलिखीत पोटकिर्द ठेवण्यात आलेली नाही. दैनंदिन जमा रकमांची पडताळणीसाठी विभागाकडून माहे मार्च 2015 या निवड महिन्यातील संगणक प्रणालीवरील जमा रकमांच्या नोंदींची एकत्रित प्रत लेखा परिक्षणास सादर करण्यात आली. परंतू दैनंदिन जमेची पोटकिर्द ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे दैनंदिन जमा रकम व भरणा चलनांनुसार लेखा शाखेकडे भरणा केलेली रक्कम यांचा मेळ घेता आला नाही. त्यामुळे भरणा चलनाची रक्कम योग्य असल्याबाबत खात्री करता आली नाही. याबाबत विभागाकडून खुलासा करतांना दैनंदिन जमेनुसार पोटकिर्द सादर केली नसल्याने भरणा चलनांच्या रकमांचा मेळ घेता आला नाही. त्यामुळे खुलाश्यावरुन आक्षेपाची पुर्तता होत नसल्याने खुलासा मान्य करता येत नाही. त्यामुळे माहे मार्च 2014-15 मधील दैनंदिन भरणा चलनांची रक्कम रु.28,39,325/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

6) वसई "आय" प्रभाग घरपट्टी वसुली विभागाकडून घरपट्टीची वसुली संगणकीकृत व हस्तलिखीत पावतीव्दारे वसुल केली असून रोख व धनादेशांन्वये केलेली वसुलीच्या रकमांच्या संगणक प्रणालीवरील माहे मार्च-15 मधील संगणकीकृत पोटकिर्द लेखा परिक्षणास पडताळणीस उपलब्ध करण्यात आल्या. परंतू अशी संगणक

प्रणालीवरील माहे मार्च-15 ची एकत्रित पोटकिर्द विभागाच्या संबधित कर्मचारी, अधिकारी यांनी साक्षांकीत करुन प्रमाणित केलेल्या नाहीत. त्यामुळे सदर संगणकीकृत एकत्रित पोटकिर्द मधील नोंदींच्या वैधतेची लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु.28,39,325/-

FDSANMM7201 (Ref No : 131, Hmm No : 70)

116 नालासोपारा 'क' प्रभागाचे पाणीपट्टी कर वसुली व थकबाकीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष : पाणीपट्टी मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 26902194.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 26902194.00/-

२०१४-१५ या वित्तीय वर्षाअखेर थकीत पाणीपट्टी रक्कम रु. २६५६८२९४/- ची वसुली प्रलंबित आहे. धनादेशाद्वारे वसूल केलेल्या खालील नळ कनेक्शनधारकांकडून धनादेश परत (बाउन्स) झालेनंतर दंडनीय रक्कमेसह पाणीपट्टी रक्कम रु.३३३९००/- संबंधित वर्षात वसूल केली नाही

वसई-विरार शहर मनपाचे २०१३-१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात, नालासोपारा 'क' प्रभागाची पाणीपट्टी कराची २०१३-१४ व २०१४-१५ या वित्तीय वर्षाअखेर खालीलप्रमाणे थकित रक्कम असल्याचे दिसून आले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.९९ दिनांक १३/०५/२०१६ अन्वये कळविले असता विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नाही. सबब लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

वर्ष	मागणी			वसूली			थकबाकी रक्कम रु.	टक्केवारी
	मागील रु.	चालू रु.	एकूण रु.	मागील रु.	चालू रु.	एकूण रु.		
२०१३-१४	१७८५७९९०	१३५४२२०१०	१५३२८००००	११७०४७९०	१२०७०६९२७	१३२४११७१७	२०८६८२८३	१३.६१%
२०१४-१५	२०८७६८२३	१३६२७६४५०	१५७१५३२७३	१२५१५८७३	११८०६९१०६	१३०५८४९७९	**२६५६८२९४**	१६.९१%

१) वरीलप्रमाणे वर्ष २०१४-१५ अखेर थकीत पाणीपट्टी रक्कम रु. २६५६८२९४/- ची वसुली प्रलंबित आहे. सदर प्रलंबित रक्कम वसुलीसाठी विभागाने वेळोवेळी नोटीसा देऊन, नळ कनेक्शन खंडित करून वसुली बाबत प्रयत्न केल्याचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

२) धनादेशाद्वारे वसूल केलेल्या खालील नळ कनेक्शनधारकांकडून धनादेश परत (बाउन्स) झालेनंतर

दंडनीय रक्कमेसह पाणीपट्टी रक्कम संबंधित वर्षात वसूल केली नसल्याचे आढळून आले आहे.

नांव	ग्राहक क्रमांक	पावती क्र/ दिनांक	धनादेश क्रमांक	रक्कम रु.	धनादेश परत चार्जेस (दंड)
वैकुंठ नगर सोसायटी	२०४३	३१२२/२७.३.१४	१००४६८	५००००	२००
आनंद वैभव सोसायटी	४९०४	३१०४/२६.३.१४	५०५५३६	२४४८०	२००
धमो बिल्डसे	९४५	३१५६/२९.३.१४	५०८२८३	५४७२०	२००
तारानाथ एन शेट्टी	४७४०	३१६३/२९.३.१४	६३४२९१	३६०००	२००
राजेंद्र राजकुमार मेहता	४८३९	२१६४/३१.१.१५	६४७७९२	९०००	२००
हावलूनगर सोसायटी	६८५	२५६७/२४.२.१५	१०००१६	३१६८० भरणा आहे	२००
ऋषिकेश सोसायटी	९२०	२०८९/२८.१.१५	२६८७०	३०२४०	२००
दीप आंगण अपार्टमेंट	३१६४	२८१३/७.३.१५	५४७३२६	३८१६० भरणा आहे	२००
साईनाग सोसायटी	३६६०	२९२३/२६.३.१५	५४२५१५	२१६००	२००
श्रीप्रस्था सोसायटी	१९२०	३०७७/२३.३.१५	१९२५०४	२१६००	२००
श्वेता अपार्टमेंट	१६१०	३१४३/२६३.१५	३९८३१७	१८०००	२००
दीप सागर अपार्टमेंट	२०६८	३१४८/२७.३.१५	४४८३५३	२३७६०	२००
रोटी हॉटेल	१६०५	३१५६/२७.३.१५	१४७७४	२७०००	२००
कामताप्रसाद यादव	४४५५	३१७६/३०.३.१५	८४०५७४	१४७००	२००
एकूण रक्कम				**३३११००**	**२८००**

तरी वरीलप्रमाणे पाणीपट्टी व धनादेश परत चार्जेस दंडाची एकूण रक्कम रु.३३३९०० वसुली झाली नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 65, Hmm No : 99)

117 नवघर-माणिकपूर ड प्रभागाचे पाणीपट्टी नळ कनेक्शन मंजुरीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 2

लेखा शीर्ष : पाणीपट्टी मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1230000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1230000.00/-

सिनिअर डिव्हिजनल इंजिनिअर पश्चिम रेल्वे यांनी वसई रेल्वे स्थानकालगतच्या १३ निवासी इमारतीतील एकूण २१६ सदनिकांना नळ जोडणी आकार महानगरपालिकेच्या दराऐवजी नगरपरिषदेच्या ठरावानुसार वसूल

केल्याने रक्कम रु.१२,३०,०००/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. इमारतीत असलेल्या निवासी व व्यापारी संख्येच्या प्रमाणात वाणिज्य व निवासी नळ कनेक्शन मंजूर केले जात नाहीत.

वसई-विरार मनपा २०१३-१४ व २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात नवघर-माणिकपूर ड प्रभागाकडील नळ कनेक्शन मंजूर प्रकरणे तपासणीत आढळून आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र.१०६ दिनांक २३/०५/२०१६ अन्वये विचारणा केली असता विभागाने पत्र क्र.वविशम १०८०/१६-१७ दिनांक ०३/०६/२०१६ अन्वये केलेला खुलासा विचारात घेता लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) सिनिअर डिव्हिजनल इंजिनिअर पश्चिम रेल्वे यांनी वसई रेल्वे स्थानकालगतच्या १३ निवासी इमारतीतील एकूण २१६ सदनिकांना नळ कनेक्शनची मागणी केली आहे. सदर अर्जात नळ कनेक्शन प्रकार व्यावसायिक दर्शविला आहे. सदर प्रकरणाच्या मंजूर टिप्पणीत १३ इमारतींना १३ नळकनेक्शन प्रती कनेक्शन रु.३००००/- प्रमाणे ३९००००/- नळजोडणी आकार १९५००/- नळजोडणी शुल्क व १३०००/- रस्ता खोदाई चार्जेस वसूल करून पाणीपट्टी निवासी दर रु.१२०/- प्रती सदनिका प्रती मासिक दराप्रमाणे नळ कनेक्शन आदेश क्र.२५१/२०/१३-१४ दिनांक ०४/३/२०१४ अन्वये मंजूर केले आहे. महानगरपालिका ठराव क्र.९ दिनांक ७/६/२०११ अन्वये नळजोडणी मागणी केलेली निवासी/घरगुती वापर असलेली मालमत्ता दिनांक २७/०५/११ पूर्वीपासून अस्तित्वात असल्यास व त्याचा पुरावा सादर केल्यानंतर मालमत्तेच्या प्रकारानुसार नळ जोडणी उपकराच्या दरामागे ५०% सवलत असेल असे आहे. सदर मालमत्तेचा निवासी वापर असल्याने सदर ठरावानुसार आर.सी.सी.इमारतीमधील प्रती सदनिका दर - एक खोली व स्वयंपाक घर रु.१००००/- , एक दिवाणखाना, एक खोली व स्वयंपाकघर रु.१५०००/- व एक दिवाणखाना , दोन किंवा अधिक खोली व स्वयंपाकघर रु.२००००/- असे आहेत त्यामुळे सर्वसाधारणपणे निवासी सदनिकांत किमान एक दिवाणखाना, एक खोली व स्वयंपाकघर अशी रचना असते याबाबतचा नकाशा नस्तीत उपलब्ध नाहीत त्यामुळे सदर १३ इमारतीतील २१६ निवासी सदनिकांत एक दिवाणखाना, एक खोली व स्वयंपाकघर असे गृहीत धरल्यास रक्कम रु. ३२,४०,०००/- (२१६x१५०००) इतकी नळजोडणी आकार रक्कम येते. तसेच सदर मालमत्ता दिनांक २७/०५/२०११ पूर्वीची असल्याने उपरोक्त नमूद ठराव क्र.९ दिनांक २७/०५/२०११ नुसार ५०% सवलतीनुसार नळजोडणी रक्कम १६,२०,०००/- इतकी येते. पाणीपुरवठा विभागाने सदरची बाब लक्षात न घेतल्याने मागील नगर परिषद दराने नळ जोडणी आकार रक्कम वसूल केल्याने सदर प्रकरणी किमान रक्कम रु. १२,३०,०००/-(१६२००००-३९००००) इतकी कमी नळ जोडणी आकार वसुली केल्याने आर्थिक नुकसान झाले आहे. विभागाने केलेल्या खुलाशात लाभधारक हा केंद्र सरकारच्या सेवेचा भाग असल्याने नगर परिषदेने केलेल्या ठरावानुसार नळ जोडणी रक्कम आकारलेली आहे. २०१३-१४ व २०१४-१५ या वित्तीय वर्षामध्ये मंजुरी दिलेल्या अन्य प्रकरणांत उपरोक्त नमूद महानगरपालिका ठराव क्र. ९ दिनांक ०७/६/२०११ नुसार नळ जोडणी आकार वसूल केला असल्याने रेल्वेच्या निवासी सदनिकांच्या बाबतीत

नगर परिषदेच्या ठरावाप्रमाणे नळ जोडणी आकार वसुली केला आहे. ही बाब संयुक्तिक नाही सबब किमान रक्कम रु.१२,३०,०००/- ची नळ जोडणी आकार रक्कम वसुली करणे आवश्यक आहे.
२) वसई विरार हद्दीतील इमारतीना नळ कनेक्शन मंजूर करताना कमीतकमी १० सदनिकांकरिता १ नळ कनेक्शन मंजूर करण्यात येते. निवासी संकुलातील व्यापारी/वाणिज्य बांधकामाचे क्षेत्रास परवानगी देताना विकास शुल्क रक्कम व्यापारी/वाणिज्य दराने वसूल केली जाते. तसेच पाणीपुरवठा विभागाने देखील अशा इमारतीतील वाणिज्य/व्यापारी गाळे यांचे संख्येनुसार नळजोडणी आकार वाणिज्य/व्यापारी दराने वसूल केला आहे. परंतु अशा व्यापारी गाळे/दुकाने यांच्या संख्येच्या प्रमाणात सोसायटीस/निवासी संकुलास नळ कनेक्शन मंजूर केले जाते. परंतु अशा मंजूर केलेल्या नळ कनेक्शनची पाणीपट्टीची रक्कम मात्र निवासी दराने वसुली केली जाते त्यामुळे महानगरपालिकेचे वर्षोनुवर्षे आर्थिक नुकसान होत आहे. उदाहरणार्थ नेमिनाथ होम्स या इमारतीत ७७ निवासी सदनिका असून ३२ व्यापारी दुकाने आहेत. सदर इमारतीस १० सदनिका/गाळे मागे १०९ सदनिका/गाळ्यांना १० नळ कनेक्शन मंजूर केले आहेत. निवासी व व्यापारी संख्येच्या प्रमाणात ७ निवासी दराचे कनेक्शन व ३ व्यापारी दराचे कनेक्शन मंजूर करून त्यानुसार निवासी व वाणिज्य दराने मासिक पाणीपट्टी आकारणे आवश्यक असता सर्व १० नळ कनेक्शनची पाणीपट्टी निवासी दराने वसूल केली जाते. विभागाने मंजूर नळ कनेक्शन जोडणी झाल्यानंतर सदनिका व व्यापारी गाळेधारक यांचेकडून माहिती घेतली जाते व त्याप्रमाणे पाणी बिल आकारले जाते असा खुलासा केला आहे. प्रभागाने अशाप्रकारे माहिती घेतल्याची नोंदवही ठेवली नसून नळ कनेक्शन मंजुरीबाबतचे कार्यादेश नळ जोडणी कारागीर यांना दिलेले नाहीत. तसेच नळ जोडणी कारागीर यांनी संबंधित इमारतींना एकूण किती नळ कनेक्शन जोडणी केले आहेत याचे अहवाल अथवा नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे विभागाने केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने मान्य करता येत नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 66, Hmm No : 106)

118 वसई ई प्रभागाचे पाणीपट्टी वसुली व नळ कनेक्शन मंजुरीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष : पाणीपट्टी मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ड
गुंतलेली रक्कम रु. 8000.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 8000.00/-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (२०११ सुधारणा) मधील प्रकरण ११ मधील कलम १३४ नुसार

महानगरपालिकेकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या दरांनी पाणीपट्टी आकार घेता येईल त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिका ठराव क्रमांक ९ दिनांक ७/६/२०११ मधील निर्णय क्र.२० नुसार पाण्याच्या वाणिज्यिक/ व्यावसायिक/ औद्योगिक वापरासाठीचे सद्याच्या दरामध्ये १००% वाढ करून दुप्पट दराने पाणीपट्टी आकारणी वसुली करण्याचे आहे. तथापि अशी कार्यवाही विभागाने केली नसल्याचे दिसून आले आहे. मे. साईराज बिल्डर्स आणि डेव्हलपर्स च्या गुरुमाऊली इमारत, किरीट संघवी (कंपनी), शंकर मोरेश्वर चौधरी (चौधरी होम्स ए विंग) व पी कवळी डेव्हलपर्स ग्रीन व्हयू बी विंग इत्यादी इमारतींचे भोगवटा प्रमाणपत्र नसताना नळ कनेक्शन मंजूर करून दिले आहेत. नळ कनेक्शन मंजूर करताना रक्कम रु.१०००/- प्रमाणे प्रती कनेक्शन रस्ता खोदाई शुल्क वसूल करण्याचे असताना वसई प्रभागात प्रती खड्डा रु.१०००/- प्रमाणे रस्ता खोदाई चार्जेस वसूल केले नाहीत. प्रभागात मंजूर केलेल्या नळ कनेक्शनचे मंजुरी आदेश निर्गमित केले नसून लायसन्सदार/नळ कारागीर यांस कार्यादेश दिल्याचे व त्यांनी तितकेच नळ कनेक्शन बसविल्याचे अहवाल प्रभागास सादर केले नाहीत.

वसई-विरार शहर मनपाचे वर्ष २०१३-१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात, वसई ई प्रभागाकडील पाणीपट्टी व वसुली नळ कनेक्शन मंजुरीबाबतची प्रकरणे तपासता खालील अनियमितता आढळून आल्या आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्र.११३ दिनांक ३०/०५/२०१६ अन्वये विचारणा केली असता विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नाही. सबब लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१)मे. साईराज बिल्डर्स आणि डेव्हलपर्स च्या गुरुमाऊली इमारत ग्राहक क्र.४६७३ व ४६८२ च्या नळ कनेक्शन मंजूर टिप्पणीत मागणी केलेले नळ कनेक्शन ५ असून मंजूर केलेल्या कनेक्शन संख्येबाबत उल्लेख नाही. ३१ सदनिका व १५ दुकाने गाळे करीता एकूण ५ कनेक्शन दिले आहेत त्यापैकी निवासी व वाणिज्य कनेक्शन किती याचा तपशिल टिप्पणीत नमूद करून कनेक्शन मंजूर केले नाहीत. तथापि २ नळ कनेक्शन वाणिज्य व ३ निवासी कनेक्शन जोडल्याचे कनेक्शन नोंदवही व मागणी बिलाचे नोंदवहीवरून दिसून आले. वाणिज्य नळ कनेक्शन पाणीपट्टी मासिक दर रु.५००/- प्रती दुकाने व घरगुती वापराकरीता पाणीपट्टी मासिक दर रु.१००/- प्रती सदनिका याप्रमाणे वसूल करण्यात येत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (२०११ सुधारणा) मधील प्रकरण ११ मधील कलम १३४ नुसार महानगरपालिकेकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या दरांनी पाणीपट्टी आकार घेता येईल त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिका ठराव क्रमांक ९ दिनांक ७/६/२०११ मधील निर्णय क्र.२० नुसार पाण्याच्या वाणिज्यिक/ व्यावसायिक/ औद्योगिक वापरासाठीचे सद्याच्या दरामध्ये १००% वाढ करून दुप्पट दराने पाणीपट्टी आकारणी वसुली करण्याचे आहे. तथापि अशी कार्यवाही विभागाने केली नसल्याचे दिसून आले आहे. वसई प्रभागात खाली तपशिलात दर्शविल्याप्रमाणे वाणिज्यिक/व्यावसायिक/औद्योगिक वापर कनेक्शन असून त्याची पाणीपट्टी वसुली सदर ठरावाप्रमाणे करण्यात येत नसल्याने वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये खालीलप्रमाणे पाणीपट्टी वसुलीच्या दराप्रमाणे रक्कम रु. २१००००००/- इतके आर्थिक नुकसान झाले आहे.

तपशिल	**१/२" व्यावसायिक**	**३/४" व्यावसायिक**	**१" व्यावसायिक**	**१/२" औद्योगिक**	**१" औद्योगिक**

				1	
१३-१४ एकूण कनेक्शन संख्या	२६	३२	१	४	३१
१४-१५ एकूण कनेक्शन संख्या	२८	३२	१	४	३१
जुना न.प. दर	५००	७५० १००० १५००	१५००	५००	१५००
नवीन मंजूर दर (दुप्पट)	१०००	१५०० २००० ३०००	३०००	१०००	३०००
दरातील फरक	५००	७५०	१५००	५००	१५००
आर्थिक नुकसान	३२४०००	५७६०००	३६०००	४८०००	१११६०००

२) खालील नळ कनेक्शन नस्ती तपासता संबंधित इमारतींचे भोगवटा प्रमाणपत्र नसताना नळ कनेक्शन मंजूर करून दिले आहेत. भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या इमारती अनधिकृत समजण्यात येतात. सबब अशा इमारतींना कनेक्शन दिलेबाबत व त्याचे पाणीपट्टी मासिक दराबाबत मनपाचे काय आदेश आहेत याबाबत लेखा परीक्षणास खुलासा केला नाही.

१. मे. साईराज बिल्डर्स आणि डेव्हलपर्स च्या गुरुमाऊली इमारत

२. किरीट संघवी (कंपनी)

३. शंकर मोरेश्वर चौधरी (चौधरी होम्स ए विंग)

४. पी कवळी डेव्हलपर्स ग्रीन व्ह्यू बी विंग इमारत

३) नळ कनेक्शन मंजूर करताना प्रती नळ कनेक्शन रक्कम रु.१०००/- प्रमाणे रस्ता खोदाई शुल्क वसूल करण्याचे असताना वसई प्रभागात प्रती खड्डा रु.१०००/- प्रमाणे रस्ता खोदाई चार्जेस वसूल केले नाहीत.

उदा.

१. मे. साईराज बिल्डर्स आणि डेव्हलपर्स च्या गुरुमाऊली इमारत ५ कनेक्शनचे रु.५०००/- वसुली केली नाही.

२. किरीट संघवी (कंपनी) १ कनेक्शनचे रु.१०००/- वसुली केली नाही.

३. शंकर मोरेश्वर चौधरी (चौधरी होम्स ए विंग) २ नळ कनेक्शनचे रु.२०००/- वसुली केली नाही वरीलप्रमाणे ज्या मालमत्तांना नळ कनेक्शन मंजूर केले आहेत व रस्ता खोदाई चार्जेस रु.१०००/- प्रमाणे वसुली केले नाहीत.

४) प्रभागात मंजूर केलेल्या नळ कनेक्शनचे मंजुरी आदेश निर्गमित केले नसून लायसन्सदार/नळ कारागीर यांस कार्यादेश दिल्याचे व त्यांनी तितकेच नळ कनेक्शन बसविल्याचे अहवाल प्रभागास सादर केले नसल्याचे लेखा परीक्षणात आढळून आले आहे.

DGPVTTM7001 (Ref No : 77, Hmm No : 113)

119 वसई 'ई' प्रभागाचे पाणीपट्टी कर वसुली व थकबाकीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : पाणीपट्टी मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 4290540.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 4290540.00/-

वसई "ई" प्रभागाची वर्ष २०१४-१५ अखेर पाणीपट्टी थकबाकी रक्कम रु. ४२९०५४०/- ची वसुली होणे प्रलंबित आहे. धनादेशाद्वारे वसूल केलेल्या पाणीपट्टीच्या रक्कमांचे धनादेश कनेक्शनधारकांकडून धनादेश बँकेकडून न वटल्याने दंडनीय रक्कमेसह पाणीपट्टीची रक्कम संबंधित वर्षात वसूल केल्याबाबतची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. महानगरपालिका ठराव क्रमांक ९ दिनांक ७/६/२०११ मधील निर्णय क्र.२० नुसार पाण्याच्या वाणिज्यिक/व्यावसायिक/औद्योगिक वापरासाठीचे सद्याच्या दरामध्ये १००% वाढ करून दुप्पट दराने पाणीपट्टी आकारणी करून वसुली केलेली नाही.

वसई-विरार शहर मनपाचे वर्ष २०१३-१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात, वसई 'ई' प्रभागाची पाणीपट्टी कराची वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ अखेर खालीलप्रमाणे थकित रक्कम असल्याचे दिसून आले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.११४ दिनांक ३०/०५/२०१६ अन्वये विचारणा केली असता विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नाही. सबब लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

वर्ष	मागणी			वसूली			थकबाकी रक्कम रु.	वसूली टक्केवारी
	मागील रु.	चालू रु.	एकूण रु.	मागील रु.	चालू रु.	एकूण रु.		
२०१३-१४	२२८५८२५	१४१८६६२५	१६४७२४५०	६६०७६०	११६३४४००	१२२९५१६०	४१७७२९०	७४.६४%
२०१४-१५	४१७६२९०	१४३७८७९०	१८५५५०८०	२०२५८७६	१२२३८६६४	१४२६४५४०	४२९०५४०	७६.८८%

१) उपरोक्त तपशिलात दर्शविल्याप्रमाणे शाखा अभियंता पाणीपुरवठा विभाग वसई ई प्रभागाने लेखा परीक्षणास थकबाकी विवरणपत्रे सादर केली असून वर्ष २०१३-१४ च्या विवरणपत्रात अखेरची थकबाकी रक्कम रु. ४१७७२९०/- असताना वर्ष २०१४-१५ च्या थकबाकी विवरणपत्रात सुरुवातीची मागील शिल्लक रक्कम रु.४१७६२९०/- दर्शविल्याने थकबाकी रक्कमेत रक्कम रु.१००००/- कमी दर्शविले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०११ मधील प्रकरण १० मधील नियम १२ नुसार पाणीपट्टी थकबाकीदारांवर नियमानुसार कारवाई केल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे थकबाकी रक्कमेत वाढ दिसून येत आहे. तरी वरीलप्रमाणे वर्ष २०१४-१५ अखेर थकीत पाणीपट्टी रक्कम रु. ४२९०५४०/- ची वसुली प्रलंबित असल्याने सदरची रक्कम वसुलीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.
२) धनादेशाद्वारे वसूल केलेल्या खालील नळ कनेक्शनधारकांकडून धनादेश परत (बाउन्स) झालेनंतर

दंडनीय रक्कमेसह पाणीपट्टी रक्कम संबंधित वर्षात वसूल केली असल्याबाबतची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. उदाहरणदाखल खालील पावत्यांद्वारे वसूल पाणीपट्टीचे धनादेश परत झाले आहेत.

पावती क्र/ दिनांक	रक्कम रु.
३६१/२९.३.१४	१८०००
३५३/२९.३.१४	१५६००
३३३/२९.३.१४	९६००
५५८/२५.३.१५	३०००
२१८/२४.३.१५	१५००

3) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (२०११ सुधारणा) मधील प्रकरण ११ मधील कलम १३४ नुसार महानगरपालिकेकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या दरांनी पाणीपट्टी आकार घेता येईल त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिका ठराव क्रमांक ९ दिनांक ७/६/२०११ मधील निर्णय क्र.२० नुसार पाण्याच्या वाणिज्यिक/व्यावसायिक/औद्योगिक वापरासाठीचे सद्याच्या दरामध्ये १००% वाढ करून दुप्पट दराने पाणीपट्टी आकारणी वसुली करण्याचे आहे. तथापि प्रभागाने/विभागाने वाढीव दराने पाणीपट्टी आकारणी करून वसुलीची कार्यवाही केली नसल्याचे दिसून आले आहे. वसई प्रभागात वाणिज्यिक/व्यावसायिक/औद्योगिक वापराचे नळ कनेक्शन असून त्याची पाणीपट्टी वसुली सदर ठरावातील वाढीव दराने करण्यात येत नसल्याने वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये पाणीपट्टी वसुलीत जुन्या दराप्रमाणे पाणीपट्टी वसुली केली जात असल्याने आर्थिक नुकसान होत आहे.

DGPVTTM7001 (Ref No : 78, Hmm No : 114)

120 नवघर-माणिकपूर 'ड' प्रभागाचे पाणीपट्टी कर वसुली व थकबाकीबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015
No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष : पाणीपट्टी मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 11522302.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 11522302.00/-

नवघर-माणिकपूर "ड" प्रभागाची वर्ष २०१४-१५ अखेर पाणीपट्टी थकबाकी रक्कम रु. ११५२२३०२/- ची वसुली होणे प्रलंबित आहे. महानगरपालिका ठराव क्रमांक ९ दिनांक ७/६/२०११ मधील निर्णय क्र.२० नुसार पाण्याच्या वाणिज्यिक / व्यावसायिक / औद्योगिक वापरासाठीचे सद्याच्या दरामध्ये १००% वाढ करून दुप्पट दराने पाणीपट्टी आकारणी करून वसुली केलेली नाही.

वसई-विरार शहर मनपाचे वर्ष २०१३-१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात, नवघर-माणिकपूर 'ड' प्रभागाची पाणीपट्टी कराची वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ अखेर खालीलप्रमाणे थकित रक्कम असल्याचे दिसून आले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.११५ दिनांक १६/०५/२०१६ अन्वये विचारणा केली असता विभागाने त्यांचे पत्र क्र.वविशम११४७/१६/१७ दिनांक ७/६/२०१६ अन्वये खुलासा केला असून सदर खुलासा विचारात घेवून लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

वर्ष	मागणी			वसूली			थकबाकी रक्कम रु.	वसुली टक्केवारी
	मागील रु.	चालू रु.	एकूण रु.	मागील रु.	चालू रु.	एकूण रु.		
२०१३-१४	८२३६२००	६८८७८७८०	७७११४९८०	२१९५६९०	६२९३८८७०	६५१६४५६०	११९५०४२०	८४%
२०१४-१५	१३५४१३२०	७०५१४०४०	८४०५५३६०	९८९५५९०	६२६३७४६८	७२५३३०५८	११५२२३०२	८६%

१)उपरोक्त तपशिलात दर्शविल्याप्रमाणे पाणीपुरवठा विभाग नवघर-माणिकपूर "ड" प्रभागाची पाणीपट्टी थकबाकी आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०११ मधील प्रकरण १० मधील नियम १२ नुसार पाणीपट्टी थकबाकीदारांवर नियमानुसार कारवाई केल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे थकबाकी रक्कमेत वाढ दिसून येत आहे. तरी वरीलप्रमाणे वर्ष २०१४-१५ अखेर थकीत पाणीपट्टी रक्कम रु. ११५२२३०२/- ची वसुली प्रलंबित असल्याने सदरची रक्कम वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक आहे. विभागाने सादर केलेल्या खुलाशानुसार वसुली मोहिमेंतर्गत बंद करण्यात आलेल्या नळधारकांची थकबाकी रु.६७८११७/- असून रेल्वेची थकबाकी रक्कम रु.३३८४००/- इतकी आहे तर दुबार नोंदीबाबतची निर्लेखित प्रस्ताव थकबाकी रक्कम रु.८१६००/- असल्याचे कळविले आहे. तथापि रक्कमेची वसुली झाली नसल्याने खुलासा मान्य करता येत नाही.

२)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (२०११ सुधारणा) मधील प्रकरण ११ मधील कलम १३४ नुसार महानगरपालिकेकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या दरांनी पाणीपट्टी आकार घेता येईल त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिका ठराव क्रमांक ९ दिनांक ७/६/२०११ मधील निर्णय क्र.२० नुसार पाण्याच्या वाणिज्यिक/व्यावसायिक/औद्योगिक वापरासाठीचे सद्याच्या दरामध्ये १००% वाढ करून दुप्पट दराने पाणीपट्टी आकारणी वसुली करण्याचे आहे. तथापि प्रभागाने/विभागाने वाढीव दराने पाणीपट्टी आकारणी करून वसुलीची कार्यवाही केली नसल्याचे दिसून आले आहे. नवघर-माणिकपूर प्रभागात वाणिज्यिक/व्यावसायिक/औद्योगिक वापराचे नळ कनेक्शन असून त्याची पाणीपट्टी वसुली सदर ठरावाप्रमाणे करण्यात येत नसल्याने वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये पाणीपट्टी वसुलीत जुन्या दराप्रमाणे पाणीपट्टी वसुली केल्याने आर्थिक नुकसान होत आहे. अर्धसमास पत्राच्या अनुषंगाने विभागाने केलेल्या खुलाशात वसई विरार शहर महानगरपालिकेने (पाणी पुरवठा व विशेष) पाणीपट्टी उपविधी सन २०११ या पारित केलेल्या उपविधीस शासनाची मान्यता असल्याने अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे सद्यस्थितीत तत्कालीन नगरपरिषद व ग्रामपंचायत कालावधीतील दरानेच पाणीपट्टी आकारण्यात येत आहे हा केलेला खुलासा विसंगत असल्याने मान्य करता येत नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 79, Hmm No : 115)

121 कर्ज निवारण निधी बाबत

कर्ज निवारण निधी

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 202596456.00 /-

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 188 नुसार नमुना क्र.143 मध्ये कर्जाची नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 115 नुसार कर्ज निवारण निधीची वार्षिक तपासणी मा.संचालक स्थानिक निधी लेखा परीक्षा यांना करता आली नाही. महानगरपालिकेने 2013-14 व 2014-15 मध्ये कर्जाची परतफेड केली आहे. परंतु संबंधित नोंदवही नसल्याने केलेली परतफेड बरोबर असल्याची पडताळणी करता आली नाही. अभिलेखे नसल्याने महापालिकेने घेतलेले कर्ज, परतफेड केलेली रक्कम उपर्जित व्याजाची रक्कम, थकबाकी इत्यादी बाबींचे लेखापरीक्षण करता आले नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 109 व 112 नुसार कर्ज निवारण निधी स्थापन करणे आवश्यक आहे. महापालिकेने कर्ज निवारण निधी स्थापन केला असून त्याबाबतचे स्वतंत्र रोकडवही लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली. महानगरपालिकेची स्थापना 03 जुलै 2009 रोजी झाली. पुर्वीच्या काळातील वसई, नवघर माणिकपूर, नालासोपारा, विरार या नगरपरिषदा व 53 गावे महापालिकेत समाविष्ट करण्यात आली. या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.117दि.02/06/16 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचे पत्र क्र.निरंक, दि.28/06/16 नुसार खुलासा केला आहे. तो विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत. महानगरपालिका स्थापन होण्यापूर्वीच्या नगरपरिषदांनी वेळोवेळी घेतलेली कर्जे, ग्रामपंचायतींनी घेतलेली कर्जे याची परतफेड करण्याचे दायित्व महानगरपालिकेचे आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 188 नुसार नमुना क्र.143 मध्ये कर्जाची नोंदवही ठेवायची आहे. त्यासाठी वेगवेगळ्या पृष्ठावर कर्जाच्या प्रकारानुसार नोंदी घेऊन साक्षांकित करावयाच्या आहेत. परंतु कर्जाचे पुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाही. त्यामुळे पुर्वीपासून घेतलेली कर्जे, नव्याने घेतलेली कर्जे, त्याची केलेली परतफेड, आणि शिल्लक असलेल्या कर्जाचे दायित्व लेखा परीक्षणास पडताळून पाहता आले नाही.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 115 नुसार कर्ज निवारण निधीची वार्षिक तपासणी मा.संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालयाकडून करावयाची आहे. परंतु सदर निधीची हिशेब व नमुना क्र.143 मध्ये ठेवलेले कर्जाचे पुस्तक लेखा परीक्षणास न दाखवल्याने महापालिकेच्या स्थापनेपासुन वार्षिक तपासणी झालेली नाही. सबब सदर कलमातील अनुक्रमांक 05 व 06 नुसार लेखा परीक्षा कार्यालयाला आवश्यक ते प्रमाणपत्र देता आले नाही. महापालिकेने MMRDA कडून दिर्घ मुदतीसाठी कर्जे घेतली आहेत. MMRDA ने ठरवून दिलेला कर्ज हफ्ता (मुद्दल

+ व्याज) वेळोवेळी भरणा केल्याचे संबंधित रोकडवहीवरुन दिसून येते. परंतु कर्जाची नियत दिनांकास परतफेड केल्याबाबतची खात्री संबंधित नमुना क्र.143 मधील नोंदवही नसल्याने करता आली नाही.

2) महापालिकेने लेखापरीक्षण काळात पुढीलप्रमाणे कर्जाची परतफेड केली आहे.

2013-14

प्र.क्र.	दिनांक	रक्कम	तपशिल
01	28.06.2013	2,18,88,741	MMRDA यांना प्रदान सूर्या पाणी पुरवठा योजनाअंतर्गत महापालिकेतील नवघर माणिकपूर, नालासोपारा, विरार विभागाने घेतलेल्या कर्जाचा जून 2013 चा हफ्ता
02	28.06.2013	52,29,266	MMRDA यांना प्रदान ऊसगांव पाणी पुरवठ्याचे अंतर्गत विरार, नालासोपारा, नवघरमाणिकपूर यांनी घेतलेल्या कर्जाची जून 13 चा हफ्ता
03	29.07.2013	27,56,233	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वसई नगरपरिषदेने घेतलेल्या कर्जाचा जून 13 चा हफ्ता
04	29.07.2013	72,750	-//-
05	30.09.2013	2,43,74,246	MMRDA यांना प्रदान सूर्या प्रकल्प विरार, नवघर माणिकपूर आणि नालासोपारा यांनी घेतलेल्या कर्जाचा माहे सप्टेंबर 13 चा हफ्ता
06	30.12.2013	2,43,74,246	MMRDA यांना प्रदान सूर्या प्रकल्प विरार, नवघर माणिकपूर आणि नालासोपारा यांनी घेतलेल्या कर्जाचा माहे डिसेंबर 13 चा हफ्ता
07	30.12.2013	52,29,266	MMRDA यांना प्रदान ऊसगांव पाणी पुरवठा योजनेसाठी घेतलेल्या कर्जाचा डिसेंबर 13 चा हफ्ता
08	28.03.2014	2,43,74,246	MMRDA यांना प्रदान सूर्या प्रकल्पासाठी पाणी पुरवठा योजनेसाठी घेतलेल्या कर्जाचा मार्च 14 चा हफ्ता
09	31.03.2014	4,40,674	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाणी पुरवठा योजनेसाठी आयुर्विमा कर्जावरील हमी शुल्काची रक्कम

2014-15

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम	तपशिल
01	27.06.2014	1,63,17,830	MMRDA यांना प्रदान सूर्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत वसई विभागाने घेतलेले कर्ज, जून 14 चा हफ्ता
02	27.06.2014	52,29,266	MMRDA यांना प्रदान सूर्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत नवघर माणिकपूर, नालासोपारा, विरार विभागाने घेतलेले कर्ज, जून 14 चा हफ्ता
03	29.09.2014	2,23,60,142	MMRDA यांना प्रदान सूर्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत

			वसई विभागाने घेतलेले कर्ज, सप्टेंबर 14 चा हफ्ता
04	30.12.2014	2,23,60,142	MMRDA यांना प्रदान सूर्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत वसई, विरार, नवघर माणिकपूर, नालासोपारा विभागाने घेतलेले कर्ज, डिसेंबर 14 चा हफ्ता
05	30.12.2014	52,29,266	MMRDA यांना प्रदान सूर्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत वसई, विरार, नवघर माणिकपूर, नालासोपारा विभागाने घेतलेले कर्ज, डिसेंबर 14 चा हफ्ता
06	30.03.2015	2,23,60,142	MMRDA यांना प्रदान सूर्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत वसई, विरार, नवघर माणिकपूर, नालासोपारा विभागाने घेतलेले कर्ज, मार्च 15 चा हफ्ता

या परतफेडीच्या नोंदी कर्जाची नोंदवही नसल्याने पडताळून पाहता आल्या नाहीत.

3) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार कर्ज निवारण निधीमध्ये आवश्यक असलेले अंशदान महानगरपालिकेने दिले पाहिजे आणि त्यातून कर्ज निवारण कामी खर्च केला पाहिजे. परंतु संबंधित अभिलेखे उदा. घेतलेले कर्ज, परतफेड केलेली रक्कम, उपर्जित व्याजाची रक्कम, थकीत रक्कम, इत्यादी बाबी उपलब्ध न झाल्याने कर्ज निवारण निधीचे लेखापरीक्षण करता आले नाही.

DATPMVM6001 (Ref No : 70, Hmm No : 117)

122 महानगरपालिकेने केलेल्या गुंतवणुकांबाबत.

गुंतवणुका बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2013-2014 ते 2014-2015

No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 5726835208.00 /-

सहकारी बँकेत गुंतवणूक करण्यापूर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 92 नुसार शासनाची मंजुरी घेतली नाही. गुंतवणूक नोंदवही नमुना क्र.142 मधील नोंदी सक्षम प्राधिकाऱ्याने साक्षांकित केल्या नाहीत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 187 नुसार नमुना क्र.142 मधील पुस्तकात स्तंभ क्र.(1) ते (3) समोर लाल शाईने रक्कम काढल्याचा तपशिल नमुद केलेला नाही.

महानगरपालिकेने 22 निधींची वेळोवेळी गुंतवणुक केल्याचे दिसून आले. यासाठी गुंतवणूक नोंदवहीची तपासणी करता त्यात दिनांक 31/03/2014 व दिनांक 31/03/2015 अखेर पुढील प्रमाणे गुंतवणुका

असल्याचे आढळून आले.

	दि.31/03/2014	दि.31/03/2015
निधीचे नाव	शिल्लक	शिल्लक
नगररचना	401562243	210027260
नगररचना विकास निधी	1804764877	409035351
मागासवर्गीय कल्याण निधी	38729	42006
सर्वसाधारण निधी	487454206	341314
अनामत ठेवी	233838294	269837370
प्राथमिक सोयी सुविधा	105100932	172111607
वैशिष्ट्यपूर्ण कामे निधी	14236592	15414962
अग्निसुरक्षा निधी	255847261	277826305
दलितवस्ती सुधारणा निधी	13963804	14834531
स्थानिक विकास निधी	55418995	54343513
स्थानिक संस्था कर	418176338	16125671
बारावा वित्त आयोग	1034798	881531
